# ..पंढरी संदेश

श्रीक्षेत्र पंढरपूर

किंमत ११ रुपये



श्रीसमर्थ पंचायतन

दिवाळी विशेषांक १९८

# अनुक्रमणिका


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी ध्यान ८

संपादकीय १०

रंगनाथस्वामी निगडीकर जीवनपट ११
म प पेठे

श्रीसाधुश्रेष्ठ रंगनाथस्वामी निगडीकर १३
दा. का. थावरे

श्रीरंगनाथस्वामींचे संतस्तवन ३०

संत आणि समर्थ संप्रदायातील साम्य ३३
जगन्नाथमहाराज पवार

आनंद संप्रदाय आणि दास पंचायतन ४१
डॉ भीमाशंकर देशपांडे

गिरिधर स्वामी विरचित
'पारिजातक नाटक पुष्प' ४९
डॉ सौ. विशाखा त्रि टुमण

श्रीरंगनाथस्वामींच्या समाधी स्थानाचे कार्य ५८
तु. दि. गोसावी

श्री शिवाजी महाराज व दास पंचायतन ६०
अशोक देशपांडे

राजयोगी रंगनाथस्वामी निगडीकर
यांचा अल्प परिचय ६८
रंगनाथ वामन टण्णू

राजयोगी संत रंगनाथस्वामी निगडीकर ७२
ना वि बडवे

समर्थ पंचायतन वारकरी संप्रदायाचे एक अंग ७६
विठ्ठलबाबा धुळे

रंगनाथस्वामी व वारकरी संत ८०
भा पं. बहिरट

रंगनाथस्वामी निगडीकर
यांच्या आरत्या एक अवलोकन ८८
शोभना डिंगरे

देहबुद्धी सरुन आत्म बुद्धीने सुखानंद प्राप्ती !
रंगनाथ - योगवासिष्ठचातील अध्यात्म विचार ९१
प्रा. नरेंद्र कुंटे

जयरामस्वामी वडगांवकर जीवनपट ११९
म प. पेठे

श्रीविठ्ठल भक्त जयरामस्वामी वडगावकर ११३
डॉ गो गो. बणारे

मनाच्या उपदेशाचे वैशिष्ट्य १२६
नारायणशास्त्री नाझरकर

समर्थ पंचायतन १३०
धुंडामहाराज देगलूकर

श्रीक्षेत्र निगडी (निर्गुणपर) एक दर्शन १३४
श्रीकांत डोईफोडे

श्रीक्षेत्र नाझरे एक दर्शन १३८
मु बा. देशपांडे

श्रीकेशवस्वामींची गुरुभक्ती १४०
प्र ल वर्वे

केशवस्वामी भागानगकर जीवनपट १४५
म. प. पेठे

राम रंगी रंगली १४६

केशवाची वाणी ए का. थावरे

सेलूकर महाराज जीवन चरित्र १४९
ल. कृ. सेलुकर

आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर जीवनपट १६१
म. प पेठे

सद्गुरु आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर १६२
सौ. प्र. श्री. देशपांडे

देवाजीला आवडते १६८
योगेश्वर अभ्यंकर

श्रीरंगनाथस्वामी महाराज
निगडीकरांचा चतुराक्षरी मंत्र १७४
प्र द. निकते


## चित्रसूची


ज्ञानपुरीचे श्रीविठ्ठल मंदिर कृष्णा काठ ३१

श्रीरंगनाथस्वामींच्या अश्वानें देह विसर्जीत
केला तो कृष्णाकाठचा ज्ञानपुरी घाट ३८

श्रीरंगनाथस्वामी महाराज समाधी स्थान निगडी ८

रंगनाथस्वामींच्या अश्वाचे खूर १५८

निगडी मंदिर परिसर १७६

# श्रीरंगनाथस्वामी महाराज निगडीकरांचा चतुराक्षरी मंत्र

— प्र. द. निकते

पंचायतन म्हणजे पांच देवतांचा समुदाय शिव, विष्णु, सूर्य, गणपती व देवी हाच तो पाच देवतांचा समुदाय या पंचायतन कल्पनेचा उगम श्रीशंकराच यांच्या काला पासून झाला. ही कल्पना त्यांना पृथ्वी, आपतेज, वायू व व आकाश या सृष्टीतल्या पंचतत्त्वावरुन सुचली असे म्हणतात.

पंचायतन म्हणजे एकचित्त असे पाचजण असा ही त्याचा अर्थ आहे. या अर्थाशी सुसंगत असे समर्थ रामदास कालीन एक चित्त असणारे थोर संत पुरुष अर्थात साधु म्हणजे श्रीजयरामस्वामी वडगावकर व रंगनाथस्वामी निगडीकर श्रीकेशवस्वामी भागानगरकर, श्रीआनंदस्वामी ब्रह्मनाळकर आणि स्वत: श्रीसमर्थ रामदासस्वामी.

या सर्व साधुचे जीवन भक्तीरसाने परिपूर्ण भरलें आहे अनेक अद्‌भुत लिलांचे त्यात ठायी ठायी दर्शन घडते आहे. आणि उपदेशांमृताचा सतत वर्षाव होत आहे.

अशा या थोर समर्थ पंचायतनात श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांच्या पुण्यस्मरणास येत्या मार्गशीर्ष वद्य १० मीस तीनशे वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून त्यांच्या काव्य-मय विचाराचे हे अल्पसे दर्शन

श्रीरंगनाथस्वामी निगडीकराचे एक अत्यंत सुंदर पद आहे. त्यापदात समर्थ रामदासस्वामीचे वर्णन असुन समर्थाच्या अगम्य सामर्थ्याची कल्पना त्यातुन व्यक्त होते. ते पद वाचतांना समर्थ रामदास स्वामींच्या विषयी रंगनाथ स्वामीच्या मनीमानसी किती उत्कट प्रेम होते, आदर होता. याची प्रचिती येते तसेच त्यांचें चित्त समर्थांशी कसे एकरुप झालें होते याचा ही अनुभव येतो.

या पदाची रचना मोठी सुंदर व नाविन्यपूर्ण आहे पदाच्या कडव्यातील प्रत्येक चरणात जे पहिले अक्षर तेच शेवटचे अक्षर आहे या प्रमाणें चार कडवी व त्यांची चार चरणें मिळून 'रामदास' हें नाव आठवेळा येतें. या प्रमाणें प्रत्येक ओळीचे पहिलें व शेवटचे अक्षर उभे वाचले असता 'रामदास' या चतुराक्षरी मंत्राचा जप आपोआप आठवेळा होतो. या पदाच्या ध्रुपदात 'रामदास' हा चतुराक्षरी मंत्र असून तो वारंवार जपावा. त्याचा जर केल्यास अव-घड असा भवसागर तरून जाता येतो व त्याच बरोबर साच्चित सुखसार लाभते. अशी फलश्रुति सांगितली आहे. या पदाच्या शेवटच्या कडव्यात सज्जन - गिरिवास असा शद्ब प्रयोग आला आहे. या वरुन समर्थ रामदासस्वामी सज्जनगडावर वास्तव्य करू लागल्या नंतर या पदाची रचना झाली असावी असे दिसते.

यातील शद्बाची रचना मोठी नादमधूर आहे. त्यात माधुर्य आहे प्रत्येक चरणाच्या सुरवातीच्या व शवटच्या शद्बात यमक साधले आहे. सारे पद काव्य सौन्दर्याने नटलें आहे.

हे पद म्हणजें एका श्रेष्ठ कवीचे आपल्या बरोब-रीच्या एका श्रेष्ठ संताच्या विषयाचे हृदगत आहे. समर्थ रामदास स्वामींच्या विषयी केवढी आदराची भावना त्यांच्या ठायी होती व परस्परांचे चित्त परस्पराशी कसे एकचित्त झाले होते यांचे हे शद्बरुपी कांव्यात्मक दर्शन आहे.

अशा या सुंदर पदाचा आशय असा राम व दास ही शद्बांची जोडी म्हणजे अभिन्न असे नाम असून ते सारखं सारखे गोड आहे.

राजाधिराज समर्थ रामदासस्वामी या पृथ्वीतलावर जगदोद्धारासाठी अवतरले आहेत. जरी ते मनुष्य रुपी असले तरी ते परिपूर्ण काम आहेत स्वत:सिद्ध असे सोनें साधकांचे विश्रांतीस्थान आहेत शत कोटीचें मस्तकमणी असणारे श्रीराम हेच त्यांचे स्वत:चे गुह्य अर्थात रहस्य आहे

उदासवृत्तीने परमामृताचा साठा सेवन करणारे ते दास आहेत. तर विषय वासना दुर करुन स्वात्मसुख देणारे ते दाते आहेत.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मद, मत्सर, हे षड्‌वैरी असून या दानवकुळांचा नाश करुन मतिमंदाना ते तारणारे आहेत.

तेव्हां द्रव्य पत्नि या सर्वांचा मोह सोडून त्यांना सद्-भावानें वंदन करावे व जीवनाचे सार्थक करावे. असे हे थोर सद्‌गुरु सज्जन गडावर निवास करीत आहेत. तरी सर्वस्व वेचून, सर्वभावे त्यांना शरण जावे व त्यांची कास धरावी

# संपादकीय

समर्थ पंचायतनाचा हा दिवाळी अंक वाचकाच्या हाती देताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे वर्ष समर्थ पंचायतनातील थोर पुरुष निजानंद रंगनाथमहाराज निगडीकर जन्मवर्ष म्हणून भाविक साजरे करीत आहेत " सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी । निरभिमाने सज्जनवृंदे आधि वंदावी " या विचाराला अनुसरुन व समन्वयाचा व्यापक दृष्टीकोन ठेउन सा. पंढरी संदेशने हा दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचा प्रपंच केला आहे. समर्थ पंचायतनातील सत्पुरुषांनी श्रीविठ्ठलभक्ती व श्रीरामभक्ती यात फरक मानला नाही. विठ्ठल भक्तीकडे त्यांचा अधिक ओढा होता. भागवतधर्माचे संतमतपत्र या संधीचा पारमार्थिक लाभ भाविकजनाला करुन देत आहे.

श्रीरंगनाथमहाराज निगडीकर, जयरामस्वामी वडगांवकर, केशवस्वामी ब्रम्हनाळकर, आनंदमूर्ती आणि समर्थ रामदास यापैकी जयरामस्वामी आणि रंगननाथस्वामी यांचा परिचय कांही लोकांना आहे. समर्थांची ओळख हा स्वतंत्र विषय आहे, राहीलेल्या केशवस्वामी आणि आनंदमूर्ती यांच्या चरित्रकाव्य आणि जीवनाचा अभ्यास व्हावा म्हणून पंढरी संदेशचा हा अल्पपरिचय आहे संततुकारामाचे चौदा टाळकरी हे तुकोबाच्या भागवतधर्मप्रसार कार्याला ज्याप्रमाणें सहाय्यक ठरले त्याचप्रमाणे समर्थांच्या धर्मसंस्थापन कार्याला पंचायतनातील पुरुषांनी मोठी मदत केली आहे.

सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हाप्रती । धर्म स्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे हा समर्थाचा उपदेश पंचायतनातील पुरुषांनी आचारात आणला.

आपल्यातील काही लोक धर्मजीवनाला विरोध करित आहेत ही खेदाची गोष्ट आहे. आज विज्ञानाने जीवन व्यापले आहे. नवी पिढी धर्माचा नव्या अर्थाने अर्थ अपेक्षित आहे. भगवान श्रीकृष्णाने अंगुलीवर गोवर्धन उचलला किंवा रावणाला दहातोंडे होती याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण मागत आहें त्यादृष्टीने महाराष्ट्रधर्माचा नव्या पिढीला अर्थ सांगण्याचे कार्य विचारवंतानी केले पाहिजे त्यामुळे समाजात धर्म वृद्धींगत होण्याला व जीवनात स्थैर्य होण्यास मदत होईल.

पुढती पुढती पुढती । इया ग्रंथ पुण्य संपत्ती ।
सर्व सुखी सर्वाभूती । संपूर्ण होई जो ॥ (१८-१८१०)

श्रीज्ञानदेवाच्या ज्ञानेश्वरीचे पाठशुद्धीकरण श्री नाथांनी केले. श्रीज्ञानेश्वरी चतुःशताब्दी सोहळा भजन, कीर्तन, प्रवचन या द्वारे सा. पंढरी संदेशने साजरे केले.

गोपाळ बेणारे

# रंगनाथस्वामी निगडीकर जीवनपट

संकलक– म. प. पेठे

जन्म : रविवार, मार्गशीर्ष शुद्ध दशमी, शके १५३४.

कुल : मूळ पुरुष राघोपंत; यजुर्वेदी ब्राह्मण माध्यंदिन शाखा, गोत्र वसिष्ठ

आई वडील : बयाबाई, बोपाजीपंत खडके, घोडके आडनांव; माण नदीच्याकाठी नाझरे गांवचे कुलकर्णी.

गुरु : सहजानंदी परंपरेतील, बोपाजीपंत (वडील) आनंद सांप्रदायी.

वास्तव्य : खडकी मोगलाईतील चौसाळे महालांत तेथून निगडी येथे यात्रेत असताना घोड्याचा खूर रुतला म्हणून निगडी येथे राहू लागले.

व्यवसाय : कीर्तनकार, ठसठसीत व बोधप्रद पदे स्वत: रचत असत. आकर्षक व्यक्तिमत्व त्यामुळे प्रभावी कीर्तन होई

शिष्य परिवार : अनेक शिष्य व भागम्मा व चंद्रम्मा या शिष्या

पांडवप्रतापकार श्रीधर हे रंगनाथस्वामीचे पुतणें

जीवनातील महत्वाच्या गोष्टी : विवाह केला नाही; बंधू यादवराव व विठ्ठलराव उर्फ आत्यास्वामी; उत्तरेकडे तीर्थयात्रा केल्या बदरीकाश्रमात योगसाधन केले. रामदासावर निष्ठा व श्रद्धा; घोड्यावर बसण्यात पटाईत शिपाई बाणा, राजयोगी होते, रामदासाच्या वेशाचे अनुकरण, कुबड्या, मस्तकावर जटाभार पादुका इत्यादी

ग्रंथ निर्मिती : भगवद्गीता, योगवासिष्ठच सार (१० प्रकरणें), बृहन्वाक्य वृत्ती, गुरुगीता, निजानंद साधन, सुदाम चरित्र, भानुदास चरित्र, शुकरंभा संवाद, गजेन्द्र मोक्ष, रंगाष्टक, मार्तण्डाष्टक, करुणाष्टक, श्लोक पचक, पंचीकरण मिथ्यामायास्वरुप, एकाखडा, बद्ध मोक्ष विवरण, रामजन्म, गरुड सत्यभामा गर्व परिहार, या शिवाय हजारो पदे, पंचके, व आरत्या; रामदास चतुराक्षरी मंत्र हे पद लोकप्रिय.

समाधी : रविवार मार्गशीर्ष वद्य दशमी, शके १६०६ रक्ताक्षीनाम संवत्सर; वयाच्या ७२ व्या वर्षी.

सदर्भ : महाराष्ट्र सारस्वत, आ ६. १९८३. दासपंचायतन (३३६–३४३)

**: नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी –**

महाराष्ट्र नामे पहा माण देश ।
असे माणगंगा पवित्र तिरास ।
जयाची असे नाझरे जन्मभूमी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१॥
बयाबाई माता पिता बापाजी तो ।
तयाचे कुशी की असे जन्मला तो ।
जयाचे असे घाडके कुळ नामा ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥२॥
बयाबाई स्वप्नी गुरुमूर्ति आली ।
गुरु ओटीमाजी फळे तीन घाली ।
दिला एक परतोनी नमिले ते स्वामी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥३॥
गुरुचे प्रसादे बया माउलीसी ।
असे जाहले तीन पुत्र सतोषी ।
गुरुचे प्रसादे ती वर्ते स्वधर्मी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥४॥
सदा रंगनाथ असे तो उदासी ।
वैराग्ययुक्त असे तो मनासी ।
नसे आस कोठेची रुपी आरामी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥५॥
सोडोनी आशा गृह ते धनाची ।
सदा आस ज्यासी गुरुचे कृपेची ।
म्हणोनी पहा सोडली जन्मभूमि ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥६॥
केली पाहा सर्व तीर्थे जयाने ।
गिरी कंदरी वास केला तयानें ।
वसे बद्रीकेदारी तपी आरमी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥७॥
प्रचिती पहाया तपाचीच जेंव्हा ।
धरी व्याघ्र रुपासी अवधूत तेंव्हा ।
गुरुरुप व्याघ्र बघ अतर्यामी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥८॥
प्रसन्न झालेच ते सूत अत्री ।
महापातकी लोक झाले धरित्री ।
रक्षानी ब्राह्मण्य लावी स्वधर्मी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥९॥
असे व्यासाज्ञा धरी राजयोगा ।
निजानंद रुपी परी नित्य जागत ।
जना दाखवी भक्तिमार्गाते नामा ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१०॥
धरी राजयोगा विचरे मही ते ।
असे नाझरे जन्मभूमी आले ते ।
करी वंदया मातृ-पित्यासी स्वामीं ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी । ११॥
जगा ज्ञान द्याया निघाले क्षणी ते ।
मिळाले जगी स्वामी पंचायना ते ।
रक्षोनी ब्राह्मण लावी स्वधर्मी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१२॥
लचके पहा अश्वची पाय जेथे ।
करी नित्य स्वामी वस्तीच तेथे ।
निगडी असे नाम पवित्र ग्रामी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१३॥
शरीर असे जाण वार्धक्य आले ।
निजानंद रुपी पहा ते निमाले ।
समाधी सुखे तोच राहे आरामा ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१४॥
समाधी पहाता मन शांत होते ।
करी भक्ति त्यासीच आनंद देते ।
मना आठविता रमे तो आरामी ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१५॥
सदा नित्य जो की स्मरे अष्टकाते ।
महा पातके जाय त्यांची लयाते ।
मिळे पूर्वजा स्वर्ग ते पुण्यभूमि ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१६॥
गुरुचे कृपे शोडस अष्टका ते ।
असे वाहिले हेच स्वामी पदा ते ।
दे काशीनाथा लयराम नामा ।
नमस्कार त्या श्रीरंगनाथ स्वामी ॥१७॥

श्रीकाशीनाथ

---

नामा म्हणे धन्य धन्य ते संसारी ।
चालविती वारी पंढरीची ॥

पंढरीची वारी हे परमार्थ क्रियेतील श्रेष्ठ साधन आहे.'सर्व सुख आहे भिवरेच्या तीरी।' यावर बापोजीपंतांचा अढळ विश्वास होता. वारकरी धर्म या कुटुंबियांच्या जीवनी स्थिर होता त्यांची धर्मपत्नि बयाबाई ही पतिसेवापरायण होती. कुलकर्ण्यांच घर म्हणज अतिथी अभ्यागतांच आश्रय स्थान होत.

'दया करणें पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥'

अशा चित्तवृत्तीची निशाणी या कुटुंबीं नांदत होती.

दुसऱ्याचें दुःखी दुःखी व्हावे । परसंतोषे सुखी व्हावें ।
प्राणीमात्रांस मेळवून घ्यावें । बरव्या शद्बें ॥

हा समर्थांचा धर्मही बापोजीपंत प्राणपणानें जपत होते. त्यांच्या चित्ती श्रीविठ्ठल होता. त्यांच्या भजनाचा धर्म तर 'भेटो कोणी एक नर धेड महार चांभार । त्याचे राखावे अंतर । या नाव भजन ॥'

या समर्थांच्या विचारांशी संगमीत झाला होता ध्यान, भजन, पूजन, श्रवण, चिंतन, वारी आणि वारिया आलेले कर्म 'आचरें विधी गौरवें । श्रृंगारोनी ।' या न्यायाने घडत होते. बयाबाई म्हणजे साक्षात् लक्ष्मीच ! आपल्या प्रीय धर्मांगीबाबत श्री. बापोजीपंताना

'मज वाचोति तत्वता । न भजे आणिक देव देवता ।
मज सांडूनि न वचे तीर्था । माझे वचन सर्वथा नुल्लघी ॥
( श्रीएकनाथ )

असे वाटत असल्यास नवल नाही.

## घरी संतान नव्हते

परंतु संसारात माणसांना सर्व सुखे प्राप्त होत नसतात
'कोठे कांहीं कोठे कांही । एक आहे एक नाही ॥'

' रामानंदा झडकरी । सदानंदाचा शोधकरी ।
शरण जाई सदानंदा ॥'

गुरुंच्या शोधात रामानंद कल्याणी आले सदानंद यतिराज एका गुहेत ध्यानस्थ होते. श्रीगुरुंचा शोध घेत रामानंद त्या गुहेत आले. श्रीगुरुशिष्यांची दृष्टादृष्ट झाली

सदानंद गुहेप्रती आला । मस्तकी हस्त ठेविला ॥- -
अंतरात प्रकाश फाकला–

परमस्नेहें तयावेळे । उपदेशीती गुरु कृपाळे ॥
अज्ञान भ्रम मावळे । रामानंद समाधिस्थ ॥
(श्रीरंग. ३–२८)

श्रीगुरु शिष्यांची साधना पुनः त्या गुहेत सुरु झाली श्रीगुरु आणि शिष्य खरे तर एकच,

' हा भेटलियाची सवे । पुरती उपायाची धावें ॥'

असे घडले त्या समयी त्याप्रांती धर्मशील राजाराम राज्य करीत होता. तो प्रजाहितदक्ष होता एकाएकी त्याचा सोळा वर्षाचा राजकुमार एकुलता एक घरी गेला सर्वत्र आकांत झाला.

' कां माये पुढील बालक । काळे नेता एकुलते एक ।

या न्यायानें मातृहृदय शतविदिर्ण झाले. प्रेत स्मशानी आणले. ते स्थान या गुरु सेवकांच्या नजीकच गुहे होते. हा आकांत त्या दयाशीलांच्या कानी गेला. सदानंदानी रामानंदाना त्या स्थानी पाठविले. हाती असलेली विभूती रामानंदानी त्या प्रेतावर टाकली. तो राजकुमार सजीव झाला. संतांना अशक्य कांही असत नाहीं. तो राजकुमार रामानंदाच्या मागोमाग गुहेत आला दर्शन होताच सारा संसार विसरला आता मला राज्य नको म्हणू लागला संत संगाने श्रीरंग सामोरा येतो मग सांसारिक सुखे तुच्छ वाटतात श्रीतुकोबांचा हा अनुभव–

' बरवा वैष्णवाचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥'
गुरु शिष्यांनी राजपुत्राला समजाबल.
न्याये करी प्रजापालन । स्वधर्म संरक्षी प्रेमान ।
अतिथी अभ्यागत पूजन । नेमे निष्ठा चालवी ॥
(श्रीरंग. ३–७९)

राजपुत्र राजधानीस परतला धर्मज्ञतेनें राज्य हाकारु संतांना संस्काराचा तिरस्कार नसतो पण त्या संसारात धर्म नांदावा यासाठी संतावतरण असते.

## परंपरेची दिव्यता

आता सदानंदानी रामानंदास काशीस जावून श्रीदत्त धर्म जागविण्याचा आदेश दिला. सदानंदांनी देह ठेवला. रामानंदांनी आपल्या अमलानंद नामक शिष्यास कल्याण मठोची वस्त्र देऊन त्यांना अधिकार प्रदान केला आणि रामानंद काशी नगरी परतले. अमलानंदाचे शिष्योत्तम सहजानंद हे अत्यंत वैराग्यशील होते.

' शुका सारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे ॥ '

अशी त्यांची स्थिती होती त्यांनी अनंत हस्ते धर्म प्रबोधन केले. त्यांची एक विधवा शिष्या मोठी एकनिष्ठ होती. समर्थांच्या शद्वांत या माऊलीचे वर्णन–

मुख्य सत्‌शिष्याचे लक्षण । सद्‌गुरु वचनी विश्वास पूर्ण ।
अनन्य भावे शरण । या नांव सत् शिष्य ॥
शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा काया क्लेशी ।
शिष्य असावा परमार्थासी वाढवू जाणें ॥ (श्रीरामदास)

त्या माऊलीचे सारे चित्त श्रीगुरुचरणी स्थिर होते. श्रीगुरु कृपेनें माया निरसन होते हे प्रमेय त्या माऊलीच्या रुचीस आले होते. संत बहिणाबाईनी म्हटले आहे–

गुरुकृपा पूर्ण जयासी लाधली ।
माया ही निरसली तया मनी ॥

एके दिवशी सहजानंदानी या माऊलीला बोलावून सांगीतल. तु मोठी अधिकारी आहेस. संन्यास घेऊन या मठाची उत्तराधिकारी हो! तीमाऊली नम्रत्वानें उद्‌गतीत होवून म्हणाली–

स्त्रीपाशी नाही अधिकार । तुमचा आनंद संप्रदाय थोर ।
ब्रह्मचर्य संन्यास खडतर । विधवा मी आहे कीं ॥
(श्रीरंग ५–४२)

श्रीगुरु सहजानंदांनी त्यामाऊलीकडे दिव्यदृष्टीने पाहिले. दृष्टीला विश्व व्यापकत्व प्राप्त झालेली ती दिव्य दृष्टी- विराट सृष्टीला कवळणारी आपल्या कृपाबलानें छाटी कफनी देउन त्या माऊलीला ' पुरुष रुपा आणिले ।' संन्यास्त बनविले ' पुर्णानंद ' अस नामाभिदान ठेवून त्या त्या माऊलीस मठाचे उत्तराधिकारी बनविले. ' आपणा सारिखे करिती तात्काळ । अस झाल. कांही कालात सहजानंद समाधिस्थ झालें. यतिपूर्णानंद धर्मप्रबोधनार्थ गावोगांवी प्रवासीत झाले. आणि आज हे कल्याण यात्री नाझरे गांवी आलें.

## तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा

एवढ मोठ प्रदीर्घ स्वप्नसंपल साऱ्या गुरु कुळाचे दर्शन झाले. तेच पूर्णानंद यति कुलगुरु आज घरी येणार होते. पंत जागे झाले. दारी एक वासुदेव गात होता. हाती

जनार्दन स्वामी व योगिराज स्वामी या सत्पुरुषांच्या दगडी बांधणीच्या समाध्या आहेत या शिवाय मनोहर घोड्याचा ज्या ठिकाणी उमटला त्या दगडी खूर चिन्हाचे छोटे मंदिर आहे या सर्व मंदिराच्या चारही बाजूनें बाहेरुन दगडी भक्कम तटबंदी आहे

**मठ**

मूळ जागा फार मोठी असून परंतु त्या जागेवर सध्या आर्ध्या खणाचे विटमातीचे कौलारु पूर्वाभिमुखी छोटे मंदिर आहे. या जागेत रंगनाथस्वामी दैनंदिन पूजाअर्चा ध्यान - धारणा करीत असत. सध्या या जागेवर दगडी पादुका आहेत मठाच्या मोकळया जागेत ग्राम-पंचायत इमारत आहे. उर्वरित मोकळया जागेत अतिथी गृहाची उभारणी होणार आहे

## २) ज्ञानपुरी

निगडीपासून पश्चिमेस कृष्णानंदीच्या काठी निगडी पासून ४।। कि. मी. अंतरावर मठापासुन नदीपर्यंत साखळी रस्ता आहे. निगडीतील वामनबुवानी श्रीमंत पेशवे माधव-राव नारायणराव यांचे कारकीर्दीत नाना फडनीस यांच्या सहकार्यानें रस्ता केला आहे

या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे स्वामींचे समाधीनंतर तीन दिवस मनोहर घोड्याने अन्न पाणी वर्ज्य केले तिसरे दिवशी मठातुन मनोहर निघाला तो थेट या ठिकाणी आला व ज्या ठिकाणी कृष्णेच्या डोहात उतरला तो पुन्हा कोणालाच दृष्टीस पडला नाही याच ठिकाणी भव्य घाट बांधला आहे विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर बांधलें नदीच्या पात्रापर्यंत घाटाची बांधणी आहे. मंदिराभोवती भक्कम तटबंदी आहे मंदिर नदीच्या पात्रात आहे. या ठिकाणी अस्थी विसर्जन होते निगडी अस्थि विसर्जन येथेच होते

## ३) जोतिबा मंदिर

सर्व ग्रामस्थाचे कुलदैवत असलेले स्थान गावच्या दक्षिणेस २ किलो मी. अंतराव वाडी रत्नागिरी जोतिबा हे मुख्य पिठ आहे. दगडी चुना माती पश्चिमाभिमुखी पत्रा असे बांधकाम आहे.

## ४) भैरवनाथ मंदिर

ग्रामदैवत भैरवनाथाचे मंदिर स्वामींच्या मंदिरापासून उत्तरेस जवळच आहे भव्य मंदिर दगडी बांधणीचे आहें. सध्या जिर्णोद्धार काम चालु आहे.

## ५) लक्ष्मी मंदिर

हरिजन वस्तीतील देवीच्या मंदिराचे स्वरुव पंचायत समिती कोरेगांव यांच्या सहकार्याने माजी सरपंच श्रीकांत डोईफोडे यांनी केले असून हे मंदिर पूर्ण झाले असून

## ६) मरीआई देवस्थान

दगड माती पत्रा असलेले अर्धा खणाचे उत्तराभि-मुखी मंदिर

या शिवाय रंगनाथ स्वामीच्या मनोहर घोड्याची निगा राखणारा मोतद्दार याच्या पिराची अ‍ॅप्रोच रोडवरच समाधी आहे.

## ८) घाट

देवस्थान जिर्णोद्धार कमीटीस सहकार्य करण्याचे उद्देशानें जवळ जवळ रु. ५०,००० ।– खर्चाचा घाट पंचायत समितीच्या मार्ग दर्शनाखाली काम चालू आहे.

## ९) अतिथी गृह

क्षेत्र निगडी येथे येणाऱ्या भाविकांसाठी त्यांचे मुक्कामाचे दृष्टीने सर्व सोईनी मुक्त असे अतिथी गृहाची संकल्पना आहे या ठिकाणी विवाहादी मंगल कार्ये करता येतील व सार्वजनिक कार्यासाठी हॉल उपलब्ध करुन देणे व त्या ठिकाणी कार्यासाठी लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करुन इ. चा त्यात समावेश होणार आहे

१) मार्ग व. १ ते ७ ज्ञानेश्वरी पारायण सोहळा
२) मार्ग. व ७ ते १३ रंगनाथ स्वामी उत्सव
३) वैशाख शु. १५ जोतिबा कावड काठी
४) वैशाख मूळ नक्षत्रावर – भैरवनाथ यात्रा
५) भाद्रपद शु. ४ ते १४ – गणपती उत्सव यात रांगोळी स्पर्धा, सार्व हळदीकुंकू कार्यक्रम होतात.

टाळ–चिपळचा होत्या पायी रुणझुणझुणारे टाळ होते तो एकसुरात म्हणत होता–

कर जोडोनि विनवितो तुम्हां । तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा ।
नको गुंतु विषय कामा । तुम्ही आठवा मधुसुदना । १॥
नरदेह दुर्लभ जाणा । शत वर्षांची गणना ।
त्यामध्य दुःख यातना । तुम्ही आठवा मधुसुदना ॥२॥
नलगे तीर्थाचे भ्रमण । नलगे दंडण मुंडण ॥
नलगे पंचाग्नी साधन । तुम्ही आठवा मधुसुदना ॥३॥
हेचि माझी विनवणी । जोडिलों कर दोन्ही ।
शरण एकाजनार्दनी । तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी॥४॥

पंताना हे सारेच शुभ शकुनी वाटले. प्रसन्नपणें त्यांनी प्रातःविधी सारला. स्नान, संध्या, पूजा, जप, ज्ञानेश्वरी वाचन, सार झाल. घरांतही स्वेपांकाची धमाल चालु होती संतसेवा ही जीवनातील खरी सेवा असते. घरात विचारुन पंत यतिरायांना बोलावणी गले. यतिराय घरी आले. दारी सडासंमार्जन केल होत. तुळसीवृंदावनावरील तुळस यतिदर्शनानंदाने डुलत होती. सर्वत्र प्रसन्न वातावरण होत श्रीगुरुदेवांचं प्रसन्नपणें भोजन झाल. पतिपत्नि हात जोडून उभी राहीली. भिळपाक गोड करुन घेतलं. आता आम्हाला पदरांत घ्या. परंपरेची दिव्यता पंतांना रात्रीच समजली होती. माऊलं च्या बयाबाईच्या चित्ती परमार्थी समवेत प्रपंचही होता. निःसंतानाच दुःख तीच्या अंतरी होत. गुरुदेवांना–यतिपूर्णानंदानीं अंतर्ज्ञानानी हे सारं जाणलं.

'स्वर्गीचा आलांचु आईके । मनोगत ओळखे मुंगीयेचे ॥'

असे सर्वज्ञ श्रीगुरु! यतिरायांनी पतिपत्निना अनुग्रहीत केल. ये हृदयींचे ते हृदयी घातले। पूर्णानंद आपणच ज्ञानमार्गे बापजी झाले.

म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहि शब्दाचा अर्थु ।
श्रीगुरुची परी होतु । दोहो ठायी ॥ (श्रीअमृ. ज्ञानदेव)

श्रीगुरु गावच्या देवळयी परतले.

## गायत्रीचे व्रत

श्रीगुरु दुसऱ्या दिवशी पुनः घरी आले. यतिंच आकस्मात आगमन झालेले पाहुन बापोजीपंत आनंदानें झाले. त्यांनी बयाबाईला हाकारलं. ती माऊली जी म्हणून हात जोडून पुढे उभी राहीली गायत्रीच व्रत घे नित्य तुळशी पूजन करीत जा हे विष्णुव्रत आहे माणसाला निष्काम करणार आहे ही उपासना साधना श्रेष्ठ प्रतिची आहे

### – वद कसें करणें रघुनंदना–

भजन विहीन या जगदोदरी ।
मजहुनी दुसरा न दिसे हरी ।
अणुपरी समता न दिसे मना ।
वद कसे करणें रघुनंदना ॥१॥
दम कसा सहसा नदिसे पहा ।
दश दिशा करणे फिरती दहा ।
मदवशे न दिसे परवेदना ।
वद कसें करणें रघुनंदना ॥२॥
तुज पराङ्मुख होऊनि सर्वदा ।
अतिशयें विषयी विचरे सदा ।
सुख गमे पाहतां वनिता घना ।
वद कसें करणें रघुनंदना ॥३॥
तनु पडेल चिरंतन हे नुरे ।
हित घडेल कदा मज न स्मरे ।
त्वरीत सोडविणें जरि येसी ना ।
वद कसें करणें रघुनंदना ॥४॥
न भजता तुज मी बहु मातलो ।
अतिरसें विषयांसीच मातलो ।
विकृती ही अझुनी परि येईना ।
वद कसें करणें रघुनंदना ॥५॥
न जळती जव हे मम दोषरे ।
न चुकती तव ते यम पाशरे ।
गति मला न दिसे करुणाघना ।
वद कसे करणें रघुनदना ॥६॥
सुखघना जिवना निज मूर्तिरे ।
न वदवे निगमा तव किर्तिरे ।
स्वपदी रगवूनी सुख देसी ना ।
वद कसे करणें रघुनंदना ॥७॥
– श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर

प्रतिपाळु तरी पाटाचा । झाडी कीजे तुळसीचा ।
परी फळाफुला छायेचा । आश्रयो नाही ॥
(श्रीज्ञानेश्वरी)

पतिपत्निनी श्रीगुरुंना दंडवत केला. थोडेसे गोदुग्ध घेऊन श्रीगुरु परतले श्रीगुरुपदिष्ट ज्ञानाची साधना उपासना सुरु झाली. बयाबाईनी गायत्रीचे व्रत सुरू केल. गोमयातील धान्य वेचावे ते धुंवून दळावें त्याचीं दशमी करावी व तेंवढ्याच आहारावर दिवस कंठावा. अंतरी श्रीगुरुच स्मरण असावें.

श्री समर्थांनी प्रतिपादिलेली सर्व पथ्ये त्यांनी आपल्या प्रबोधनात आग्रहाने मांडिली आणि त्या काळात महाराष्ट्रा बाहेर एवढया दूर अंतरावर राहून राष्ट्रहिताला पोषक ठरेल अशा भक्तिमार्गाची दुदुंभी पिटविली

केशवस्वामींनी खुप मराठी पद्य रचना केली आहे. तसेच त्याची हिंदी पदेही उपलब्ध आहेत तरी सुद्धा जाणकारांचे असे मत आहे की, स्वामींच्या पुष्कळशा कविता अनेकांच्या दप्तर -बाडात अद्याप धुळखात पडल्या आहेत तिचे संशोधन व संपादन होण्याने त्यांच्या जीवित कार्यावर अधिक प्रकाश पडेल. स्वामीच्या सर्वच पदांची रचना अचूक शब्द–योजनेनें गुंफिली आहेत. त्यांच्या काव्याला रागाची व तालाची अवीट जोड आहे. त्यांनी आपल्या पदातून श्रीरामाचे व श्रीकृष्ण रुपाचे अतिशय मनोहरी वर्णन केंलें असून तें भाविक मनाला भारुन टाकते कृष्णा विषयी त्यांच्या पुढील काव्य पंक्ती पहा–

अनादी मूळ । ज्यासी नाही याती कूळ ।
तो यशोदेशी म्हणतसे आई रे ।

कधि कृष्णाचे तर कधि रघुरायाचे वर्णन वर्णन तें आपल्या पदातून रसभरीत करतात–

धन्य अयोध्येचे वन रे । जे अवलोकित रघुनंदन रे ।

पंढरीच्या सावळया पांडुरंगाने तर स्वामींना मोहिनी घातली होती, वेडं केलं होत. भिवरेच्या वाळवंटात भक्त पुंडलिकाच्या सान्निध्यात उभे राहून केशवस्वामी म्हणतात

काशीची न भवेचि सरी या।

विठ्ठल महती गाताना त्यांची वाणी बहरते. ते सहज उद्‌गारता –

वंदी पडल्या देवकोडी । त्यांचा वंद हा रे सोडी ।।

समर्थ सांप्रदायाचा मुख्य भट भिक्षेवर भिक्षेत निर्लोभता, संतुष्टता आणि ईश्वर भजनी लिनता या सर्वांचा एकत्र लाभ होतो म्हणुन समर्थ म्हणत

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।।
ओम भवति पक्षा । रक्षिलें पाहिजे ।।

या तत्वप्रणालीवर स्वामींचा सुद्धा अति कटाक्ष असे भिक्षेचे अन्न शुद्ध, सात्विक असावे, अन्यथा त्याचें वाईट परिणाम खाणाऱ्यावर होतात, म्हणून स्वामीनी अलक्ष भिक्षा मागितली त्या भिक्षेतील अपूर्वाई पहा –

ब्रह्मीची ब्राह्मणें आली भिक्षेलागी ।
अलक्ष भिक्षा वेगी द्यावी आम्हा ।।ध्रु।।
शुद्ध स्वयंपाक केला नाही जीं हीं ।
त्यांची भिक्षा नाही घेणें आम्हा ।।१।।
कर्म कांडाचे ब्राह्मण ज्यांसीं न सोडी कर्मठपण ।
त्यांची भिक्षा जाण नेघो आम्ही ।।२।।
भेदवुद्धी पाक असे ज्याचे घरी ।
भिक्षा त्यांची करी घेणें नाही ।।३।।
शब्द ब्रह्मवादी शुष्क भिक्षा केवळ ।
तेणें एक चूळ न भरुं आम्ही ।।४।।
संकल्प विकल्प गेले नाही ज्याचे ।
भिक्षान्न त्याचे नेघो आम्ही ।।५।।
ऐसिया भिक्षेलागी फिरतां आपण ।
गुरुकृपे केशवी पूर्णप्राप्ती झाली ।।६।।

भक्ति मार्गीच्या प्रतिपादनात त्यांनी उच्च - निच, श्रेष्ठ कनिष्ठ, अधिकारी अन् अधिकारी असा भेद कधी केलाच नाही तो फक्त धर्माचरणाचा. हेच त्यांचे जीवन तत्वज्ञान त्यांच्या वरील अलक्ष भिक्षेतुन प्रतित होत नाही काय?

समर्थ पंचायतनात असलेले, पण समर्थांच्या कार्य–क्षेत्रा पासुन खूप दुर असलेल्या केशवस्वामींनी आजन्म लोक जागृतीचे कार्य केले. या महामानवानें अखेरीस भागा-नगरीत मुचकुंदा (मुसा) नदी कांठी लोकसेवेच्या व्रताचे आचरण करित असतानाच शके १६०४ मध्ये देह ठेवला. त्यांनी आत्मोद्धारापेक्षा लोकोद्धारच श्रेष्ठ मानला व अधो-गतीला जात असलेल्या समाज पुरुषाला जाग आणून योग्य मार्ग दाखविला. अशा या महात्म्याला, महापुरुषाला, निष्ठावान भगवद् भक्ताला श्रीज्ञानेशांच्या ओवीने वंदन करुर विसावतो.

तें ऋणक्षेप वाचा द्या । न फडवे मरोनिया ।
तें पायां पडोनि मियां । सोडविले ।।

संताचे बोलणे ऐकताचां कानी ।
ब्रह्मरूप झणा होय सर्व ॥ (श्रीबहिणाबाई)'

अशी स्थिती बयाबयांनी कधी कधी सुलवून जाई. अशा व्रताने बारा वर्षाचा कालावधी लोटला व्रतात खंड पडला नाही.

' ज्ञान झाले भवत जना । सोडू नये उपासना ॥ '

यावर माऊलीचा दृढ विश्वास होता. समर्थांनी म्हटले आहे.–

तैसे आत्मज्ञान झाले । तरी साधन पाहिजें केले ।
एकवेळ उदंड जेवले । तरी सामुग्री पाहिजे ॥

## ओटीत श्रीफले–प्रसाद

श्रीगुरु चिंतनात बयाबाई एकेदिवशी झोपी गेल्या रामप्रहरी भल्या पहाटे श्रीगुरु स्वप्नी आले बयाबाईंच्या ओटीत तीन श्रीफले टाकली. मनःकामना पूर्ण होईल असा वर दिला. थोड्याच वेळात बयाबाई जाग्या झाल्या ओटीत खरोखरीच तीन नारळ होती. पतिदेवांना उठवल श्रीगुरुंच लाघव सांगितल दोघांच्याही नयनांना श्रीगुरुमहिमेचे स्मरण करताना अश्रु धारा लागल्या... घरी दोन चार दिवसानी व्रताच उद्यापन केल. संसारात आनंद मावू लागला. बयाबयींच्या उदरी गर्भ वाढू लागला नवमास भरताच बापोजीपंताना पुत्रलाभ झाला. मुलाचे नांव यादव ठेवण्यांत आले. कांही काळ लोटला पुनः बयाबाई गरोदर झाल्या यावेळी मात्र त्यांची अवस्था अलौकिक होती

संसाराचा पाश । तोडूनि टाकावे त्यास ।
एकांत देखोनि स्थानास । नामस्मरण करावे ॥
(श्रीरंग ६–५०)

अस बडवडू लागल्या नवमास पूर्ण झाले भगवंताचा निवास असलेला ' मासानाम मार्गशिर्षोस्मी ।' मास सुरु झाला. गीता जयंतीचे वेध लागले आणि बयाबाईची कुस संत रत्न प्रसवती झाली. मार्गशिर्ष शुद्ध दशमीला शके १५३४ साली श्रीरंगनाथ महाराज त्या रंगाचा रंग अंगी लेवून नाझरे गांवी देशपांड्याच्या घरी ॐकाराचा उच्चार करीतच जन्माला आले.

जन्मताच बोले ॐकार । आश्चर्य करिती नारीनर ।
ईश्वराचाच हा अवतार । दिसतसे जाण पां ॥
(श्रीरंग ६–५४)

श्रीमन्महा रंगनाथ स्वामी ' जन्मतेनि प्रसंगे । स्त्रि देह शिवणें अंगी । तेथूनी जन्म आघवे सोवळे कीजे ॥

या ज्ञानदेवाच्या उक्तीच्या परिपूर्तीसाठी कटीबद्ध झाले. यापुढे श्रीरंगनाथस्वामीच्या दिव्य, जनबोधक, धर्मसंरक्षक जीवन वेदाचा विचार करावयाचा आहे

' तैशी दशेची वाट न पाहता । वयसेचिया गावा न येता ।
बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ॥ (श्रीज्ञानेश्वरी)'

अशी त्यांची पूर्णावस्था असल्यानें यापुढे त्यांना स्वामी या आदरार्थी नामानेच संबोधु. आणखी दोन वर्षांनी बयाबाईना आणखी एक पुत्र झाला त्याचे नांव विठ्ठल ठवण्यात आले. दत्त सांप्रदायी आनंदाच्या यापरंपरेत या त्रैमूर्ती पुनः अवतरीत झाल्या स्वामीच्या अवतार कार्यांचे वा या संतसद्गुरुच्या अवतार कार्याचे प्रयोजन सांगताना संत कथाकार महिपतीने म्हटलें आहे–

धणीवरी गावे श्रीहरीचें गुण ।
आणि जगदुद्धार करावा पूर्ण ।
यास्तव अवतरले संत सज्जन ।
आणिक कारण नसे की ।

## प्रांगणी मुलबाळ

तीन गोजीरवाणी गोमटी मुल अंगणी नांदु लागली तिघेहि विद्याभ्यास करीत होती परंतु रंगनाथ स्वामीची वृत्तीचा रंगच कांही आगळा होता यथाकाली मुलांचे व्रतबंध झाले. श्री यादवजीचा विवाह पार पडला मातेने रंगोबांच्या लग्नाचा विषय काढला. रंगोबानें त्यास कडकडून विरोध केला. असार संसारात मला रस नाही.

स्त्री पुत्रधनादिक व्याप । लटिके वैभव अमुप ।
परमात्मा सर्व व्यापक । तोचि निरंतर ध्याईजे ।
योगाभ्यास करावा विशेष । सेवावे एकांत स्थानास ।
अखंड राहुनि समाधिस्थ । श्रीगुरु आज्ञे वर्तावे ॥
(श्रीरंग ७–१६ १८)

शिवाय आईला विनवितांना रंगोबा म्हणाले–

योग स्त्रियेवाचूनी आणिक नारी । समस्त जाण मातेसरी ।
जरी आणाल ते सुंदरी । वरुं म्हणती तये वेळी ॥
(श्रीगुरुचरित्र)

परंतु माय बाप कांही ऐकेनात. संतपुरुष अशावेळी मातृआज्ञाही मानीत नाही. श्रीतुकाराममहाराजांनी अशा महात्म्यांच्या बाबत म्हटले आहे.

भगवंती जेणें घडे अंतराय ।
हो का मायबाप त्यजावी ते ।

प्रल्हादे जनक बिभिषणें बंधु ।
तिहीं माता निंदु भरतें केली ॥

एके दिवशी भल्या पहाटे मायबापांना मनोमन वंदून स्वामींनी घर सोडलें. धामीं राम असतांना 'नसे राम ते धाम सोडूनी जावें । सुखालागी आरण्य सेवित जावें ।' अशी स्थिती नसताना केवळ आत्मारामाच्याच भेटीसाठी नव्हे तर जगदंतरी राम भरुन 'विश्वजन उद्धरावा । संसर्ग मात्रे ।।' याकार्यासाठीं त्यांनी गृहत्याग केला ते निरानरसिंगपूरी आले. श्रीदेवांच्या दृष्टान्तानुसार त्यांनी बद्रीकेदारचा रस्ता धरला. खाण्यापिण्याची क्षीती नाही, अंगावर अंगभर कपडा नाही. कमरेला दमडा नाही, उन्हा, पावसाथंडीत स्वामींनी बद्रीधाम गाठलें देवाच्या सान्निध्यात आले. त्यांनीच त्यांना आणले होते.

## श्रीलक्ष्मी वल्लभ दर्शन

इकडे घरी स्वामीच्या जाण्यानें मायबापाना चिंतेनें गाठले. माझा रंगोबा कोठे गेला हाच त्या माऊलीच्या चित्ती ध्यास होता माऊलीने सारी कर्मे करावीत श्रीगुरु स्मरण सोडू नय आणि अंतरी रंगोबाची काळजी रोज रात्री तुळशी वृंदावना समोर झोप घ्यावी पंतांनी दरमहाची पंढरी बारी चुकव नय त्या मायबाप विठ्ठलाला रंगोबासाठी पुन: विनवावे. घरी परताव पत्निला समजाव. यईल तो काळजी करु नको.

स्वामी व्यासगुंफेत आपले आसन मांडले दिवसांदिवस ध्यान करावे. त्या रघुगोपाळास आळवावे. कंदमुळावर गुजारण करावी याकालांत त्यांनी गायत्री पुरश्चरणही केल अखंड साधनेंने चित्त विमल–प्रविमल झाले.

'सकल धर्मा मध्ये धर्म । स्वरुपी रहाणें हा स्वधर्म ।
हेचि जाणावे मुख्य वर्म । साधु लक्षणाचे ।'

अशी स्थिती प्राप्त झाली पण तो देव भेटेना. परंतु एके दिवशी एक व्याघ्र आक्राळ विक्राळ रुप धारण करुन ता लक्ष्मीवल्लभ स्वामींना सामोरा आला. 'विश्वी विश्वंभर हा प्रत्यय जागा होता सार जगच त्याच मग हे रुपही त्याचेच ना !

'म्हणौनि जग परौते । सारुनि पाहिजे माते ।
ऐसा नोहे उचिते । आवघाचि मी ॥'

हा विचार अंतरी घेऊन वाक्स्तुती करीत स्वामी त्या चिन्मय शक्तीच्या वाहनांस सामोरें गेलें तो काय – लक्ष्मीवल्लभ मूळ स्वरुपात प्रगट झाले.

### : श्रीविठ्ठल संग रे —

मनी भरला रंग झाला । विठ्ठल संग रे ॥ध्रु॥
एकचि तंतु सोहं स्मरणाचा । वाजतो जैसा चंगरे ॥१॥
चिन्मय मूर्ति परात्पर आहे । पाहूनी झालो मनी दंगरे ॥२॥
रंगातित निजरंगी रंगला । जाहलासे भव भय भंगरे ॥३॥
— श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर

' राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशि कळा लोपलिया ॥

रंगनाथानी त्या भगवन्तास दंडवत घातला प्रेमाश्रुंनी श्रीचरणावर अभिषेक झाला रंगोबा ! 'लोकी योग लोपला आहे

' कैसा नेणो मोहा वाढिन्नला । तेणें बहुतेककाळ व्यर्थ गेला ।
म्हणौनि योगु हा लोपला । लोकी इया ॥'

अस घडु लागले आहे. तु लोकी जा महाराष्ट्र देशी धर्म दवळून काढ मीच तुझ्या केशवस्वामीच्या समर्थ रामदासांच्या जयरामस्वामीच्या आणि आनंदमूर्तीच्या रुपा स्वरुपानें समर्थ पंचायतन अस नामाभिधान घेऊन विचरत आहे. मनोगत व्यक्तवल–

रंगनाथ रामदास । आनंदमूर्ती केशवदास ।
जयराम स्वामी परेश । पंचरुप हें माझे
अवतार उमाकांत । शिवाजी जाण विख्यात ।
रंगनाथा त्वरीत । जावे तुवा येथोनि ॥
जगी उद्धार करावा । लोका बोध सांगावा ।
राजयोग बरवा । स्विकारा रंगनाथा ॥
(श्रीरंग८–५७ ते५९)

## राजधर्माकडून गौरव

देवदेवाचे दर्शन घेवून आणि त्याला आपल्या अंतरात साठवित हा तपोयोगी बद्रिकेदाराहून परतला. खाली आल्यावर टिहरीच्या हरीराजाने त्यांचा यथोचित गौरव केला. भरजरी पोषाख दिला, निल वर्णी अश्व दिला. आणि सारा लवाजमा दिला. श्रीगुरुंना दंडवत प्रणाम केला. गुरुदेवा कृपा असावी. त्यासकलांना आशीर्वाद देऊन ही राजयोग्याची स्वारी दक्षिणेंत निघाली. आधी पंढरपूरी जाव असा मानस उदीत झाला. त्याठायी पुंडलिकाने वैकुंठीचा देवच भूतळी आणला आहे. 'वैकुंठीचे निज । परब्रह्म आणिले ॥' शिवाय रंगोबांच्या घरी पिढ्यानपीढ्या पंढरीच्या वारीचा नेम आणि नियम होता म्हणूनच त्यांच्या घोड्याचा टापांनी

पंढरीची वाट धरली दरमजल करीत स्वामींची स्वारी पंढरीला आली, ' पावलोपंढरी वैकुंठ भुवन । धन्य आजि दिन सोनियाचा ।।' अशी धन्यता वाटली स्वामींच्या तपःपुत जीवनाचा कीर्ति परिमळ तो पावेतो पंढरीस येऊन पाहचला होता. मध्यंतरी आयोध्याच्या राममंदिरात भक्तसखा नुमंतानी त्यांना सांगितल होत आता लागवेगी पंढरीस जा आपला सारा प्राण नयनी आणून तुझे मायबाप तुझी वाट पहाताहेत, रंगोबांनाही माय दर्शनाची हुरहूर लागली होती शुद्ध एकादशीचा सुदिन होता पांडुरंगाच्या राऊळा रंगनाथ स्वामींचे कीर्तन होते. अफाट जनसमुदायांनी कीर्तना दाटी केली होती. ' नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।' हे तर त्यांचे कार्यच

> सगुण हरिकथा करावी । भगवत् कीर्ती वाढवावी ।
> अखंड वैखरी वदवावी । यथायोग्य ।।(श्रीदासबोध)

या कीर्तनाचा परिणाम ' प्रसंगे वाढवावी । अध्यात्म विद्या ।। ' हा असल्याने स्वामींचा कीर्तनावर उद्धारक म्हणून प्रेमा होता. स्वामींची असःखलित वाणी', तप, साधनेचे तेजःपूंज शरिर, वाणीतील कृपेचा ओलावा असा कीर्तनाचा अभूतपूर्व आणि अपूर्व रंग पाहून सहस्त्रावधी श्रोत्यांचे कान – मन धाले. या कीर्तनाला स्वामींचें माय–बापही हजर होते. मातेला वाटत होते हा माझा रंगोबाच असावा कारण तो तीचा आत्मांश होता! कीर्तनोत्तर मायबाप रंगोबाशी गेले बाकी काही बोलण्यापूर्वीच मातेला ओळखून स्वामींनी मायबापाचे चरण धरले ' तुका म्हणे मायबापे । अवघी देवाचीच रुपे ।।' असा भाव मनी दाटला रंगोबास मायेन उराशी धरलं हा मायपुत्र भेट सोहळा ज्यांनी पाहिला त्यांची धन्यता कशी वर्णावी.

## पीतृदेव संन्यासी

मग द्वादशीच्या पारण्यानंतर स्वपुत्रसह बापोजीपंत नाझऱ्यास आले. पुत्रगमनाप्रित्यर्थ मोठा आनंद सोहळा झाला. आता नाझरे गांवी स्वामीच प्रबोधन कार्य सुरु झाले मायबापाची सेवा, नित्यकर्म आणि ज्ञानप्रदान असे कार्य दिवसेदिवस चढत्या वाढत्या श्रेणीनें चालले होते माता आता थकली होती. पण रंगनाथ स्वामींची आत्मप्रत्ययाची वाणी श्रवून ती प्रतिदिन आनंदत होती. एके दिवशी त्या माय मांउलीने स्वामींच्या चरणाला हस्तस्पर्शून दर्शन घेतले आई ! अग हे काय ? 'पितयाने तैसा वंदावा कुमर । जयाचे अंतर देव वसे ।।' अशी विचारचर्या स्वामींना दिसली अशाच एका दिवशी त्या पुण्यशील माऊलीने स्वामींच्या मांडीवर मोठ्या आनंदात प्रभुस्मरण करीत देह ठेवला. माऊलीच्या निर्याणामुळे बापोजींच्या जीवनी पोकळी निर्माण झाली तो वैराग्यशील महापुरुष अधिक वितरागी बनला. ते स्वामींना घेऊन श्रीगुरु घरी कल्याणला आले पूर्णानंदांनी या आपल्या शिष्याला सन्यास दिला 'निजानंद' या नामाभिधानाने त्या शिष्याचा गौरव केला. बापोजींना कृतकृत्यतेचा परमानंद झाला पूर्णानंदांनी रंगनाथ स्वामींना सांगितले तू निजानंदाचा म्हणजेच तुझ्या वडिलांचा अनुग्रह घेत तूं आत्मज्ञानी असलास तरी श्रीगुरुबोधाशिवाय ते आत्मबोधाचें प्रमेय रुचीस येणार नाही.

> शास्त्राभ्यासे जालेही ज्ञान । परी अपरोक्षता नव्हेची जाण ।
> न सेविता संतपादरजःकण । बुद्धिसी स्पर्शेन स्वरुपी न घडे ।।
> (– श्रीरंगनाथ स्वामी यो. वा. १।५२८)

आजेगुरुंची आज्ञा शिरसावंद्य मानुन रंगनाथ स्वामींना निजानंदाकडून गुरुदीक्षा घेतली. पूर्ण पुरुषांसही अनुग्रह घ्यावाच लागतो 'श्रीरामप्रभू जरी-तरी वसिष्ठासी शरण ।।' असा धर्ममार्गच आहे. निजानंद असे आनंद परिपूर्णावस्थेत एकदा कऱ्हाडी आले आणि कऱ्हाडी आले आणि कऱ्हाडच्या प्रितीसंगमात मार्गशीर्ष व।।३० शके १५६४ साली जलसमाधी घेतली. आपला देह पंचमहाभूतांच्या स्वाधीन केला स्वामींना अतिव दुःख झाले. निजानंद, सदानंदाच्या कैवल्यधारेत पूर्णानंदांशी आनंदपूर्णतेनें लीन झालें. एक पर्व संपलें यासमयी रंगनाथस्वामींनी वयाची तिशी गाठली होती.

## आता प्रबोधनासाठी

आता स्वामींच फिरण विवरण सुरु झालं. कितन, प्रवचन आणि प्रबोधन हेच देहकार्य झालें. त्यांच्या सहज बोलण्यांतही उपदेश असे सारं वाणीच नारायणी वेंचलेली 'श्रवण मनन निजध्यास । साक्षात्कार होय ऐसे विवरा ।।' असं मानवी जीवनाचे साध्य-साधन ते सहजी सांगून जात.

> 'आलेल्यांनो संसारा । पुरुषार्थ करा बरा ।।
> सारासार विचार । मानव देही ।।'

अशा पदांतून ते सांसारिकांचा पुरुषार्थ प्रयत्नानें जागा करीत प्रारब्धही प्रयत्नानीच खुले होते असा तो महाबोध होय.

> 'साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरुपी एक झालें ।।'

अशा प्रत्ययी समर्थ रामदासांना अेकदा सहजासहजी रंगनाथ स्वामींचे स्मरण झालें. त्यांनी शिवरायाना सांगितले अरे रंगनाथांस बोलावणें धाड. तो मोठा योगी आहे. ' अगा

योगी जो म्हणीजे । तो देवाचा देव जाणीजे ॥' रंगनाथ तर 'सदा स्वरुपानुसंधान । हे मुख्य साधूचें लक्षण । जनी असूनी आपण । जनावेगळा ॥' अशा लक्षणांनी युक्त आहे.

शिवरायांनी सद्गुरु आज्ञा प्रमाण मानून ताबडतोब श्रीरंगनाथ स्वामींना सांगावा धाडला. 'सेवा सी आज्ञा स्वामींची प्रमाण ।' या न्यायानें आपल्या घोड्यावर निघाले मध्यंतरी निगडी वा निर्गुणपुरी या गावी घोड्याचा पाय एका दगडांत रुतला. स्वामी खाली उतरले. बदरीच्या वनांतून परततांना त्यांना व्यासदेवांनी सांगितल होत दक्षीणेंत ज्याठायी घोड्याचे खूर रुतले तीं तुझी कर्मभूमी त्या पुण्यभूमीतुन तू धर्म प्रवर्तनाचे आणि धर्मसंकीर्तनाचे लोकोत्तर कार्य आकारी आण. स्वामींनी या आज्ञेने स्मरण झाले त्यांनी त्या निर्गुणपुरीच्या भूमीला वंदन केले 'काही परमार्थ वाढवावा ।' यासाठी भूमीची निवड झाली रंगनाथ स्वामी थांबले त्यांनी शिवरायांना निरोप धाडला आम्ही निर्गुणपुरी वस्ती केली आहे इच्छा असल्यास एखादी मठी बांधून द्यावी धर्मज्ञ राजानी छान सुंदर मठ बांधून दिला ज्या दगडावर घोड्याचा खुर रुतला होता त्या दगडाची आजही श्रद्धा जागी असल्याने त्याठायी पूजा होते.

## कीर्तनाचा अगाध महिमा

श्रीरंगनाथ स्वामी एकदा सहजगत्या सातान्यास आले शिवरायांना वार्ता कळली. तात्काळ ते सामोरे गेले अगदि त्याच दिवशी समर्थही अचानक राजनगरीला आलें. शिवरायांना आनंद झाला रंगनाथ स्वामीचे रात्रभर हरी कितंन झालें तो एकादशीचाच दिवस होता.

कीर्तनाचा महिमा अगाध । कीर्तने संतोषे परमात्मा ।
सकळ तीर्थें आणि जगदात्मा । हरिकीर्तनी वसे ।

असा सकल श्रोत्यांना अनुभवामृत प्राप्त झाला. राजानी द्वादशीच्या पारण्यास येण्यास सर्वांना तस स्वामीनाही विनवल. पण समर्थांना स्वामींचा अधिकार शिवरायांना दाखवावयाचा होता. अपरात्री स्वामींनी शिवरायांना सांगीतल अरे, तू रंगनाथ स्वामींना उद्या प्रसादाला बोलावलस ना. होय स्वामी ! तर त्यांना निरोप धाड, हा व्रत रहित झाला आपण सारे त्याच्या शिवाय प्रसाद घेवू.

रंगनाथ स्वामींच्या निवासी तर कांही नव्हते. राजसेवकांचा निरोप येताच स्वामींनी आपल्या शिष्यांना सांगीतल ज द्वादशीसाठी जे मिळल ते आणा पण द्वादशी साजरी झाली पाहिजे. सेवक रात्री हिंडले त्यांना एक रेडा मिळाला तो तसाच त्यांनी निवासा आणला. दत्तप्रभूंची

> **= बाई माझे दैवत श्रीगुरुराय –**
>
> बाई माझे दैवत श्रीगुरुराय ॥ ध्रृ ॥
> बारी मुक्ती दासी होती । नमिता श्रीगुरुचे पाय ॥१॥
> ब्रह्मादिक जे ध्यानी ध्याती । माननी हाचि उपाय ॥२॥
> पूर्णरंग गुरुराज विना । आन नाही तरणोपाय ॥३॥
>
> — श्रीरंगनाथ स्वामी

कृपा म्हणून स्वामींनी त्याचे तुकडे तुकडे केले अरे शिजायला टाका. हा सारा प्रकार त्या राजदुतांनी पाहिला त्यानी ही वार्ता राजधर्मांच्या कानी घातली. समर्थांना राजानी ही वार्ता मोठ्या जड चित्तानें सांगीतले स्वामी– रंगनाथ स्वामींनी असे अधर्मी, अघोर आणि अनाचारी कृत्य कां करावे ? समर्थ स्वस्थ बसले. शिवरायांच्या दरबारी थाटांत पानें साजरे झाले वारकरी, धारकरी, ब्रह्मवृंद इ. ची भोजने झाली. समर्थ म्हणाले शिवबा चला आता रंगनाथ स्वामीकडे पारणें सोडण्यास जावू शिवरायांना आश्चर्य वाटल पण गर्वाज्ञा प्रमाण मानून ती सारी मंडळी रंगनाथ स्वामीच्या मठी आले समर्थ येत असल्याची अंतरीक जाण होताच रंगनाथ स्वामींनी सर्वांच्या भोजनाची तयारी केली होती समर्थांना स्वामींनी नमस्कार केला उराउरी भेट मोठ्या आनंदात सर्वांची जवण झाली. पंचपक्वान्नाचा बेत होता. भोजनोत्तर समर्थ म्हणाले, शिवबा आता या भ्रष्ट रंगनाथाला प्रायश्चित्त देऊ समोरच त्या मारलेल्या रेड्याच चामड पडल होत 'राममयी जडली प्रीती । राममय झाली वृत्ती । अंतर्बाह्य सर्वांभूती । रामची भासें ।' अशी ज्यांची चित्तदशा ते रंगनाथ स्वामी त्या चामड्याजवळ आले त्या चामड्यावर त्यांनी विभूती टाकले उठ बाबा ! म्हणाले तो रेडा फुरफुरुन उभा राहिला 'अशक्य ते तुम्हा नाही नारायणा । निर्जिवा चेतना आणावया ॥' संत सामर्थ्य उदीत झाला. ज्ञानदेवांनी रेडा बोलविला होता. 'कैसा रेडा बोलविला । गर्व द्विजांचा हरविला ॥' रंगनाथ स्वामींनी रेड्याला मुक्त केल. शिवराय नम्र झाले.

सद्गुरुपांची अलौकीक स्थिती । देवाहूनी श्रेष्ठ परती ॥
(श्रीरंग १०।९७)

श्रीसमर्थ व श्रीरंगनाथ स्वामींची ही पहिली भेट शके १५६७ मध्ये झाली असे म्हणतात येथून पुढे या दोघांमधील परमार्थ प्रेमा दिवसेदिवस शुक्लेंदुवत् वाढतच गेला.

## कीर्तने होय सत्पात्र

साधु संतांचे कार्य एकमेकांच्या कार्याला पूरक असते.

एकदा रंगनाथ स्वामीना केशवस्वामीच्या कडे जाण्याची इच्छा झाली जाण्याची तयारी केली अेवढ्यांत जयराम स्वामीचा निरोप आला माघ पौणिमेचा श्रीगुरु उत्सवाला आपण अवश्य यावे त्याला होकार भरुन स्वामी भागानगरीस आले. दोन संतांच मिलन झाल केशव स्वामीच्या मठी श्री रंगनाथ स्वामीचे रोज कीर्तन होई असंख्य जनसंमर्द लोटत असे

> कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गतीं ।
> कीर्तने भगवत् प्राप्ती । यदर्थी संदेह नाही ।
> कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तने होय सत्पात्र ।
> हरी कीर्तने प्राणीमात्र । सुशील होती ॥
> (श्री दासबोध ४।२।२७।२८)

नगरभर असा अनुभव सर्वांना येवू लागला. असा नित्य नामजय घोष चालु होता.

आज प्रातःकालीच स्वामींना जयराम स्वामींची आठवण झाली. दिन पाहतात तो माघ पौर्णिमा होती. माघी पौर्णिमेला वडगांवला जाण्याचे कबूल केले होते. केशव स्वामीचा निरोप घेऊन त्या विजयी अश्वावर स्वार होवून स्वामी सायंसयमा पावेतो वडगांवी दाखल झाले शंभर मैलाचा टप्पा अवघ्या १० । ११ तासात पार झाला रात्री प्रसन्न कीर्तन झाले अवघ्या समाजाला डोल आला सकाळीच घोड्याने अतिव श्रमामुळे देह ठेवल्याची वार्ता स्वामींच्या कानीं आली मोठा खेद झाला स्वामी अन्नोदकही घेईनात 'तोही माझा आत्मा' दुखावला ही भावना जयरामस्वामी त्या मृत घोड्याजवळ आले. त्याला प्रेमभरे हांकारले तो टवकारुन खडा झाला त्याच्या पाठीवर स्वामी द्वयांचा थाप पडली सकलैजनांना स्वामी सामर्थ्याची जाणीव झाली त्यांनी नामाचा जयजयकार केला.

## तीर्थ यात्रे जाय चुको नको

निगडीला परतल्यावर स्वामी तीर्थ यात्रेस निघाले. 'तीर्थयात्रे जाय चुको नको' हा श्रेष्ठांचा संदेश आचरणें आवश्यक होते पावन अवस्थेतही लोकाचारांशी विन्मुख होता येत नाही प्रवासांत रहिमतपूरी आलें. एका सश्रद्ध ग्रामलेखकांच्या घरी उतरले तेथे उतरताच स्वामींच्या असे निदर्शनास आले की, या ग्रहस्थाच्या धर्मांगीचा आज दुपारी मृत्यु आहे. थोड्या वेळानी स्वामीनी त्या मातेला बोलावल तीला कुरवाळल. तो त्या मातेच्या अंतरी विकल्प आला 'स्त्रीयासी देखोनि एकांत । वर्तन आपुले ठीक नव्हे ॥' पण स्वामी म्हणजे 'पराविया नारीं । रखुमाई समान ॥' दोन प्रहरी त्या माऊलीला सर्पदंश झाला आणि ती निचेष्टीत पडली सार अटोपल. सर्वत्र आक्रोश झाला संतांच्या आगमनान् अस विघ्न कां याव? रंगनाथ स्वामींनी सकलांना समजावल. ईश्वराचा धावा करण्यास सांगीतल 'हरी तूं आमुचा कैवारी । आले विघ्न निवारी । हरी तूं आमुचा ॥' असा जल्घोष सुरु होता. स्वामींनी श्रीदत्तांच स्मरण केलं आणि त्या मातेच्या देहावर तीर्थसिंचन केलं ती माता झोपेतून उठावी तशी जागी झाली स्वामींच्या चरणांनातीने स्वाश्रुने धुतले 'तयाचे चरण न सोडी ।' असे तीला झाले स्वामी म्हणाले माते – तुझ्या उदरी गर्भ आहे तो मला दे –

> तुझ्या उदरी योगभ्रष्ट । येईल जाण तपोनिष्ठ ।
> देई मज अभिष्ठ । तव पुत्र दान देई ॥ (श्रीरंग १३।५३)

मातेने 'तुझे देणें तुझ्या । समर्पूनी पारी ॥' या न्यायानें होकार भरला माता यथाकाली प्रसूत झाली १० । १२ महिन्याच बाळ निगडीच्या मठात आल त्याला स्वामींनी जनार्दन म्हणून हांकारल 'उपजलिया बाळकासी । नाम नाही तयापाशी । ठेविलेनी नावेसा । वो देत उठे ॥' त्याचे संगोपन केले तो श्रीगुरु सेवेतच सारं सार समजू लागला त्यांनी जन्मभर स्वामींची सेवा केली आणि त्यांच्या नंतर त्यांचा धर्म गर्जत वृद्धिगत करीत राहिला.

## श्रीमोरया गोसावी

चिंचवडचे श्री मोरया गोसावी म्हणजे श्रीगजाननाचे परम भक्त. गणराय त्यांच्याशी बोलत पण हा थोडासा सात्वीक अहंकार त्याच्या मनी उपजला. एकदा हा अहंकार घालविण्यास ठ समर्थ पंचायतन चिंचवडी आल भोजनाला पंगत बसली. अस ठरलं भोजनाला आपापल आराध्य दैवत आणाव. गणराय आले रंगनाथ स्वामींन दत्तरायांना हांकारल, समर्थांनी रामरायांना पाचारल सारे आले देव भक्तांच मिलन झाल श्रीमोरया गोसावींचा अहंकार गला. 'अहंकार गेला । तुका म्हणें देव झाला ॥' अस घडल.

## प्रपंच परमार्थ चालविणें

यात्रा गंगातटाकी आली समवेत हजार दोन हजार शिष्य मंडळी होती. समर्थ रंगनाथांना म्हणाले अरे यात सच्चे कीती स्वामींनी दत्तरायांना पाचारल ते मलंगवेषाने उपस्थित झाले एक डेरा चुलीवर ठेवला जवळच सार त्यांत घातल, कोंबडी कुतर इ डेरा भरेना आता एकेका शिष्याला कापून यात घालतो म्हणाले तो क्रोधावतार पाहून सारी शिष्य मंडळी दिसेल त्या रस्त्यांनी पळून गेली फक्त कल्याण

आणि जनार्दन हीच श्रद्धाशीलांची जोडी राहीली परमार्थी मिळाच.

सातान्याला शिवरायांच्या दरबारी किर्तन सोहळा प्रत्यही चालू होता या कीर्तनांस समर्थ आवर्जून उपस्थित असत.

प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।
म्हणोनि सावधानपणें । प्रपंच परमार्थ चालवणें ।
ऐसें न करिता भोगणें । नाना दुःखे ॥ (श्रीदास १२-१)

असा बोध प्रबोध सुरु असे एके दिवशी किर्तन चालू असतांनाच स्वामी कांही काळ स्तब्ध झालें. पुनः भानावर आले अहो! एका शिष्याचे जहाज पाण्यांत बुडत होते त्यांनी स्मरण केल मला जाव लागल ' करणें का न करणें । हे आघवे तेचि जाणें । विश्व चळतसे जणें । परमात्मेनी ॥' अशी देवाची कृपा दहावीस दिवसांनी तो शिष्यवाणी आल स्वामींना दंडवत प्रणाम करुन म्हण ला–

तंव स्मरताची वेगी । लागले जहाज तुस्थळी ।
(श्रीरा १५।४४)

शिवरायांना रंगनाथ स्वामीच्या सामर्थ्याची आपली एकदां कल्पना आली. योग्यांना कांहीच अशक्य असत नाही 'स्वर्गीचा आलोच् आईके । मनोगत ओळखे मुंगीयेचे ॥' अशी त्यांची अवस्था असते रंगनाथस्वामी असे थोर योगी साधु होते. नाथराय म्हणतात–

साधु थोर जाणा । साधु थोर जाणा ।
साधु थोर जाणा । कलियुगी ॥

## खंडोबाचा श्रीधरस्वामी

स्वामींचा खंडोबा नामक एक पुतण्या एकदा स्वामी समवेत पंढरपूरी आला तो योगभ्रष्ट होता पण ती भावना उदीत झाल नसल्याने मंदमती सारखा राही. पंढरीरायाच्या प्रांगणी राऊळांत रंगनाथस्वामीची नित्य कीर्तनें होत एकदां स्वामी पूजेत मग्न असता यायला वेळ लागू लागला तेव्हा समर्थ म्हणाले खंडोबा तूं आज कीर्तन कर मला कसलही ज्ञान ही आज आपली फजिती होणार त्यापेक्षां मरण परवडल अस म्हणून तो स्वामींच्या बिन्हाडी आला स्वामींना सांगीतल मी प्राणत्याग करतो, दयादवी स्वामींनी त्याला जवळ घेतल मुख उघडायला सांगीतल त्याच्या जिभेवर 'श्री' हे अक्षर लिहील जा आता कीर्तनकर अस म्हणाले तो राऊळी आला समर्थांना वंदुन कीर्तन करु लागला किर्तनी

## = जिवन्मुक्त साधु म्हणावे तयाते –

उदासीन चित्तीं अनीनो स्वदेही ।
प्रपंची यया ताठवे द्वैत कांही ।
विचारी विवेके निवारी भयातें ।
जिवन्मुक्त साधु म्हणावे तयातें ॥१॥
जनाचार चालें विधियुक्त बोले ।
सदा सर्वदा सर्व साक्षी निवालें ।
न बाधे कदा कल्पना काम जेथें ।
जिवन्मुक्त साधु म्हणावे तयातें ॥२॥
भजे मत्त मतांतरी एक पाहे ।
नव्हे खंड आखंडता दृढता हे ।
न मोडे तदाकार वृत्ती मनातें ।
जिवन्मुक्त साधु म्हणावे तयाते ॥३॥

– श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर

रंग भरला ' आपुलिया स्नेहाचो वाणीश्वरी । जे मुकेयाते अंगीकरी । तें वाचस्पतीशी करी । प्रबंधु होडा ॥' असे घडले कीर्तनोत्तर समर्थांनी खंडोबास 'श्रीधर' या नामानें हांकारले 'तुम्ही संत माझिया कडा । कराल दिठीचा बहुडा । तरी तुम्हा माने एवढा । होईन मी ॥' अस घडल हेच श्रीधर स्वामी पुढे विख्यात कवी, हरीभक्त झाले त्यांनी शिवलीला मृत, रामविजय, हरिविजयादि ग्रंथ लिहीले पंढरीरायाचे राऊळांत 'ब्रह्मरुप काया होतसे कीर्तनी । भाग्यतरी ऋणी देव ऐसा ॥' अस घडल ते 'विठ्ठलावाचूनी ब्रह्म जे बोलती । वचन ते संत मानू नय या निर्धारामुळे श्रीगुरुच्या कनवाळू आश्रयामुळे आणि आशिर्वादाने याची कृतज्ञता श्रीधर स्वामीनीं आपल्या वेदांत सूर्य नामक ग्रंथात नोंदवून ठेवली आहे.

गुरु आज्ञा त्यासी प्रमाण । न म्हणें कार्य थोर लहान ।
आपुले नित्यकर्म सांडून । तेचि अनुष्ठान तयासी ॥ ५-१२३

तीर्थ यात्रा संपवून स्वामी निगडीस आले कीर्तनोत्तर कल्याण स्वामी रंगनाथ स्वामीना म्हणाले–

अद्वैत चर्चा कंटाळवाणी । सोडूनी वर्णा कोदंडपाणी ॥

याला रंगनाथ स्वामींनी अत्यंत चपखल व तत्व ज्ञानात्मक उत्तर तात्काळ दिले–

अद्वैत चर्चा जवं हे कळेना । तो पूर्ण रामी मन हे वळेना ॥

कल्याणांना आनंद झाला. असे स्वामी पूर्णानंदाचे पूर्णाधिकारी प्रशिष्य होते.

## बहुतांचे समाधान करावे

बहुतांचें समाधान करावे । बहुतांस मानेल ते बोलावे ।
विरंग पडो नेदावे । याथे मध्ये । (श्रीदास १२-९-२०

या संकेताचा पदर न सोडता किर्तन प्रवचन चालू असे त्यामुळें सारा परिसर पारामी चिन्मय होऊ लागला.

कीर्तनाचेनी नटनाचे । नाचिले प्रायश्चित्त व्यवसायाचें ।
नामची नाही पातकें । ऐसे केले ॥ (श्रीज्ञानेश्वर )

स्वामी एकदा निघून भागीरथीच्या दर्शनासाठी काशीला निघाले. वाटेत देहुला थांबले. संतमुकुटमणी श्रीतुकोबारायांनी त्यांचे कीर्तन करवून 'संताची विभव हेचि संपत्ती ।' असे तुकोबाराय स्वामी चरणी मस्तक तुकविते झाले. स्वामी म्हणाले तुकोबा चला आमच्याबरोबर भागीरथी मातेच्या दर्शनाला, आपल्या सारख्या संतसंगतीचा आम्हाला लाभ होईल. तुकोबा म्हणाले देवा ! मी आता थकलो. माझे हे पत्र तेवढं भागीरथी मातेला द्या. तीने उत्तर दिल तर मला आणून द्या मी ती शिरी वागवीन

परिसेवो माते माझी विनवणी । मस्तक चरणी ठेवीतसें ।
भागीरथी महादोष निवारणी । सकळा स्वामीणी तीर्थाचिये ।
जिता मुक्ती मोक्ष मरों तुझ्यादारी । अहिक्य परत्री सुखरुप ।
तुका विष्णुदास संताचे पोषणे । बाकृपुणा तेणे पाठविले ।

- - - रंगनाथ स्वामी काशीला आले भागीरथी त्यांना सामोरी आली माझ्या तुकोबाचा निरोप ! स्वामीनी पत्र काढून दिलं. ती जगत्तारिणी म्हणाली

ऐका रंगमूर्ती सांगावे निरोपा । नमस्कार बापा तुकोबासी ।
माझिये अंगीचा मळ काढील कवण ।
एका तुम्हा वाचून विष्णुदासा ॥

- - - 'संतांचेनी अंगलगे । पापाते जिणणे गंगे ।।' हा ज्ञानदेवांचा भाव भागीरथीने तुकोबाला कळविला रंगनाथ स्वामीचे हे उत्तर तुकोबांच्या हाती दिल तो विष्णुदास प्रेमान न्हावून निघाला रंगनाथ स्वामीही त्या प्रेमसागरांत सामील झाले.

वाटेत बोहेगावी एका सश्रद्धाच्या घरी स्वामी स्वतः हून गेले. तो दरिद्री होता पण पत्नि मोठी भाविक. घरी एक म्हैस पण ती पाडसाशिवाय दुध देईना आणि दुर्दैव असं की पाडसाला आजच हिंस्त्र स्वापदानी मारल होत.स्वामींनी म्हशीच्या पाठीवर हात ठेवल. तिन विना कुरकुर द्विगुणीत दुध दिलं.त्यांची दुग्धभीक्षा स्विकारुन स्वामी त्या दांपत्याचा भक्तीभाव वाढवीत परतले.'भावेविण देव नकळे निःसंदेह।' हे संतवचन - नाथवचन सार्थ झाले.

## समर्थांचे परमप्रेम

श्रीसमर्थांचे रंगनाथ स्वामीवर अतिव प्रेम 'प्रेम नये दाविता, सांगता बोलता । अनुभवी चित्ता चित्त जाणें ॥' एकदा समर्थ असेच आतल्या ओटीनें निगडीला आले बोलता बोलता सहज म्हणाले—

कीर्तनी असावे सावध । श्रोते पहावे शुद्ध बुद्ध ।
समये देखोनि उचित । त्यारिती भाषण करावे ॥
(श्रीरंग १८.२८)

स्वामींनी मान तुकविली पुढच्याच आठवड्यांत स्वामी वेरुळ घृष्णेश्वरीं आले जिथे जात तिथे प्रबोधन चालुच. तो त्यांचा जीवनधर्मच होता त्यांच्या कीर्तन श्रवणास रोज त्या देशीचा यवन राजा येत असे प्रत्यही स्वामींनी वेदांत, 'बाळ जे जेवविजे । तै ग्रासु विसाठायी कीजे ।' या न्यायाने सोपा करुन सांगत त्या रमानायकाचे वैभव सांगत—

श्रीराम कीर्तिची परम कीर्ती । श्रीराम आमुची विश्रांती ।
श्रीरामशांतीची परम शांती । मंगळमुर्ती श्रीरामु ॥
श्रीराम ब्रह्मादिकांचा नियंता ।
श्रीराम विश्वास्थती संहारकर्ता ।
श्रीराम जगाते उद्धारिता । स्वज्ञानें करुनी ॥
(श्रीरंग-योवा. १२७१७२)

तो यवन राजा एके दिवशी म्हणाला मला त्या परब्रह्मरामाचे दर्शन घडवा नाही तर तुम्हाला तुरुंगात टाकीन. घडलेही तसेच स्वामींची तुरुंगांत रवानगी झाली. भोजनाची सारी सामुग्री यथास्थित पोहोचती व्हावी. 'सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे ।।' या समाचित्त वृत्तीत स्वामी स्थित होते समर्थांना ही वार्ता समजली ते तडक निघून राजप्रासादात प्रवेश केला जय जय रघुवीर समर्थ अशी ललकार दिली. राजा उठून उभा राहीला तो साक्षात् ब्रह्मपिंडी मूर्ती पाहून त्याला आश्चर्य वाटल. समर्थ म्हणाले तुला श्रीहरी दर्शन हवय ना. चल माझ्या बरोबर, समर्थ पुढे राजधर्म मागोमाग जावू लागला एका दरीच्या कडावर आले समर्थांनी त्या खोल दरीत शरिर झोकून दिले क्षण र्धात अदृश्य झाले. राजा अवाक् झाला त्यांनी स्वामींना मुक्त केले क्षमा करा. माझी चुक झाली. राजा चरणी लोळत होता एवढ्यात समर्थ आले त्यांच्या समवेतच ते श्रीरामरुप प्रगट झाले.

श्रीराम मंगळाचे मंगळ । श्रीराम परब्रह्म निष्कळ ।
श्रीराम नित्य निर्मळ । चिद्घनेक रुप ।
(श्रीरंग यो. १—१७३)

अस रुप पाहून राजधर्म कृतकृत्य झाला. समयोचित न बोलण्याचे असे घडले हे स्वामींच्या सहजी लक्षांत आले समर्थ व स्वामी पुढच्या प्रवासाला निघाले.

## आपणासारिखे करिती

या मह स्वामी द्वयांची जोडी कृष्णाकाठी आली. कृष्णेला महापूर आला होता. समर्थ सिद्ध योगी होते त्यांनी पाण्यावर आसन टाकले त्यावर बसून पैलतीरी गेले. रंगनाथ स्वामी राजयोगी महायोगी होते त्यांनी घोडाच पाण्यात घातला तो पाण्यावरुन धांवत पैलतीरी गेला. त्याचा खुरही भिजला नाही संत पशूनाही आपणासारिखे करतात.

पैलतीरी आल्यावर समर्थ म्हणाले रंगोबा या आकाशांत उडणाऱ्या घारीला तीर लावून खाली पाडतोस बोलण्याचा अवकाश तीर लावून घार समर्थांच्या चरणी सादर केली समर्थ म्हणाले अरे रंगोबा हत्या घडली. ब्रह्मवृंदांना बोलाविण्यात आले प्रायःश्चित्तासाठी धर्मनिर्णय सांगु लागले. रंगोबांनी घारीला आपल्या हाती घेतले. तीच्यावर हात फिरवीत म्हणालें बाई उठ. पडली तशी घार उडून गेली ब्राह्मण पोथ्या आवरुन निघून गेले सत् संगात सकलांना मुक्तीच वरते स्वामींनी योगवासिष्ठयांत हे सांगीतले आहे–

म्हणोनि सत्संगे दैत्यासी मुक्ती । राक्षसा सत्संगे माझी प्राप्ती ।<br>
मृग पक्षीयासी सत्संगती । माझी प्राप्ती झाली असे ॥

## अकुळीसाचा श्रीकृष्ण

एकदा स्वामीचे भागानगरी श्रीकेशव स्वामीचे मठात कीर्तन चालु होते त्या नटनाटकी श्रीकृष्ण लीलांचे वर्णन स्वामी मधुरतेने सांगत होते.

एक म्हणती नंदाचा । एक म्हणती वसुदेवाचा ।<br>
ठाव नाही बापाचा । अकुळीसाचा श्रीकृष्णु । श्री एकनाथ

अशा अकुलीयाचे कुल वानीत होते. राधाकृष्णाच्या आणि विशेषतः राधेच्या अतुलनीय प्रेमाचा विषय होता. भक्ती ही 'परमप्रेमस्वरुपा' असते. कीर्तनास रंगनाथांनी रंग भरला होता तो सर्वांच्या अंगी उधळत होता. कीर्तनाला राजधर्म उपस्थित होता. राजा म्हणजे सकल ज्ञानाचे नव्हे सकल सत्तेचे निधान ! तो राजधर्म उठून उभा राहीला. गर्जुन म्हणाला या भिंतीवर राधाकृष्णांचे चित्र आहे या चित्रांतील श्रीकृष्णाने राधेच्या मुखी तांबूल घातला तरच मी ही कृष्ण कथा सत्य मानीन नाहीतर तुम्हा सर्वांना प्रत्येकी पन्नास रुपये दंड केला आहे सर्व श्रोते आवाक झाले

**= मन हे कारण बंधन मोक्षाचे —**

मन हे कारण बंधन मोक्षाचें । पाहता दोन्ही पक्षाचे ॥ध्रु॥<br>
स्वरुपोन्मुख मन उन्मन होता पूर्णानंदी लक्षाचें ।<br>
विषय विलासी गुंतुनी पडता केवळ बीज भववृक्षाचे ॥१॥<br>
याचिलागी करणे सह मन शम दम युक्त मुमुक्षाचे ।<br>
स्वात्मसुखामृत सेवूनी तृप्त केवळ साधू सुदक्षाचे ॥२॥<br>
स्वर्ग नर्क या द्विवीध कल्पना करण हे मन यक्षाचे ।<br>
निजरंगे रंगता होते स्वरुप पूर्ण अलक्षाचे ॥३॥<br>
– श्रीरंगनाथस्वामी निगडीकर

सर्वांना या संकटानी ग्रासले. श्रीरंगनाथ स्वामींना सर्वांना अभय दिले. ते म्हणाले तो परमात्मा ' भयकृतभयनाशनम् आहे शिवाय भक्ताला संकट येवूच शकत नाही. सुर्याला कधी अंधाराचा अनुभव येईल कां ? 'सूर्यासी अंधःकारु । कं जाहला होता गोचरु ।' (अमृतानुभव)

श्रीगुरु दत्त समर्थ । भक्ताचे पुरवी आर्त ।<br>
तुम्ही स्वस्थ करुनिया चित्त । अवधान द्यावे कथेसी ॥<br>
(श्रीरंग २०।९४)

अस म्हणून स्वामींनी भजनास सुरुवात केली ' कृष्ण कृष्ण जयचा' गगनभदी जयजयकार झाला आणि काय आश्चर्य चित्रांतील भगवान राधेच्या मुखी विडा देत होता. सर्वांचे हात आपोआप जोडले. सहस्त्रावधी भावुकांना श्रीकृष्ण दर्शन झाले राजा नम्र झाला. 'कीर्तनी प्रत्यक्ष देव नांदतो' याच्या अनुभवाने सारे श्रोते धन्याती धन्य झाले.

## पंढरपूरी चातुर्मास

एके वर्षी स्वामींचा चातुर्मास पंढरपूरी चालु होता. प्रति द्वादशीला स्वामींच राऊळांत कीर्तन होई. एका दरिद्रि मातेला वाटले एखादे दिवशी स्वामीला जवायला सांगावे मी तर घरी एकटीच शिवाय गरीब. स्वामी कसे यतील ? कीर्तन संपले ती बाई थबकली होती. तीचा मनोकामना ओळखून स्वामी स्वतःच म्हणाले बाई मी तुमच्याकडे उद्या जेवायला येतो बर ती माय जागीच आनंदली 'कां रायाचें देह चाळूं । रंका परौते गाळु । हें न म्हणेची कृपाळु । प्राणु पै गा ॥' हा जसा प्राण वायु धर्म तसाच संताचा धर्म असतो 'नाही विचारित । मेघ हागणदारी शेत । अस स्वामींच कोमल हृदय. त्या मातेने दुसऱ्या दिवशी स्वैपाक केला दोन भाकरी टाकल्या थोडे पीठलें केल. 'दरदरीत पाण्या माजी रांधी येल्या कण्या । माता मणी म्हणत होती मी दुर्बल ' येवढयात १२॥ च्या सुमारास स्वामी आलें माता पान

वाढती तोच समर्थांनीही ललकार दिली. स्वामीनी आणखी एक पान वाढायला सांगितल आता हे कस पुराव' समर्थ पानावर बसले तेवढयात जयराम स्वामी व आनंदमूर्ती आले ती माता पुरती घाबरली ऐवढयात केशव स्वामी ही आलें समर्थ पंचायतन जेवायला बसल अन्नतर एकाचेंच होते. 'मी सुदाम्याचिया सोडी गाठी । पव्हयासाठी ॥' असा देव-धर्मच संतहृदयी स्थिर असतो. श्रद्धाशील दुर्बलाच्या घरी जेवून ही पंचमूर्ती संतुष्ट झाली त्या मातेला अस्मान ठेगण झाल तीच्या नयनांना धारा लागल्या पुन: आंत जावून पाहाते तो स्वैपाक तसाच. ती माऊली या सकल समर्थाच्या चरणावर लोळली विदुराच्या कण्या भक्षुन पंचायतन परतला. गावभर ही वार्ता पसरली सामर्थ्याच अस दर्शन नेहमीच घडत असे.

## वेद अनंत बोलिला

कनेरखेडचा एक ब्राह्मण समर्थांकडे वेदांतचर्चा करण्यासाठी आला तो वेदांत वाचस्पती होता. त्याला जयपत्र हवे होते. समर्थांनी त्याची समजूत काढीली. वेद अनंत बोलिला अस सांगीतल पण तो अहंमन्य ब्राह्मण ऐकेना ! 'शबरी तरगयी, कुबरी तरगयी, तरगये जंगल जट, रहगये ब्रह्मन भट ॥' (कबीरजी) ते यामुळेच समर्थांनी रंगनाथ स्वामींच्याकडे दृष्टीक्षेप केला. 'शोभविले येरयेरा, सोने एके ठायी हिरा ॥' अशी या पंचायतनाची स्थिती-गती होती. रंगनाथ स्वामींनी अेक अत्यंज बोलविला त्या अज्ञानी जीवाकडे दृष्टीक्षेप टाकला–

'कां जै दिठीवा तुमचा वरुषे। तै सकळार्थ सिद्धीमती पिकें।

(ज्ञानेश्वरी) असे घडले. त्या अंत्यजाने वेदांत चर्चा करुन त्या कनरखेडच्या ब्राह्मणास वादात जिंकले–

निस्तेज जाहला ब्राह्मण । स्वामींसी घाली लोटांगण ।<br>
अपराधी मी पापी पूर्ण । आता उद्धार करावा ॥<br>
(श्रीरंग २६।३३)

स्वामींनी त्यालाही कृतार्थ केला. त्याला सांगितलं -

मी कोण झालो जग कासयाचे ।<br>
याचे असे कारण काय साचे ।<br>
विचार साचार आता न केला ।<br>
तो इंद्रियार्थी जन हा भुकेला ॥

माणसानीं यासाठी अंतरमुखी व्हाव. बोलण्यासारख वागाव तरच माणस मानतात आणि जाणतातही समर्थ म्हणतात–

बोलण्यासारिखे चालणें । स्वये करोनी बोलणें ।<br>
त्याची वचनें प्रमाणें । मानीती जन ॥

रंगनाथस्वामींचा धर्म असाच आचारविचार सम !

## राजयोगी रंगनाथ

श्रीरंगनाथ स्वामी जसे योगी भक्त होते तसे ते राजयोगीही होते. एकदा समर्थ त्यांना म्हणाले रंगोबा ! अरे आपल्या सारख्या सन्याशांना कशाला हा राजदरबारी थाट 'वैभव सकळा । तुका मानीतो विटाळ ।' अस व्हाव. चल लंगोटी नेसून माझ्या बरोबर चल. ते पूर्ण वैराग्यशील होते लंगोटी नेसून समर्थाबरोबर निघाले एका वनात आले स्नान संध्या ध्यानधारणा सुरु झाली ' ध्यानं निर्विषयम् मन: ।' अस झाल. समर्थ रंगोबास जागे करीत म्हणाले. मी गावांतून भीक्षा मागून आणतो मग आपण भीक्षा घेवू. स्वामींनी होकार भरला नि ते परत ध्यानी मग्न झाले.

समर्थ दान योजनें दूर असलेल्या खेड्यांत गेलें. इकडे या रानात एक सरदार शिकारीसाठी आला होता त्यांने आपल्या श्रीगुरुंना पाहीले 'असो जयास मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरुवीण मोक्ष पावावा । हे कल्पांती न घडें ॥' हा समर्थ विचार त्या सरदाराच्या मनी स्थिर होता त्यानी रथ सोडून रंगनाथ स्वामींना दंडवत घातला सेवकांना गावी पाठवून सारी सामुग्री आणायला सांगीतली तंबु, राहुटया, देवालय, आचारी पाणकी, तास दीड तासात तिथे एक नगरच उभे राहीले 'राजा चाले तेथे वैभव सांगातें।'असतेच देवाच्या समोर श्रीरंगनाथ स्वामी भरजरी शालु नेसून पूजा करु लागले एवढयात समर्थ भीक्षा घेवून आले. पाहतात तर येथे एक नगरच वसलेले, त्यांना वाटले आपण रस्ता तर चुकलो नाही ना ! पण समोर रंगोबाला पाहताच त्यांना विचारले अरे हे काय? त्यानी त्या सरदारा कडे बोट दार्खावले. सरदारानीं सार कांही सांगीतलं समय म्हणाले, रंगोबा तू खराच राजयोगी बाबा. आम्ही जातो तुमची चालुद्या ऐश्वर्ययुक्त परमार्थारधना, पण रंगोबा ध्यानांत ठेवा–

वैराग्यापरते नाही भाग्य । वैराग्य नाही ते अभाग्य ।<br>
वैराग्य नसता योग्य । परमार्थ नव्हे ॥<br>
प्रपंची वीट मानिला । मनें विषयत्याग केला ।<br>
तरीच पुढे अवलंबिला । परमार्थ मार्ग ॥<br>
त्याग घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा ।<br>
त्याग घडे अज्ञानाचा । शनैः शनैः ॥<br>
सकल विषय त्यागणें । शुद्ध कार्याकरण घणें ।<br>
विषय त्यागाची लक्षणें । वोळखा ऐसी ॥<br>
प्रत्ययज्ञानी वितरागी । विवेक बळे सकळ त्यागी ।

तो जाणीजे महायोगी । ईश्वरी पुरुष ॥

समर्थांनी हा जणू रंगोबाचा ईश्वरी महापुरुष म्हणून गौरवच केला आहे.

## श्रीगुरु सेवेसी

श्रीजनार्दन हा रंगनाथ स्वामींची एकनिष्ठेने सेवा करीत असे 'श्रीगुरु सेवेसी विकलो' अशी त्यांची स्थिती होती. समर्थाचा जसा कल्याण तसा रंगनाथस्वामीचा जनार्दन. स्वामीचीं वाणी हाच त्याचा आधार.

जेही जही सत्संग केला । तयासीच मी प्राप्त झाला ।
येरा संसाराची उरला । अन्य साधनाला प्रवर्तले जे ॥

या मळेच जनार्दन प्राप्तव्याच्या काठावर आला
'स्मरण देवाचे करावे अखंड नाम जपत जावे ॥'

हा समर्थांचा धर्म स्वामींनी घरोघरी पोहचविला माणूसन् माणूस परमार्थ मार्गी केला. 'विश्वजन उद्धरीला हेळा मात्रे ॥' असे त्यांच्या जन्मभरच्या कार्याने घडले.

अतिप्रेती साधु चरणी । उपजताहे प्रतिदिनी ।
इतर पदार्थ कोण्ही । नावडती मज ।
म्हणोनि महानुभव संपर्के । ज्ञान पाविजे निकें ।
भवार्णव लंघनी कौतुके । तारोचि निके ऐसे असे ॥
यालागी जेथ नसती महानुभव । तो देश अथवा नगरगाव ।
सांडावा गा सर्वथैव । श्लोक भाव परियेसी ॥
जे देशी नाही सज्जन । तो देश नव्हे महाराण्य ।
जे ग्रामी नाही सज्जन । ते स्मशान गा रघुराया ॥

हा असा संत-संगतीचा धर्म स्वामीनी महाराष्ट्रभर घुमविला जनसामान्याची रती सत्कर्मी रत केली.

## ईश्वरी सुत्रानुसार साधु कार्य

साधुचे कार्य श्रीईश्वरी इच्छेने चालत असते स्वामींनी आपली वाणी तशी लेखणीही सद्‌बोधार्थ अखंडपणें झिजविली स्वामींचे योगवासिष्ठ्यावरील साडेसहा हजार ओव्यांचे भाष्य हा महाराष्ट्र शारदेचा सुवर्णालंकार आहे अध्यात्म आणि वेदांत या ग्रंथात स्वामीनें हळवारपणें समजुन दिला त्यांच्या थोर अधिकाराचे या ग्रंथातील ओवी - ओवीत शद्बाशद्बात दर्शन घडते.

त्याची मनोज्ञ गुरुगीता त्यांच्या अतिव गुरुनिष्ठेचे दर्शन घडविते 'गुरु तेथे ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन । दर्शनी समाधान । आथी जैसे ॥' या ज्ञानदेवांचे मर्मच गुरुगीतेत शंकरोपनिषद म्हणून प्रगटले आहे.

शुकरंभासंवाद, सुदामचरित्र, भानुदास चरित्र आणि असंख्य श्लोकांतून स्वामींनी परमार्थ मार्गीयांना रसिकत्वाच्या सीमेपावेतो आणून सोडले आहे 'वाचे बरे कवित्व । कवित्वी रसिकत्व । रसिकत्वी परतत्व । स्पर्शु जैसा ॥' याचा प्रत्यय त्यांच्या काव्य वाणीत दिव्य बोलांत येतो भानुदास चरित्र आणि असंख्य श्लोक आणि सुमारे सहस्त्र अभंगातुन त्यानी उदंड बोधाचा सुकाळ केला आहे. त्यांची वाणी रसाळ मवाळ, अमृतकल्लोळवत आहे या सर्वाना परामर्ष येथे घेता येणार नाही केवळ कळसदर्शनानेंच देवतच्या दर्शनाचे समाधान मानले पाहीजे 'लोकी तरी आथी ऐसे । जे दुरुनुची कळसु दिसे ॥ हाच धर्म सामान्यांत त्यांनी पेरला.

## श्रीस्वामींचे महानिर्याण

श्रीमंत रंगनाथ स्वामीचें जीवन धर्म संकीर्तन आता पूर्णावत आले होते 'माळियें जेऊते नेंले । तेऊते निवांतची ठेलें । तया पाणीया ऐसे केले । होआवे गा ॥' अस ईश्वरी धर्मानुसार चालणारे जीवन परहितासाठीं, परकल्याणासाठी दक्ष असलेले, विधी धर्माचा सुकाळ करणारे जीवन संपत आले. त्यांना आपल्या जीवन समर्पणाची कल्पना आली. अत्यंत शांतपणें निगडीच्या पुण्यस्थानी या भक्तियोग्यानी निष्कलंक साधुनी, अकलंक ब्रह्मचाऱ्यांनी निरंतरच्या सन्याध्यानी, निर्मळचित्ताच्या संतानी शके १६०६ साली मार्गशीर्ष वद्य दशमीला रविवारी सत्तरी ओलांडल्यावर देह भगवंताच्या ठायी समर्पित केला. निगडी रिती झाली सारी मंडळी परिसरातील मंडळी या महायोग्याच्या महा समाधीला उपस्थित झाली सर्वांच्याच नयनाला धारा लागल्या होत्या ही बातमी त्यांचे धाकटे बंधु विठ्ठल धांवत आले त्यांनी अतिव शोक केला श्रीरंगनाथ स्वामीचा आवाज त्यांना ऐकू आला.

सखया सावधरे करिसीं हा खेद ।
सत्ता एक जगी विलसते । तुज मज कैसा भेद ।
योग भंगला । रंगला आघवा । निजानंद विचरे
सहजसुखें । चिद्‌भुवनी जीवन जैसे जीवनी ।

विचरे सहजसुखे । - - - - - विठ्ठलाचा अंतर जागे झाले शोक थांबला.

स्वामींच्या महानिर्याणास तीन दिवस झाले होते स्वामींच्या घोड्यानी अन्नोदक वर्ज्य केले होते. विठ्ठलानी त्या घोड्यास उठविले त्यांनी स्वामीच्या समाधीचे दर्शन घेतले समाधीला प्रदक्षिणा घातली नयनांतून सारख्या आश्रुधारा वहात होत्या स्वामीसेवेला तो मुकला होता

विठ्ठलानी त्याला ज्ञानपुरीस कृष्णा काठी आणलें त्यांप्त स्वामी स्मरण करुन त्या डोहात उडी घेतली तो गुनी झाला ' इये शरिराची माती । मेळविन तीये क्षिती । जेथ श्रीचरण उभे ठाती । श्रीगुरुचे ॥'हा ज्ञानराजांनी सांगीतलेला शिष्य धर्म - सेवक धर्म या जीवांनी आचरला कारण तो जन्मभर संत गुरु सेवेत रत होता.

## स्वामी शद्व गौरव

असे हे रंगनाथ स्वामीचे दिव्यजीवन शद्वात कसे मावावे.

माथा मंदिल भरजरी, निढळी तो शोभे टिळा केसरी ।
मोत्यांचा विलसेची तो चवकडा, कानांत बाळी बरी ।
शेला तो जरीचा, कृपाण करी ते तो ढाल पाठी महा ।
कांती उत्तम, रंगनाथ नयनी, तो राजयोगी पहा ॥

असा 'दर्शनाचिये प्रशस्ती । पुण्यपुरुष ॥' नयनाआड झाला ही तीनशे वर्षांपूर्वीची घटना! पण त्या पुण्यपुरुषाच्या कार्याचा नंदादीप आजही हजारोंची अंतःकरणें उजळीत आहे यांतच त्यांचीं थोरवी आहे त्या महापुरुषाच्या चरणी कोटी कोटी दंडवत घालून त्यांच्या धर्माचे स्मरण करुन लेखणीला विराम देवू.

रामनामामृत पान भूलेंकी ।
करी तो घरामर नयनी विलोकी ॥
तोचि जीवन्मुक्त भक्त भलारे ।
रामस्मरणी राम तो लाभ लारे ॥
देव भक्त कोणी भिन्न म्हणे दोन्ही ।
पाहो जाता दिपची तो वन्ही ॥
रामस्मरण करी नित्य निरंतरी ।
रामरमावर सबाह्य अभ्यंतरी ॥
निजानंदी रंग सागरी तरंग ।
ओतप्रोत रामी राम निःसंग ॥

– श्रीमत् रंगनाथ स्वामीमहाराज की जय –

० आम्हा घरी धन-शद्वांच च रत्नें-शद्वाचीचयत्ने पूजा करु ०

## कृतज्ञता –

ग्रंथाधार– १) संतवर श्रीकृष्णाजीं दिक्षीत सोमयाजी यांचे श्रीरंगलीलामृत ओवीबद्ध चरित्र
२) श्रीज्ञानेश्वरीं ३) श्रीदासबोध
४) सकलसंत गाथा ५) सप्तकांडात्मक दासायन
६) प्रसाद मासिक ऑगस्ट ८१
७) श्री ज्ञानेंश्वर मासिक ऑगस्ट ८३
८) श्रीरंनाथ स्वामीचे योग वासिष्ठय पदे, श्लोक, इ. साहित्य.

नाझऱ्याचे स्वामींचे वंशज श्रीकांत (जगू) रामचंद्र देशपांडे व त्यांचे बंधु निगडिचें डॉ. गोसावी या मंडळींचा सहयोग हर्षभराने मिळाला म्हणूनच हा लेख लिहीता आला त्यांचे सहस्त्र आभार !


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

प्रचलित प्रश्नांचे अचूक उत्तरासाठी

**स्वा. वीर सावरकर**

लिखीत पुस्तके वाचा

- १८५७ चे स्वातंत्र्यसमर, सहा सोनेरी पाने, हिंदुपद बादशाही आदि अैतिहासिक पुस्तके.
- काळे पाणी, मला काय त्याचे ह्या कादंबऱ्या.
- अुःशाप, अुत्तरक्रिया, सत्यस्त्रखडग - नाटके.
- हिंदुत्व, हिंदुत्व चे पंचप्राण, हिंदुराष्ट्र दर्शन, जात्युच्छेद निबंध, विज्ञाननिष्ठ निबंध आदि ४० पुस्तकें

पृष्ठे ५००० मुल्य रु. ६००
सवलत मुल्य रु. ४५०|-

**श्री॰ बाळाराव सावरकर लिखित**

**वीर सावरकर विस्तृत चरित्र**

पृठे १३०० मूळ मूल्य रु. १४०
सवलत मूल्य रु. १००|-

सूची मागवा : **श्री॰ बाळाराव सावरकर**
वीर सावरकर प्रकाशन
सावरकर सदन, राअुत पथ,
७१ शिवाजी अुद्यान मुंबई ४०००२८

# श्रीरंगनाथ स्वामींचे संतस्तवन


ॐनमो सद्गुरुपर ब्रह्मा परिपूर्णा । तूं नित्य निरामय निर्गुणा ।
शेषशाई नारायण । आनंद गहना अविनाशा ।।१।।
मंगल मणिमयनिधाना । अखिल त्रिजगत्पालना ।
सज्जन जनवन चंदना । आराध्यमूर्ति । २।।
शरणागता प्रतिपालना । करावया मुख्य कारणा ।
म्हणोनि करिशी अवतरण । युगायुगीं निश्चय । ३ ।
जगदुद्धारणालागी । अवतरशी युगा न युगी ।
महानुभव संत जगी । प्रगट करिशी निजरुपे । ४ ।
ज्याचे केलिया स्मरण । पावोनि सायुज्य पद निर्वाण ।
पुनरपि जन्म मरण । कासे कारण सहितते ।।५।।
त्या संताची नामे । वाचे उच्चारी सप्रेमे ।
मोक्षदायक उत्तमोत्तमे । प्रेम सभ्रमे करुनिया ।।६।।
व्यास अंबरीष रुक्मांगद । वसिष्ठ वामदेव नारद ।
विदुर उद्धव ध्रुव प्रल्हाद । पृथु अंगद अक्रुर ।।७।।
सनक सनन्दन सप्तऋषि । शुक भीष्मते जो राशी ।
जनक विदेही निश्चयेसीं । याज्ञवल्क्य उपमन्यु ।।८।।
दुर्वास कपिल महामुनि । अगस्ति बृहस्पति जैमिनी ।
वाल्मिक कवि पूर्ण ज्ञानी । जमदग्नि मुनिवर्य । ९।।
कश्यप कौंडिण्य गौतम । आयोध्याधीश श्रीराम ।
हरिश्चंद्र राजा धर्म । भिमार्जुन नकुल सहदेव ।।१०।।
विश्वामित्र पाराशर । गरुड भक्त हनुमान वरी ।
मार्कण्डेय मुनिश्वर । गंधर्व तुंबर जवळिके ।।११।।
मयुरध्वज मांधाता । शिबी परिक्षिती बिभिषण भ्राता ।
रावण कुंभकर्ण तत्वता । शरण उमाकांता सर्वस्वे ।।१२ ।
मुचकुंद बरी कुंडलिक भरत । भरत शत्रुघ्न पुण्यश्लोक ।
नळ नीळ जांबुवन्तादिक मुख्य सैनिक सुग्रीव ।।१३।।
भरद्वाज गर्गाचार्य । भगीरथ सुदामा संजय ।
जगद्गुरु दत्तात्रय । हस्तामलक चिद्भानु ।।१४।।
अहिल्या द्रौपदी जनक तनया । तारा मन्दोदरी अनुसया ।
अरुंधती पार्वती मूळमाया । स्मरणें भवभया नाशिती ।।१५।।
अनंताच्या अनंत विभूती । कोण जाणें कैशा किती ।
जेथे मौनावल्या वेद श्रुती । तेथे मंदमती काय बोलूं ।।१६।।
तृणांकुर पर्जन्य धारा । सिंधु जीवन उर्वी भारा ।
असंख्य गगनाचीया तारा । काय पामरा गणवेल ।।१७।।
एक एक रोमरंध्री केवळ । अनंत ब्रह्मांडाची माळ ।
एसा व्यापक लक्ष्मी लोल । भक्त वत्सल परमात्मा ।।१८।।
त्या भक्ताची नामे । कांही बोलो यथा ज्ञानें ।
कृपा करुनि विद्वजने । द्यावे अवधान श्रवणार्थी । १९।।
कृती त्रेती द्वापारी । अनंत युगी अनंत अवतारी ।
विद्वजन नानापरी । बोलिले वैखरी स्मरली तें । २०।।
आता कलियुगी सांप्रत । जे का परब्रह्म मूर्तिमन्त ।
चर्म देही जीवन मुक्त । साधुसंत विचरती ।।२१।।
मोन मच्छिद्र गोरक्ष जती । बुटी जालन्दर कानी फासे ती ।
गोपीचंद मैनावती । नाथपंथी सिद्ध पुरुष ।।२२।।
चर्पट रावल चम्पन । शाहूसेन नानक ।
दामाजीपंत दामो मुलुक । मोक्षदायक सारसख्य ।।२३।।
गहिनी निवृत्ती ज्ञानेश्वर । सोपान मुक्ताई अवतार ।
ब्रह्मा विष्णु श्रीशंकर । आदिमाया हे चवथी ।।२४।।
मुकुंदराज मुनेश्वर । विवेक सिंधुचा कर्तार ।
जेणें जयपाल नृपवर । बोधानि परपार पै केला ।।२५।।
चांगदेव वटेश्वर । मिराबाई कमाल कबिर ।
कनकदास विठ्ठल पुरंदर । व्यंका खेचर विसोबा ।।२६।।
श्रीशंकराचार्य परमहंस । नामदेव तुळशीदास ।
जनि जसवन्त मुधेश । मृत्युंजन स्वामी तो ।।२७।।
सहानंद रामानंद । अमलानंद गंभिरानंद ।
ब्रह्मानंद सहजानंद पूर्णानंद गुरुवर्य ।।२८।।
जयदेव महामुद्गल भट । बाजी दत्त पठाण धनाजाट ।
सेना न्हावी भक्त श्रेष्ठ । भूवैकुंठ बनविले ।।२९।।
कूर्मदास नरहरी सोनार । धागा रोहिदास गोरा कुंभार ।
चोखामेळा महार । भक्त निरंतर मुक्तते ।।३०।।
राजाई गोणाई जनी । नारा म्हादा विठा ज्ञानी ।
नामयाचे पुत्र कलत्र जनी । संत सज्जन जाणवे ।।३१।।
जगमित्र नागा सुरदास । पिपा रजपूत महापुरुष ।
शिवराम मुकुन्द माधवदास । राघवदास निज भजनी।।३२।।
सावतामाळी भक्तराज । नृसिंह मेहता घेऊनि पैज ।
माळ घातली हे चोज अधोक्षजे दाखविले ।।३३।।
दासोपन्त जनी जनार्दन । विठा रेणुकानंदन ।
बहिरा पिसा कृष्णरण्य । भानुदास पूर्णत्वे ।।३४।।
जनार्दन एकनाथ । रमावल्लभ मालोपन्त ।
गोधडा मुकुंद महन्त । आणि अनंत देवता ।।३५।।
नामा म्हादा कान्हो पाठक । मुक्तेश्वर लतिब देख ।
ज्योतिरानंद अलौलिक । भक्त संपन्न जाणता ।।३६।।
अच्युताश्रम मनोषाश्रम । गुह्येश्वर पुरुषउत्तम ।
नृसिंह भारती नारायणाश्रम । मौनिबाबा एक तो ।।३७।।
संतदास वेडा नागा । ताठंबरा परमानंद जोगा ।
परिसा भागवत पांडुरंगा सन्निध सर्वदा राहिला ।।३८।।
शेख महंमदका कामड किया । कान्होपात्रा नवलख सालिय
रामानंदा गली विलया । माहमाया समुळी ।।३९।।
केशवदास नागार्जुन । चांद बोधला जडतारण्य ।

संतोबा पवार आपण । वैराग्य पूर्ण धगधगीत ॥४०॥
लोलिंबराज जगतारण । निवराजहरि नारायण ।
निरंजनस्वामी ब्रह्मपरायण । मंगलमूर्ति प्रत्यक्ष ॥४१॥
काशीराज जनस्थानी । विश्वनाथस्वामी अनुसंधानी ।
भगवंतपंत रघुनाथ भजनी । आनंदमूर्ति गुरुवर्य ॥४२॥
श्रीकृष्ण तुळशी अद्वय । चिद्घनस्वामी कृष्णमय ।
उल्हास चैतन्य सांप्रदाय । ऐसे गुरुवर्य बोलती ॥४३॥
शांतलिंग चिद्विलास । जयरामस्वामी कृष्णदास ।
तुकोबा तो स्वयंप्रकाश । भक्तीचा कळस झळकतसे ॥४४॥
केशवस्वामी रंगबोध । रामीरामदास प्रसिद्ध ।
वामस्वामी शुद्धबोध । अगाध बोध बोधिला ॥४५॥
हो जिवन्मुक्त संतमाळा । अखंड घालवी गळा ।
प्रियझाली तमाल नीळा । म्हणोनि हे कां मात्र गुंफीली ॥४६
संतमाळा वैजयन्ति । अर्पुनिया श्रीभगवंती ।
सरती झाली साधुसंती । संसारगुंनी उगविली ॥४७॥
स्मरण करिता प्रातःकाळी । दोष दहन होय समूळी ।
भवभयाची होय होय होळी । स्वानंदचळी मननिवे ॥४८॥
अनंत पुण्य असेल गाठी । तरी संतमाळा शोभेल कंठी ।
वैकुंठीहूनि उठाउठी । जगजेठी उडी घाली ॥४९॥
माझिया भक्ताची नामे । अंध मी ऐकेन सप्रेमे ।
म्हणोनिया मेघश्यामे । उडी घाली श्रवणार्थी ॥५०॥
प्रगट गुप्त असंख्यात । ब्रह्मरूपावासी समाधीस्त ।
तया अनन्यभावे प्रणिपात । नमन दंडवत साष्टांगें ॥५१॥
सहजी सहजपूर्णरंग । निजानंदे रंगुनिरंग ।
अक्षय अव्यय अभंग । ग्रंथ सांगतांचेनि ॥५२॥

॥ इति श्रीनिजानंद रंगनाथस्वामी कृत संतमालिका ॥

ज्ञानपुरीचे श्रीविठ्ठल मंदिर

— कृष्णा काठ —




श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

**महीम विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि.**

ता. सांगोला जि सोलापूर

भाग भांडवल १॥ लाखाचे वर — मेंबर कर्ज ८ लाखाचे वर — सभासद ४२५

र. नं. ८३१४ — रजि. ता. २३ । ३ । १९४२

विष्णु तुकाराम डोंगरे
सचिव

कुशाबा श्रीरंग चौगुले
चेअरमन

मेन विभाग व धान्य विभाग

# संत आणि समर्थ संप्रदायातील साम्य

– जगन्नाथ सखाहरी पवार

भक्तिभाव, अध्यात्म, नीतिमत्ता, संस्कृतिद्वारा समाज जीवनांतील अज्ञानांधःकार दूर करुन त्यास आल्हाद आणि ज्ञानप्रकाश देवून तो सुखरुप, शांत नि समृद्ध करण्याचे महान कार्य गेली शतकानुशतके अनेक पंथोपपंथांनी केले आहे. त्या सर्व पंथामध्ये महाराष्ट्र क्षितीजावर चंद्र सूर्या प्रमाणें तळपणारे दोन महान संप्रदाय म्हणजे संताचा वारकरी संप्रदाय व समर्थाचा समर्थ संप्रदाय हे होत. या अलांछन चंद्रम्याने व तापहीन मार्तण्डाने आपल्या तेजाने उभा महाराष्ट्र धवळून काढला, इतकेच नव्हे तर त्यांची तेजःपुंज प्रभा जगभर फाकली. त्यांत एकाने स्वदेश, स्वभूमि स्वराष्ट्र यांस प्रधान मानून त्यासाठी भगवंताचे अधिष्ठान घेतले तर दुसऱ्याने आत्मसाक्षात्कार, अर्थात ईश्वर प्राप्ती मुख्य मानून त्याद्वारा स्वदेशनिष्ठा स्वधर्मरक्षण करण्याचे ठरविले. मात्र ईश्वर प्राप्ती व राष्ट्रसेवा दोन ही संप्रदायात आहेत फरक आहे तो साध्य साधनांत. देशभक्ती हे साध्य व ईश्वर भक्ति हे त्याचे साधन हे समर्थ संप्रदायाचे ब्रीद तर देवप्राप्ती हे साध्य तर देशभक्ती आदि त्याची साधनें हे संत संप्रदायानें मानलेले दिसून येते.

या दोन्हीही संप्रदायाचे साध्य साधन अंशभूत फरकाने एक असल्याने त्यांची साधनभूत लक्षणें समान असणें अगदी साहजिकच आहे. समर्थ पंचायतनाचा हा अंक असल्याने समर्थ संप्रदायाची जी वीस लक्षणें आहेत तोच वीस लक्षणी वीस कलमी नव्हे कार्यक्रम समर्थांपूर्वी व त्यांच्या समकालीन वारकरी संतानी ही राबविल्याचे दिसून येते. व यावरुन यादोन्ही संप्रदायात बरीचशी साम्यता दिसून येते. राष्ट्रोन्नतीं राष्ट्रोद्धार, हा उदात्त हेतू दोन ही संप्रदायात असाच आहे बहूजन समाजास अध्यात्मिक नीती व भक्तीमार्गाचे धडे देवून त्यांस ईश्वरप्राप्तीचा मार्ग सुलभ व सरळ करण्यासाठी भागवत धर्मीय संतानी जी लक्षणें वा साधनें आपल्या संत वाङ्मयात ठाई ठाई सांगितली होतीं. तेच विखुरलेले वीस लक्षणरुप मोती समर्थांनी आपल्या स्वभाव व पद्धती प्रमाणें एकत्र करुन तो मोत्याचा हार मानव मंदिरी असलेंल्या देवाला घातला आहे. त्यामुळे मानव मंदिरातील हा देव खरोखरीच विराजून दिसत आहे तो लक्षणी मोत्यांचा हार असा–

" प्रथम लिहिणें । दुसरे वांचणें । तिसरे सांगणें अर्थान्तर ॥
" आशंका निवृत्ति । ऐसी चौथी स्थिती ।
पाचवी प्रचिती । अनुभवे ॥
' सहावे ते गानें । सातवे नाचणें ॥
टाळी वाजविणें । आठवे ते ॥
" नववा अर्थ भेद । दहावा प्रबंध ।
आकरावा प्रबोध । प्रचीतिसी ॥
" बारावे वैराग्य । तेरावा विवेक ।
चौदावा तो लोक । राजी राखे ॥
" पंधरावे लक्षण । ते राजकारण ।
सोळावे ते जाण । अव्यग्रता ॥
" प्रसंग जाणावा । हा गुण सतरावा ।
काळ समजावा । सर्वांठायी ॥
" अठरावे लक्षण वृत्ती उदासिन ।
लोलंगता जाण । तेथे नाही ॥
" एकोणीसावे चिन्ह । सर्वांशी समान ।
राखे समाधान । ज्याचे त्याचे ॥
" विसावे लक्षण । राम उपासना ।
वेध लावी जना । भक्ती रंगे ॥

अर्थ स्पष्ट असल्यानें तो देत नाही मात्र वरील लक्षणांचा पुरस्कार वारकरी संत मांदियाळीनी यापूर्वी केला होता कारण ईश्वरप्राप्ती बरोबरच त्यांचे जीवन प्रबुद्ध व्हावे निवृत्ति बरोबरच प्रवृत्तिहि नीट असावी अशी सर्व संताची धारणा आहे. " जयाचे ऐहिक धड नाही । तयाचे परत्र पुससी कांही ॥ हे जे ज्ञानराजांनी सातशतका अधि सांगितले तेच नंतर तीन शतकांनी समर्थानीहि सांगितले,

" प्रपंची जो सावधान । तोचि परमार्थ करिल जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥

वरील प्रमाणें समर्थोक्त वीस ही परमार्थ लक्षणें संत साहित्यांत मूलभूत रीतीने सांपडतात.

प्रथम लिहीणें-वारकरी संत वाङ्मयात हि या लक्षणाचा स्विकार केलेला आहेच.

## (पहिले) प्रथम लिहणे

" गीता लिहोनी वाहणें । पुस्तकमिषे ।। असे ज्ञानराज सांगतातच तसेच ज्ञानेश्वरी, भागवत गाथा आदि संत वाङ्मयाची हस्तलिखीतें गेल्या अनेक शतकांत संप्रदायिकाकडून झालेलीच आहेत लिहिण्यानें मानवी मनावर सुविचाराचा पक्का ठसा उमटुन ते विचार निश्चित होतात असे पूज्य गु. मामासाहेब दांडेकर म्हणत असत. आणि आता वारकरी संप्रादायातील सुप्रसिद्ध असलेले प. पू. गु धुंडा महाराज सारखे महान् वक्ते कीर्तनें, व प्रवचने अगोदर लिहुन व मग सांगताना प्रस्तुत लेखकांसह अनेक संप्रदायिक प्रत्यक्ष पहातातच ना.

## दुसरे वाचणें

वाचनाचे हि विधान वारकरी संतानो केले आहे. "वांचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी । असे संत जनाबाईनी म्हटलें आहें तसेच "पाहोनिया ग्रंथ करावे किर्तन । तेव्हा आले जाण फळ त्यासी ।। ज्ञानेश्वरी गाथा भागवतादि ग्रंथाची व्यक्तिगत सामुदायिक पारायण पद्धत तर आता तर आता रुढच झाली अर्थात वाचन या लक्षणावरुननच 'पुढे ना वाची । ना सेवा ही जाणें स्वामीची असे लीनतेंचे उद्गार ज्ञानराजांचें प्रसिद्धच आहेत " नातरि आवर्तने निगम का नाम ।। किंवा "तैसा प्रतिपाद्य जो ईश्वर । तो व्हावयालागी गोचर ।। श्रृतिचा निरंतर अभ्यास करणें ।। असे स्वाध्याय लक्षण ज्ञानेश्वरीत सांगितले आहे. श्रीसंत तुकाराम महाराजांनी हजार पारायणें भागवताची केल्याचें सर्व श्रुत आहेच.

## तिसरे सांगणें

". जो गीता सांगे मेळावा । भक्त जनांच्या । " कोकिळा कलखाचेनी मिषे । सद्गद बोलवित जैसे । वसंत का प्रवेश । मद्भक्त आरामी ।। गीता भागवतादि ग्रंथ माझ्या भक्तांना सांगणारा मला जीवाहूनहि अधिक आवडतो असे भगवांन गीतेतच सांगतात. वारकरी संप्रदा–याचें किर्तन प्रवचन हे भगवत् सेवेचे माध्यम म्हणजे " सांगणें हे तिसरे लक्षणच नव्हें काय?

## चवथे लक्षण आशंकानि

श्रोत्यांची वा शंका निरसन हे श्रोत्रीयता-शद्वनिष्णा–तजा असल्या शिवाय होत नाही शंका - समाधान -पूर्वपक्ष उत्तरपक्ष - खंडण मंडण आदि पद्धती या तत्वबोधासाठी उपयुक्तच ठरतात.

गीतें मध्ये " किं तद्ब्रम्ह किं अध्यात्म, किं कर्म पुरुषोत्तम । अधिभूतं च किं प्रोक्तम धिदैवंकिमु ते ।। असे आठव्या अध्यायाच्या आरंभी अर्जुनानें सप्त प्रश्नमालिकाच विचारली आहे. व भगवन्तांनी पुढील सर्व अध्यायामध्ये त्या सात प्रश्नाची उत्तरे दिली आहेत. भागवतांतहीं एकोणिसाव्या अध्यायांत – – –

" यमः कतिविधः प्रोक्तो नियमोऽ वारि कर्शन ।<br>
कः शमो कोदमः कृष्ण का तितिक्षा श्रृतिः प्रभो ।।

इत्यादी चाळीसावर प्रश्न विचारलें आहेत. व देवानेहि त्यांची उत्तरे दिली आहेत यावरुन प्रश्नोत्तर शंका समा–धानरुप संवादाने अव्यवहार्यजी आत्मवस्तु तीं आरशातील प्रतिबिंबा प्रमाणें स्पष्ट होते.

" संवादाचे निमिषे । जें अव्यवहार्य वस्तु असे ।<br>
ते दोखज कि जेस । आरिसा रुप ।। ज्ञानें.

## पाचवे लक्षण

प्रचिती अनुभवे । अति महत्वाचे लक्षण आहे. " तुका म्हणें चाखोनि सांगे । मज अनुभव आहे अंगे । तुका म्हणें मज कळते चांचणी । बडबडीची वाणीं अथवा सत्य तुका म्हणें येथे न चाले तातडी । अनुभवे गोडी येईल कळो ।।

आत्मप्रचिति ही शास्त्र प्रचिति व गुरु प्रचितिहून ही श्रेष्ठ मानली आहे, संत साहित्य मुळी अनुभूतींतून साकारले आहे. म्हणन ते वाङमय आहे काव्य नव्हे ते प्रतिभेतुन जन्मलेले असते.

" अनुभव आले अंगा । ते या जगा देत असे ।।

स्वामी विवेकानंदानी एकदा रामकृष्ण परमहंसांना प्रश्न विचारला आपला देव पाहिला कांय? परमहंस लगेच म्हणाले "हो हो मी तो पाहिलाच नव्हे तर अनुभवला ही तो एवढा जवळ आहे की माझे शरीर त्यापेक्षा दूर आहे, यांस प्रचिती म्हणतात

## सहावे गाणें

संत साहित्यात तर हे लक्षण प्रकर्षानें आहे.नव्हे गाणें हा स्थायिभाव म्हटले तरि चालेल संताचे सर्व अभंग ऊनच म्हणावे लागतात. गाऊन म्हणता येईल एवढे अध्यात्म सुलभ करण्याची क्रान्ति संतानी केली.

"स्वरुप वाटे चला जाऊ । वांचे गाऊ विठ्ठल ।<br>
आवडी विठ्ठल गाईजे एकान्ती ।<br>
अलभ्य तें येती लाभ घरा ।।<br>
" धन्य ते गायनी कला ।। असे समर्थ म्हणतात

## सातवे ते नाचणें

वारकरी संप्रदायांत गायन ही नारदी भक्ती व प्रवचन ही व्यासभक्ति मानतात. नाचणें ही हनुमद् भक्ति मानली जाते.

देहभान विवर्जित होऊन नाचणें हे आत्मानुभुतिस खुपच सहाय्यक ठरते मारुतीरायानें हि नृत्यभक्ति केली आहे. भक्त नाचतो एवढेच नव्हे तर " प्रेमाचिनि छंद देव नाचु लागला" । अशी अवस्था होते श्रीसंत नामदेवराय यांच्या कीर्तनांनी देवही नाचु लागला व ते हि सर्व विसरुन

" नाचतां नाचतां देवाचा गळला पितांबर ।
सावध होई देवा ऐसा बोले कबीर ।।
" नाचती आनंद कल्लोळी । पवित्र गाणें नामावळी रे ।।

## टाळी वाजविणें आठवें ते

वारकरी कीर्तनात व रामदासी कीर्तनांत ही टाळी वाजविण्याची रींत सारखीच आहे.

" टाळ वाजवावी गुढी उभारावी ।
वाट ते चालावी पंढरीची ।।
" एका हाती टाळ । एका हाती चिपळिया ।।
घालती हूंबरी एक वाहताती टाळिया ।
" एकचि टाळी झाली चंद्रभागे वाळवंटी ।
माझा ज्ञानराज गोपाळासी लाहचा वाटी ।।
" टाळाटाळी लोपला नाद । अंगो अंगी मुराला ।।

## नववा अर्थभेद

शद्बाचे वा अर्थाचे भेदाने जनांचे अन्तर आश्चर्य चकित होते एका शद्बाचे अनेक अर्थ व एका अर्थाचे अनेक शद्ब ही वक्तृत्व कला आहे.

" अर्थ बोलाची वाट पाहे । तेथ अभिप्रावो अभिप्राया ते विये । भावाचा फुलौ रा । होत जाये । मतिवरी ।। ज्ञाने

मात्र या साठी सद्‌गुरुकृपा आवश्यकता आहे. तशीच अंतरंग श्रोत्यांची ही.

## दहावे लक्षण

प्रबन्ध - ग्रंथ रचना भागवत धर्मीय लक्षणात मुख्य भागवताचे हे लक्षण सांगितलें आहे,

" अबाल सुबोधे । ओवियेचे नि प्रबन्धे
बह्मरस सुस्वादे । अक्षरे गुंफिली ।।
" म्हणोनि मांझे नित्य नवे ।
श्वासोश्वासही प्रबध हो आवे ।
श्री गुरु कृपा काय नव्हे । ज्ञान देव म्हणें ।।
" तो श्रीकृष्णार्जुन संवाद । नागरी बोली विशद ।
सांगोनि दाऊ प्रबंध । ओवियेचा ।।

ग्रंथ रचना हा अन्तरंग संप्रदायिकांचा महान गुण वा कार्य मानले जाते.

## अकरावे लक्षण – प्रबोध

" प्रबोधी त्या नारीनर लोका ।।
करुनि प्रबोध संतपार उतरलें ।।

साधकांची जीवन गंगा समाजास भक्ति मार्गांचे प्रबोधन करत करत परमात्मसिंधुला मिळत असते.

" फेडिती पाप ताप । पोखीत तिरिंचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगेचे जैसे ।
" तैसीं बांधली सोडिती । बुडाली काढीत ।
सांकडी फेडित । आर्ताचिया ।।

प्रबोध दिनकरांच्या उदयानेच जगाचा अंधार दुर होवून विवेक किरणें सर्वत्र पसरतात.

" जे जे आपणांस ठावे । ते इतरांस शिकवावे ।। असे समर्थ म्हणतात.

## बारावे लक्षण – वैराग्य

" अंगी वैराग्याचे बळ । साहिरवळ जिणावे ।
" ते हे विषय वैराग्य । आत्मलाभाचें भाग्य ।
तेणें ब्रह्मानंदा योग्य । होती जीव ।।
" म्हणोनि सवैराग्य । ज्ञानाभ्यास तो सभाग्य ।
करुनी जाहला योग्य । आत्मलाभ ।।

वैराग्य म्हणजे विरक्ती अनासक्ति यांत पर व अपर असे दोन प्रकार

अपर वैराग्यांत - एकेन्द्रिय, वशीकार, व्यतिरेक, जिज्ञासा हे चार प्रकार आहेत पर मात्र ज्ञानोत्तर स्थितीत

" वीतरागते सारिखा । जोडोनी ठेविला सखा ।।
जो आघविया भूमिका । सवे चाले ।।

## तेरावे लक्षण – विवेक

समर्थ संप्रदायां प्रमाणेंच विवेक वैराग्य ही दोन्ही लक्षणें संतवाङ्मयातहि आलेली आहेत,

" विवेका साहित्य वैराग्याचे बळ ।
धगधागिन ज्वाळ अग्नि जैसा ।।
" विवेक दृश्याची मांदी सारी ।
" विवेका मध्ये सांपडेना । ऐसे कांहीच असेना ।।

एकान्ती विवेक अनुमाना । आणून सोडी ।।
"संसार त्याग न करितां । प्रपंच उपाधन सांडिता ।
जनामध्ये सार्थकता । विचारेचि होय ।।

" हांच विवेक विचार संत वाङ्मयात पूर्वी आलेला आहे.

विवेका वांचन । न पविजे समाधान ।। तुकाराम महाराज
" क्षणोक्षणा हाचि करावा विचार ।
तारावया पार भवसिंधु ।।
" आत्मविवेकी धरा । चित्तवृत्ति । ज्ञानेश्वरी

## चवदावें लक्षण – लोक राजी राखणे

" राखावी बहूतांची अन्तरे । भाग्ये येती तदनंतरे ।
"जीवातळी अंथरित । आपुला जीव ।।
" वेंधी आणिकांस । ऐसा अंगी जया कसा ।
" तैसा मन देता लोका । नालोजी जो ।।

असा वरील लक्षणाचा विचार संत संप्रदयातहि सांपडतो.

## पंधरावें लक्षण – राजकारण

समर्थ संप्रदायात परमार्थाची चतुःसुत्री सांगितली त्यात " पहिलें हरिकिर्तन । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्वा विषयी । हिंदवी स्वराज्य संस्थापन हा समर्थांच्या कार्यांचा गाभा असल्याने प्रत्येक मनुष्यास राजकारण करता यावे यासाठी संघटना साम-दाम, दंड भेद, शत्रू निर्दलन आदि विचारांनी समाज जागा करण्याचे कार्य त्यांनी केलें व त्याचा उपयोग श्री. शिवाजी महाराज यांना स्वराज्य स्थापनेत मोठ्या अंशानें झाला वर्णाश्रमादि संस्था आदि हिंदुधर्माची मुल्ये सर्व हिंदुना आपली अशी वाटून आपण सर्व हिंदु आहोत हे सवर्ण नि अवर्ण हिंदुना पटवून देवून हिंदुधर्मांच्या झेंडयाखाली सर्व हिंदुना आणण्यात संतानाहि समर्था पूर्वी बरेच यश आले होते संघर्ष अश्रद्धा नास्तिकता इत्यादी दुर्गुणांनीं समाज पडत असताना पाहून जगद्गुरु तुकाराम महाराजांनी स्वतः तळमळ नि कळकळ दाखवून राष्ट्रप्रेम दाखविले आहे.

" न चले यावरी न धरवे धीर ।
बुडत हे राष्ट्र देखोनि जग ।।

असा राष्ट्र विचार त्याकाळी संता जवळ होता फरक हा आहे की, त्यांनी ईश्वर प्राप्ती हे राष्ट्राचे वा व्यक्तिचे हित मानले. केवळ अन्न, वस्त्र, निवारा हा विचार त्यांनी दैवावर सोडला आणि ईश्वरनिष्ठे बाणली की " हन्तिके पावमे सबके पाव' आलेच व्यक्तिग वा सामाजिक सर्व प्रश्न ईश्वर निष्ठेतून सुटतात असा संतांचा आत्मविश्वास असल्यानें त्यांनी समाज ईश्वरनिष्ठ बनविण्यावर आधिक जोर दिला व या तत्वावर समाज्याची अभेद्य एकता निर्माण करुन खरेखुरे राजकारण व राष्ट्र सेवा केली.

## सोळावे लक्षण – अव्यग्रता शांतता

" बरे वाईट सर्व । साहोनि जांवे ।। समर्थ
" सुखदुःख समान सकळ जी वाचा कृपाळ ।। नाथ
" सुखी संतोषान यावे दुःखी विबादा न भजावे ।।
ज्ञानेश्वर महाराज
" सुख दुःख नाही चाड आम्हा ।। तुकाराम महाराज
" सुख दुःख - जाणणें । नाही जया ।।

असा अव्यग्रतेचा - शान्ततेचा विचार हि दोन्ही वाङ्मयात आढळतो.

" शांतिरुपे नव्हे कुणाचा वाईट ।
वाढवी महत्व वडिलांचे ।।
" शान्तिधरणें जीवा साठी । दया उत्तम गोमटी ।
"शांति क्षमा दया । मूर्तीमंत अंगी । परावृत्त संगी कामादिका

## सतरावें लक्षण " प्रसंग जाणावा

" समयो जाणा समयो जाणा
भलते नाणा भलतेथे ।
" समय न कळे समय न कळे
काय उपयोगी ये वेळे ।।

दक्ष हे साधु लक्षण प्रसिद्धच आहे.
' जाणोनि अन्तर वर्ततसे ।।

## अठरावे लक्षण– वृत्ति उदासीन

" भक्त ऐसे जाणा जे देही उदास ।।
गेले आशापाश निवारोनि ।।
" तरि जो या देहावरी । उदास ऐसीयापरी ।
उखिता जैसा विठारी । बैसला आहे.
" लटिके वचन । नाही देही उदासीनी ।।
" सर्वसंगी वीट । तुं एकला आवडसी ।।

अनेंक ठिकाणी संत वाङ्मयात उदासीनतेचा विचार आला आहे.

## एकोणीसावे लक्षण

सर्वांशी समान राहुन समाधान राखणें सर्वभुता बरोबर " एकपणें जया मैत्री असते.।
" सर्वाभूतो पाहे एकवासुदेव । पुसोनिया डाव अहंतेचा ।।
" कुणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे

सर्वांना हवा हवा वाटेल असे तो वागतो आता शेवटचे म्हणजे अतिमहत्वाचें लक्षण म्हणजे - - - -

## विसावे लक्षण

श्रीराम भक्ति हे लक्षण मेरुमण्या सारखे आहे भक्तिमान यः समोप्रिय । हे असें संत लक्षणांत भगवंताने गीतेत सांगीतले आहे.

" याहीवरी पार्थ । माझीया भजनी आस्था ।
तरि तयाते मी माथा । मुगुट करी
हे शेवटचे म्हणजे खरोखरी महत्वाचे होय
" भक्ति नवविध भावशुद्धीवर ।
अलंकारावरी मुगुटमणी ।।

### " भक्ति हे अखेरचे लक्षण

पूर्ण जीवन मंदिराचे ते शिखरच नव्हे तर त्यावरचा कळस.

मुक्ति वरिल भक्तिजाण । अखंड मुखी नारायण ।।

संत संप्रदायांत तर हे भक्ति लक्षण बीजभूत व फलभूत हि मानलें जाते भक्ति लक्षण हे माता - आई आहे तर इतर लक्षणें हि तिची मुले आहेत.

" माऊलीच्या मागे बाळकाची हारि ।
प्रेम सुत्र दोरी ओढ तसे ।।

असे भक्ति व इतर सद्गुणांचे नाते आहे

,,भक्तिचिया पोटी रत्नाचिया खाणी ।
ब्रह्माची ठेवाबी सकळ वस्तु ।।

म्हणून विसावे लक्षणें

" श्रीराम उपासना वेध लावी जना भक्तिरंग " ।।
जे पुरुषार्थ सिद्धि चौथी । घेवोनि आपल्या हाती ।
रिगाला भक्तिपंथी । जगादेतु ।। ज्ञानेश्वरी



कृष्णा काठच्या ज्ञानपुरी घाटांवर
श्रीरंगनाथ स्वामीच्या अश्वाने देह विसर्जित केला.


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

रुचकर जेवणासाठी एकवेळ अवश्य भेट द्या.

**हॉटेल तृष्णा**

रामराव फकीरराव मार्केट

स्टेशन रोड, **चाळीसगांव** जि. जळगांव

# आनंद संप्रदाय आणि दास पंचायतन

– डॉ. भीमाशंकर देशपांडे

तत्वज्ञानाच्या दृष्टीने मुकुंदराज, दासोपंत, समर्थ रामदास आणि शिवराम स्वामी अशी एक ज्येष्ठ परंपरा मराठी वाङ्मयात आढळते. कालमानानुसार सातत्याने विचार करण्यापेक्षा या कवींना आपली परंपरा श्रेष्ठ वाटते. या एकाच कारणामुळे या सर्वच कवींची उपेक्षा झालेली आढळते. ज्ञाननिष्ठ अशा परंपरेतच समर्थ पंचायतनातील श्रेष्ठ सत्पुरुषांचा समावेश होतो वेदांतपर अशी या कवींचा रचना महत्वाची आहे. या कवींचा परस्पर जो संबंध असला याची नोंद अनेक ग्रंथातून आढळते. एका थोर पुरुषाने दुसऱ्या श्रेष्ठ पुरुषाची केलेली प्रशंसा क्वचितच आढळते. या दृष्टीने काही प्रसंग उद्‌बोधक आहेत

तुकाराम, वामन पंडित, कृष्णदास बैरागी, रामदास यांच्या समकालीनच शिवरामस्वामी, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर केशवस्वामी भागानगरकर, रंगनाथस्वामी निगडीकर हे सत्पुरुष होऊन गेले शिवरामस्वामी कल्याणकर, केशव स्वामी व रंगनाथस्वामी यांची रचना विपुल अशी आढळते समर्थ पंचायतनाच्या कालातच शिवरामस्वामी होऊन गेले संत एकनाथमहाराजांचे हे पणतु असून आद्य आचार्यां प्रमाणेच यांचे आयुष्य केवळ ३२ वर्षांचे होते. आचार्यांच्या सर्वच ग्रंथावर यांनी भाष्य केलेले आहे. यांची रचना विविध व विपुल आहे. यांची रचना द्विविध पद्धतीची आहे शास्त्रीय ग्रंथावरील भाष्य सादर करताना कवी आपला उल्लेख महाकवी म्हणून करतो. अन्य टीका वाङ्मयात मात्र भागवत धर्माची परंपरा मातुल घराण्याची लाभून कवी लघुत्व घेऊन वावरतो या दोन्ही पद्धतींची कुठेही गल्लत व सरमिसळ नाही शिवरामस्वामींच्या योग्यते बद्दल व अधिकाराबद्दल एका ग्रंथात महत्वाचा उल्लेख आढळतो. समर्थ व शिवराम यांच्या भेटीचा तो प्रसंग आहे.

समर्थ रामदासांच्या चरित्र विषयक साहित्यात "दासलीला" नावाचा ग्रंथ वसुमती (वसमत) येथील योगीराज या सत्पुरुषानें लिहिलेला आहे. ही रचना शके १७७२ ज्येष्ठ शु॥ ८ इंदुवासरची असून लेखन भागानगर हैद्राबाद येथे झाले आहे कवीने ग्रथित केलेली बरीच माहिती समर्थ चरित्रातील नवीन प्रसंग सादर करणारी आहे. हा ग्रंथ मागे प्रसिद्धपण झाला आहे या ग्रंथात समर्थ व शिवराम यांच्या भेटीचा प्रसंग आहे. समर्थ फिरत फिरत कल्याणी (जि. बीदर) येथे आले. शिवरामस्वामींची भेट झाली. शिवरामस्वामींची सर्व रचना त्यांनी पाहिली व कौतुक केले. समर्थ बरेच दिवस शिवरामस्वामी जवळ राहिले शिवरामस्वामींची पंचीकरण रचना पाहून समर्थ सुखावले. माझ्या मनात पंचीकरणावर टीका करावी असे होते पण आता प्रयोजन नाही असे समर्थ बोलले. बाल शिवरामास प्रति शुक्र मुनि असे समर्थांनी संबोधलें. समर्थ आपला प्रवास उरकून चाफळास आल्यावर आपल्या कल्याण आदि शिष्यास त्यांनी शिवरामस्वामींची योग्यता कथन केली पूर्व पुण्याईनेंच अशा सत्पुरुषाची भेट होत असते असे समर्थ सांगतात. एका थोर आचार्याने दुसऱ्या एका श्रेष्ठ पुरुषाची केलेली प्रशंसा साहित्यातून क्वचितच आढळते. संप्रदायातीलच आपल्या परंपरेच्या श्रेष्ठ पुरुषांच्या कथनावर हा ग्रंथ आधारलेला असल्यानें नोंद केलेल्या गोष्टींची माहिती कदापि कमी मोलाची नाही याच ग्रंथात समर्थ रामदास मंत्राळ (मंत्रालय) येथील राघवेंद्रस्वामी यांच्या दर्शनास गेल्याचा उल्लेख आहे. या ग्रंथात सारा वर्णनाचा भाग तपशीलवार आहे. अनेक नवीन प्रसंग या ग्रंथातून उपलब्ध होत आहेत हैद्राबाद येथील माझे नातलग श्री. कृष्णकांत आगलावे यांच्या कडे हा ग्रंथ उपलब्ध झाला. सुमारे १३१ वर्षां पूर्वीचा हा ग्रंथ आहे.

शिवरामस्वामी यांचे सुमारे १४० ग्रंथ आज उपलब्ध आहेत. या कवीची रचना कानडी, हिंदी, संस्कृत, तेलुगु भाषात पण असून हा कवी बहुभाषा कोविद होता. सारेच वाङ्मय अप्रकाशित असे आहे. धुळ्याच्या समर्थ वाग्देवता मंदिर संग्रहातील बाडातून या कवीचे अन्य दोन ग्रंथ व काही स्फुट रचना नव्यानें लाभली आहे.

शिवरामस्वामींच्या चरित्र विषयक साधन सामुग्रीत पूर्णानंद चरित्र ग्रंथाचे महत्व विशेष असे आहे. या ग्रंथातून दोन पिढ्यांचा इतिहास आलेला आहे. हा ग्रंथ अप्रकाशित असून या ग्रंथाचे एकूण १८ अध्याय व ओवी संख्या २२८१ आहे. हनुमदात्मज या नावाखाली कवीने ही रचना केली

आहे. याच कवीनें दासोपंत चरित्र लिहिलेले आहे या कवीच्या रचनेच्या विश्वसनीयते बद्दल डॉ. शं. गो. तुळपुळे व श्री. न. शं पोहनेरकर यानी निर्वाळा दिला आहे. व हा चर्चा दासोपंताच्या संदर्भानं आलेली आहे. त्याच प्रमाणें शिवराम व पूर्णानंद आणि आनंद संप्रदाय या बद्दल बरीच विपुल माहिती या ग्रंथातून लाभते. हनुमदात्मजाचे मूळ नाव कृष्णा असून आई वडिलाचे नाव अनुक्रमे हनुमंतराव व काशीबाई असे आहे. शके १७५३ खर नामसंवत्सरी चैत्र शुद्ध पौर्णिमेस हा ग्रंथ पूर्ण झाला आहे हा मूळ राहणारा बीदरचा. पुढे रोजगारामुळे भागानगरीस आला. तेथेच या ग्रंथाची रचना झाली. आनंद संप्रदायाच्या दृष्टीनें या ग्रंथास विशेष महत्व आहे. या ग्रंथाच्या प्रती गुलबर्गा, बीदर व हैद्राबाद येथे असून शिवरामाचे वंशज कै. हुतात्मानंद महाराज बीदर यांच्या संग्रहातील प्रत सुवाच्य व संपूर्ण अशी आहे

शिवरामस्वामींची गुरुपरंपरा आनंद संप्रदाय मठाची आहे. या संप्रदायाचा इतिहास हनुमदात्मजाने आपल्या चरित्र ग्रंथात अध्याय सोळा मध्य दिला आहे. या संप्रदायाचे आद्य प्रवर्तक सदानंद आहेत. सदानंद चरित्राची एक संस्कृत पोथी पण उपलब्ध आहे. या मठाच्या अर्वाचीन इतिहासाचा भाग अध्याय १८ मध्य आलेला आहे. या पीठाच्या इतिहासाच्या दृष्टीने सदानंद काल, शिवरामपूर्व काल व शिवरामकाल अशा कालखंडातून अभ्यास केल्यास महत्व दिसून येईल. मूळ सदानंद याचा काल आद्य आचार्या पूर्वीचा आहे. बीदर जिल्ह्यातील किल्ले कल्याणी येथे मूळ मठ आहे. मठाच्या मठाम्नायातून संप्रदायाचे प्राचीनत्व दिसून येते. ही दत्तात्रय परंपरा आहे. काशीचा विश्वनाथच या संप्रदायाचा अभिमानी आहे. या पीठाच्या व संप्रदायाच्या इतिहासाकडे कुणीही आजवर लक्ष दिले नाही. या संप्रदायाचा इतिहास हा एक स्वतंत्र ग्रंथाचा विषय आहे आजवर या पीठावर ६३ पीठाधीश झाले आहेत. या पीठाच्या गुरुनी ज्याना अनुग्रह केला त्यापैकी अनेक थोर आणि अधिकारी पुरुष निपजले. अनेक कवीनी आपल्या गुरुपरंपरेत आपल्या सोयी प्रमाणें प्रमुख सत्पुरुषाचा उल्लेख करीत थेट मूळ सदानंदाचा उल्लेख केला. यामुळे संशोधकात निरनिराळे अनुमान कल्पून चर्चा झालेली आढळते. अशा या अनादि आनंद संप्रदायाचा इतिहास महाराष्ट्रातील चोखंदळ संशोधकाच्या दृष्टीतून आजवर सुटावा हे आश्चर्य आहे. ही परंपरा केवळ दहा पंधरा सत्पुरुषाची नाही अनेक कवीनी परंपरा देताना आपली सोय पाहिली व केवळ प्रसिद्ध पुरुषांचीच नावे दिली. कारण क्रमवार सर्वच नावे देणें जिकीरीचे होते रंगनाथस्वामी निगडीकर व केशवस्वामी भागानगरकर यांचा समावेश दास पंचायतनात होतो. पण त्यांची परंपरा या आनंद संप्रदायाकडे येते या संप्रदायात सहजानद, पूर्णानंद ही नावे परंपरेत अनेकदा आली आहेत. केवळ सदानंद एक हेच आहेत. एका नावाचे अनेक अन्य सत्पुरुष या पीठावर आले आहेत. पूर्णानंद नावाचे तीन पुरुष या पीठावर आले मूळ पूर्णानंद हें स्त्री होते. अन्नपूर्णा बाईनाच गुरुनी पुरुष बनवून पूर्णानंद नाव ठेवले. शेवटचे पूर्णानंद हे पूर्वाश्रमीचे नारायण होते नाथमहाराजांची मुलगी गोदा व गोदेची मुलगी लक्ष्मी होच या नारायणाची पत्नी होती. या नारायण लक्ष्मीच्या पोटीच शिवरामाचा जन्म झाला. हेच नारायण ब्रह्मानंद गुरु कडून अनुग्रह होताच पूर्णानद बनले. याप्रमाणें शिवरामस्वामीचे वडिल नारायण हेच त्यांचे गुरु पूर्णानंद आहेत. या पूर्णानंदाचाच अनुग्रह रंगनाथस्वामी निगडीकर व केशवस्वामी भागानगरकर यांच्यावर झाला. या प्रमाणें दास पंचायतनातील या श्रेष्ठ पुरुषाचा संबंध या आनंद संप्रदायाशी अशा प्रकारे आला या कारणामुळे हे उभय सत्पुरुष शिवरामाचे गुरुबंधु ठरतात. कवी श्रीधराच्या गुरु परंपरेत पण या संप्रदायाच्या ब्रह्मानंदाचा उल्लेख येतो.

हनुमदात्मजानें आपल्या ग्रंथात केशवस्वामी भागानगरकर व शिवराम भेटीचा प्रसंग विस्ताराने दिला आहे. यावेळेस शिवराम स्वामीचे वय केवळ १२ वर्षाचे होते केशवस्वामींनी शिवरामास अत्यंत विनयपूर्वक पत्र देऊन एका कारकूनास पाठविले. तुमच्या दर्शनास मीच यावे पण येथील कामामुळे जमत नाही यामुळे येथवर येण्याचे कष्ट देत आहे असे कळविले. केशवस्वामीच्या घरी गजांत लक्ष्मी होती सारे त्यांना केशवपंत म्हणून ओळखत तानाशहाच्यापदरी नोकर असल्यानें ते भागानगरीस वास्तव्य करुन होते. आपल्या आगमनानें माझे घर पवित्र होणार आहे आपण अनुमान केल्यास मलाच यावे लागेल असे लिहून पाचारण केले होते. केशवस्वामीचे प्रेमळ पत्र पाहून शिवरामांना अत्यंत आनंद झाला वाटेत अनेक ठिकाणी पाद्यपूजा घेतशिवराम हैद्राबादेस आले. केशव स्वामीना ही वार्ता कळताच समागमे सैन्य घऊन ते स्वागतास आले शिवरामास सुखासनावर बसवून थाटात वाजत गाजत आपल्या घरी नेलें शिवरामाच्या बालवदना वरील ते तेज पाहून केशवस्वामींना धन्यता वाटली. शिवराम मुखावलोकाने त्याचे देहभान हरवले शिवरामाचा रंग सावळा होता, व ते अवघे १२ वर्षाचे होते. असे चरित्रकार नमूद करतो. साक्षात चंद्रमौळीच आहेत. अशी

स्तुती केशवस्वामींनी केली. हा प्रसंग देताना चरित्रकार म्हणतो–

दोघे सेविती समाधीसुख ॥
दोघे डोलतां अती हरिख ॥
त्या उभयतांची स्थिती पाहातां देख ॥
लोकास आश्चर्य वाटे ॥५६॥
लोकास पाहता देखले दोघे ॥
दिसे सांब किंवा श्रीरंग ॥
जे भक्त वत्सल भवभंग ॥
मानवी रुप विराजे ॥५७॥

असा हा कथा भाग पधराव्या अध्यायांत देताना चरित्रकार ग्रथित करतो की तेथील बादशहा हुशेनशहा अत्यंत सद्भक्त होता.त्याच्या कानावर शिवरामाची थोरवी गली केशवस्वामीच्याकडे शिवरामास बोलावून आणण्या विषयी सुचना पाठविली. शिवराम स्वत: येण्याची शक्यता नाही असे केशवपंतानी सांगताच बादशहाच केशवपंताच्या घरी शिवराम दर्शनास आला. त्यावेळी एक सहस्र होन आणि मोहरा, महावस्त्र व कल्याणी भागातील दहागावांची देऊ केली. पण " ही जागार या धरतीवरची असणार पण चराचरच आमची जागीर आहे. तुझ्या जागीरीस अंत आहे पण आमच्या जागीरीस कल्पांतीही नाश नाही.अशी जागीर सद्गुरुनी आम्हास दिली आहे. आम्ही फकीर लोक भिक्षा हीच आमची जागीर आहे यापुढे आम्हास सर्व काही तुच्छ आहे' असे शिवरामानी निक्षून सांगितले. आश्चर्य चकित झालेला राजा वंदन करुन परत गला. पुढे काही दिवस शिवरामस्वामी पंताकडे राहिले केशवस्वामीनी अलोट द्रव्य, चांदीची उपकरणी, वगैरे देऊन पाच उंट बडदास्तीस ठवून वस्त्र भरणादिकानी गौरवून त्यांची बोळवण केली चरणाला वंदन केले. त्याना विरह सहन होईना दोघेहि अधिकारीच होते एक मजल पर्यंत पाठवावयास केशवस्वामी स्वत: आले पुढे दर दान वर्षास शिवरामस्वामीना केशवस्वामी बोलावून घेत व त्यांच्या सहवासात दिवस घालवीत.

केशवस्वामीची प्रथम भेट घेऊन शिवरामस्वामी कल्याणीस परत आले काही दिवसातच रंगनाथस्वामी निगडीकर यांचे पत्र शिवरामास आले. त्यानी शिवरामास मुद्दाम पाचारण केले होते. रंगनाथस्वामीचे पत्र येताच पूर्णानंदाची आज्ञा घेऊन शिवरामस्वामी रंगनाथांच्या दर्शनास निघाले. रंगनाथस्वामी हे पूर्ण अधिकारी पुरुष होते. ते नेहमी निगडी गावी असत. त्यांच्या बरोबर नेहमी शिष्य समुदाय असे चरित्रकार निर्गुणग्रामच्या या रंगनाथाचे वर्णन करतो :–

रंगनाथस्वामी पूर्ण अधिकारी ॥
पूर्णानंदाचे अभयकर ज्याचे शिरी ॥
त्यांचे पद्य ऐकता निर्धारी ॥
ज्ञात होय अपरोक्ष ॥ ९१ ॥
ते केवळ ज्ञान सिंधु ॥
त्यांचे स्मरण मात्रे हटे भवबंधु ॥
ज्यांचे कवित्व ऐकता ब्रह्मानंदु ॥
सहजा सहज होतसे ॥ ९२ ॥

रंगनाथस्वामी हे राज ऐश्वर्य संपन्न होते. शिवराम स्वामी रंगनाथाच्या भेटीस निघाल्यावेळी त्यांचे बरोबर ५०० ब्राह्मणांचा समुदाय होता. पाच उंट तैनातीस होते. येवढा मेळावा घेऊन शिवराम प्रवासास निघाले. येवढ्या वैभवात असूनही शिवराम विरक्त असेच होते. निगडी ग्रामात प्रथम गावाबाहेर एका उपवनात ते उतरले.इतक्या मेळाव्यासह तेथे एकदम न जाता त्या उपवनात भोजन उरकून मग पुढे दर्शनास जावे असा विचार करीत त्यानी त्या उपवनात तळ दिला होता. भोजन उरकून शिवराम स्वामी एका मंचकावर पहुडले होते. एक शिष्य शिवरामाचे पाय चुरीत होता. शिवरामस्वामी जवळच्या उपवनात उतरले आहेत हे कळताच गडबडीनें रंगनाथस्वामी त्यांच्या स्वागता करिता उपवनात आले आपल्या गुरुबंधूचे पाय एक शिष्य चुरीत आहे व तेथील सर्व वैभव पाहून रंगनाथास फार आश्चर्य वाटले त्यानी विचार केला की याची रचना आणि शिकवण पाहिल्यास अज्ञानाला ज्ञान लाभावे असे आहे पण असे हे वैभव यास कितपत शोभा देणारे आहे ! वैराग्यपूर्ण उपदेश करणारी याची रचना आहे पण हा मात्र येवढा भोगी आहें याचेच त्याना नवल वाटत होते ! याची किर्ती किती अगाध आहें प्रत्यक्ष पांडुरंगानेंच स्वकंठीची माळ याच्या गळ्यात घातली व वाचा व प्रतिभा दिली. पण अशा व्यक्तीस हें वागणें शोभत नाही. जो बोलतो तसा वागतो तोच खरा साधु आचरणाविना केवळ बोलणें फोल पणाचेच असते. शिवरामाचे हे वरपांगी वैभव पाहून रंगनाथांचा क्रोध अनिवार झाला. जवळ येऊन त्यानी शिवरामाच्या छातीत लाथ मारली. रंगनाथस्वामींच्या लाथेचा प्रहार पडताच शिवरामस्वामीनी तो पाय कवटाळून धरला व प्रेमानेंच म्हटले :–

धन्य दिवस आजवर्णू काय ॥
देखिले म्या साधूचे पाय ॥
ते पाहिल्यानें सुख न समाये ॥

ब्रह्मांड गर्भी या काळीं ॥ १ ॥
अळकावरी जेवी गंगा ॥
निजछंद वाहे त्रिताप गंगा ॥
तेवी तुमचे दर्शन पैंगा ॥
उद्धरती जगा सत्वत्वे ॥ २ ॥
सर्व मंगळ आज जाले ॥
सकळव्रत पर्व आम्हा घडले ॥
पातक माझे हरले सर्व ॥ ३ ॥

शिवरामस्वामींना गहिंवरुन आले. सर्वांग सुखावले व डोळ्यातून आनंदाश्रू ओघळू लागले. याप्रमाणे शांतीचा पुतळा शिवरामस्वामी ज्यांची सहजानंदी चित्तवृत्ति रगलेली होती, त्याना त्या लाथेची जाणीव पण झाली नाही. पण या प्रसंगामुळे रंगनाथस्वामींची अवस्था फार विचित्र अशी झाली. शिवरामांना झाल्या गोष्टी बद्दल काहीच वाटत नाही याचे आश्चर्य वाटले. कदाचित माझ्याच मनात त्यांचे वैभव पाहून द्वेष भावना निर्माण झाली व अशी कृति घडली असे मनास वाटून अत्यंत दुःख झाले. शिवरामाची शांती, किर्ती व स्थिति अगाध अशीच आहे हेच खरे असे सारखे वाटून त्यांचेही डोळे पाणावले. स्वतः पांडुरंगानेच ज्यास स्वकंठीचा हार घातला हे जाणूनही आपण त्यांची परीक्षा घतली. रुक्मांगपंडिता सारखा त्याच्या कीर्तनात डुलतो, रंगतो त्यांचा मी आज अपमान केला. असा विचार मनात येऊन रंगनाथस्वामींची विचित्र अवस्था झाली. अशा चंद्र मौळीस आपण लाथ मारली म्हणून रंगनाथ विव्हळले. तद नंतर दुःखातिरेकानें शिवरामस्वामींस कवटाळून त्यांना आपल्या अश्रूंचा अभिषेक केला व झाल्या अपराधा बद्दल क्षमा मागितली. शिवरामस्वामींनी तेवढ्याच शांतपणें म्हटले की, " मीच पापी व आळशी या आपल्या चरणानें पुनित झालो. आज जन्मजन्मांतरींचे सुकृत फळास आले म्हणून चरण कमलांचा लाभ झाला,, एकमेकास अलिंगून शिवराम व रंगनाथांनी अद्वयानंदाचा अनुभव घतला. नंतर उभयता सर्वांसह नगरीत आले. काही दिवस शिवरामस्वामी रंगनाथस्वामींकडे राहिलें. निघते वेळी वस्त्राभरणांनी निरोप दिला. व चौकोस बोळवण करण्यास आले तेथून शिवरामस्वामी कल्याणपट्टणास परत आलें. रंगनाथस्वामींच्या रचनेत त्यांनी शिवरामस्वामींवर केलेली रचना महत्वाची आहे. यात रंगनाथस्वामी म्हणतात :—


स्वस्ति श्री शिवराम पूर्ण गुरु हा ॥
प्रख्यात योगी पाहा ॥ ध्रु. ॥
सिद्धांती गुरु भक्त पुत्र ॥
निववी सामर्थ्य सत्ता पहा ॥
वादी वेद विरुद्ध वाक्य सकळा ॥
हा मोह वुनिस्त्रये ॥
साधु होऊनिया जना सुखोनिलोला ॥
करी निर्भय ॥ २ ॥
साधु पुष्कळ जाहले जगी ॥
खरे यात्री समा योग्यता ॥
नहीं हे बहु बोलिती ।
फल नसे प्रत्यक्ष आता पाहा ॥
साक्षात पंढरीनाथ हरिस्वकरी घालुनिकंठीं बरे ॥
बोलत्यास पाहती जन खरे प्रत्यक्ष नेत्री बरे ॥

तसेच शिवरामस्वामींच्या निर्वाणा बद्दल एक श्लोक खालील प्रमाणें आहे :—

वैशाखमासी तृतिया क्षतासी ॥
भीमा तरा तनु ठेविलासी ॥
कल्याण ग्रामी वसति मिरासी ॥
शिवराम झाला वैकुंठवासी ॥

हा श्लोक रंगनाथस्वामींचा आहे असे हुताशनंद महाराजांनी आपल्या संग्रहात नमूद केलें आहे. पण हा श्लोक अन्य कुणाचा तरी असावा कारण शिवरामा पूर्वी ४ वर्षे रंगनाथस्वामींनी आपली जीवन यात्रा संपविलेली आहे

या प्रमाणें दास पंचायतनातील या दोन ज्येष्ठ सत्पुरुषांचा संबंध शिवरामस्वामी आणि पूर्णानंद यांच्याशी प्रामुख्याने आला आनंद संप्रदायाशी ते एकरूप झालेले आहेत. याची प्रचिती या उभय कवींच्या अनेक रचनेतून पण प्रामुख्याने येते. तत्वज्ञानाच्या दृष्टीनें एकरुपता असल्यानें या आनंद संप्रदायाच्या कृपेनें पावन झालेले हे दोनही कवी समर्थ पंचायतनात प्रमुख आहेत. केवळ यामुळेच हनुदात्मजाने आपल्या पूर्णानंद चरित्र ग्रंथात वरील भाग विस्ताराने दिला आहे शिवाय शिवराम स्वामींना आपल्या अध्यात्म रामायण ग्रंथात हे काव्य एकावयास जो संत समुदाय जमला आहे त्याची आवली दिली व त्यात केशवस्वामी व रंगनाथ स्वामी यांचा क्रम आवर्जून दिला आहे.



# गिरिधर स्वामी विरचित
# ' पारिजातक नाटक पुष्प '

– डॉ. सौ. विशाखा बि. टुमणे

( प्रस्तुत लेख हस्तलिखिताच्या आधारे लिहिला असून मुळात त्रुटी अशुद्धे व अपपाठ पुष्कळच आहेत उद्धरणें देताना ते जसेच्या तसे ठेवले आहेत. )

## संक्षिप्त चरित्र –

गिरिधर स्वामी हे रामदासी संप्रदायातील एक कवी होऊन गेले. इ. स. १६५३ ते १७२९ हा त्यांचा काळ समजला जातो. सहाजीकच त्यांनी रामदासांना पाहिले असल्यास नवल नाही. रामदासांनी आपल्या शिष्यांच्या अकरा पिढ्या पाहिल्या होत्या असे म्हणतात त्या दृष्टीनें पाहिले तर गिरिधर हे त्यांचे चौथ्या पिढीतील शिष्य आहेत. समर्थांच्या प्रत्यक्ष शिष्या वेणाबाई(इ. स. १६२७ ते १६७८) त्यांच्या शिष्या बाइयाबाई व त्यांचे शिष्य गिरिधर अशी त्यांची गुरु-परंपरा आढळते. त्यांचा निश्चित जन्म दिवस उपलब्ध नसला तरी समाधी दिवस मात्र उपलब्ध आहे. त्यांनी शके १६५१ च्या वैशाख शुद्ध अष्टमीस बीड येथे समाधी घेतली

## साहित्य निर्मिती –

आश्चर्य वाटावे इतकी विपुल व नानाविध रचना गिरिधरांनी केलेली आढळते. त्यांच्या काव्य रचनेंचा मुख्य हेतू रसिकांना मानसिक आल्हाद देणें हा नसून ' अध्यात्म सुगम करुन सांगणें ' हा होता. ' समर्थ प्रताप ' ह्या प्रचंड ग्रंथाची रचना त्यांनी केली त्यात समर्थांच्या ह्या विस्तृत चरित्राचा विस्तार रामदासांची काव्यंही त्यात नकळत्या मुळ आणखीनच वाढला आहे त्यातल्या 'गुरु भक्त - महंत-रत्नमाला ' या प्रकरणात १२५ शिष्य शिष्यिणींचीही माहिती गुंफलेली आहे. ' निवृत्तीराम ' हा त्यांचा ग्रंथ रामदासी संप्रदायाची लक्षणें सांगणारा आहे. वाल्मीकी रामायणातील घटनांचा सारांश सात निरनिराळ्या प्रकारांनी गिरिधरांनी लिहिलेल्या सात मराठी रामायणात ग्रथित केलेला आहे. ही सप्त रामायणे ' समर्थ वाग् देवता मंदिर', धुळे येथे आहेत याखेरीज त्यांच्या नावावर जवळ जवळ सत्तर रचना आहेत. त्यापैकी बेचाळीस काव्ये 'समर्थ वागदेवता मंदिर' धुळे येथे उपलब्ध आहेत. रामदासांच्या काव्य - रचना - पद्धतीचे त्यांनी अनेक ठिकाणी अनुकरण केलेले आढळते.

## काळाचा परिणाम –

अशा ह्या प्रचंड अध्यात्मपर रचना करणाऱ्या गंभीर स्वभावाच्या कवीनें 'पारिजातक - नाटक - पुष्प' ही हलकी फुलकीशी आख्यान-रचना केली याचे खरोखर नवल वाटते. गिरिधरांच्या काळात आख्यान काव्य भरभराटीला येऊन कीर्तनप्रसार बराच झाला होता. तेव्हा सर्व सामान्य श्रोत्यांपर्यंत अध्यात्म व भक्ती पोचवण्याच्या ह्या राजमार्गाचा अवलंब आपणही करावा असे त्याना वाटले असेल. आपल्या आख्यानाला असे नाट्यपूर्ण शीर्षक देणारा हा कवी खरोखरी रसिक असला पाहिजे, त्या विषयातील नाट्याची जाण त्याला असली पाहिजे एवढेच नव्हे तर त्या काळी अशी नाटके केली जात असत की काय? व त्यासाठी उपयुक्त असलेली वाङ्मयरचना त्याला करावीशी वाटली का ? असे मनात आल्यावाचून रहात नाही.

## रचना –

एकोणीस पदात रचलेले हे काव्य अतिशय ललीत मधुर असून भाषा अत्यंत सोपी आहे. 'पद' हे नाव स्वतः कवीनेंच प्रत्येक कवितेला दिलेलें आहे. 'पदा' मध्ये गेयते व्यतिरिक्त लगक्रम तर राहोच; मात्रा किंवा चरणांचे परिमाण वा अंत्ययमक कसलेच बंधन कवीने पाळलेले आढळत नाही.

**उदाहरणार्थ –** ॥ पद ॥

कलह प्रीय तो नारद हारीची भवती मोटी ॥१॥
सुर पुरिचें सुमन येकची अर्पीले । कृष्णा भेटी ॥२॥
गीरीधर प्रभु पदीं । मानस बसें ॥ प्रेम पोटी ॥३॥

॥ पद ॥

नारदा केला कलहासी मुळ ॥

सत्यभामा नोहे सामान्य कुळ ।।धृ।।
तुजवरी सत्यभामें । येवढी गोविंदाची प्रीती ।
तरी ते काय प्राप्त जाले । पुष्प रुक्मिणी प्रति ।।धृ।।
म्हणें भामा पुष्पकैचें ।। सांगा आणील कोणें । इत्यादी

**कथा –**

स्वर्गातून येताना, पृथ्वीतलावर न आढळणारे पारिजातकाचे एकच पुष्प श्रीकृष्ण पूजेसाठी नारदानें आणले व ते जवळच बसलेल्या रुक्मिणीला श्रीकृष्णाने प्रेमभरानें दिलें इतक्या साध्या प्रसंगानेंही सत्यभामेचा सवती मत्सर जागा जाला नारदाने जणू कलहालाच 'मूळ' देऊन आपलें कळलाव्या हे नाव सार्थ केले. ह्या क्षुल्लक गोष्टीमुळे अनर्थ घडणार हे श्रीकृष्णही जाणून होता वस्तुतः त्या क्षणी रुक्मिणी जवळ होती म्हणून सहाजीकच फूल तिला दिले. सत्यभामा बसली असती तर तिलाही दिले असते; पण इतका सरळ विचार केला तर ती सत्यभामा कसली? तिच्या मत्सराने पेट घेतला व तिने आपले अंग धरित्रीवर झोकून दिले. क्रोधरुपी महाभूताने तिला झपाटले; पण श्रीकृष्ण (गिरिधर) रुपी मांत्रिकानें उतारा देऊन तिला शुद्धीवर आणले असे सांगून दुसऱ्याच पदात आख्यानाचे सर्व सारच सांगून टाकले आहे

आपल्या रुसव्याचे कारण श्रीकृष्णानेंच ओळखावे ह्या स्त्रीसुलभ अपेक्षेने ती त्याला आपल्या रागाचें कारण सांगतच नाही; पण जेव्हा ते समजते तेव्हा श्रीकृष्ण म्हणतो,

"येक्या पुष्पे तुज काये होऊ पाहाते
जरि म्या दीधले ते उद्या वाकुनि जाते
हीत न कळे निता (मित्य) पुष्प दिधली माते
काय म्हणावे या तुझ्या मुर्खत्वाने ।३।। पद १५

तो पुढे असेही आश्वासन देतो की

सुर पुष्प मय तो मगसा पारिज्याते ।
हे तव सदनी स्तापीन निश्चिते ।

अशी शपथ वहातो, तिची समजुत घालतो, सांत्वन करुन परम प्रीतीने आपल्या चारी हातांनी तिला आलिंगन देतो. व आपल्या अंतरीची खूण तिला पटवितो. त्यामुळे ती प्रसन्न होते, आपले सर्व दागदागिने घालवून मोठ्या थाटाने श्रीकृष्णा बरोबर गरुडावर आरुढ होऊन जाते. इतकी साधी पण सहज सुंदर अशी ही कथा आहे. श्रीकृष्ण परमात्म्याचे ही शांत मानससरोवर क्षणभर ढवळून टाकणारी ही कथा प्रत्येकाच्या अंतःकरणात वास्तव्य करणाऱ्या कळीच्या नारदाला मोठी रोचक वाटते.

**व्यक्तिरेखा सत्यभामा –**

सत्यभामा ही ह्या आख्यानकाव्याची नायिका असून तिच्या सहज भाव विकारांचा आविष्कार कवीने तितक्याच सहजतेने केला आहे. स्त्रीसुलभ असा सवतीमत्सर जागृत झाल्यामुळे, ती संतापून त्रागा करते.

"कळली कळली आजी पतीची प्रीती हो ।
बाई त्याचीया करणीस नाही लागी (उपाय)
मिती (माप) हो । ।।धृ।।
- - - ज्यार चोर कपटी ऐसी ख्याती वो ।।१।। पद ५
पति नोहे वैरि होये ।
येणे सोडीली माझी सोये (संगत) ।।धृ ।
वरचड मानाची मी ।
ते ची आजी जाले ची मी (छोटी) ।।१।।
मज केलें मान हीने । वैरी साधीला सवतीने ।।२।।
गीरे धर स्वामी वरी । दात खाऊनी गुरगुरी ।३। पद ६

उधट बोलें पचेंडा (प्रचंड) कर्कशा, तोंडाला आढावेढा नाही असे निचे कवी स्वतःच वर्णन करतो. नंतर तर ती वस्त्रालंकारही फेकून देते (पद ११) व श्रीकृष्ण भेटीस आला तरी

डोळे नुघडे न पाहे न बोले'

त्यामुळे श्रीकृष्णाची मोठी पंचाईत होते. रोज ताजी फुले देणारा पारिजातक वृक्ष देतो' अशी हातावर हात मारुन आणभाक (पद १६, आकडा ३) दिल्यावर ती शांत होते क्रोधाविष्ट सत्यभामेचे शद्वचित्र उठावदार व प्रत्ययकारी उतरले आहे एकाच ओळीत कवी सांगतो,

"उधट भामा गर्वांची । नाही पतीची पर्वाची ।"

तिच्या मनोवृत्ती अत्यंत उत्कट असून रागावली की जितका आकस्ताळेपणा करते तितकीच ती आनंदाने फुलते. आपले 'भामा' (भामन् = तेज. ती तेजस्विनी आहे) हे नावही सार्थ करते.

**नारद –**

कलह प्रिय तो नारद हरीची भक्ती मोठी । अशी सुरुवात करुन एका ओळीतच कवीनें नारदाची दोन्ही वैशिष्टये सांगून टाकली आहेत आपण केलेल्या कृतीचा परिणाम पहाण्यास तो पुन्हा परत येतो त्यावरुन त्याची कलहप्रियता तर दिसतेच. तसेच एकच पुष्प आणणें, त्याचा परिणाम मुकाटयानें पाहून तो कृष्णाला कळवणें आणि वर

साळसूदपणें त्याला उपदेश करणें हे तो सारे चवीने करतो वर म्हणतो,

भवीष केले तसेचि झाले । म्हणे कमलाकांत रे ॥१॥
नारद म्हणे देवराया सलगीचे हे फळ रे । २। पद ८.

**श्रीकृष्ण –**

श्रीकृष्ण मात्र येथे दोन निरनिराळ्या पातळीवरच्या भूमिका बजावताना दिसतो. तो सर्वसाक्षी परमेश्वरही आहे व भामेचा पतीही आहे. नारदाने दिलेले एकुलते एक पुष्प तो जाणूनबुजून रुक्मिणीला देतो. पुढील अनर्थ तो जाणून आहे. म्हणूनच संतापलेली सत्यभामा 'त्यांच्या कृत्याला लागमीती नाही म्हणते, 'पती नाही वैरीच आहे', 'कपटी', 'नसता डौल दाखविणारा' अशी विशेषणें त्याला बहाल करते पण लीलालाघवी श्रीकृष्ण शांत आहे या अनर्थावरील उताराही तो जाणून आहे. अशीही श्रीकृष्णाची दुहेरी प्रतिमा मनोज्ञ उतरली आहे.

**संवाद**

ह्या काव्यातील तिन्ही पात्रांचे संभाषण-चातुर्य प्रकट करण्यात कवीचे कौशल्य पणाला लागले आहे.

"नारदा, केला कलहासी मूळ ।
सत्येभामा ना हे सामान्ये कुळ ॥ध्रु॥ पद २

हे भाकीत श्रीकृष्णाने आधीच नारदाजवळ बोलून ठेवलेले असते तिचा सवती विषयक दुस्वास याच शुल्लक गोष्टीमुळे उफाळून येणार आहे हे समजूनही श्रीकृष्ण तिच्या रुसण्याचे कारण माहीत नाही असे दर्शवतो व विचारणा करतो,

"कां ही रुसली, प्राणप्रीय सत्येभामा" ॥ध्रु॥

तिच्या रुसव्याचे कारण नव्यानेच कळले आहे असे दर्शवून तो समजूत काढताना म्हणतो,

"येकच की पुष्प आणिले नारदाने"

व ते रुक्मिणीला दिले खरे पण आता त्याची भरपाई म्हणून,

'अनुदिन तुजला असावी यैसी सुमनें ।
तरु तव सदनी (पद १६) स्तापुनि संकल्पुन ."
- - - "एवढ्यासाठी कां केला हा कोहाळ ?"

एवढेच म्हणून तो थांबत नाही तर तिची व आपली एकरुपता पटविताना पुढे म्हणतो,

"आवडति तु मी तुला प्रीय"

असे असताना, "दुसरे दिवशी वाळून जाणारे फूल मी तिला दिले तर केवढा अकांड तांडव केलास? ह्या तुझ्या मूर्खत्वाला काय म्हणावे?' तिचा मूर्खपणा तिच्या पदरात टाकल्यावरही पुन्हा स्वतःच्या प्रेमाचा निर्वाळा देत कृष्ण निक्षून सांगतो,

"सुंदर सत्यभामे । माझीया प्रीतीची साज तुची ।"
कारण पूर्वी तू माझी अनन्य भक्ती केली आहेस.
"आरवीला (अंकित झालेला) होये मी सर्व सोसीतसे ।
सांगतो खुण जाणे अंतरीची । (पद १७)

अशी गोड बोलांची साखरपेरणी करुन मोकळा होतो.

सत्यभामा व कृष्ण यांचा हा संवाद- म्हणजे सत्यभामा भांडते आहे आणि श्रीकृष्ण समजुत काढतो आहे– विशेष रंगला आहे. (पद १३ ते १६) मनात आलेले सत्यभामा फटकन बोलून टाकते पण कृष्ण मात्र त्या सर्वावर या ना त्या परीनें पांघरुन घालतो आहे. हा संवाद म्हणजे नर्म शृंगाराचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

**निवेदन शैली –**

कथा निवेदन करण्याची कवीची हातोटी वाखाणण्या जोगी व प्रवाही आहे. भाषा सरळ असून सहज समजेल अशी आहे. प्रत्येक पदाच्या शेवटी 'गिरिधर' ही कविमुद्रा आहे. तीतही कवीने श्लेष साधला आहे. तो शब्द जर 'गिरिधर प्रभु' किंवा 'गिरिधर स्वामी' असेल तर त्याचा अर्थ श्रीकृष्ण आहे व नुसता 'गिरिधर' शब्द आला तर ते कविनाम आहे.

"पुष्प कैचे ॥ सांगा आणिले कोणी ।
वास यतो मगमगीत । नगर व्यापीले तेणे ॥१॥ पद ३

हे वर्णन अतिशयोक्त भासते, 'मगमगित' हा शब्द 'घमघमित' सारखाच नादानुकारी आहे.

सत्यभामेच्या अंगात सवतीच्या द्वेषाचे भूत संचारले होते व त्यावर श्रीकृष्ण उतारा देईल ही कल्पना समकालीन श्रद्धा व परिपाठ यांची द्योतक आहे. सत्यभामेचे स्वगत तिचा द्वेष अधिक स्पष्ट करते.

आभीमानाचा तो रावण । भंगिला की नारायेणे । पद ५
येथे रुपक अलंकार साधला आहे.

आपल्याला न देता सुरपुरीचे पुष्प श्रीकृष्णाने रुक्मिणीला दिले यामुळे त्या भामिनीचा संताप इतका उफाळून आला की ती म्हणते,

ज्यार, चोर, कपटी ऐसी ख्याती वो ॥१॥ पद ५.

पण संतापाचा आवेग ओसरल्यावर एकदम निराश होऊन ती म्हणते,

'आपुलाची दाम कुडा तेंव फारवयासी (परवयाशी) झगडा ।

येथे लोकोक्ती अलंकार साधला आहे. पुन्हा पती विषयी विचार करताना ती उद्गारतें.

"पति वोहे वैरी होये । येणे सोडी माझी संग(संगत)
स्वतःविषयी वृथा गर्व बाळगून ती म्हणते,
बरवड मानाची मी तेवो अजी जाले ची मी ॥

वास्तविक पहाता, श्रीकृष्णानें स्वतःला मिळालेले पुष्प रुक्मिणीला दिले ह्यात रुक्मिणीची कोणती चूक? पण द्वेषामुळे चुकीच्या पद्धतीनेंच विचार करीत ती सगळयां वरच आग पाखडतें.

मज केले मान हीनें । वैरी साधिला सवतीन ॥२॥
गिरिधर स्वामीवरी दात खाउनी गुरगुरी । ३॥ पद ६

पुन्हा पुन्हा तोच तो विचार करुन ती निरनिराळ्या मत्सरी कल्पना कशी करतें हे पहाण्यासारखे आहे.

सवती लागी फल वोपीले ।
श्रीकृष्णाला रमे अभिमानाचे नाक कापिले ॥ध्रु॥
आता कैसे तोंड दाउगे । धग(धिग्)जीणे माझे ।

व सखीला विचारते,

सखीये कैसे प्राण ठउ गे ॥६॥ पद ७
मानाचा करी चेंदा मेंदा गे । गिरिधर प्रभुषी येउ दे ना गे ॥

यात तिचा अकस्ताळेपणा तर दिसतोच शिवाय क्षुल्लक गोष्टीचे अवडंबर करुन कल्पित दुःख उगाळत बसण्याची 'खास बायकी मनोवृत्ती' ह्या कवीनें फार प्रभावी पणें रंगवली आहें, जणु तो तिच्या मनातच शिरला आहे. ह्या सर्वांवर उत्तार म्हणूनच की काय नंतरच्या पदात श्रीकृष्णाचे स्तोत्र त्यानें गाइलें आहे पण कथेशी ते फारसे संबंधित नाही; मात्र भामेच्या उफाळणाऱ्या रागाच्या पार्श्वभूमीवर हे भक्तिपूर्ण पद अधिक उठावदार होते. ते नारदाच्या तोंडचे आहे असे मानले तरच त्याचा संदर्भ लागतो. श्रीकृष्णाचे वर्णन पारंपारिक असलें तरी वैशिष्ट्य पूर्ण आहें "तो इतका सदय आहें की अमृताचा वर्षाव करणारा चंद्र जणु त्याच्या अंतकरणात निवास करतो" ही उत्प्रेक्षा चेतोहारी आहें. आपण लावलेंली कळ पुरती फलद्रूप झालेली पहाण्यासाठी नारदाची स्वारी परत आलेलीं दाखवून येथ नाट्य साधलें आहें.

"गिरीधर प्रभुच्या हते शेवा घेतसे निट"

येथे अशुद्धामुळे चटकन अर्थ उमगत नाही; पण उमगला की हसू लोटते. सत्यभामेची वेणी घालून देणारा तिला दागिन्यांचा साज चढविणारा श्रीकृष्ण नवनवलाईचा वाटतो. सत्यभामेने साजशृंगार करतांना ज दागिने घातले आहत, ते कविकालातील आहेत, हे उघड आहे.

## वर्णने –

गिरिधरांच्या ह्या काव्यात काही वर्णनें इतकी उत्कट व हुबेहुब उतरली आहेत की तो प्रसंग आपण प्रत्यक्ष पहात आहोत असे वाटावे. कृष्णानें रुक्मणीला पुष्प दिले हे ऐकताक्षणीच –

भडके क्रोधाग्नीच्या ज्वाळा । पद ३
'भुदरी भामा ते लोळे गडबड गुंडा । पद ४
'अुकसा बुकसी फुंदे सत भामारे ।
तिचा उलो पाहें उर ॥'
'आयासे मुर्छित झाली बाळा रे ।' पद १०

हे क्रोधांध व मानिनी सत्यभामेचे स्वभावोक्तीपूर्ण शब्दचित्र अत्यंत प्रत्ययकारी उतरले आहे. पात्रांनी तसा अभिनय करावा, म्हणून हे वर्णन इतके विस्तृत व सांगोपांग केले आहेसे वाटते. कृष्ण येण्याचे वेळी ती

अलंकार विवर्जित । अचेतन काष्ठवत ॥१॥
झाली आहे तसेच
'फाटके वसने दिस । मुळीहूनी कंचुकी नसे ।
वाकसले (विसकटले) मोकळे केसें ॥
मुखी अवकळा ॥ २ ॥ पद ११.

अशा क्रोधाग्नीने जळणाऱ्या सत्यभामेची समजुत पटवता पटवता शेवटी त्यानेच तिची सेवा करण्यास प्रारंभ केला निर्वाणीच्या प्रसंगी ज्याने गजेंद्राचे रक्षण केले,

तोची बैसोनी बाईलेची घालतो वेणी ॥१॥
बाळया बुगड्या काप कानी । जडित नागोत्रे (वेल)
आळंकारिली दीपाभरणी । (काजळ)
अंबोरुह नेत्रे । कुंकुम रेखा रेखी ॥२॥
नाडळी (निटिल = कपाळ, कपाळावर) कस्तुरीचा टिळा ।
वाळी वाकी मोर नाकी सजविलो बाळा ॥३॥
हारीचे (हरीच्या) आमृत हास्त स्पर्शे उचले ।
(उचंबळून आले ) लावण्ये ।
सलगीचे सुख फळले पुर्व पुण्याने पुर्णे ॥४॥ पद १८.

पति पत्नींच्या सेव्य- सेवक भावांची ही अपूर्व उलटा पालट सहाजिकच हास्यरसात्मक ठरते. पतिव्रता धर्म असा उफराटा केल्यामुळे कवी म्हणतो,

ही सत्यभामा दाण्टीक मोठी । दादुल्याची लाडकी धीट ।

ज ता जाता अशी वात्सल्याची डूब दिल्यामुळे संतापी अ.कस्ताळचा सत्यभामेचा राग न येता कौतुकच वाटते.

सत्यभामेच्या रागाच्या वर्णनात रौद्र रसाचा आभास आहे तर श्रीकृष्णाच्या समजूत घालण्याच्या क्रियेत नर्म शृंगाराच्या छटा आहेत. हे आख्यान मळात शृंगारिक असूनही हास्य वत्सल व रौद्राभास यांच्यावर भर दिल्यामुळे वाचणाऱ्याला संकोच वाटेल असे स्वरुप त्याला कोठेच आलेले नाही. हे रामदासी कवीचे वैशिष्टयच म्हणावे लागेल गिरिधरांनी केलेली ही हलकी फुलकी रचना हा गिरिधरांच्या प्रतिभेचा अपूर्व विलास अत्यंत अत्यंत हृदयगम आहे हे छोटेसेच गेय 'नाटक-पुष्प' केवळ त्यांच्याच नव्हे तर एकंदर रामदासी संप्रदायाच्याच काव्यात आगळचा वेगळचा नाटचमयतेमुळे उठून दिसते.


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर
विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

दूरध्वनी ४४३१८८

व्ही. जोशी
अँड को.

ब्लॉक मेकर्स, आर्ट प्रिंटर्स

शनिवार नजिक, शेवडे बोळ, **पुणे. २**



श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर
विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

**एक आवड श्रेष्ठ निवड**

# राजेश

साधा

सातारी जर्दा

नेहमी वापरा.

-: उत्पादक :-

मे. राजेश जर्दा
मॅन्यु. कंपनी

जयसिंगपूर (जि. कोल्हापूर)

☎ ५११

# श्रीरंगनाथस्वामींच्या समाधी स्थानाचे कार्य

— तु· दि· गोसावी

## अवाहन

श्रीमद् सद्गुरु निजानंद रंगनाथ स्वामी महाराज यांचे समाधीस्थान सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव तालुक्यात कोरेगाव रहिमतपूर रस्त्यावर कोरेगाव पासून दक्षिणेंस ८ किलोमीटर अंतरावर आहे

समाधी स्थानाभोंवती सुमारे १५० फुट लांब रुंद असा आकार भक्कम दगडीत तर बंदीनें बंदिस्त केलेला आहे. मध्यभागी पश्चिमाभिमुख गर्भागार व भव्य दुहेरी सभा मंडपवर ३० फुट व्यासाची मेघडंबरी आहें. समाधी समोर पश्चिमेस जेष्ठ बंधूची व उत्तरेस कनिष्ठ बंधू (सध्यांचे गोसावी घराण्याचे मूळ पुरुष ) श्री विठ्ठलपंत यांची समाधी आहे. दक्षिणेंस शिष्योत्तम श्री काशिराज अण्णांचीं समाधी (अवधूत अवतार श्री दत्तमंदिर ) असून लगतच श्री. जनार्दन स्वामीची समाधी उत्तरेस श्रीराम मंदिर हनुमान मंदिर, भरपूर पाण्याचा आड वविश्वस्तांची निवासस्थाने आहेंत.

राम मंदिरासमोर पूर्वाभिमुख श्री हनूमंताची संगमरवरी मूर्ती, पाठीस ढाल, कमरेस तलवार काखेत धनुष्य व हात जोडून श्रीरामांचे आज्ञेची वाट पहात ऊभा आहे. अशी मूर्ती संपूर्ण महाराष्ट्रांत फक्त एकमेव आहे. असा अभिप्राय शिवशाहीर श्री बाबासो. पुरंदरे यांनी त्यांचे समक्ष भेटीत दिला आहे. याच ठिकाणी श्री स्वामीचें मनोहर घोड्याचा दगडांत रुतलेला खूर स्थापन केलेला आहे.

काल मानाने या सर्वच बांधकामाचीं पडझड सुरु झाली. देवस्थानचें व्यवस्थापना करिता उत्पन्नाची कोणतीच बाब नाही अशा अवस्थेत ४ वर्षां पूर्वी कोरेगावचे एक स्वामी भक्त श्री. दि. ह. तथा तात्यासो. कुलकर्णी यांनी सक्रिय प्रेरणा देवून डॉ. सर गोसावी, ग. दि. गोसावी, तु. दि गोसावीं यांचे सहकार्याने अगदीच अल्पस्वल्प देणग्यावर जीर्णोद्धारांस प्रारंभ केला व कोणत्याही परिस्थितीत सर्वांगिण जीर्णोद्धार तडीस नेणेंचा त्यांचा निर्धार आहे.

हे मदत कार्य व्हावे ही श्रींची इच्छा असल्याने आता पर्यंत पश्चिम दर्शनी तटाचे प्रवेशद्वारासह पूर्ण बांधकाम मुख्य मंडपावरील आर. सी. सी. चें आच्छादन, मेघडंबरा, मुख्य शिखर, उपशिखरे, राममंदिराचे संपूर्ण बांधकाम, दत्त मंदिराचे शिखर यांची कामे पूर्ण केली आहेत. हनुमान मंदिर पूर्ण उलवडून मंडपाचा आकार वाढवुन पुन्हा बांधले असून शिखराचे तळा पर्यंत काम झाले आहे. आर्थिक अडचणी मुळे सध्या हे काम थांबले आहे. बांधकामा पैकी पूर्व दक्षिण तटाचे काम विहीर दुरुस्ती, अतिथी गृह, स्वयंपाक गृह, नवे कृष्ण मंदिर ही कामे व्हायची आहेत·

जीर्णोद्धाराचे काम केवळ बांधकामा पुरतेच मर्यादित नसून देणग्यांचे उपलब्धतेनुसार, स्वयंपाकासाठी भांडी, श्री स्वामीचे ग्रंथसंपदा पुनर्मुद्रित करणें याही बाबी समाविष्ट आहेत.

या सर्वांगीण सुव्यवस्थेचे निर्मितीस लाखो रुपयांचे देणग्याची गरज असून हे महत्व कार्य दानशूर भक्ताचे इच्छेंवर अवलंबून आहे,

या सर्व बाबींची पूर्तता व्हावी देवस्थानची नित्य देखभाल व्यवस्था यासाठी विश्वस्त निधीची योजना तयार केली आहे. त्यासाठी एक सरकार मान्य ट्रस्ट स्थापना केली असून निधी संकलनांची व विनी योगाची योजना पुढील प्रमाणें आहे.

देणगीदारांनी कायम ठेव म्हणून किमान रु. १५१ द्यावेत ज्या तारखेस वा तिथीस ही देणगी दिली जाईल. त्या तारखेस दरवर्षी श्रींचें समाधीस देणगीदाराचे नांवे अभिषेक करुन अंगारा प्रसाद पाठविणेंची योजना आहे ही रक्कम स्वतंत्र ठेवण्यात येणार आहे.

जीर्णोद्धारा संबंधीचें छायाचित्रासह नम्र आवाहन दै. तरुण भारतचे दि. १०–१०–८१ चे अंकात प्रसिद्ध झाले आहे. देणगीदारांनी आपल्या देणग्या, रोख, मनीऑर्डर

बँकड्राफ्ट द्वारा पुढील पत्त्यावर पाठवाव्यांत अशी विनंती आहे. पत्ता

श्री रंगनाथ स्वामी मठ, निगडी ट्रस्ट नं. NSA, ११४०
ट्रस्टी, डॉ. रंगनाथ पंढरीनाथ गोसावी व गजानन
दिगंबर गोसावी, मु. पो. निगडी (रंगनाथ स्वामी)
ता. कोरेगाव जि सातारा.

या रोख देणग्या प्रमाणेच श्रीं हनुमान, श्री कृष्ण व श्री समर्थ रामदास यांच्या मूर्ती देणगीत मिळाल्यास नव्या मंदिरातुन त्यांची स्थापना होईल. वस्तु व रोख देणगी–दारांची नांवे कायम स्वरुपांने फलकावर लावण्याची योजना आहे. कोरेगांवचे एक लाकूड व्यापारी श्री. विलासराव काळे यानी सुमारे २५०० रु. किमतीची उत्कृष्ट गणेश मूर्ती देणगी दिली. तिची स्थापना केली आहे.

श्रींची समाधी व अन्य दैवतांचा दैनंदिन पूजा सांज आरती पंचपदी गुरुवार व एकादशीस तसेच अन्य प्रासंगिक निमित्ताने भजनें कीर्तनें होतात. रोज पुराण वाचणें पूजा–अर्चा करणें, देवस्थानची झाडलोट दिवा बत्तीं करणें या करिता सेवेकरी घराणी येथे स्थांइक झाली असुन त्याचे कायम चरितार्थाची व्यवस्था पूर्वी पासून करणेंत आली आहे.

श्री स्वामीचे पुण्यतिथी उत्सवा प्रमाणेंच श्री. जनार्दन स्वामी, योगीराज, श्री विठ्ठल यांच्या पुण्यतिथी तसेच रामनवमी, हनुमान जयंती, जन्माष्टमी, दत्त जयंती या बरोबरच कार्तिक शु॥ १ ते त्रिपुरी पौर्णिमा रोज पहाटे काकड आरती व महानैवेद्य केला जातो.

या उत्सवास जोडुन ग्रामस्थातर्फे मार्गशीर्ष व॥ १ ते व.॥ ९ अखेर ज्ञानेश्वरी पारायण, अखंड नाम सप्ताह भजन - कीर्तन - प्रवचने केली जातात पारायण समाप्तीस मिरवणूक व महाप्रसाद केला जातो.

जीर्णोद्धार व देवस्थानचे कायम स्वरुपांचें व्यवस्था–पन या संबंधीची वस्तुस्थिती भक्तांचें समोर सादर केली आहें. श्रींचे प्रेरणेने भक्तजन या सर्व सत्कार्यास सक्रिय सहकार देतील अशी आशा करुन हें निवेदन पूर्ण करतो या कार्याची धुरा कोरेगाव येथील प्रसिद्ध डॉ. सच्चिदानंद रं. गोसावी हे कर्तव्य बुद्धीने, सामाजिक जाणिवेनें व परमार्थ प्रबोध वाढावा यासाठी वाहत आहेत

●●●


With Best Compliments From ☎ 7201

**Shree Vijay Tubewells**

Prop : H. H VEMULA

Borewell Contractors –
86 A, Asra Colony Hotagi Road, **SOLAPUR** 413003

**Shree Samarth Tubewells**

Prop : A. H. VEMULA

Tubwell Contractors –
Block No. 1 B, Scheme 11 Asra colony, Hotgi Road, **SOLAPUR** 413003.

卐 श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा 卐

**श्री गुरुदत्त दूध व्याव. सह. संस्था मर्या. सांगोला**

आनंद पद्धतीनें दूध सकलन करुन सभासदाना जास्ती भाव देणारी सांगोला तालुक्यातील अग्रगण्य संस्था

रोजचे संकलन म्हैस– १२५ गाय– ३५० ऑडीट वर्ग 'ब'

शेअर्स भांडवल– ७०५०।– मागील नफा ८२-८३– १०,३००।– चालू नफा ८३-८४– ७,५००।–

शहाजी दगडू चौगुले
सेक्रेटरी

वसंत दिगांबर पुजारी
चेअरमन

# श्री शिवाजी महाराज व दास पंचायतन

– अशोक देशपांडे

सताव्या शतकरात ह्या महाराष्ट्रात घडलेला एक अपूर्व चमत्कार म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी यांची जगावेगळी युती ह्या युतीला चमत्कार म्हणणें देखाल खरे नाही! हा योगायोग ही नाही हा दैवी संकेतच म्हणावा लागेल. पराक्रमाच्या मद–तील धर्माचे अधिष्ठान धांवून आले भगवताची – – – श्रीरामाची प्रेरणा लाभली मराठी साम्राज्यांची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महान् प्रतापी शिवरायांना कोदंडधारी श्रीरा–माची पाठराखण मिळाली तो काळ – – – – ? त्या काळाचे वर्णन सामान्य शद्बात करता येणार नाही. हिंदु धर्मावर, हिंदु संस्कृतीवर चारी बाजूनी इस्लामी आक्रमण चालू होते.

सुरु होती विलक्षण अस्मानी - सुल्तानी नष्ट होवू लागली होती येथील सुजलाम - सुफलाम मंगल भूमीं शाश्वती राहिली नव्हती कशाचीच. जड जाहला होता. जीव प्रत्येकाला स्वतःचा ह्या देशाच्या मुलीबाळींना, आया बहिणींना घराबाहेर पडण्याची सोय राहिली नव्हती. वखवखलेल्या कामांध नजरा चारीठाव शोधीत असायच्या आपले भक्ष्य महत्व उरलें नव्हते पावित्र्याला - - - - कुकवाला उठला होता. हाहाःकार माणुसकीचा वून केव्हांच झाला होता. उरली होती उदंड निर्लज्जता.

" जे युगी राजा यवन । तेथे अन्यवार्ता कायसी" ?

असे समर्थांनी परखडपणें विचारले. त्यांना पाहण्यास काय मिळाले ?

"माणसा खावया अन्न नाही ।
आंथरुण पांघरुण तेही नाही ॥
घर कराया सामग्री नाही ।
काये करिती" ॥

कारण

" राजा देवद्रोही जाला । देवस्थळांचा उछेद केला ।
तीर्थ महिमा सवाल मोडिला । ठाईठाईचा " ॥

त्यामुळे

" कितेकी विखे घेतली । कितेकें जळी बुडाली ।
जाळिली ना पुरली । किती एक" ॥

अशावेळी हडबडू नका –––– गडबडू नका –––– असा टाहो फोडत एक जगावेगळा रामभक्त कृष्णातीरी डोंगर–दऱ्यातुन हिंडत होती वणवण. घुमत होतो त्याची खणखणीत वाणी.

" जय जय रघुवीर समर्थ"

हाती झोळी घेवून मागत होता भिक्षा तो फक्त माणुसकीची शिकवीत होता युगायुगाचा राष्ट्रधर्म सांगत होता राम–कथा ब्रह्मांड भेदुनियां पैलाड नेण्यास स्थापन करीत होता उदंड हनुमान मंदिरे. सांगत होता. सुर्य नमस्कार घालण्यास हवे होते त्यासाठी सुराज्य, स्वराज्य अशावेळी ह्या राष्ट्र–पुरुषाला भेटला एक निश्चयाचा महामेरु जाणता जयवंत राजा दिल्हा गुरुदेश त्याला - - - स्वराज्याचा. लागला व ढीला त्यांचा महाराष्ट्र धर्म यावनी सत्ता लागली डळमळू खान लागले हादरू. पराक्रमांच्या विजय पताका लागल्या लहरु बहुत जनांचा आधार असा श्रीमंत योगी अखेरी सिंहासनी बैसला दास संतुष्ट झाला.!

समर्थ रामदास व शिवछत्रपतींची गांठभेट निश्चित केव्हां झाली ह्यावद्दल विदवानात मतभेद आहेत. हनुमंत स्वामींच्या सर्वमान्य बखरी १८२५ ही भेट चाफळ खोऱ्यात शिंगणवाडीच्या परिसरात शके १५७१ म्हणजे १६४९ मध्यें निश्चत झाली. त्यावेळी समर्थ समर्थपणें सह्याद्री वावरत होते. शिवरायानी स्वराज्याच्या आकांक्षेला नवे तोरण बांधून आपला कारभार चालु केला होता शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीच समर्थांची व शहाजी राजांची गाठभेट झाली होती त्यावेळी राजानी समर्थांना स्वतःच्या जहागिरीत येण्याचे निमंत्रण अगत्य पूर्वक दिले. होते. श्री रामाच्या आज्ञेनें ते त्या प्रमाणें खरोखरच कृष्णातीरी आले.

" जो गोदातीरीं जन्मला । तो कृष्णातीरी आला ॥
तेथे प्रताप प्रकटला । धन्य तो साधू" ॥

कृष्णातीरी आल्यावर समर्थांना काय दिसले.?

" मतामतांचा गलगला । कोणी पुसेना कोणांला ।।
जो जो मती सापडला । तयासि ते चि थोर ।।

या अशा कर्तव्य मूढ मऱ्हाठ मोला जनतेस कर्तव्य दक्ष करणें आवश्यक होते दुःखारण्य बनलेल्या महाराष्ट्राचे आनंदवनभुवन करायला हवे होते म्हणून त्यांनी एक नवा पवित्रा घेतला.

" सामर्थ्य आहे चळवळीचे . जो जो करील तयाचे
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे" ।।

ही खूण गाठ त्यांनी पक्की केली. बहुजन समाज देवाधर्माला पारखा होवू लागला होता. अंधारात चांचपडत होता. नैराश्याचे तिमीर दाटू पाहत होते अशावेळी – – – –

" मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा"
हे आपल्या जीवीतांचे परमध्येय ठरवून त्यांनी – – – –

" मुख्य हरिकथा निरुपणा । दुसरे ते राजकारण ।
तिसरे तें सावधपण । सर्व विषयीं ।।

हा महामंत्र बहुजन समाजास देण्यास आरंभ केला

" देशद्रोही तितुके कुत्ते । मारुनी घालावे परते" ।।

ह्या आगळ्या महाराष्ट्र धर्माच्या प्रेरणेंत फार मोठा अर्थ होता. भरलेल्या तीर्थ यात्रा चालु असतानाच त्यांनी मठ स्थापन करुन लोकसंग्रहाला आरंभ केला होता. धर्मस्थापनेंस स्वराज्याची गरज असल्याने ते जन्मभूमी व तपोभूमी सोडून शिवछत्रपतींच्या जहागिरीत आले मोरे, घोरपडे, सावंत वगैरे मातबर मराठा सरदार मुसलमानी सेवा पत्करुन सुखाने राहत होतें शिवरायांशी वैर साधत होते. आदीलशाही मराठा सरदार बाजी शामराजानें शिवाजी महाराजांना पकडण्याचा कट जावळीच्या चद्रराव मोऱ्याच्या साहयाने केला होता. शहाजी राजाना अधमपणें पकडण्याचा डाव घोरपड्यानी त्यापूर्वीच केला होता. मऱ्हाठा सरदा–रांची ही विघातक वृत्ती वाढली होती. " म्लेह्र दुर्जन उदंड" हे त्यांना दिसत नव्हते.

हे सर्व मऱ्हाठे देशमुख, जहागीरदार व बहुजनसमाज स्वराज्याच्या झेंड्याखाली एकत्र आणण्याची गरज होती. या कारणें अखंड सावधान असावे लागणार होते. ह्या मनो-कामनेंसाठी त्यांनी रामनामाचा जय जयकार चालु केला बहुजन समाजात धर्म शौथिल्य, निसरसाह व पराधीनपणा वाढला होता. त्या ऐवजी धर्म निष्ठा, कर्तव्य जागृती व आत्मविश्वास येणें आगत्यांचे होते उत्साह. स्फूर्ती व पराक्रमासाठी रामकथा अवश्यक होती. श्रीरामाने आपल्या महान पराक्रमानें रावणवध केला.

" म्हणोनी कथा थोर ह्या राघवाची"

समर्थ कालीन स्थिती रावणाच्या बंदीशाळेतील देवा प्रमाणें होतीं. त्या देवांचा बंध तोडणाऱ्या कोदंडधारी श्रीरामाची उपासना करण्यासाठी त्यांनी रामनवमीचा उत्सव कृष्णातीरी चालु केला. उपास्य देवतांच्या गुणांचे थोडेतरी अनुकरण होईल ह्या हेतुने हनुमान जयंतीला आरंभ केला. श्री बजरंगबलीचो उपासना म्हणजे प्रत्यक्ष पराक्रमाला आरंभ त्यासाठी ठाईठाई हनुमान मंदिरे बांध–ण्यास प्रारंभ केला समर्थांनी सारा कृष्णकाठ रामनामाने व बजरंगबलीच्या जय जयकाराने दुमदुमू लागला.

ह्या उत्सवा साठी हजारो मऱ्हाठे एकत्र येवू लागले रामकथा गाऊ लागले ह्या रामनामातूत लोक संग्रह वाढू लागला. यातुन संघटना, संघटनेतुन संप्रदाय संप्रदायातुन राजकारण ! हे राजकारण म्हणजेच महाराष्ट्र धर्म!

महाबळेश्वर, वाई वगैरे परिसरातून हा आगळा महाराष्ट्र धर्म स्थापून समर्थ कृष्णावेण्णा संगमावर माहु–लीला आले तेथे जवळच 'जरंडा' पर्वत आहे. त्या उंच डोंगरावर श्री हनुमानाचे पुरातन मंदिर आहे. साक्षात श्रीहनुमानजी द्रोणागिरी पर्वत उचलून लंकेंकडे जाताना त्याचा एक तुकडा येथे साताऱ्या जवळ पडला तोच जरंडा हे अतिरमणीय ठिकाण समर्थांना फार आवडले. ते रोज जरंडा उतरुन संगमावर माहुलीला स्नानाला येत. माधुकरी मागून परत जात. समर्थ येथे मुक्कामाला आल्याचें कळताच त्यांच्या गाठी भेटीला विविधमंडळी येवू लागली. निगडी-हून रंगनाथ आले. वडगावाहून जयराम आले ब्रह्मनाळहून आनंदमूर्ती आले. भागानगराचे केशवस्वामी अजून यावयाचे होते. ही सारी मंडळी समर्थांना तीर्थ यात्रेच्यावेळी विविध ठिकाणी भेटली होती. त्यामुळे जवळीक निर्माण झाली होती. फक्त भागानगर ( हैदाबाद ) दूर होते. ह्या पांच जणांचे एकत्र येणें म्हणजे दासपंचायतन !

" श्री रामदास जयराम रंगनाथ
आनंदमुर्ती केशव सनाथ
ऐसे हे पंचायतन समर्थ
रामदास स्वामींचे ।।
हे दिसताती वेगळाले
परी ते स्वरुपी मिळालें
अवघे मिळोनि येकचि जाले
निर्विकार वस्तु" ।।

रंगनाथ स्वामी निगडीकर हें मूळ माणदेशीच्या नाझऱ्याचे देशपांडे ते राजयोगी होते. त्यांचा बाणा शिपा–याचा थाट राजाचा तें नेहमी पंच कल्याणी घोड्यावर

वसत ते ब्रम्हचारी होते. बद्रिकाश्रमी त्यांनी योगसाधन केले. त्यांनी हजारो पदे, अष्टके, पंचके रचली शिवलीला–मृतकार कवि श्रीधर हे त्यांचे पुतणे.

जयराम स्वामी हे वडगांवचे कुलकर्णी पंढरपुरात त्यांनी विद्याभ्यास केला. त्याना दत्त दर्शन झाले. त्यांना नाथांचा अवतार समजतात आजही गोकुळ अष्टमीचा उत्सव ते दरवर्षी वडगांवला फार मोठ्या थाटामाटात साजरा करीत. सारे पंचायतन गोळा होई. समर्थानी स्वत: श्रीकृष्णासाठी रथ तयार करुन दिला होता. जयरामांचे कांही ग्रंथ उपलब्ध आहेत.

आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर मूळचे आगळ गांवचे नंतर ते ब्रह्मनाळला आले. त्यांचे गुरु रघुनाथ स्वामी समर्थ आनंदमूर्तींच्या घरा गेले असतांना रघुनाथ स्वामींची समाधी डोलू लागली! आनंदमूर्तीचे कांही पदे उपलब्ध आहेत.

केशवस्वामी भागानगरकर हे मूळचे लातुरजवळील कल्याणीचे कुलकर्णी त्यांच्या विलक्षण भक्तिभावामुळे हिंदु प्रमाणेंच त्यांना मुसलमान शिष्यही लाभले त्यामुळे बाद–शहाच्या दरबारात त्यांचे वजन होते. त्यांना जयदेवांचा अवतार समजत समर्थावर त्यांचा फार जीव होता.

'श्रीरामदासा परमसखया । स्वानंदकंदा गुरुवर्या ।।
ही त्यांची निष्ठा होती.

ह्या चारी जणांनी समर्थाना वेगळे न मानता त्यांचा नवासंप्रदाय वाढविण्यास आरंभ केला समर्थांची आज्ञा गुरु समान त्यामुळेच चारी दिशांना समर्थांना त्यांचा महाराष्ट्र धर्म वाढविता आला व राजकारण साधता आले.

समर्थ वाईला असतांना तेथे त्यांचा लोकसंग्रह फारच वाढला वाई परिसरातील अनेक तरुणांना ते गोळा करीत सूर्य नमस्कार घालण्यास सांगत श्लोक म्हणून घेत वाईचा खान अस्वस्थ होवू लागला समर्थावर त्याच बारीक नजर होती. परंतु सावधपणा हा समर्थबाणा असल्याने त्याला कांहीच करता येईना. काहीच गैर आढळले नाही त्याला.

वाईहून समर्थ माहूलीला आले. तेथे रंगनाथ स्वामी, जयराम स्वामी, आनंदमूर्ती, आल्यावर सहजपणें धर्म परिषदेची कल्पना निघाली. समर्थानी लगेच ती अमलात आणण्याचे ठरविलें. माहुली परिसरातील सारा तरुण वर्ग कामाला लागला. त्याकाळीं माहित असलेल्या सर्व साधु संताना निमंत्रणें जाऊ लागली तुकाराममहाराज चिंचवडचे मोरया गोसावी वगैरेंनी येण्याचे कबुल केलें. जरंड्यावर हा सोहळा होणार होता.

फार मोठी तयारी सुरु झाली. जरंड्यावर तेथे तशी कांहीच सोय नव्हती. ह्या साधु संतापुढे समर्थांना आपली मनोकामना स्पष्ट करावयाची होती. त्यांचे विचार ऐकून घ्यावयाचे होते त्यातून कांही तरी मार्ग काढावयाचा होता. समाजचित्र फार दारुण होत चाललें होतें. गप्प राहून उपयोग नव्हता.

तीर्थयात्रेच्या निमित्तानें रंगनाथ स्वामी, जयराम स्वामी, आनंदमूर्ती नाना तीर्थक्षेत्री जाऊन आलेले होते. ओळखी वाढलेल्या होत्या. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणांत साधुसंत गोळा होऊ लागले, वाईच्या खानाच्या पोटांत दुखू लागले. माहुलींच्या परिसरातील हे उत्साहाचे वातावरण त्याला सहन होईना. समर्थांची शंका येऊ लागलीं. त्यानें समर्थांना गुप्तपणें पकडण्याचा डाव पक्का केला समर्थांच्या वाईतील एका शिष्याने ही वार्ता अत्यंत गुप्तपणें समर्थांच्या कानावर घातली. समर्थाना हे सारे अपेक्षित होतेंच या पूर्वीच त्यांनीं भागानगरहून केशवस्वामींना बोलावणें पाठविले होतें. त्यांची उपस्थिती अत्यंत आवश्यक होती. आपल्या मुसलमान शिष्यवर्गासह ते केव्हांच निघाले होते ते येताच समर्थांनी त्याना खाना संबंधी सांगितले. वाईच्या केशव स्वामींनी आपल्या मुसलमान शिष्यापैकी कांही जणांना वाईला पाठविले. वाईच्या खानाला गप्प बसण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें ! समर्थांनी काट्यानें काटा काढला होता गंडांतर टळले.

अगदी मोकळ्या वातावरणात कांहीही विघ्न न येता संत मेळावा पार पडला. तुकाराममहाराजांच्या येण्यानें एक वेगळीच गोडी निर्माण झाली. रोज रात्री हरिजागर असायचा. आपल्या रसाळ वाणिने तुकारामांनी सर्वांची मने जिंकली. मोरया गोसावींनी गणेश पूजनाची महती सांगितली समर्थांनी चालू काळाला अनुसरुन काय व कसे बदललें पाहिजे याची परखडपणें चर्चा केली. रामभक्ती व हनुमान पूजनाचे श्रेष्ठत्व पटवून दिले. तुकोबांनी देखिल हे मान्य केलें. राजांच्या कार्याची त्यांना माहिती झालेली होती.

जरंड्यावर ही सारी खलबते चालू असतांना रंगनाथ स्वामी, व केशवस्वामीच्या शिष्यवर्गाने माहुलीतील तरुण पोरा समवेत पहारा ठेवण्याची कामगिरी पार पडली. हा पहारा खडा पण गुप्त होता ! समर्थांचे एक स्वप्न पूर्ण पूर्ण झालें. पंचायतनाचे कार्य सर्व साधुसंतांनी मान्य केले. नव्या उत्साहाने सारे पंचायतन महाराष्ट्र धर्माच्या आगळ्या यज्ञाला पुढे चालू ठेवणार होतें. दुसऱ्या अर्थाने हेच होतें. समर्थांचें प्रभावी राजकारण !

शिंगणवाडीच्या परिसरात झालेल्या शिव समर्थ भेटी नंतर समर्थांच्या राजकारणाला खरी सार्थकता प्राप्त झाली. राजकारण ह्या शद्बाचा अर्थ त्याकाळात ' चातुर्य ' असा न समजता आजचाच अर्थ रुढ होता.

" राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे "

हे समर्थाच्या राजकारणाचे प्रमुख सुत्र होते कमालीची गुप्तता ! शिंगणवाडीच्या शिवछत्रपतींच्या पहिल्या भेटी-तंच समर्थांनी महाराजाना सांगितले ————————

'सुचित करुनी अंतःकरण । आता करावे राजकारण" ! कारण

"प्रवृत्तीस पाहिजे राजकारण"

शिवाजी महाराजांची ही प्रवृत्ती समर्थानी शेवटपर्यंत जागृत ठेविली. त्यासाठी सारे दास पंचायतन कामी लागले होते.

अफझूलखानानें विजापूरला पैजाचा विडा उचल-ल्याची व तो स्वारी साठी निघाल्याची पहिली वार्ता कल्याण स्वामीनी समर्थाना कळविली त्यांचे सांकेतिक भाषेतील हे एकमेव ओवीरुप पत्र उपलब्ध आहे!

'विविके करावे कार्य साधन । जाणार नरतनु हे जाणोन ।
पुढील भविष्यार्थी मन । रहाटोच नये" ।।
चालो नयें असन्मार्गी । सत्यता बाणल्या अंगी ।
रघुवीर कृपा ते प्रसंगी । दास माहत्म्य वाढवी ।। २
रजनीनाथ आणि दिनकर । नित्य नेमे करिती संचार ।
घालिताती येरझार । लाविले भ्रमण जगदीशे ।। ३
आदिमाया मूळ भवानी । हे चि जगाची स्वामीनी ।
एकांती विवंचन करोनी । इष्ट योजना करावी ।।

हे पत्र कितीही वेळा वाचलेंतरी कांहीही गुप्त अर्थ समजणार नाही!

पहिल्या तीन ओव्यांची व शेवटच्या अर्ध्या ओवीची आद्याक्षरे वाचली म्हणजे विजापुरचा सरदार निघाला आहे, असे वाक्य होते ! नंतर शेवटच्या ओवीचे शेवटचे दोन चरण एकांती विवंचना करोनी । इष्ट योजना करावी असे वाचले म्हणजे सारे रहस्य समजते.

कल्याण स्वामीनी फार मोठी कामगिरी पार पाडली होती. ह्यावरुन हे सिद्ध होत आहे की समर्थाचे शिष्य आशा तऱ्हेच्या विलक्षण कामगिऱ्या जिवावर उदार होवून पार पाडीत. गुप्त बातम्या नाना तऱ्हेने, नाना वेदानें गोळा करुन वेळेवरती योग्य ठिकाणी कळवीत. यासाठी फार मोठी यंत्राण राबविली जात होती. आज जी

## आरती श्रीरंगनाथ स्वामीची –

ओवाळु आरती सद्‌गुरु निजरंगा-स्वामी सद्‌गुरु निजरंगा
चित्सागर-तू स्थावर जंगम तरंगा–ओवाळू आरती–ध्रृ ।।
ब्रह्मादिक अवतार तुजवरि बुदबुद कल्लोळ–
दयाळा बुदबुद कल्लोळ
ब्रह्म परात्पर तूं हो निजगुरु मायेचा मूळ –
ओवाळू आरती ।।
नमित नमित म्हणती सज्जन मी तुझा दास
स्वानंदे क्रीडती सबाह्यें होऊनीसंतुष्ट ।
ओवाळू आरती ।। ध्रृ ।।
अगणित गुण–गण–गणीत कवण तुज परमामृत सिंधु–
श्रीरंगानुज–तनुज–शरण तुज भावे दीन बंधू
ओवाळू आरती सद्‌गुरु निजरंगा – ध्रृ ।।

कामे सी. बी आय. किंवा गुप्त हेर खाते पार पाडते तीच कामे समर्थाचे रामदासी करीत. कल्याणस्वामी हे या यंत्रणेंचे प्रमुख सुत्रधार होतें.

भक्तिमार्गाकडे वळलेंल्या बहुजन समाजाला सम-र्थांनी ठोसरूपणें राज्य कारभाराकडे वळविले त्यांच्या जीवनाला नवी दिशा दाखविली. गुप्तपणें ज्या कारवाया ह्या समर्थ शिष्यानी व पंचायतनानी केल्या त्या अत्यंत गुप्तपणें, कारण

" इशारतीचे बोलता नये"

अशी समर्थाची सक्त ताकीद असायची केवळ योगायोग म्हणूनच कल्याण स्वामीचें वरील पत्र सांपडले

" समर्थ आकारपूर्वक यवनासी मारविले"

असा स्पष्ट उल्लेख समर्था प्रतापात आहें गिरधर स्वामीच्या हे गिरधर स्वामी समर्थाजवळच होतें. हा आकार पूर्वक मुसलमान म्हणजे अफझूलखान होय.

अफझूलखान विजापूराहून वाईला जातांना पंढरीचा पांडुरंग शिल्लक ठेवणार नाही ही समर्थाची खात्रीच होती. ते स्वतः लगेच पंढरीला आले. खुद्द पंढरीचा पांढरीत न येता गुरसाळचाच्या गढीत राहिलें. प्रल्हादबुवा बडवे हे त्या काळातील सत्पुरुष समर्थाच्या माहितीचें होते. त्यांच्या ओळखीनें चंद्रभागेपलीकडील देगांवच्या पाटलांच्या वाड्या तील तळघरात श्री विठ्ठलाची मुळ मनोहारी मूर्ती ठेवण्याची व्यवस्था समर्थानीच केली. त्यामुळे खानाला पांडुरंगाची मूळ मूर्ती भ्रष्ट करता आली नाही ! त्यानंतर

शिवछत्रपतींनी खानाचे पारिपत्य व्यवस्थित केले. समर्थ त्यावेळी गडावरच होते !

शिवाजी महाराज व समर्थ रामदास स्वामी यांचें एकांतात राजकारण चालायचे ही गोष्ट आता निर्विवादपणें सत्य ठरलेली आहे. समर्थ शिष्य दिवाकर गोसावी हे समर्थ व शिवाजी राजांच्या गाठी भेटींची टिपणें ठेवीत. त्याला वाकेनिशी दप्तर म्हणीत त्या दप्तरातून विलक्षण माहिती उपलब्ध झालेली आहे. शिवाजीमहाराज रायगडावर दरबारी मंडळीत वसलेलें असतांना दक्षिणेंकडील गुप्त दिंडीनें समर्थ राजांच्या महाली कुणालाही न दिसता येत ! तेथे गुप्त मसलती होत. ही व्यवस्था खंडो बाळाजी चिटणीस पाहत. समर्थांना शिवाजीमहाराजाचे फक्त मोक्ष गुरु न म्हणता राजकीय गुरूही समजावे लागेल. महाराजांचें प्रत्येक राजकारण त्यांच्या ह्या अशा तऱ्हेच्या गुप्त मसलतीनें झालें. ' श्री शिवाजी प्रताप ' ह्या ग्रंथात शाहिस्तेखानाच्या पारिपत्याची संपूर्ण हकीकत दिलेली आहे. त्यात ह्या मसलती ही समर्थांचा संबंध अगदी स्पष्टपणें सांगितलेला आहे. याशिवाय निळो सोनदेव मुजुमदार, रामचंद्र निलकंठ अमात्य बाळाजी आवजी चिटणीस, वगैरे महाराजांची जवळची मंडळी समर्थांचे राजकारणी शिष्य म्हणून प्रसिद्ध प्रसिद्ध आहेत.

ब्रह्मतेजाची व क्षात्रतेजाची गांठ भेट झाल्यावर जे जे होणे शक्य आहे. ते ते त्यावेळी घडले. समर्थांच्या आशिर्वादाने स्वराज्य स्थापनेत यश येत गेल्याचे उल्लेख छत्रपतींनी समर्थांना दिलेंल्या सनदेत केले आहेत. कृष्णातीरी आल्यावर समर्थ पुन्हा उत्तरेत गेलें नाहीत. परंतु त्यांनी तीर्थयात्रेच्या वेळी केंलेल्या मठांचा व महंताचा उपयोग शिवाजी महाराजांची औरंगजेबाच्या तावडीतून मुक्तता करण्यासाठी झाला.

शिंगणवाडीच्या त्या परिसराने जी शिवसमर्थ भेटी पाहिली ती केवळ योगायोग नव्हता ! ती होती प्रभू रामचंद्राची इच्छा. तुळजाभवानीची कृपा. शंभुशिखरीच्या राजाचा आशिर्वाद पंढरीच्या पांडुरंगाची किमया लंगोटी लावून ' जय जय रघुवीर समर्थ ' म्हणणें व भिक्षा मागणें हेच समर्थांचे मागणें हेच समर्थांचें जीवनकार्य नव्हते स्वतः रानावनात राहून त्याना सुखी करावयाचे होते. कुटुंब जीवन स्वतः प्रपंचात न पडता त्याना करायचा होता स्वराज्याचा प्रपंच. हिंदुधर्माची वैभवशाली पताका नव चैतन्याने पुन्हा एकदा ह्या देशांत मानानें उभी करायची होती ह्यासाठी त्यांच्या लाडक्या शिवबांना द्यावयाची होती त्यांना एक अलौकिक प्रेरणा ह्या भूमंडळाचे ठायी.

ह्या साऱ्या गोष्टीच्या पुर्तीसाठी पंचायतनाचा जगावेगळा शिष्यवर्ग ' जय जय रघुवीर समर्थ ' असे म्हणत अहोरात्र सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातूनच नव्हे तर साऱ्या मुगल सलतानीतून अखंड हिंडत होता. अस्मानी सुल्तानी सहन करीत होता. प्राण गेला तरी ' महाराष्ट्र धर्म सोडीत नव्हता. जिवावर उदार झालेली व समर्थांच्या राजकारणाने भारुन गेलेंली ही रामदासी मंडळी नाना वेषांनी, रुपांनी मोगलाच्या मुलूखातील माहिती गोळा करीत देशप्रेमाच्या आगळ्या महामंत्रानें भारावून गेलेंली ही मंडळी म्हणजे देशाचे भूषण ठरावित दासपंचायताच्या रुपानें ह्या देशाला मिळालेली ही एक अलौकिक देणगी होती गाजावाजा न करता एक प्रचंड स्वातंत्र्य यज्ञ ह्या मऱ्हाठभूमीत चालू होता. त्यात कित्येकांच्या आहुती पडल्या.

परंतु दुर्दैवाने आजही ह्या पंचायतनाचे संपूर्ण कार्य बहूजन समाजापर्यंतच नव्हे तर सुशिक्षितापासूनहि दूर राहिलें आहे ! समर्थांच्या कुबडीत धारदार गुप्ती होती. हे किती जनांना ठावूक आहें ? वारकरी व धारकरी ह्या दोन्ही भूमीका समर्थांनी पार पाडल्या. गाजावाजा न करता ! दुसऱ्याना समजावे म्हणून त्यांनी कांहीच केले नाही कसलेहि श्रेय स्वतः कडे घतले नाही त्यांचे पंचायतन ही तसेंच. त्यांनीही स्वतःचे प्रस्थ माजविले नाही.

एका सामान्य नारायणाने ठोसरपणें जगावेगळा महाराष्ट्रधर्म वाढविला मराठा तितुका मेळविला बहुतांचो अंतरे राखिली सदर प्रसंग ओळखिला. सावधपणेंचि बहुत राजकारण साधिले हरिकथा निरुपण ही केंले. रामकथा नुसती न गाता ब्रह्मांड भेदुनिया खरोखरच पैलाड नेली. हिंदुधर्माची भगवा पताका नवचैतन्यानें पुन्हा एकदा ह्या देशात मानाने डोलू लागली. समर्थांना हवे असलेले आनंद वन भुवन ह्या देशीच निर्माण झालें.

" बुडाला औरंग्या पापी । म्लेंछ सहार जाहला ॥

आणि त्यामुळे

" निर्मल जाहली पृथ्वी । आनंदवन भुवनी ॥ "

# राजयोगी रंगनाथस्वामी निगडीकर यांचा अल्प परिचय

– रंगनाथ वामन टण्णू

काय त्यांचा महिमा वर्णू मी पामर ।
न कळे साचार ब्रह्मादिका ।। तु. म.

रंगनाथस्वामी निगडीकर हे रामदास पंचकातील सतराव्ये शतकात होवून गेलेले प्रसिद्ध साधु होत. समर्थ–रामदासस्वामी, केशवस्वामी आनंदमूर्ती जयरामस्वामी आणि रंगनाथ स्वामी यांचा रामदास पंचकात समावेश होतो. रंगनाथ स्वामींना निगडीकर म्हणण्याचे कारण दुसरे एक पैठणकर रंगनाथ होतें. रंगनाथस्वामी स्वतः राजयोगी साधु, प्रतिभावान् कवि व साक्षात्कारीं सत्पुरुष होते

## जन्म व बालपण–

रंगनाथांच्या पूर्वजांचे मूळ नांव खडके असे होते. ते पूर्वी मोगलाईतील खडकी येथे राहत असत त्यामुळे खडके आडनांव पडले त्यांचे पूर्वज राघोपंत त्यांची शिपाईगिरी व अश्वविद्या नैपुण्य पाहुन लोक त्यांना घोडके म्हणू लागले हल्ली त्यांचे वंशज हेच अडनांव लावतात. राघोपंतांनी नाझरे येथील देशपांडेपणाची वृत्ती बिजापूर सरकारातून संपादन केलीं होती. घोडके हे माध्यंदिन शाखेचे वशिष्ठ गोत्री ब्राम्हण होत.

रंगनाथ स्वामींचा जन्म शके १५३४ मार्गशीर्ष शुद्ध १० रविवार या दिवशी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बोपाजी व आईचे नांव बयाबाई असे होतें. बोपाजी पंतांना फार दिवस पुत्र संतान नव्हते परंतु पुढे कलबुर्गी जवळील श्रीपूर्णानंद स्वामींच्या प्रसादानें त्यांना यादव, रंगनाथ व विठ्ठल असे तीन पुत्र झाले स्वामींना लाहनपणी दांडपट्टा, बोथाटी, तिरंदाजी वगैरे मर्दानी खेळ आवडत.

## व्यासांचे दर्शन व भगवत् साक्षात्कार

रंगनाथ चौदा वर्षांचे झाले. तेव्हां त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्या लग्नाची तयारी केली. मी परंतु " मी लग्न करणार नाही असे त्यांनी निक्षून सांगितले. आई बाप आपले ऐकत नाहीत असे पाहुन त्यांनी घर सोडले. व थेट बद्रिकाश्रमी गेले. तेथे तपाचरण करीत असता त्यांना व्यासो नारायणांनी दर्शन घेवून सांगितलें कीं, " बाळ ! तु घरी जा. कारण तुझी माता पितरे घरी वाट बघत आहेत. जाताना वाटेत 'तेहरी येथील पहाडी राजाची भेट घे. तो तुला एक घोडा व सरंजाम देईल. त्याचा स्विकार कर त्या घोडयाची पावलें ज्या ठिकाणी खडकावर रुतून घोडा अडून राहील तेथेच आश्रम करुन राहा. त्या ठिकाणी तुला भगवद् साक्षात्कार होईल. जड जीवांचा उद्धार कराया तु समर्थ होशील" या प्रमाणें परत येत असता निगडी येथे त्यांचा घोडा ऐका ओढयात खडकावर एकाएकी पाय रुतुन अडला. त्यावेळी व्यासांची सांगितलेंली खूण पटून रंगनाथांनी तेथेच कायमचा मुक्काम केला. त्यांनी आपल्या घोडयाचें नांव 'मनोहर' ठेवलें होते. स्वामींनी तिथे राहून योगसाधनहि केले नंतर स्वदेशी येण्यास निघाले घर सोडल्या पासून तें संन्याशासारखे राहात परंतु तेहरी येथील राजानें त्यांचा अनुग्रह घेवून त्यास घोडा, हत्यारे, व मंदिल इत्यादी अर्पण केलें त्यावेळे पासून मोठ्या थाटानें राहू लागलें महाराष्ट्रात आल्यावर पंढरपूरास आले असता त्यांच्या आई वडिलांनी त्यास ओळखले व नाझरे येथे घरी घेवून आले. कांही दिवसांनी त्यांचे वडील बोपाजी हे निजानंदस्वामी व मुलगा रंगनाथ यांची अनुमती घेवून कृष्णा कोयना संगमावर आले व त्यांनी तेथील पवित्र जलप्रवाहात जलसमाधी घेतली ही घटना शके १५६४ मार्गशीर्ष वद्य ३० यां दिवशी घडली.

## ग्रंथ लेखन

समर्थांचे वेळी सज्जनगडावर रामनवमीच्या मोठा उत्सव होत असे. त्यात इतर संता बरोबर रंगनाथांचीहि कीर्तने होत असत. त्यासंबंधानें उद्धव सूत म्हणतात.

यावरी रंगलास्वामी कीर्तनासी । उभे ठाकले सद्भावेंसी ।
त्या कीर्तनाची महिमा कैसी । सांगीजे आता ।।१।।
ऐसे रंगाबा स्वामीचे कीर्तन । जाले परम समाधान ।
धन्य धन्य साधू सज्जन । गुण वर्णिता तयाचे ।।१।।

प्रसिद्ध मराठी कवि श्रीधरस्वामी नाझरेकर यांचें तीर्थरुप ब्रह्मानंद हें रंगनाथस्वामींचे चुलतबंध होत. रंगनाथांचा उल्लेख श्रीधरस्वामींनी आपल्या ग्रंथात दोन ठिकाणी केला आहे.

'ब्रह्मानंदस्वामींचा बंधू सत्य । नाम तयाचे रंगनाथ ।
ज्याची कविता समस्त । अपार जन उद्धरले ।।
रामविजय अ. १ ला

रंगनाथस्वामी मोठे पंडित कवि होते. त्यांची पदे गीता व उपनिषदे यातील रहस्यांनी भरलेला आहेत त्यांची वाणी फार प्रासादिक व अधिकार युक्त अशी आहे. त्यांनी गुरुगीता, रामजन्म, गजेंद्रमोक्ष, स्वरुप, साधने सुदाम चरित्र, शुकरंभासंवाद, पंचीकरण, मिथ्यामाया स्वरुप, एकाखडी अंभंगा, बद्धमोक्ष विवरण, स्फूट पदे, अष्टके अशी प्रकरणें लिहिली आहेत, या शिवाय बृहद्वाक्यवृत्ती भानुदास चरित्र, योगवासिष्ठ हे ग्रंथ रचले आहेत.

रंगनाथांनी आपल्या ग्रंथात गुरुभक्तिचा महिमा खालिल प्रमाणें वर्णिला आहे.

गुरुकृपा प्रसादे । निजात्म दर्शन स्वानंदे ।
पावोनिया पुर्ण पदे । पेलती दोंदे मुक्तीसी ।।
आब्रह्मस्तंभ पर्यंत । स्थावर जंगमादि पंचभूते ।
सच्चिदानंदघ अव्यक्त । अच्युतानंत सद्‌गुरु ।।
परात्परतर ध्यान । नित्यानंद सनातन ।
हृदयी सिंहासनी बैसवू । चित्ती चिंतन करावे ।।

रंगनाथांचे रामजन्म काव्य बरेच मोठे असून वाचण्यासारखे आहे. सुदामचरित्रात स्वामी द्वारकेचे व श्रीकृष्णाचे वर्णन खालिल प्रमाणें करतात.

रत्नखचित सुवर्ण शिखरे । वरी नाचती हंस मयोरे ।
कोकिळा कूजती पंचमस्वरे । गगनी गोपुरे झळकती ।।
दिव्य पताका फडकती । गुढीया तोरणें शोभती ।
वेद बंदीजन गर्जती । वाखाणिती कृष्ण माहिमा ।।
चित्र विचित्र मंडप । ठायी ठायी रत्नदीप ।
रविकिरण देती ओप । तेज अमूप प्रकाश ।।
कुंकुम केशर चंदन सडे । परिमळ उधळती चहुकडे ।
गंधर्व गायन इडे पाड । सुस्वर पवाडे गर्जती ।।
नाना वाद्याचिये ध्वनी । अमर बैसुनी विमानी ।
वर्षताती दिव्य सुमनें । घोष गगनी न समाये ।।
वृक्ष लाविन्नले अमृत फळी । सरोवरे भरली शीतळ जळी ।
वसंत फिरे महिमंडळी । सुवर्ण कमळे सुगंध ।

## श्रीनिजानंद रंगनाथ स्वामींच्या निर्याण समयी तुका विप्र याने केलेला अभंग

नमियेंली निजरंग माऊली समाधिया निगडी ।।ध्रृ.।।
भक्ती भावार्थें विचरोनि संकीर्तन रंगून प्रेमे नाचतसे ।
निजध्यानी सर्वार्थ नमूनि केला देव घडीं ।।१।। नमियेंली
केला सर्वांचा उद्धार उद्धरलें सर्वस्व झाला अवतार ।
नरदेह सर्वोत्तम हे सर्व उभविली देहगुडि ।।२।।नमियेली
मार्गेश्वर या विभूति मासांतिर तिथि ।
कृष्ण दशमीसि सक्तितं पूर्णत्वे पुण्य तिथि उभविली-
देह गडी ।।३।।
तुका विप्र या सत्संगे ऐकूनि कितंनरंगे ।
उभा नाचतसे कलियुगी, नमूनि संतयोगी
धन्य होय घडी ।।४।।

श्रीद्वारकेचे वर्णन । करिता शिणला चतुरानन ।
तेथ मंदमती हीन दीन । काय महिमा अनुवादे ? ।।

संत तुकाराममहाराज सदेह वैकुंठास गेले. त्यावर ज्या लोकांचा विश्वास नाही. त्यांनी रंगनाथाच्या पुढील पदाचा अवश्य विचार करावा.

जड देहा धऊनीं वाणी गेला ती ऐका वाणी ।।ध्रृ०।।
घट फोडुनि जनकादिक ते अनुभविते झाले माती ।
हा नोहे तुकया तैसा घट राखूनी धरिला चित्ती ।।१।।
इतर ते वारुनी दुग्धा परिणामक घेतीं पाणी ।
हा नोहे तुकया तैसा पयं राखूनी चाखी लोणी ।।२।।
इतर तें फोडूनी कोहं मग चाखियला सोहं ।
हा नोहे तुकया तैसा चच्छेद्य पचविला कोहं ।।३।।
इतरे त्या मिश्रपुटाते देउनिया जड टाकियलें ।
तो नोहे तुकया तैसा परिसाने हेमची केले ।।४।।
जडबुद्धि अहं या देहा निजस्वरुपी वाहुनी गेला
निजरंगी रंग पहाया रंगाने निश्चय केला ।।५।।
या बोला साराची कथितो दिसणें तें हाचि जन्म ।
अदृश्य मरण योग्यांचे निजरंगी अघटित धर्म ।।६।।

### गुरुपरंपरा –

रंगनाथांची रामदास स्वामींचे ठिकाणी फार पूज्य बुद्धी असे. परंतु त्यांची गुरुपरंपरा ह्या प्रमाणें आहें.

श्रीविष्णु–विधि–अत्री–दत्त–सदानंद–रामानंद–अनलानंद-अभिरानंद–ब्रह्मानंद-सहजानंद-पूर्णानंद-निजानंद रंगनाथ.

## अलौकिक सामर्थ्य–

१) रंगनाथ स्वामींस कोठेहि जावयाचे असलें तरी तें आपल्या निळया घोड्यावर बसुन कमरेला तलवार व बरोबर लंगोटबंद शिष्य समुदाय अशा थाटाने जात असत शिवाजी महाराज प्रथम त्यांच्या भेटीस आले. त्यावेळी तें भगवी वस्त्रे परिधान करुन पलंगावर पहुडले होते.

तव स्वामींनी भोजन सारुन । तांबूल भक्षिला असे जाण ।
मंचकावरी केले शयन । पद संवाहन करितसे ॥
उभयता शिष्यिणी दोघीजनी ।
'भागम्मा' 'चंदम्मा' लावण्य खाणी ।
पाय रगडितीं प्रीती करोनी ।
जन्मांतरीच्या मेदिनी अप्सरा त्या ॥

असा स्वामींचा विलक्षण थाट पाहून महाराज फार विस्मित झाले. तेंव्हां स्वामींनी जरी आपण हे उपभोग भोगतो तरी त्यांनी आपण बद्ध झालेली नाही. अशी महाराजांची खात्रीं करुन दिली. ही अख्यायिका अशी आहे की, आपले बाह्याचरण पाहून छत्रपतीच्या मनांत विपर्यास उत्पन्न झाला आहे. हे रंगनाथांनी अंतर्ज्ञानाने जाणले व व त्यास एकांतात बोलावून नेंले. नंतर एक मोठे घंगाळे आणवून स्वामींनी योगबलाने त्यात वीर्यस्खलन केंलें, त्यानें सगळे घंगाळे भरुन गेलें नंतर एका काडीने त्यातला एक थेंब घेऊन महाराजांच्या हातावर ठेवला, त्याबरोबर तेथे फोड उठला ! तेव्हा स्वामी म्हणालें " बाबा ! पहा अरे! हे ब्रह्म रेत आहे. हा प्रत्यक्ष अग्निच होय त्यास जिकून आम्ही स्वाधीन करुन ठेवलें आहे आम्ही उर्ध्वरेते आहोत हे अज्ञ जनास कळत नाही. आता चमत्कार पहा ! असे म्हणून स्वामींनी पुन्हा ते सर्व रेत गुह्येन्द्रियद्वारेच आकर्षण करुन घेतले हा चमत्कार पाहून छत्रपतींचा संशय दूर झाला.

२) एकदा समर्थ आणि रंगनाथ स्वामी बरोबर असताना समर्थांच्या खुणेंवरुन रंगनाथ स्वामींनी गलोलाने घार खाली पाडली. जवळपास ब्राह्मण मंडळी होती. त्यांनी गहजब करुन त्या हत्तेबद्दल या दोन्ही गोसाव्यास सक्षौर प्रायश्चित्त दिलें. समर्थांनी मुकाट्याने सर्व पत्करुन "आता घारीच्या हत्येचे पातक गेले मग घार कां उठत नाही "? असा प्रश्न केला समर्थ म्हणाले की " पातकाचा नाश झाल्यावर घार उठली पाहिजे. परंतु ती उठत नाही म्हणजे हत्या नाहीशी करण्याचें सामर्थ्य प्रायश्चित्त नाही. तर तुम्हीं आम्हाला निष्कारण क्षीण दिला."

तेव्हा ब्राह्मण दीन झाले. त्यांनी आपली चुक कबुल केली मग समर्थांनी रंगनाथ स्वामीस खूण करुन घार उठविण्यास सांगितले. त्याप्रमाणें रंगनाथ स्वामींनी घारी वरुन हात फिरविला व आकाशात उडवून दिली त्याबरोबर घार जिवंत होउन निघून गेली.

रंगनाथ स्वामी आपलें वयाचे ७२ वे वर्षी शके १६०६ रक्ताक्षी संवत्सरी मार्गशिर्ष वद्य १० मीस प्रातःकाली समाधिस्त झालें.

## संत संगतीत सर्वांचा उद्धार होतो·

जीवाचा उद्धार करण्याचे बाबतीत देवाजवळ कृपणता दिसून येते. पण संत हे परम उदार असतात. देव गीतेत म्हणतात.

ये यथा मां प्रपद्यते तांस्तथैव भजाम्यहम् ॥
(भ गीता ४–११)

जे मला ज्या प्रकारे भजतात त्यांना मी त्या प्रकारचे फळ देतो. संतापाशीं मात्र कोणी ही आणि कोणत्याही भावनेनें गेला किंवा द्वेषाने कोणी त्याचां छळ केला तरी ते त्याचे गुणदोष बघता उद्धारच करतात

गुणदोष याती न विचारी काही ।
ठाव दिला पायी आपुलिया ॥
हो का दुराचारी विषयी आसक्त ।
संतकृपे त्वरीत उद्धरतो ॥
खट नट यावे शुद्ध होवोनि जावे ।
दवंडी पिटी भावे चोखामेळा ॥

नाथ महाराजांचें अंगावर थुंकणारा यवन, तुकोबास क्रोधाने काठी घेऊन मारणारा मंबाजी, मुक्ताबाईचे तोंडात मारणारा विसोबा, डोक्यात कुऱ्हाड घालून नारदाला ठार करु पाहणारा वाल्ह्या कोळी या सर्वांवर संतांनी कृपादृष्टी करुन त्यांचा उद्धार केला म्हणून म्हटलें आहे.

साधुसंत मायबाप जे का दयेचे सागर ।
कृपा कटाक्षे न्याहळीलें । आपुले पदी बैसविले ।

कस्तुरीच्या संगतीनें मातीस सुवास लागतो, दोरा फुलाबरोबर देवाचे गळ्यात स्थान मिळवितो. चंदनाचे सुवासाने बोरी बाभळी सुगंधीत होतात. तसे संत संगतीत सामान्य जीव ब्रह्मपदास जाऊन पोहोचतो.

संताने सरता केलो तैशा परी ।
चंदनानें वोरी व्यापियेल्या ॥

परिस लोखंडाचे सोनें करतो पण आपल्या सारखे परिस करित नाही ' आपुल्या महिमानें । धातू परिसे केले सोनें ' संत मात्र तात्काळ जीवास आपल्या सारखे आनंदरुप करतात.

आपणा सारिखे करिती तात्काळ ।
नाही काळ वेळ तयालागी ॥

मुकुंद राजानें जयत्पाळ राजास केंवळहस्तस्पर्श करुन ब्रह्मदर्शन दिले व कृतार्थ केलें श्रीमदाद्य शंकराचार्यांनी हस्तामलकाचे मस्तकावर हात ठेवताच तो ब्रह्मस्थिती पावला. नाथांनी गावबाचे जिभेवर ' राम ' अशी अक्षरे लिहताच तो नाथांचे योग्यतेस जडला व त्याने भावार्थ रामायण पुरे केले.

रविदीप हिरा दाविती देखणें ।
अदृष्य दर्शने सताचिया ॥१॥
काय त्यांचा महिमा वर्णु मी पामर ।
न कळे साचार ब्रह्मादिका ॥२॥
तापली चंदन निववितो कुडी ।
त्रिगुण तो काढी संत संग ॥३॥
मायबाप पिंड पाळीयेला माया ।
जन्ममरण जाया संतसंग ॥४॥
संताच्या वचनें वारी जन्म दुःख ।
मिष्टान्न ते भूक निवारण ॥५॥
तुका म्हणें जवळी न पाचारिता जावे ।
संत चरणी भावे रिघावया ॥६॥

**श्रीरंगनाथ पदे –**

माझे कुळीचा स्वतंत्र ।
राम निजमूर्ति षडाक्षरी मंत्र ॥धृ॥
सर्व साधनाचे सार ।
राम निजमूर्ति हा उच्चार ॥ १ ॥
योग याग तपे तपती ।
आम्हा येण्याची कैवल्य प्राप्ति ॥ २ ॥
वंशी न करी जो जतन ।
त्यासि घडेल जाणा पतन ॥ ३ ॥
धरिता स्मरणाचा छंद ।
रंगी रंगला निजानंद ॥ ४ ॥


With Best Compliments From

86340
Resi : 86530

SPECIALITY IN SOUTH INDIAN DISHES & PERMIT ROOM
SEFF CONTAINED ROOMS

HOTEL
PAVAN

SANJIVA SHETTY
Nasik Road - 422101

# राजयोगी संत रंगनाथस्वामी निगडीकर

– ना. वि. बडवे

सर्व साधारण लोकांची अशी समजूत असते की, साधु किंवा संत हा अकिंचन, दरिद्री आंगावरील कपडे फाटके तुटकें असा असणारा, कसा तरी उदर निर्वाह करणारा असा जो साधु समजण्यात येतो. त्याचे कारण बहूजन समाजाची दृष्टी बहिरंगावर असते पण साधुत्व हे बहिरंगावर नसून ते त्याच्या अंतरंगातील वैराग्यावरुन असतें हे अंतरंग न जाणणाऱ्या विषयी जीवास कळणें कठीण असल्याने ते केवळ बहिरंगावरुन साधुत्वाची कल्पना करुन घेतात. व बहुतेक संत साधु बाह्य आचारात सर्व साधारण लोका सारखेच राहतात. आपल्या महाराष्ट्र संतामध्ये ज्ञानेश्वरापासून ते रामदास स्वामी पर्यंत साधारण माणसा प्रमाणेंच त्यांची बहिरंग स्थिती होती. बहुतेक बहिरंग परिस्थितीत दरिद्रीच होते. नाही म्हणायला एकनाथ महाराजांचे प्रारब्ध ऐश्वर्ययुक्त होते. पण प्रारब्धाने ऐश्वर्य युक्त भोगतालची परिस्थती असता त्या विषयात आसक्त न होता दृढवैराग्य बळावर, केवळ साक्षीभूतत्वाने भोगणें ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. ती नाथमहाराजांनी आपल्या दृढवैराग्याने करुन दाखविली आहे. अशी उदाहरणें फार क्वचित सापडतात. त्यापैकी दासपंचायतनातील श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर यांचे प्रसिद्ध असे उदाहरण आहे. त्या करिता त्यांच्या चरित्राचा थोडक्यात आढावा घेणेंचे या लेखात ठरविले आहे.

## पूर्ववृत्त–

रंगनाथ स्वामी वसिष्ठगोत्री माध्यंदिन ब्राह्मण त्यांचे वडिलांचे नांव गोपाळपंत उर्फ बापोजीपंत व आईचे नांव बयाबाई बापोजीपंताचे त्रिपणजोबा राघोपंत खडके हे बीड आंती चौसाळच्या जवळील खडकीचे राहणारे तेथील देशमुखी व कुलकर्णी त्यांचे घराण्याकडे असे. हे पशुरोग चिकित्सेत निष्णात होते विजापूर बादशहाचा आवडता घोडा आजारी झाला असता यांनी बरा केला म्हणून नाझरे गांवचे देशपांडेपण, कुलकर्णीपण, सरंजामी इनामी जमीन, कांही विशेष अधिकार व एक उमदा अरबी घोडा बक्षीस देउन त्यांना रवाना केले होते. ही पंधराव्या शतकातील गोष्ट आहे. पुढे ते नाझऱ्याचे वतनावर म्हणून तेथे राहण्यास गेले.

## गुरपरंपरा–

गुलबर्ग्याजवळ कल्याणी मठ नांवाचा दत्त संप्रदायी मठ आहे. तेथे पैठणकर एकनाथमहाराजांचे वेळी सहजानंद नांवाचे सत्पुरुष होते त्यांनी आपला पट्टशिष्य पूर्णानंदास तीर्थयात्रेचे निमित्तानें जगदुद्धार करण्यास पाठविले ते यात्रा करीत असता नाझऱ्यास स्थिरावलें. तेथे बापोजीपंत व त्यांचे कुटुंब बयाबाई यानी त्यांची फार सेवा केल्यावरुन त्यांना बरेच वर्षे संतती नसल्यानें, प्रसन्न होऊन त्यांच्या कृपाप्रसादानें त्याना ओळीने तीन मुलगे झाले. त्यापैकी मधला मुलगा रंगनाथ हा होय.

तो लहानपणा पासून विरक्त होता. तो मोठा झाल्यावर त्याचे लग्नाचा विचार चालू असता, रंगनाथ नको म्हणत असता, त्याचें म्हणणें ऐकण्यास त्याचे आई-बाप तयार नव्हते. तेव्हां रंगनाथाने गृहत्याग केला व हिमालयात बद्रीनाथास जाऊन तेथे एका गुंफेत राहून तीन महिने तपश्चर्या केली. आणि त्यानंतर योगयुक्त गायित्री पुरश्चरण त्यानी बारावर्षे गुरुच्या स्वआदेशा प्रमाणें केले. या त्यांच्या साधनेने भगवंताचे साक्षात दर्शन त्यांना झाले. देवानी आज्ञा केल्यावरुन जाताना टेहरीच्या राजास कृतार्थ करुन पुढे गेलें. तो राजा जे देईल ते स्विकारुन पुढे जावे व पुढे जेथे घोड्याचा पाय रुतेल त्या ठिकाणी ती जागा बद्रिकाश्रम समान मानून तेथे निवास करावा असा आदेश मिळाला. टेहरीच्या पहाडी राजाकडून भरजरी पोषाख, सुन्दर निळा घोडा, लवाजमा, द्रव्य वगैरे मिळाले द्रव्याचा दानधर्म करण्यास राजाला सांगून, बाकी लवजमा घेऊन दक्षिणेंस निघाले. त्यांना आदेश मिळाल्यावरुन तें पंढरपूरास आले तेथे श्रीविठ्ठलाचे दर्शन घेउन कीर्तनसेवा करण्याची विनंती केल्यावरुन रात्री कीर्तनाचे वेळी त्यांचे आई बापांची भेट झाली. नंतर आई बापासह नाझऱ्यास येऊन मावंदे केले. पुढे रंगनाथ स्वामीचे वडिलांनी म्हणजे बापोजीपंतानी कल्याणास जाऊन पूर्णानंदाकडून संन्यास दिक्षा घेतली म्हणून रंगनाथ स्वामीचे पद्यांती ' सहज, पूर्ण, निज, रंग '

अशी ओळ असते. म्हणजे पणजे गुरु सहजानंद, आजे पूर्णानंद व आत्मगुरु निजानंद ( बापोजी पंताचे संन्यास दीक्षे नंतरचे नांव) या गुरुपरंपरेचा उल्लेख येतो.

रंगनाथ स्वामी सरदारी थाटात राहात. पोषाख भगव्या रंगाचा पण रेशमी किंवा भरजरी वस्त्राचा असे. डोक्यास मंदील, हाताचे बोटात अंगठ्या, लवाजमा बसण्यास उमदा घोडा, असा थाट असे.

रंगनाथ स्वामीस समर्थ रामदास स्वामीची माहिती व भेट नव्हती. पण एकदा रंगनाथ स्वामी घोड्यावर रानातून चालले असता समर्थांची भेट झाली व लगेच घोड्यावरुन उतरुन समर्थांना त्यांनी नमस्कार केला. एकमेकांना एकमेकास अंतर्ज्ञानांनी ओळखिले. त्यापासून एकमेकाकडे येणें सुरु झाले. समर्थांनी त्यांना त्याच्या ऐश्वर्ययुक्त वागण्या बद्दल नापसंती युक्त प्रश्न केला असता रंगनाथ स्वामीनी त्याचा खुलासा केला. ते म्हणाले

‘ ब्रह्मीभूत होती ब्रह्मार्पण द्वारे ।
कर्ता कार्य कारण तेही सरे ।।
ज्ञानकाली संचित दग्ध झाले ।
अहं त्यागे क्रियमाण सर्वगेले ।
देह प्रारब्ध निश्चये भोगा आले ।
आंगी नातळे त्रिविध बोधबळे ।। ’

या वरुन आत्मज्ञान होताक्षणी संचित कर्म दग्ध होते आणि अहंतेच्या त्यागानें क्रियमाण जाते, व प्रारब्ध असेल ते भोगावयास येते पण आत्मशास्त्र व गुरुप्रचितीच्या जोरावर प्रारब्ध त्या भक्ताला स्पर्श करुं शकत नाही.

रंगनाथ स्वामींनी या आपल्या वैभवयुक्त आचारा बद्दल केलेला खुलासा समर्थांनी एकून ते म्हणाले ‘ मला पक्के ठाउक आहे की तुम्ही निजरूप निजांगे झालेले आहात जे बोलाल ते सर्व मान्य आणि जे कराल तें विद्ययुक्त इतका तुमचा अधिकार असला तरी मला असे वाटते की– वैभवादि विषयाकडे लोकांची साहजिकच धाव असतें. त्यांना विषय भोगच हवे असतात. आणि आपणहि त्याना आपल्या आचरणानें तोच विषय सेवनाचा मार्ग दाखविला तर त्यांचा उद्धार कसा व्हावा ? म्हणून आपल्या सारख्या ज्ञात्याना “ आधी ते करावे कर्म कर्ममार्गे उपासना । उपासका सापडे ज्ञान ज्ञाने मोक्षची पावणें हा राजमार्ग लोकापुढे ठेवणें बरे ” त्यावर रंगनाथ स्वामीनी समर्थाचें म्हणणें अगदी मान्य केले. पण प्रारब्धानें पुर्वव्रत थाट चाललेला होता. पुन्हा समर्थांची भेट झाली असता त्यांनी रंगनाथ स्वामीस वैभव त्यागाची जाणीव दिली असता ‘ प्रारब्धातच राजयोग असेल तर आत्मज्ञान तेथे काय कमी करील ? ’ असे रंगनाथ स्वामी म्हणाले ‘ प्रारब्धाचे आड दडायचें हीच तर तुम्हा लोकांची युक्ती । ’ ‘ पण ज्ञानीयासी भोग । तोचि भवरोग । नव्हे राजयोग विटंबना ।। ’ असे म्हणून समर्थांनी रंगनाथ स्वामीस अंगावरचा पोषाख काढावयास सांगितले त्यावर रंगनाथ स्मामीनी अंगावरचा पोषाख काढून दिला. समर्थांनी त्याचे गाठोडे बांधून शेजारील गांवी भिक्षेला जाऊन येतो असे सांगून आम्ही परत येई पर्यन्त येथून जाऊ नयें असे बजावले, व ते गाठोडे बरोबर घेऊन गेलें. रंगनाथ स्वामी फक्त लंगोटी घालून ध्यानस्थ बसलें असता रंगनाथ स्वामींचा एक सरदार शिष्य त्या माळावरुन सातार्‍याकडे जात होता. त्यानें या स्थितीत स्वामीस पाहून नवीन वस्त्रे वगैरे सरंजाम, राहूट्या तंबू तेथे उभारल्या व त्या प्रमाणें पूर्ववत् थाट सुरु झाला. समर्थ परत येऊन पाहतात तो रंगनाथ स्वामी दिसेनात. तेव्हां ते पळून गेले असावेत अशी समजूत होऊन या उभारलेल्या तंबूत त्यांचीं चौकशी करावी म्हणून गाठोडे घेऊन शिष्यासह तंबूकडे आले असता रंगनाथ स्वामींनी माणसे पाठवून समर्थांना तंबूत आणलें जेवणखाण झाल्यावर समर्थ रंगनाथ स्वामीस म्हणाले ‘रंगनाथ स्वामी ! बरीच आगची मजा केलीत ! ’ त्यावर रंगनाथ स्वामी म्हणाले महाराज ! मी कांही केले नाही मी आपल्या आज्ञे प्रमाणें येथे राम नाम घेत बसलो. पण हे सरदार कुठून आलें व कुठे चालले होतें याची मीं अद्यापहि चौकशीं केलीं नाही येथे आता पर्यंत जे कांही घडले त्यातील अमुक करा वा करु नका असेहि मी कोणास सांगितलें नाही. फक्त श्रीरामास नैवेद्य समर्थ झाल्यानंतर वाढा एव्हढे बोललो बाकी सगळ्या गोष्टी अनिच्छा प्रारब्धानें घडल्या त्या केवळ साक्षी रुपाने मी आपल्या आज्ञेस्तव पाहिल्या यापेक्षा कशात कांही माझा संबंध नाही. हे खरे की खोटे हे आपण हृदयस्थ असल्याने जाणु शकता ! त्यावर समर्थ म्हणाले ‘ रंगोबा तुझी अंतर्बाह्य स्थिती मला माहित आहे. पण हे सगळे बहिर्मुख लोक तुझी दिव्य अंतर्निष्ठा न ओळखता बाहेरिल थाटामाटामुळे तुझी अवहेलना तरी करितात अथवा तो थाट हेच लोकात मिरविण्याचें मुख्य साधन समजून त्या बहिरंगाचेच केवळ अनुकरण करितात.

‘ भोगेच्छा विषयिक । तें जो त्यागी सकळीक ।
प्रारब्ध प्राप्त होता देख । तेथूनी निष्टक मन काढी ।।

हे विषय भोगातून मनास अलिप्त करण्याचें साधु वर्म ओळखतो कोण ? त्यावेळी भोवताली असलेल्या

मंडळीस उद्देशून समर्थ म्हणाले ' कळलेंना तुम्हा सगळयाना वैराग्याचे वर्म ? रंगनाथ स्वामी सारखे दृढतम अंतर्वैराग्य आणि बाह्यविषय भोगाचे बलवत्तर प्रारब्ध असा संयोग फारच क्वचित आढळतो. हाअपवादच आहें अंत:करणातील अनुभव, वैराग्य नी विवेक हे बाह्यवेषावरुन समजून येत नाहीत म्हणून साधु म्हटला की आपण त्यांना वंदन करावे बाह्य वेषाकडे पाहू नये. नाही तर रंगनाथ स्वामी सारख्या झाकलेल्या रत्नाचा आपल्या हातून अपमान व्हावयाचा ?

वरील प्रमाणें संत रंगनाथ स्वामी महाराजांच्या चरित्राचा थोडक्यात मागोवा घेतला आहें. हे रंगनाथ स्वामीचे श्रेष्ठ वैराग्याचे उदाहरण दत्त संप्रदायातील साधूंचें आहें. प्रारब्धानें प्राप्त झालेल्या कनिष्ठ बहिरंग परिस्थितीत वैराग्य राखणें फारसे अवघड जात नाही.कारण बहिरंग परिस्थिती सर्व बाजूनी कनिष्टच असते. पण प्रारब्धाने भोवतालची परिस्थिती अनुकूल असता नव्हें बहिरंगात विषयी वस्तुने भरली असता त्यात तिळमात्रही आसक्त नव्हता साक्षीत्वाने भोग घेणें हे वैराग्य अतिदृढतम होय हे निश्चित ! आणि ही प्रचिती रंगनाथ स्वामींनी आपल्या दृढतम वैराग्याचे उदाहरणावरुन पारमार्थिक लोकापुढे ठेविली आहें. त्याच प्रमाणें आपलें वारकरी संप्रदायातील श्रीएकनाथमहाराजांचे श्रेष्ठ असे दृढतम वैराग्याचें उदाहरण आहे. त्यांना लौकिक दृष्टिने सर्व बहिरंग परिस्थिती सर्व बाजूने अनुकूल असता आपल्या दृढतम वैराग्यास किंचितही बाध आणला नाही. त्यांनी आपल्या आचरणाने जनास हच उपदेशकेला की, संसारात आसक्त न होता ज्या प्रमाणें प्रारब्ध भोग प्राप्त झाला असेल तो साक्षीभूतपणें भोगावा. एकाभारुडात ते लिहितात ' सांगते तुम्हा वेगळे निघा । वेगळे निघून संसार बघा ।।' आणि हाच उपदेश स्पष्टार्थाने सांगतात की, संसारात आल्यावर माणसानी कसे राहावे.

' पक्षी अंगणांत आलें । चारा चरुनिया गेले ।।
तैसे असावे संसारी । जोवरी प्राचीनाची दोरी ।।
(ए. गा.)

त्याप्रमाणें संत तुकोबारायाचा हाच बोध जीवाकरता आहे ते म्हणतात धनलाभ, मानमरातब हे प्रारब्धाने मिळालेले असतात त्याकरिता जीवानें धडपड निष्कारण करुन काय उपयोग ?

' प्रारब्धेंचि जोडे धन प्रारब्धेंचि वाढे मान ।।
सोस करिसी का वाया । भज मना पंढरी राया ।।
(तु. गा.)

म्हणून संसारात धडपड न करता पंढरीरायाचे चिंतन करावे आणि हीच भक्ती देवाला आवडतें असे मोठ्या कळवळयाने जीवास बोध देतात.

हेचि थोर भक्ती आवडते देवा ।
संकल्पावी माया संसाराची ।।
ठेविले अनंते तैसेचि राहावे ।
चित्ती असो द्यावे समाधान ।।
वहिल्या उद्वेग दुःखचि केवळ ।
भोगणें ते फळ संचिताचे ।।
तुका म्हणें घालू तयावरी भार ।
वाहू हा संसार देवा पायी ।। (तु. गा.)

या करिता रंगनाथ स्वामी सारख्या संताची चरित्रे ही अंधारमय संसारात पडलेल्या जीवास प्रकाश देउन सुखाची वाट दाखविणारी आहेत स्वामीच्या चरणी शतशः प्रणाम ! हरि: ॐ सत्सत्


卐 श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा 卐

**आंधळगांव विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि.**

ता. मंगळवेढा जि. सोलापूर

रजि. नं १८६२१ र. ता. २२ । ८ । १९५०

शेअर भांडवल– १८१६७० सभासद संख्या ६५४ येणें कर्ज ७९८२५०

सोसायटीने हाती घेतलेले व्यवहार– १) स्वस्त धान्य दुकान २) ग्राहक वस्तू भांडार

**रामचंद्र चंदाण्णा कोरे**
सचिव

**दत्तात्रय बापूराव भाकरे**
चेअरमन

# ' समर्थ पंचायतन वारकरी संप्रदायाचे एक अंग '

**– विठ्ठलबोवा घुले**

भारत हा एकच देश असा आहे की ज्यात अनेक धर्मांचे, अनेक पंथाचे, अनेक संप्रदायाचे व अनेक जाती जमातीचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदु शकतात अर्थात प्रत्येकांची ध्येय धोरणें भिन्न भिन्न असू शकतील. त्यामुळे वादविवाद झाल्याचे इतीहास सांगतो. तथापि तो वाद तात्विक स्वरुपाचा नसून औपचारिक ठरतो व ठरल्याचे अनेक दाखले आहेत किंबहुना त्यावादामुळे चांगलेंहि निष्पन्न झाल्याचे वाचण्यात आहे. उदाहरण म्हणून एकदोन दाखलें देता येतील श्रीमत् शंकराचार्य व मंडण मिश्र, बौद्ध व शंकराचार्य याचा वाद झाल्याचा बळकट पुरावा आहें. परंतु त्यातुन वाईट असे कांही झालेच नाही. उलट पक्षा अद्वैताचा पाया भक्कम असल्याचे आढळून आले श्रीमत् शंकराचार्यांनी फार मोठी क्रांती केली नास्तिकाचा द्वैत्यांचा धुवा उडविला जवळ जवळ त्यांना नामशेष केलें. व अद्वैतांचा झेंडा ऊंच आकाशात फडकविला. त्या साठी ते अवतीर्ण झाले होते शंकराचार्य म्हणजे शंकराचा अवतार असे समजले जाते.

> 'शंकरं शंकराचार्य केशवं बादारायणम् ।
> सूत्र भाष्य कृतौवंदे भगवंतो पुनः पुनः' ॥

आपल्या हयातीतच त्यांनी पद्मपाद, हस्तामलक, त्रोटकाचार्य, सुरेश्वराचार्य इत्यादी अनेक अधिकारी व्यक्ति निर्माण केल्या. आणि हा अद्वैत संप्रदाय वाढीस लागला अनेक ग्रंथ निर्मिती केली त्याकरवी अद्वैताला बळकटी आणली आसेतु हिमालयापर्यंत यांचे अनुयायी झाले. आज आहोत व पुढेहि राहणारच आहेत याच अद्वैताच्या भक्कम पायावर भगवत ऊर्फ वारकरी संप्रदायाची अभंग इमारत ऊभी आहे या इमारतीचें अध्वर्यु आहेत श्री ज्ञानोबराय, श्री नामदेवराय व त्यांचे सांगाती. त्याच्या नंतर श्री एकनाथ महाराज त्या नंतर श्री तुकोबाराय, व त्यांचें शिष्य श्री निळोबाराय प्रभृति चवदा टाळकरी तसेच समर्थपंचायतनातील श्री समर्थ रामदासस्वामी श्री जयरामस्वामी श्रीरंगनाथस्वामी, श्री केशवस्वामी, व आनंदमूर्ती आणि त्याच काळात अवतीर्ण झालेलें गो ब्राह्मण प्रतिपालक, व हिंदुधर्मांचे कट्टर स्वाभिमानी, जे श्री रामदास स्वामींना गुरुस्थानी मानित असत. तसेच श्री तुकोबारायानी देखील मानाचा मुजरा देत असत. इतकेच नव्हे तर त्यांच्या कीर्तनाला जातीनें हजर असत असे श्री शिवाजीराजे ज्यांनी हिंदु धर्मावर होणाऱ्या हल्याचा प्राणपणाला लावून पराभव केला व हिंदु धर्माचें रक्षण केले त्या शिवाजी राजांचा वरील इमारतीशी संबंध जोडल्यास वावगे होणार नाही. याबाबतीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे असे म्हणावे लागेल.

नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, चैतन्य संप्रदाय, व समर्थ संप्रदाय असे चार संप्रदाय आज जीवंत आहेत. त्याला जीवंत ठवण्याचे त्या त्या पंथाची मंडळी कार्यक्षम आहेत नाथपंथाचे श्री ज्ञानोबाराय, दत्त संप्रदायाचे श्री एकनाथ महाराज, चैतन्य संप्रदायाचे श्रीतुकोबाराया व समर्थ संप्रदायाचे श्रीरामदासस्वामी आणि त्यांचे अनुयायी संप्रदायाच्या नांवावरुन जरी भेद वाटत असला तरी सर्वांचे साध्य मात्र एकच सर्वांचें उपास्यहि एकच त्या उपास्या पर्यंत नेंणारा मार्ग म्हणज साधनहि एकच, आधिकार परत्वे साधनात विभिन्नता जरी वाटत असली तरी साध्यात मात्र भेद कल्पिलेला नाही साधनातील भेद हा खरा भेद नाही कर्म, उपासना, ज्ञान, हे त्या साध्याकडे नेंणारे टप्पे अथवा कक्षा आहेत निष्काम कर्माने मलदोष म्हणजे पाप जाते. निष्काम उपासनेनें विक्षेप म्हणजे मनातील रजोगुण जातो अंतःकरण शुद्धिद्वारा ज्ञान होऊन त्या ज्ञानाने अज्ञान जाऊन जीव मोक्षाप्रत जातो. म्हणजेच कृतार्थ होता. हे ध्येय सर्वांनी संपादन करावे म्हणून वरील सर्व संप्रदायातील मंडळीनी जीवाचे रान केले जगाचा शिव्याशाप घेतला. अनेंक खस्ता खाल्या हेतु एक की जगाचे हित व्हावे.

हिताचे दोन प्रकार आहेत. एक प्रेयहित व एक श्रेयहित म्हणजे इंद्रियाला जे गोड लागते ते प्रेयहित यात जीवाचा अत्यंतिक नाश आहे. विषय भोगल्याने जीवाचे कल्याण होणार नाही

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एवते ।
आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः । गीता अ. ५

या श्लोकावरील ज्ञानेश भाष्य वाचण्या सारखे आहे 'बुधः' म्हणजे ज्ञानी, शहाणी माणसे या क्षुद्रभोगात कधीच रममाण होत नाहीत. भगवान म्हणतात अर्जुना तू असे करकीयात कधीच अडकू नकोस

'या कारणे गा सुभटा । हा विचारिता विषय ।
तू झणें कही या वाटा । विसरोनि जाशी ।
पैं याते विरक्त पुरुष । त्यजतिका जैसे विष ।
निराशा तया दुःख । दाविले नावड ॥ ज्ञा. अं ५

म्हणून जीवाने श्रेयहित म्हणजे अत्यंतिक कल्याण करुन घ्यावे यासाठी सर्व थोर पुरुषांना प्रयत्न केले. श्री. तुकोबाराय सांगतात

झाडु संताचे मारग । आडरानी भरले जग ।
उच्छिष्ट चा भाग । उरला तो सेवू ।

उन्मार्गी जगाला सन्मार्गी लावण्यासाठी संतांचा अवतार आहे
अवतार तुम्हा धराया कारण । उद्धरावे जन जड जीव ।तु. म.

या सर्व अवतारी [पुरुषांनी सर्वांना झेपणारा, सुगम सोपा मार्ग म्हणजे भक्ति हा मार्ग जगापुढे ठेवला. की ज्यांत अधिकाराचा प्रश्नच येत नाही.

नाम संकीर्तन साधन पैं सोपे । जळतील पापे जन्मांतरे ।तु.म.
अवघ्यावाटा झाल्या क्षणी । कली न घडे साधन ।
उचित विधी विधान । न कळे न घडे सर्वथा । तु. म.
भक्ति पंथ बहु सोपा । पुण्य नागवे या पापा ।
येणें जाणे खेपा । येणेंचि एके खंडती । तु. म

भक्ति मार्गाचा स्विकार करणारा पुरुष निश्चत साध्यापर्यंत जातो म्हणून हा मार्ग सर्व साधु संतानी हातळला व निश्चित केला.

साध्य साधनाचा समन्वय फक्त वारकरी पंथात व समर्थ संप्रदायात पहावयास मिळतो. चार्वाकादि नास्तिकाचे साध्य व साधन दोन्हीहि चांगले नाहीत. रामानुज, मध्व वल्लभ, व निंबार्कादि द्वैत्यांचे साधन म्हणजे उपासना फार चांगली पण साध्य योग्य वाटत नाही. त्यांच्यात जीव कधीच मुक्त होत नाही. उपास्य उपासक भाव हा कायम राहतो. त्यांनी साध्य म्हणजे सलोकतादि विशेष मुक्ति मानल्या आहेत सायुज्य मुक्तीला त्यांच्यात स्थान नाही ते जरी स्वतःला विशिष्टाद्वैती, शुद्धाद्वैती, द्वैताद्वैती असे अद्वैति म्हणून घत असलें तरी ते खऱ्या अर्थानें द्वैतीच आहेत. मात्र त्यांची उपासना घेण्यासारखी आहे. साध्य साधनाचा मेळ फक्त अद्वैत पंथातच आहे या पंथाचे साध्य आहे सायुज्य मोक्ष अथवा भगवत प्राप्ती आणि त्यांचे साधन आहे अद्वैतज्ञान. कर्म, उपासना, योग, ध्यान आदि साधने ही त्या ज्ञानाची साधने आहेत याचा अर्थ असा की साधनाला साधनाची गरज आहे. कर्म, उपासना ही मोक्षाची बहिरंग साधने आहेत व ज्ञान हे अंतरंग साधन आहे तसे तर श्रवण, मननादि ही देखील ज्ञानाचीच साधने अगर सहाकारी साधने आहेत. आद्य शंकराचार्यापासून चालत आलेली ही परंपरा श्रीज्ञानेश्वर प्रभृति संतानी मान्य केली व तीच प्रथा श्रीतुकोबारायांनी आणि समर्थ पंचायतानांतील सर्व स्वामीनी शिरोधार्य मानली व्यासाचा मागोवा घेत व भाष्यकाराते वाट पुसत चाललेला हा वारकरी संप्रदाय आहे म्हणून या पंथाला विशेष महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहें आणि म्हणूनच संप्रदायाची प्रायः सर्वच मंडळी या वारकरी पंथाची कास धरतात.

## 'समर्थ पंचायतनातील स्वामी वारकरी नव्हते?

श्रीरामदासस्वामी श्रीरंगनाथ स्वामी हे वारकरी नव्हतें तथापि निष्ठ वंत भक्त होते अधिकारी पुरुष होते. इतकेच नव्हे तर ते सर्वच आत्म साक्षात्कारी होतें. यामुळेच महाराष्ट्रात या पंचायतनाला विशेष स्थान प्राप्त झाले आहे. रामदासी पंथ आजहि चांगल्या स्वरुपात ऊभा आहे. याचें कारण उपरिनिर्दिष्ट मंडळींची कार्यवाही चालविणाऱ्या महान व्यक्ति या संप्रदायात जन्मास आल्या. त्यांनी या पंथाची धुरा खांद्यावर घेवून हे कार्य जोमानें जोपासलें आहे व प्रस्तुतच्या कालात जोपासीत आहेत.

रामदास स्वामींचे हे रामांचे उपासक. मातोश्रीच्या आज्ञने ते बोहल्यावर उभे राहिलें. आईनें त्यांना म्हटलें की नारायण, माझ्या डोळ्याने मी तुझ्या डोक्यावर अक्षता पडलेल्या पाहाव्यात आईची आज्ञा म्हणून ते बोहल्यावर ऊभे राहिले. मंगलाष्टक म्हणायला सुरुवात झाली सावधान हा शब्द कानावर पडला चार अक्षताहि डोक्यावर पडल्या. आईची आज्ञा मानण्याचे श्रेय पदरात पडले. आणि त्यांनी बोहल्यावरुन त्याचक्षणी उडी टाकली तेथून पळाले व लगेच नासिक पंचवटी जवळील टाकळीचा खोरा गांठला तेथे बारावर्षे 'श्रीराम जयराम' या मंत्राचा ऊभ्यानें जप केला. रामाचा साक्षात्कार करुन घेतला मग ते धर्म प्रचाराला बाहेर पडले दासबोधासारखा श्रेष्ठ ग्रंथ रचला. मनाचे श्लोक आदि स्फूट काव्यहि केले. महाराष्ट्रात ठिकठिकाणी मारुतीची स्थापना केलीं ते जरी रामोपासक होते तरी पंढरीला पांडुरंगाच्या दर्शनाला येत होते. पांडुरंगाच्या

मंदिरात जो मारुती आज आपणास सभामंडपात उत्तर बाजूस दिसतो त्याची स्थापना त्यांनीच केली आहे असे सांगतात. तें जरी राम भक्त होते तरी पांडुरंगाचेंहि उपासक होतेच. वारकरी पंथातहि रामप्रभुला फार महत्वाचे स्थान आहे. 'रामः शस्त्र भूता महम्। या पदावर भाष्य करताना श्री ज्ञानराजानें रामाचे उत्कृष्ट वर्णन केले आहे.

शस्त्रधरा समस्ता । माजी श्रीराम तो मी ॥
जेणें सांकडलिया धर्माचे कैवार ।
आपणपया धनुष्य करुनि दुसरे ॥
विजय लक्ष्मीये एक मोहरे । केले त्रेती ॥
पाठी ऊभे ठाकुनि सुवेळी । प्रताप लंकेश्वराच्या सिसाळी ।
गगनीं उदो म्हणतया हस्तवळी । दिघली भूता ।
जेणे देवाचा मान गिवसिला । धर्मासि जिर्णोद्धार केला ।
सूर्यवंशी उदेला । सूर्य जो का ॥
'तो हतियेर परजितया आत । रामचंद्र मी रमाकांत ॥ज्ञा १०

श्री ज्ञानेबाराय अंभगद्वाराहि रामाचा निर्देश करतात.
राम बरवा कृष्ण बरवा । सुंदर बरवा बाईयानो । ज्ञा.अ.

इत्यादी अंभगवाणीतून रामाचा उल्लेख आढळतो श्री एकनाथ महाराजांनी भावार्थ रामायणासारखा रसाळ ग्रंथ लिहिला. रामानीच त्यांना तो लिहिण्याबाबत आज्ञा केली आहे भावार्थरामायण वाचणाऱ्याना यांची सत्यता पटेल श्री तुकाराम महाराजांनी रामावर कांही अंभग रचना केली आहे. त्यात रामराज्याचे वर्णन केलें आहे. ते मुळात पाहाणेंच योग्य होईल.

'झाले रामराज्य काय ऊणें आम्हासी ।
'राम वेळोवेळा आम्ही गावू ओवियें ।
राम राम स्मरा आधी । लाहो करा गाठ घालामूळबंदीं ।
ऐसा कर धर आवे राम । और धंदासब छोरहि काम ।

असे किती तरी प्रमाणें उधृत करता येतील. विस्तार भयास्तव तो मोह मी अवरतो. 'रामकृष्ण हरि विठ्ठलकेश वा हा मंत्र श्रीतुकोबारायाना त्यांच्या गुरुंनी दिला. 'मंत्र दिला रामकृष्ण हरि' हाच मंत्र माळ घालताना म्हणजे वारकरी पंथाची दिक्षा देताना आजहि दिला जातो. वारकरी पंथीयाची रामावर अत्यंत निष्ठा आहे. राम हा त्यांचा जीव की प्राण आहे राम, कृष्ण, पांडुरंग विठ्ठल हरि, केशव इत्यादी नांवे एकाच विग्रहाची आहेत. अद्वैत सिद्धांतात नाम नामीचा अभेद सांगितला आहें तेव्हा कोणत्याहि नामाचा जप केला तरी त्यात कांहीच बिघडत नाही. रामाची अथवा विठ्ठलाची उपासना केली तरी ते दोन्ही एकच आहेत. अर्थात उपासकावर उपास्य अवलंबून असते. 'जेणे जेणे जैसे ध्यावे तैसे व्हावे कृपाळें' असा नेम आहें. रामदासस्वामी श्रीरंगनाथस्वामी हें जरी रामाचे उपासक असले तरी वारकरी पंथासी त्यांचा विरोधअसण्याचे कारण नाही मारोतिराय हे राम भक्त होते तर अर्जुन हा कृष्णभक्त होता तरी पण दोघांची मैत्री होतीच. 'ध्वजस्तंभावरी वानर । तो मूर्तीमंत शंकरा हा त्याचा पुरावा आहें त्याच प्रमाणें रामदासी पंथ हा वारकरी पंथाचा अंग म्हणावयास हरकत नसावी पण त्याच बरोबर त्या त्या पंथातील लोकांनी त्या त्या पंथाचा स्वाभिमान घेवून वागण्यातहि कांही अन्यथा होणार नाही कार्यदृष्टी सोडून कारण दृष्टी ठेवून वागले तर त्यात मतभेदाचा प्रश्नच उरत नाही ही समन्वयाची दृष्टी सर्वांनी बाळगावी.

श्रीरंगनाथ स्वामी हे थोर पुरुष होते रामदासस्वामींसी त्यांचा अतूट संबंध होता हे त्याच्या कांही उपलब्ध पुराव्या वरुन सिद्ध होते.

ही वाक्पुष्पे त्यांचें चरणी समर्पित करित आहें.

श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर
विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

卐 आकर्षक व कलात्मक छपाईचे माहेरघर 卐

ज्योतिप्रिंटींगप्रेस

फौजदार चावडी जवळ,
सोलापूर.

# रंगनाथस्वामी व वारकरी संत

– भा. पं. बहिरट

श्रीरामदासस्वामी ज्यात श्रेष्ठ व प्रमुख होते. असे दासपंचायतन प्रसिद्ध आहे. या पंचायतनांत रंगनाथ स्वामी निगडीकर जयरामस्वामी वडगावकर, केशवस्वामी भागानगरकर, व आनंदमूर्ती ब्रम्हानाळकर यांचा समावेश होतो. हे सर्व संत श्रेष्ठ भगवद् भक्त व अधिकारी आत्म साक्षात्कारी संत असून त्याचे वाङमयही प्रसिद्ध आहे. पंढरीच्या विठ्ठल देवा विषयी व ज्ञानदेवादि संता विषयी सर्वांनाच आदरभाव आहे पंचायतन तील प्रमुख श्रीसमर्थ रामदास स्वामी हे एकविध रामभक्त परंतु पंढरीस पांडुरंग दर्शनास आल्यावेळी श्रीपांडुरंगानें त्यांना रामरुपांत दर्शन दिलें. रामचंद्र व विठ्ठल यांच्या एकरुपतेचाच तो अनुभव होता. त्यामुळे रामदास स्वामींच्या अभंगातून

राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एकरुपे ।।
आमुचिये घरा वस्ती निरंतर । हृदयी एकाकार राहियेलें ।।
दास म्हणें धरा भक्ति प्रेमभाव । कृपाळू राघव पांडुरंग ।।

अशा तऱ्हेचे उद्गार आढळतात. स्वामींचे विठ्ठलपर अनेक दुसरे अंभगही उपलब्ध आहेत. स्वामीनी आपल्या अनंत नामक शिष्यास पंढरीची वारी सांगितली होतीं ती अद्याप त्यांचे परंपरेत चालू असुन प्रतिवर्षी मेथवड्याहुन पंढरीस पालखी येते. काही वर्षापूर्वी मी विजापुरी गेलो असता श्री. काकासाहेब कारखाननीस भेटले. त्यांचे तोंडून स्वामीनी तुकाराम महाराजांचा गौरवपूर्वक उल्लेख ज्यात आहें अशा अभंगाचे कडवे सांगितले त्यात स्वामीं म्हणतात (अभंग तारल्या विषयी )

दास म्हणें पंढरीनाथ । तारी तुकायाचे पुस्तक ।।

रंगनाथ स्वामींचा व रामदास स्वामीचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध रंगनाथ स्वामीनीही श्रीविठ्ठल वरमा यांची एकरुपता जाणून श्रीविठ्ठल प्रेमानें ओथंबलेली पदे गाइली आहेत, श्रीतुकाराम महाराजांच्या विषयी ज्यात परमादर व महात्मता वर्णिली आहें असे एक सुंदर पदही रचले आहें.

रंगनाथ स्वामी हे राजयोगाच्या ऐश्वर्यात रहणारे व अंतरंगी रामरसात पूर्ण रंगलेले तुकोबारायांचे समकालीनच तुकोबा कीर्तनरसात पूर्ण रंगलेले, रंगनाथ स्वामींनी तुकोबांचा हा अपूर्व कीर्तनरंग प्रत्यक्षात पाहिला. या कीर्तन रंगात तुकोबा सदेह वैकुंठास गेलें. सदेह वैकुंठगमन म्हणजे पंच महाभूतांचा देह चैतन्यातविरुन अदृश्य होणें होय. तुकोबांचा महिमा व कीर्तनांत अदृश्य होण्याचा अघटित प्रसंग रंगनाथ स्वामींनी वर्णिला आहे. तो लक्षणीय आहे ते वर्णित्पत

नरदेहा घेउनि वाणी । गेला ती ऐका वाणी ।। ध्रु ।।
घट फोडुनि जनकादिक ते [अनुभविते झालें माती ।
हा नोहे तुकया तैसा घट राखुनी धरली माती ।। १
इतर ते हारुनी दुग्धा परिणामक घेती पाणीं ।
हा नोहें तुकया तैसा पय राखुनी चाखे लोणी ।। २
इतर ते टाकुनी कोहं मग चाखियला तो सोहम् ।
हा नोहे तुकया तसा अच्छेद्य पचविला कोहम् ।।३
इतरे या मिश्र पुटाते देउनिया जड टाकियले ।
हा नोहे तुकया तैसा परिसाने हेमचि केले ।। ४
जडबुद्धी 'अहं' या देहा निजस्वरुपी वहूनि गेला ।
निजरंगी रंग पहाया रंगाने निश्चय केला ।। ५
या बोला सारचि कथितो दिसणें जे हाचि जन्म ।
अदृश्य मरण योग्यांचे निजरंगी अघटित कर्म ।।

इतरानी घट फोडून मृत्तिका पाहिली पण तुकोबानी घट राखून मृत्तिका अनुभवलीं इतरांनी दुध नाहीसे करुन लोणी काढलें पण तुकोबानी दुधातील पाणी म्ह. द्रवत्व राखून लोणी चाखले इतरांनं अहं बाजूस टाकून सोहं अनुभविला म्ह जीवत्व टाकून शिवत्व अनुभवले पण तुकोबानी जीवत्व राखून शिवत्व अनुभवले. इतरानी धातूस पुढे देऊन त्यातील हीन भाग जाळून सोनें बनविले पण तुकोबानी लोखंडाच्या संपूर्ण अंगाचे सोने केंले सारांश तुकोबा देह टाकून न देता देहच चैतन्यरुप करुन अदृश्य झाले.

तुकोबांचे चिरंजीव नारायणबुवा यांनी तुकोबा कीर्तन करताना अदृश झाले असे म्हटले. बहिणाबाईना तुकोबांचा प्रत्यक्ष अनुग्रह मिळाला. त्यांनी ही तुकोबा गुप्तरुप झाल्याचे सांगितलें आहे, रंगनाथ स्वामीनी या दोघांच्या हाकीकतीस दृढता आणली दास पंचायतनातील

जयरामस्वामीनी आपल्या कं तं ांत तुकोबारायांचे अभंग म्हणत. तें अभंग ऐकून बहिणाबाईना तुकोबांच्या दर्शनाचा वेध लागला व पुढे त्या देहूस गेल्यावर प्रत्यक्ष भेट झाली.

रंगनाथ स्वामीनी श्रीएकनाथ महाराजांचे गुणगान एका पदात केले आहे

एकनाथ हे नामपूर्ण काम वद वाचे ।
श्रवण स्म र्णे दुर्घट तुटतिल पाश भवाचे ।।ध्रु।।
यमुना पुलिन विहारी हरि निज भक्तांची माया ।
ये ऊनि प्रतिष्ठानी सेवक तो होय ।
येरसरा अभिन्नपण ते जाणिति विद्वद्वर्य ।
येकात्मता बोलित बोलिली नवजाय ।।१।।
का ण समुच्चय भगवद्जनें झाला सुश्लोक ।
करुनिया निजबोध आत्मनात्म विवेक ।
कर्म तेचि ब्रह्म वर्म हे निज निष्टंक ।
कल्पनातील होऊनि पाहे अनेंकी एक ।।२।।
नामरुपातील अवलोकित या जनीजनार्दना ।
नासुनिया उभयता विपरित असंभावना ।
नाद बिंदु कला ज्योती विरहित सनातना ।
नारायण नररुपे जो या सेवित विज्ञाना ।।३।।
थरक्त पतितो दार कराया हा याचा पंथ ।
थडक सहावा प्रथम तरि हा प्रसन्न गुरुनाथ ।
थडिये पाववि़ले करुनी भागवत ग्रंथ ।
थकीत केंले निजरंगे या मनिचे मनोरथ ।।४।।

या पदात रंगनाथानं प्रत्येक ओळीचे प्रत्येक कड–व्यास आद्य क्षर व अंत्याक्षर 'येकनाथ' असे साधले आहे

रंगनाथ स्वामीच्या पद संग्रहात ज्ञानदेवांच्या वर एक पद उधृत करुन ते स्वामी आळंदीस गेले असता तेथे रचले असे म्हणले आहे. सदरची सुरवात

ज्ञानदेव ज्ञानदेव वदता ज्ञान देव देतो ।
वासुदेवचि होतो अखंड वदनि व देतो । ध्रु।।

परंतु सदर पद हे एकनाथ कृत नसुन ते एकनाथी अभंग गाथ्यात सापडते.

या पद्याचा शेवट पदसंग्रहात पुढील प्रमाणें आहे.
वंदुनि अनन्य भावे गाऊ गीति ज्ञानदेव ।
वर्षति निजरंग ते पूर्ण जाणति स्वानुभव ।।

एकनाथीं गाथ्यात शेवटच्या ओळी पुढील प्रमाणें आहेत,

वंदुनि अनन्य एका जनार्दनी दृढ भाव ।
वर्षति निर्जर ज्ञानदेव नामे पुष्पांचा वरुषाव ।।

मूळ नाथांच्या पद्याला शेवटी रंगनाथ स्वामींनी शेवटच्या दोन ओळी ऐवजी या ओळी घातलेल्या दिसतात.

श्रीज्ञानेश्वर महाराज वर स्वामींचे दुसरे एक पद उपलब्ध आहे. त्यात स्वामींचा अथांग आदर भरलेला आहे.

ॐ नमो जयजयजी सद्‌गुरु ज्ञानदेवा ।।ध्रु।।
कली माजी त्रिषयी जन । बहुत जाहले अज्ञान ।
यास्तव मूर्तीमंत ज्ञान । देव रुपे अवतरसीं ।।१।।
ज्ञानदेव ही अक्षरे । अक्ष रातीत परे ।
स्मरणें तरती नर पामरे । दुस्तरतर हा भवसिंधू ।।२।।
कृष्णाद्रिहूनि चिद्‌गंगा । गीता आली हे कलियुगा ।
पावन करावया जगा । श्रवणे पठणे मुमुक्षा ।।३।।
देशभाषा प्राकृत वाणी । टीका ज्ञानेश्वरी करुनी ।
प्रबोधले भाविक ज्ञानी । झाले अर्थावबोधे ।।४।।
जैसी हिऱ्याची हिरकणी । दृष्टी न पडे दुजेपणी ।
गीता ज्ञानेश्वरी कोणी । भिन्न न म्हणावी कोणी ।।५।।
अगाध महिमा वर्णू कैसा । वेद बोले पशू म्हैसा ।
गेले पूर्वज आणिले सहसा । श्राद्धी ब्राह्मणाचे ।।६।।
ऐसा महाराज योगी । ज्ञानदेव तू कलियुगी ।
पूर्ण निजानंद रंगी । अभंग रंगे रंगसी ।।७।।

रंगनाथ स्वामींची ज्ञानदेवादि संतावर पद्य रचना आहे तशीच पंढरीच्या विठ्ठलावर अनेंक रसाळ पदे उपलब्ध आहेत.

समपद सुंदर रे विटेवरी ।।ध्रु.।।
चंद्रभागातिरी हस्त कटावरी मदन मनोहर रे ।।१।।
पुंडरीक–वरद भक्तवत्सल श्रीद गर्जती सुरवरे ।।२।।
त्रिभुवननायक निज सुखदायक रखुमादेवीवररे ।।३।।
सनक सनंदन ध्याती गाती नारद तुंबर रे ।।४।।
सहज पूर्ण रंग निजानंद अभंग ब्रह्म परात्पर रे ।।५।।
जाऊ पाहू भीमातीर विहारी ।।ध्रु.।।
मदन मनोहर समपद सुंदर ।
शंख चक्र पीतांबर धारी ।।१।।
त्रिभुवन नायक निजसुखदायक ।
दीनानाथ स्वभक्त कैवारी ।।२।।
सहज पूर्ण रंग निजानंद अभंग ।
केवळ भूवैकुंठ पै पंढरी ।।३।।

रंगनाथ स्वामी काल्याचे प्रसंगी पंढरपूरी येत. त्यांचे कीर्तनही श्रीपांडुरंगा समोर होई त्यानी एका पदांत

# रंगनाथस्वामी निगडीकर यांच्या आरत्या एक अवलोकन

– शोभना डिंगरे

## आरती : स्वरुप विचार

आरती हा पूजोपचारातील एक विधी आहे सगुणोपासना, चिंतन, सेवा, प्रेम, एकाग्रता, अशा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण अशी भक्ती आरतीच्या द्वारे साधता येते. आरती हें एकभक्तीभावपूर्ण पद्य आहें उपास्य दैवताच्या चरित्रातील रसाळपणा व उपासकाच्या हृदयातील भक्ती यातून आरतीचे भावविश्व उमलते. आरतीकाराने आपल्या उपास्य दैवताला आपल्या मनातील आर्त आरतीच्या द्वार उघड करुन दाखविलेले असते उपास्य दैवताची अतिशय आर्त भावानें दुःखनिवारणार्थ केलेंली प्रार्थना हीच आरतीची खरी प्रेरणा दिसून येते भक्ताच्या हृदयांतराचे बोल ज्या वेळी उमाळ्यानें प्रकट होतात तेव्हा आरतीला भावनेचे अधिष्ठान लाभते स्वतःची दुरावस्था, दैवताचे चारित्र, दैवताच्या स्वरुपा विषयीचें रमणीय चित्र देवदर्शनास होणारा विलंब इ. विषयांचे भाविक भक्तांनी अतिशय जिव्हाळ्यानें केलेले वर्णन आरतीमध्ये वाचावयास मिळते. भक्तांनी आपला भक्तीभाव आरतीमध्ये विविध प्रकारांनी प्रकट केलेंला असतो. आपले दैवत हेच आपले सर्वस्व. आपण आणि दैवत यात अभेद आहे अशी दृढतर मानसिक ऐक्याची भावना आरतीत प्रकट झालेली असते. त्यामुळे आरतीचे एकूण स्वरुप भावगर्भ बनते. स्वानुभवप्रकटी करणानें आलेली भावगर्भता आणि सगुणोपासनेच्या अनुरोधानें प्रकट होणारी निखळ भक्ती यांनी आरतीचे अंतरंग संपन्न झालेंले असतें भावोत्कटता, चित्रदर्शित्व आणि नादमाधुर्य ही आरतीची गुण वैशिष्ट्ये सांगता येतील.

आरती हा एक वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराची मर्यादा सांभाळून आपल्या व्यक्तित्व स्पर्शाने व भावदर्शनाने आरती हा काव्य प्रकार समृद्ध करणाऱ्या अनेक महान आरतीकारांची परंपरा मराठी भाषेला बाराव्या शतकापासून लाभली आहे नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त आणि रामदासी अशा साऱ्याच सांप्रदायिकांनीं आरत्या गायिल्या आहेत.

ज्ञानदेवांच्या आरत्यांना त्यांच्या अलौकिक प्रतिभेचा स्पर्श झालेला आहे. नामदेवांच्या आरतीत त्यांच्या अंतरंगातील प्रेमभावाचे कल्लोळ शब्द बद्ध झालेंलें आहेत, एकनाथांनी आपल्या आरतीत भक्तीभावाचा मुक्त आविष्कार करुन त्यातील तात्विक अधिष्ठान समर्थपणें सांभाळले आहें. लोकमान्यता, चैतन्य आणि जोश या बाबतीत रामदासी आरत्या अतुलनीय आहेत. याच परंपरेत रामदास पंचायतनातील एक सत्पुरुष श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांच्या आरत्यांचा समावेश करता येईल.

### रंगनाथस्वामीच्या आरत्या – अंतरंग

आरती गणपतीची – श्रीगजाननाच्या आरतीनेच आरत्यांचा शुभारंभ करण्याची पूर्वपरंपरा असल्यानें रंगनाथांनी गजाननाला आरतीतून आळवून त्यांच्या सामर्थ्यांचे गुणगान केलें. 'महिमा न कळे शेषा अगम्य जगदीशा अशा आदरपूर्ण शब्दात त्यांनी गजाननाची महती व्यक्त केली आहे आणि शेवटी विद्येचे अधिदैवत असलेल्या गजाननाने आपल्याला सद्बुद्धी द्यावी. अशी विनवणी केली आहें.

### आरती चंद्राची

रजनीनाथ चंद्राचे अतिशय काव्यमय वर्णन रंगनाथांनी या आरतीत केलेलें आहे. आकाशात अखंड शोभायमान झालेला, आपल्या अमृतमय व शीतल स्पर्शाने भक्तीरुपी चकोरांना जीवन संजीवनी देणारा व जगताचे तापहरण करणारा चंद्र किती आल्हादक, सुखकर व हितकर आहे हें त्यांनी स्पष्ट केलें आहे.

'तव करुणारसपियुषं चन वन वनस्पती ।
स्थिरचर सफलित पल्लवपुष्पेसह होती' ।।

चंद्रप्रकाश हा सर्वांनाच जीवनरस व सफलता देणारा आहे अशी चंद्राची महती त्यांनी परोपरीने गायिली आहे. नादानुकारी शब्द योजना निखळ भक्तीभाव व काव्यरमता ही या आरतीची वैशिष्ट्यें नमूद करता येतील.

## आरती पंचायतनाची

या आरतीत रंगनाथांनी विष्णू, शिव, शक्ती, गणेश सूर्य, या पांच दैवतांचा महिमा गायिला आहें. सच्चित्सु– खरुप विष्णू, कर्पुरगौर शिव, निजसुखसरिता शक्ती, विघ्ननाशक गजानन, विश्वप्रकाशक सूर्य या सर्वांची गुण-वैशिष्टये अतिशय यथोचित शब्दात स्पष्ट केलेली आहेत आणि त्यानंतर 'आरती करिता झाली सासाम्य समता' हा आपला अनुभव पण मोठया भावपूर्ण पद्धतीनें अभिव्यक्त केलेंला आहे.

## आरती दत्ताची

त्रिमूर्ती, जगद्‌व्यापक, दशइंद्रयातीत, दिगंबर दत्ताचा माहमा रंगनाथानी या आरतीत गायिली आहे. सिद्ध साधक योगी या सर्वांचा मुकुटमणी, जीवांचा तारक, भवमूळछेदक दान दयाकर अशा विविध विशेषणांनी दत्ताचा गौरव केलेंला आहे जे अनन्य भावाने दत्ताला भजतात त्यांना मुक्ती मिळते असे शवटच्या कडव्यात स्पष्ट केले आहे.

## आरती हनुमंताची

या आरतींत रगनाथांनी हनुमंताचे चरित्रचित्र थोडक्यात रेखाटलें आहे. हनुमंतानें केलेंल्या पराक्रमाचा महिमा वर्णन करण्यास शब्द अपुरे आहेत हे त्यांनीं अधीच स्पष्ट केले आहें अहिरावण महिरावण वध, लंकादहन, लक्ष्मणासाठी द्रोणागिरी पर्वत आणणें इ, घटनांचा उल्लेख करुन हनुमंताच्या अचाट पराक्रमाचा कथा मोठया प्रत्यय–कारक पद्धतीने सांगितली आहे शेवटच्या कडव्यात हनुमंताचा उल्लेख शंकराचा अवतार म्हणून आलेला आहे. निवडक पुराणसंदर्भ, ओज, श्रुतिसुभग व प्रासात्मक रचना ही या आरतीची वैशिष्टये सांगता येतील. गुरु रगनाथांनी अतिशय आर्त भावनेनें श्रीगुरुची आरती केलेली आहे. त्यांचा गुरुविषयीचा भक्तीभाव, श्रद्धा आणि निष्ठा व अतुल प्रेमभाव या आरतीत प्रकट झालेला आहे.

' अर्ते आरति झाली गुरुरायाची हो ।
दुस्तर संसार सागर उतरायाची हो ॥

असा प्रारंभ करुन त्यांनी पुढे गुरुकृपेमुळे होणाऱ्या लाभाचें वर्णन केले आहें गुरुचरणी अनन्य भावाने निष्ठा ठेव ल्यामुळे आपली सर्व चिंता मिटली असून गुरुच्या अनुग्रहामुळे देहबुद्धीचा द्वैत संग भंगला हो'अशा शब्दात त्यानी आपली आत्मसाक्षात्काराची अवस्था वर्णिली आहे. लयबद्ध शब्द रचनेंमुळे ही आरती अधिक परिणाम कारक उतरली आहे.

## शेजार्ती–

शेजारतीत देव थकले आहेत त्यांना आता विश्रांतीची जरुरी आहे. देवाच्या या थकव्याला आपणच कारणीभूत आहोत या जाणीवेनें भक्ताचे मन कळवळून येते. व भक्त देवाला विश्रांती घेण्याची विनंती करतो. या ठिकाणी रंगनाथांनी श्रीगुरुची शेजारती केली आहे. आणि श्रीगुरुंना समाधि शेजेवर पहुडण्याचे विनंती केलेली आहें.

' निज निज रे निजानंद रंगा
निर्गुण निःसंगा गरुराया तु ।
अवस्थातीत तोचि मंचक बीजे।
निजमंदरीं सुख स्वरुप शेजे ।

या शेजारतीत रंगनाथांनीं श्रीगुरुंना निद्रा करण्या–साठी सर्व परिस्थिती अनुकल आहे. हे स्पष्ट केले आहे. सद्‌गुरुविषयीचा निःसिम प्रेमभाव, अद्वैत तत्व मांडण्या–साठी रुपकात्मक भाषेचा केलेला अवलंब यामुळे या शेजा–र्तीला एक प्रकारची उंची लाभली आहे.

रंगनाथांनी लिहिलेल्या आरत्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की आरती हा वाङ्मय प्रकार रंगनाथांनी अतिशय समर्थपणें हाताळला आहे त्यांनी लिहिलेल्या आरत्या या उपास्य दैवताच्या श्रद्धाभावानें रंगलेल्या आहेत. आरतीच्या मर्यादित अवकाशात त्यांनी गजाननाची महती, चंद्राच्या जीवनसंजीवक गुणाचे सामर्थ्य हनुमंताचा पराक्रम यांचे वर्णन अतिशय आदराने केलेलें आहे या आरत्यामध्ये उत्कट भक्तीभावापेक्षा देव देवतांविषयीचा प्रेमादर अधिक प्रमाणात प्रकट झालेला आहें असे जाणवतें. देव-देवतांच्या रुपाची सुरेख व रमणीय शब्दचित्रे असे काढण्या ऐवजी त्यांच्या गुणाचे गायन करुन त्यांच्या कार्याची महती रंगनाथांनी वर्णिली आहे ही वर्णने करीत असता प्रसंगानुसार त्यांनी अद्वैत तत्वज्ञानाचा धागा गुंफुन आवश्यक तो परिणाम साधण्याचा प्रत्यन केलेंला आहे. यातून रंगनाथांच्या अध्यात्म दृष्टीचो प्रगल्भता जाण वते. त्यांच्या आरत्या संख्येनें कमी असल्या तरी त्याद्वारे त्यांची देव देवतां विषयीची भक्ती, श्रद्धा, व्यासंग, चिंतन-शीलता यावर प्रकाश पडतो. पुराणकथेतील तपशील,

अध्यात्म विचाराचीं स्पष्टीकरणें, अनुप्रासात्मक, लयबद्ध, गतिमान व परिणामकारक रचनाबंध, रचनेचा आटोपशीरपणा, प्रौढ व आलंकारिक भाषा व भावनिदर्शक मुद्रिका ही रंगनाथांच्या आरतीची वैशिष्ट्ये सांगता येतील

जय जय रंगनाथ माऊली दयाळे रंगनाथ महाराज
श्रीरंगनाथ जयरंगनाथ जय जय निजानंद रंगनाथ ॥
जय जय गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्मसद्गुरु ॥


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

महारोग्यांना आपल्या हातांनी
अभ्यंग घालून ज्यांनी
भाऊबीज साजरी केली
जगांतील सर्व व्याधीवर
एकच उपाय म्हणून
नामाची महती गायिली
त्या महासती श्री **सोनामाता**
यांच्या चरणी विनम्र अभिवादन

**श्रीसोनामाता मुद्रणालय**

पापय्या बाबाजी बेलपवार पथ
२३६, मोदी **सोलापूर** ४१३००१
☎ ३८९२

श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

☎ ४४७५९२

# बलदोटा सराफ अँड जव्हेरी

**सोन्या चांदीचे होलसेल व्यापारी**

सोन्या मारुती चौक,

**पुणे.**

# देहबुद्धी सरुन आत्मबुद्धीने सुखानंद प्राप्ती !
# रंगनाथी - योगवासिष्ठयातील अध्यात्मविचार

**प्रा. नरेंद्र कुंटे**

समर्थ रामदास स्वामी यांच्या 'दासपंचायनन' मधील एक साधु पुरुष म्हणून प्रसिद्ध असलेलें राजयोगी श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर यांनी 'योगवासिष्ठसार' नांवाचा ओवी ग्रंथ लिहिला असून त्यांत सुमारे ७००० ओव्यातून आणि दहा प्रकरणातून 'साधक स्थितीतून गुरुपदवी प्राप्त करुन देणारे आत्मज्ञान कोणते आहे ?' याविषयीचे सुरेख विवरण केलें आहें. 'देहबुद्धी सरुन आत्मबुद्धीनें सुखानंद प्राप्ती' हे या ओवींचे सारतत्व आहे. त्या अनुषंगाने जो अध्यात्मविचार प्रकट झाला आहे. त्याचे विवेचन अभ्यासू नि जिज्ञासू साधकाच्या भूमिकेतून केले आहे. आत्मज्ञान प्राप्तीस हा 'गुरुपदेश' प्रेरक ठरुन त्या योगे 'सुखानंद' मिळो, हीं सद्गुरु जवळ प्रार्थना....

### योगवासिष्ठ ग्रंथ स्वरुप–

'योगवासिष्ठ' हा ग्रंथ संस्कृत भाषेतील तत्वज्ञानपर ग्रंथ म्हणून ओळखला जातो. इत्यार्षे 'श्रीमद्वासिष्ठरामायणें वाल्मीकिये' असा उल्वेख ग्रंथाचे शेवटी असल्यानें याचा मूळ रचयिता मुनिश्रेष्ठ वाल्मिकी हाच आहें. ७ या शतका पासून ते १४ व्या शतकापर्यंत याचा केंव्हा तरी 'रचनकाल असावा असे मानले जाते. मूळग्रंथावर संस्कार होऊन हा ग्रंथ तयार झाला आहे. वाल्मीकी रामायणात 'योगवासिष्ठ' निरुपणाचा उल्लेख नाही. म्हणून हा ग्रंथ 'उत्त र रामायण' म्हणून मानला जातो. गुरुगृही वेदाध्ययन झाल्यानंतर राम लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, यांचेवर स्नातक संस्कार झाला. त्यानंनतर रामचंद्र तीर्थाटन करुन परतलें. तेव्हां त्यांना वैराग्य प्राप्त झाले. दशरथाच्या दरबारात त्यांनी गुरुवर्य वसिष्ठ आणि मुनिश्रेष्ठ विश्वामित्र यांच्या उपस्थितीत आपली वैराग्यस्थिती सांगितली देह आकांक्षां आणि राज्य वैभव यांत आपले मन रमत नसून हें सर्व कालांतरानें नष्ट होणारे असल्याने आपण चिंताग्रस्त झालो आहोत असेहि त्यांनी सांगितले. संसार हा रोग असून मला त्याची चिंता वाटते आहे. म्हणून या भवरोगाची चिकित्सा करा अशी प्रार्थना रामचंद्रांनी मुनिद्वयांना केली. त्यावर विश्वामित्राच्या सांगण्यावरुन आणि रामचंद्राच्या मनात निर्माण झालेल्या जिज्ञासावृत्तीतून गुरुवर्य वसिष्ठांनी जो 'उपदेश' केला, तो म्हणजे 'योगवासिष्ठ' ग्रंथ होय. एका परिनें हा ही गुरुशिष्य–संवादच आहे. आणि त्यांतून अध्यात्मतत्त्वाचे विवरण वसिष्ठांनी केले आहे. या ग्रंथात एकूण सहा प्रकरणें असून त्यातील पहिल्या वैराग्य–प्रकरणात रामचंद्रानें मांडलेलें वैराग्याचे विचार मांडलेले आहेत. मुमुक्षु-व्यवहार या दुसऱ्या प्रकरणात मुमुक्षु कोण ? त्याने कसे वागावे ? हा विचार विशद केलेला आहे. तिसरे, चौथे, पाचवे या प्रकरणात विश्वाच्या उत्पत्ती–स्थिती–प्रलय या विषयीची उपपत्ती लावण्यात आलेली असून त्यातच संसारचक्र कसे व केव्हां थांबतें हें सांगितले आहे उपशम प्रकरण असे त्याचे नामाभिधान आहे. सहाव्या प्रकरणात जीव संसारात बद्ध असून तो अज्ञानामुळे दुःखमय झाला म्हणून त्याला सुखानंद कसा प्राप्त होईल याचा विचार सांगितला आहे. याला विचार सांगितला आहें. याला निर्वाण प्रकरण असे शीर्षक दिले गेले आहे. निर्वाण म्हणजे वासनाविरहित अवस्था. वासनेंचा क्षय होऊन ब्रह्मप्राप्तीचा मिळालेला आनंद हीच मोक्षस्थिती. 'साधकावस्थे पासून सुखानंद प्राप्त झालेल्या गुरुपदवी पर्यंत' चाविचारयाग्रंथात समाविष्टीत आहे.

### तत्वज्ञान सार

योगवासिष्ठयातील तत्वज्ञान साररुपाने पाहुं जाता पुढील प्रमाणें आहे.

अज्ञानामुळे दुःख; आत्मज्ञानानें परमशांती, त्यासाठी सत्संगतीची कांस धरुन आध्यात्मिक-साधना करायला हवी प्रयत्न तो हाच. त्यायोगे आत्मसाक्षात्कार होऊन आनंद मिळतो दुःखाचा संबंध कर्माशी. त्यालाच दैववाद म्हणतात पण तेहि अज्ञानच. शहाणा माणूस प्रयत्नवादी असतो. ज्ञान कर्म, भक्ती याविषयी तो गुरुंचे मार्गदर्शन घेतो मनाच्या ठिकाणी वासना. वासनेनेतून कर्मे घडतात. वासना क्षीण झाल्यातरच मन विषय वासनेंतून मावळून ब्रह्मस्वरुपाशी रमते. हे आनंदमय म्हणून ब्रह्म प्राप्तीत दुःखाचा नाश आहे. विषयामुळे बंधन. मन निर्विषयी झाले की मोक्ष प्राप्त होतो संसार सागरातून तरुन जाण्यासाठी आत्म-स्वरुपाचे यथार्थ ज्ञान व्हावयास हवे. शहाणें लोक ज्ञानाच्या नौकेने हा भवसागर पार करुन जातात. संसारासक्ती सोडली की संसाराविषयीचे अज्ञान संपते त्यांतला मोह आहे हा त्याविषयीच्या अज्ञानामुळे किंवा भ्रमरूप ज्ञानामुळे! जीव-जगत-परब्रह्म यांचे स्वरुप जाणावे. (१) जीव म्हणजे मी. मी म्हणजे अहंकार. त्यायोगे वासना. त्यामुळे जीव बद्ध (२) जगत म्हणजे मूळस्वरूपात ते अव्यक्तच. पण त्यांतून अभिव्यक्त जे झाले ते जगत. उदा आकाशातून वायू. वायूतून तेज. तेजातून जल. जलातून पृथ्वी. पृथ्वीतून वनस्पती, प्राणीमात्र, पार्थिवशरीर इ. त्यांची उत्पत्ती वासना बीजातून. मूळ अव्यक्तस्वरूप तेंच सत्तत्व. ते कशातच विलीन होत नाही. म्हणूनच ते 'सत्' होय. (३) परब्रह्म म्हणजे परमतत्त्व. ते सर्वप्रकारच्या शक्तींनी युक्त. सर्वठिकाणी, सर्वांच्यावरोबर, सर्वांत हे परमतत्त्व असते ते जड-चेतन; विद्या-अविद्या; तम-प्रकाश या पलीकडचे आहे. आनंदाचा वर्षाव होतो ते ब्रह्मरुप. तिथे इच्छा संपतात. जग हे भ्रम होय हे कळून येते. विषय निरस वाटतात. आणि वासनारहित स्थिती होते. तीच 'निर्माण' अवस्था होय. त्याने ब्रह्मानंद प्राप्त होतो. आणि मूळ सत्तत्त्वाशी ऐक्य होते.

## रंगनाथी-योगवासिष्ठ

'रंगनाथी-योगवासिष्ठ' हा ग्रंथ या मूळग्रंथावर आधारलेला असून मूळ संस्कृत ओव्यांचा संक्षेप करुन त्यावर केलेले विवरण यांत आहे. रंगनाथी-योगवासिष्ठयात एकूण १० प्रकरणें असून त्यांची ओवी संख्या पुढील प्रमाणे आहे. ओवी संख्या कंसात दिली आहे.

**प्रकरण १ ले : वैराग्य (११३३)**
**प्रकरण २ रे : जगन्मिथ्या (४६४)**
**प्रकरण ३ रे : मनोलय (४४९)**
**प्रकरण ४ थे : वासनोपशम (३८१)**
**प्रकरण ५ वे : आत्ममनन (२३६)**
**प्रकरण ६ वे : शुद्धनिरुपण (४०४)**
**प्रकरण ७ वे : आत्मार्चन (२५८)**
**प्रकरण ८ वे : आत्मनिरुपण (५९४)**
**प्रकरण ९ वे : जीवन्मुक्ती (१०५०)**
**प्रकरण १० वे : निर्वाण (१०६८)**

रंगनाथी-योगवासिष्ठयातील भाष्य चार चरणाच्या पारंपारिक ओवीप्रमाणेच असून भाषा रसाळ आणि रचना सुबोध अशा प्रकारची आहे. दृष्टांत आणि उपमा याही समर्पक नि सरस आहेत. त्यांतील साहित्य-स्वरुपही उलगडून दाखविण्याचा मोह होतो इतके कवित्व उत्कट नि प्रासादिक आहे. पण तूर्त तरी या ग्रंथातील अध्यात्म विचारांचेच स्वरुप पहावयाचे असल्याने ओवी-संदर्भातील महत्वपूर्ण आशयाचा मागोवा घेत घेत विवरण केले आहे. विस्तारभयाचेही बंधन आहेच. प्रतिपाद्य विषयातील पुनरुक्ती टाळून जेवढें पाहता येईल त्याचा विचार केला आहे. प्रतिपाद्य विषयाची ही एक 'संक्षिप्त-टिपण्णी' आहे, एवढेच म्हणता येईल. असो.

## ग्रंथकर्तृत्व कोणाचे ?

'रंगनाथी-योगवासिष्ठ' या शीर्षकाने उपलब्ध असलेला हा ग्रंथ नाथकालीन रंगनाथस्वमी मोगरेकर यांचा कीं, समर्थकालीन रंगनाथस्वामी निगडीकर यांचा?- असा प्रवाह आहे. हा ग्रंथ रंगनाथस्वामी मोगरेकर यांचा, असे मत म. म. दत्तोवामन पोतदार यांनी दिल्याचा उल्लेख भारतीय संस्कृती कोशात (संपा. महादेवशास्त्री जोशी खण्ड ७ वा, पृष्ठे ६८६-८७) केलेला आहे. योगवासिष्ठ आणि चित्सदानंदलहरी या ग्रंथाच्या भाषेत साम्य आहे हे ग्रंथ मोगरेकर यांनी लिहीले आहेत. त्यांचीं गुरुपरंपरा सिद्धानंद-परमानंद-वैकुंठानंद-कृष्णानंद अशी आहे. श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांचे विषयाची माहिती देताना भारतीय संस्कृती कोषात (संपा. महादेवशास्त्री जोशी, खण्ड ७ वा, पृष्ठे ६८८) म्हटले आहे कीं, हे रंगनाथस्वामी राजयोगी होते. ते समर्थ रामदासांच्या 'दासपंचायतन' मधील दुसरे साधुपुरुष होत. त्यांचे वडील बोपजी यांनी पूर्णानंद स्वामींकडून अनुग्रह घेतला होता. पूर्णानंदांनी बोपजीचे नांव निजानंद ठेवले होते रंगनाथांनी निजानंदांकडून ( वडिलांकडूनच ) अनुग्रह घेतला म्हणून

निजानंद हे त्यांचे गुरु होत. समर्थ संप्रदायी हे 'योगवासिष्ठ' या ग्रंथाचे कर्तृत्व रंगनाथस्वामी निगडीकर यांचेकडेच देतात. शके १८५५ साली प्रसिद्ध झालेल्या 'समर्थ चरित्र' ग्रंथात समर्थांच्या समकालीन साधुपुरुषांच्या यादीत रंगनाथस्वामी निगडीकर यांचा उल्लेख असून त्यांनी वडिलांकडून म्हणजे बोपाजीपंत यांचेकडून अनुग्रह घेतला आणि बोपाजीपंत म्हणजेच निजानंद होत या संदर्भाची नोंद केली आहे. तसेच रंगनाथस्वामींच्या काव्यलेखन यादीत ' योगवासिष्ठसार ' असा उल्लेख केला आहे. ओवी संख्या तेवढीच आहे.

आता या वादविवादात निर्णय करायचा झाला तर प्रत्यक्ष ग्रंथातील अंतरंगाचाच आधार घ्यावा लागतो, तो पाहता ग्रंथ श्रीरंगनाथस्वामी निगडीकर यांचाच आहे, असे म्हणता येईल. ग्रंथारंभाच 'श्रीमत्सदगुरु निजानंदाय नमः' असा उल्लेख असून त्यांत गुरुवंदनाचे १० श्लोक ते लिहितात. त्यात मोगरेकरांच्या गुरुपरंपरेतील एकही नांव आढळत नाही. गुरुवंदनाचा हा भक्कम पुरावा पुरेसा आहे. त्यांतून ग्रंथाचे अंतरंग शोधू जाता श्रीसमर्थांच्या दासबोधातील अनेक ओवीं विचारांचे साम्यरुप या ग्रंथात आढळते. आशयाचाही विचार करता ' देहे बुद्धीने आत्मबुद्धी भरावी' हे समर्थांचे तत्वज्ञान पूर्णांशाने या ग्रंथात विवरले गेले आहे. तेव्हा ग्रंथकर्तृत्वाच्या वादात अंतर्बाह्य - काल निगडीकरांच्या बाजूनेंच देता येईल. त्यांतून ग्रंथकर्तृत्वाचा वाद कांहीही असो. साधकाला महत्वपूर्ण आहे ते त्यांतील तत्वज्ञान त्यामुळे आशयाच्या दृष्टीनेच त्यांतील अध्यात्मविचार पहावयाचा असल्यानें या वादाचे यथातथ्यपण नोंदविण्यापलिकडे त्यांत स्वारस्य असण्याचे कारण नाही ग्रंथलेखनास आरंभ करुन गुरुवंदन झाल्यानंतर श्रीरंगनाथस्वामी लिहतात,

ऐसे ऐकोनिया विनवणी ।
प्रसन्न श्रीगुरु चिंतामणी ।
प्रकाश करिता जाला वाणी ।
निजानंदे ।। प्र १ ओ. १८ ।।

अशी' गुरुकृपा' संपादून ते ग्रंथविवरण करु लागतात.

प्रकरणशः त्यातील 'अध्यात्मविचार' पाहून त्याचे यथामती विवरण विनम्रपणानें, सद्गुरु कृपेची याचना करुन, पुढे केले आहे.

विवरणासाठी उपलब्ध असलेली पोथी शके १८२७ साली प्रसिद्ध झालेली व श्री. गोविंद नारायणशास्त्री दातार यांनी संपादित केलेली असून तिची पाने जीर्ण अवस्थेत आहेत. पण त्यावरुन तयार केलेली 'हस्तलिखित पोथी नाझरे येथील स्वामींचे वंशज श्री श्रीकांत देशपांडे यांनी उपलब्ध करून दिली त्यावरुन हे संकलन - विवरण केले आहे.

## ज्ञानप्राप्तीसाठी 'वैराग्य' हवे

'वैराग्य ' या पहिल्या प्रकरणात श्रीरंगनाथस्वामींनी योगवासिष्ठचा 'साधकदशा' निरुपिली आहे. प्रापंचिकांना रघुनाथाच्या दर्शनाने परमानंद होत असताना त्यांनी वैराग्य कसे आले? हीच मुळात अपूर्वअवस्था होय, असे सांगून कवीनें त्याला लगेच पारमार्थिकदृष्या अन्वयार्थ-जोडला आहे की, परमेश्वरानें सामान्यजनांच्या उद्धारासाठीच हे मनुष्यपण स्वीकारले असून त्यानें अज्ञान पांघरले आहे. कवी म्हणतो,

तो स्वयें जऱ्ही ज्ञानमूर्ती ।
तऱ्ही लौकिकी न प्रकटिली व्यक्ती ।
जन तारावया प्रश्नोक्ति ।
करी नेणता ऐसी ।।७३।।

म्हणजेच रामाने विरक्तावस्था धारण करुन लोकोद्धाराचे तत्वज्ञान गुरुमुखातून जगाला समजावे यासाठीच ही प्रश्नोत्तरे केली. वसिष्ठ हे रामाचे गुरु म्हणून हा 'गुरु - शिष्य संवाद' होय. स्वतः राम हा ब्रह्मरुप असूनही तो श्रोता झाला. भक्त, साधक या अवस्थेत येऊन त्याने प्रश्न केलें आणि वसिष्ठांकडून आलेल्या उपदेशामृताचे सेवन केले हा संवाद ऐकतानाही समाधी - सुख लाभले, असे अभिवचन कवी देतो.

## ज्ञानासाठी आर्तता हवी

राम दशरथाच्या सभेत आला तेंव्हां त्यांची वैराग्यपूर्ण मुद्रापाहून दशरथाने दुःखाचे कारण विचारले. त्यावर राम म्हणाला, स्त्री सौख्य, राज्य वैभव, बंधूमित्र, संपत्ती या कशातच माझे मनरमत नाही. कळीने त्या मनाची स्थिती सांगताना म्हटले आहे कीं,

मन हे अखंडश्वानाचे परी ।
विषयालागी वणवण करी ।
तेणेंदुःख हो तसे भारी ।
किती सांगो ।।२९६।।

मनास त्यामुळे पूर्णत्व लाभत नाही, याचा कांही उपाय सांगावा असे रामानें प्रार्थिले. इथें रामाला वैराग्य

उत्पन्न झाले त्याचे मूळकारण कवीने शोधून दाखविले आहे. मनामुळेच देहास जडता आली. शरीर देहीं दुःखाचे वसतीस्थानच. त्यामुळे मन आणि शरीर या दोन्ही विषयी बोलावे तर संसारातील दुःखच आठवते. 'प्रपंच अवघा दुखःमूळ' या समर्थ वचनांची इथे आठवण होते. तेव्हा या प्रपंचाविषयीच वैराग्य वाटूं लागले तरच सद्गुरुभेटीचा आणि त्याने सुखाचा मार्ग दाखवावा, ही तळमळ उत्पन्न होते. साधक परमार्थाकडे प्रवृत्त होतो तो प्रामुख्यानें प्रपंचविषयक दुःखातूनच ही साधकाची ज्ञानप्राप्ती विषयक अनुकूल भूमिका होय. कवी म्हणतो,

> सकळ नावडोनिया चित्ती ।
> येक साधुचरणी अतिप्रीती ।
> हेचि जाणावी शुद्धमती ।
> ज्ञानभूमिका ।।३३२।।

या अनुकूल भूमिकेत रामाची 'मनोवस्था' दिसून आल्याने मुनिश्रेष्ठ विश्वामित्र गुरुवर्य वसिष्ठांना म्हणाले, रामचंद्राला उपदेश करा. तेव्हां वसिष्ठांनी एक सूत्र विशद केले आहे. ते म्हणतात, गुरुच्या उपदेशाची प्रार्थना शिष्याने आपणहोऊन केल्याशिवाय तो शिष्य उपदेशाला पात्र होत नाही. ज्ञानप्राप्तीसाठी शिष्याचे मन आर्त झाले आहे कां? तसे झाले नसेल तर गुरुला दूषण येते. सवतीनें आणि स्वार्थाने उपदेश केला तर गुरुत्व आणि संप्रदाय हें दोन्ही ओस पडतात. अध्यात्मिक दृष्टीने हा विचार फार मोलाचा आहे. थोर तत्वज्ञ आणि साक्षात्कारी संत श्रीगुरुदेव रानडे हे त्यांच्याकडे येणाऱ्या मुमुक्षला चटकन नाममंत्र देत नसत पुन्हा या पुन्हा पाहूं असे सांगत. आणि त्या व्यक्तीत परमार्थविषयक आस्था वाटून ती व्यक्ती पुन्हा त्यांच्याकडे गेली तरच ते उपदेश करीत. पुष्कळवेळा असे होते की, कांही लहान थोर व्यक्ती येतात. आणि गुरुमंत्र घेतात. संजीवन समाधीजवळ ते नामोच्चारही करतात. पण हा मंत्र त्यांच्या मनात रुजला जातो कां? कीं तात्काळ भोव-ताली दिसणाऱ्या भक्तीसाधनेंने भारुन जावून केवळ भाव-निक आवेगात तो घेतलेला असतो? याचा विचार करायला हवा कांही व्यक्ती ठाया ठाया जाऊन प्रत्येक समाधीशी मंत्रोच्चार करतात. तिथली परंपरा स्वीकारतात. मग तो गुरुद्रोह होणार नाही कां? - म्हणजेच अशा गोष्टी घडल्या कीं, गुरुत्व आणि संप्रदाय यांची हानी होण्याचा संभव असतो. त्यादृष्टीने वसिष्ठांचे 'तत्व' ध्यानी घेण्याजोगे आहे गुरुवर्य वसिष्ठांनी आर्ततेचे एवढे महत्व असल्याचे सांगताच रामाने " उद्धार मज " अशी त्यांना प्रार्थना केली. तेव्हां मग वासिष्ठांनी उपदेश केला.

## देहबुद्धीमुळे दुःखप्राप्ती

" तुला भवावेगळा करेन ' असे अभिवचन देऊन वसिष्ठांनी रामचंद्रास उपदेश केला. ते म्हणालें, मी देह हाच अहंकार आणि या देहबुद्धीपोटीच दुःखप्राप्ती होते. देव कोण आणि मी कोण? हे कळत नाही, यालाच अज्ञान म्हणावे. आत्मस्वरुप हे नित्य असून बाकी उरलेले ते सर्व अनित्य होय. कवी म्हणतो,

> देहादिप्रपंच सर्व ।
> तो अनित्य नश्वर सावेव ।
> हा जसासि विवेकभाव ।
> जागती आंगी ।।३९४।।

म्हणून अनित्य विषयाबद्दलच्या अज्ञानापासून दूर व्हावे. त्याविषयी वैराग्य उत्पन्न व्हावे हा विचार महत्व-पूर्ण ठरतो. मन आणि बुद्धी विषयावरुन – देह-प्रपंचावरुन आवरावी यासाठी कवी शमादिषटक सांगतो त्यांत (१) आंतरिक इंद्रियनिग्रह (२) बाह्येंद्रियवृत्ती निरोध (३) उपरती (४) तितिक्षा (५) श्रद्धा (६) समाधान या गोष्टी असव्यात असे सांगून अज्ञानात भ्रमलेल्या मन बुद्धीपासून कांही 'उपाय' योजून सुटका करावी, असे त्याने प्रतिपादिलें आहे. उपाय कोणता? तर 'सेविल्या सद्गुरुपाये । मोक्ष सिद्धचि' असे त्याचे उत्तर आहे. सद्गुरुकृपा संपादून त्यांचेकडून अध्यात्मज्ञानाचा अधिकारी होण्यास मनबुद्धी ही प्रपंचातून काढून घेतली पाहिजे. विषयवासनेंबद्दल उदासीनता यायला हवी. ईश्वर विषयक प्रेम हीच भक्ती होय.

## साधुभेटीची निकड

देहबुद्धीने दुःख निर्माण होते. पण देव विषयक प्रेम-भक्तीने सुख निर्माण होते. म्हणून साधुसंगतीने प्रेमभक्ती करावी. पण त्यासाठी साधुभेट व्हायला हवी, म्हणून साधुभेटीची निकड कवी प्रकट करतो म्हणतो.

> ईश्वरानुग्रहे साधुसंगती ।
> करणे हे उपजे सर्वदाचित्ती ।
> साधुसेवेचि परमआर्ति ।
> नित्यतृप्ती साधुसंगे ।।४३२।।

संसाररुपी समुद्रात अज्ञान हेंच जळ असून त्यांत कामक्रोधाच्या लहरी अनेक आहेत. म्हणून संसारसागर पार करुन जाण्यास गुरुभेट व्हावी, गुरुवाक्य म्हणजेच 'गुरूबोध' झाल्यासच या संसारसागरातून सुटका होऊं

शकेल. कारण गुरु वा साधु हेंच या सागरातून पैलतीरी नेणारे नावाडी आहेत. ते ज्ञानरुपानें तारून नेतात म्हणून संत, साधु, सज्जन यांची संगती धरावी. रंगनाथस्वामींची सज्जन - संगतीची थोरवी या प्रकरणात सविस्तरपणें सांगितली आहे. अध्यात्मविचारात गुरुकृपेपूर्वी आणि गुरु–कृपेनंतरही संतसज्जनांची संगती निरंतर असायला हवी, याला खूप महत्व आहे. कारण जीवाला स्मरण आहे ते संसारातील अनित्य विषयाचे नि त्याविषयीच्या अज्ञानाचें त्यामुळे पुन्हा पुन्हा साधकाला ब्रह्मविषयीचे स्मरण करुन देण्याचे काम संत-सज्जन करीत असतात, साधकाला साधनावस्थेत तर सत्संगतीची खूपच आवश्यकता आहे. ती नसेल तर मी गुरुपुत्र आहे हेही तो विसरतो. गुरूचा विसर पडणें हाही गुरुद्रोहच होय, असे अनेक संताचे सांगणे आहे. त्यादृष्टानें गुरुभेटीची निकड आणि संत-संज्जनांचा सहवास अत्यंत मोलाचा आहे. 'सत्संगे होय मुक्तिप्राप्ति । म्हणोनि सत्संगती सर्वदा करी' असे कवीनें म्हटले आहे. तो पुढे म्हणतो.

जैसे निधिलाभे अतिसुखआहे ।
तैसे क्षणार्धे सत्संगे होय ।
परी विषयसुख नश्वर आहे ।
सत्संगे पाहे परब्रह्म ॥५२९॥

संत साधू- सज्जन हे अज्ञान दुर करतात. अज्ञान संपले की दुःख संपले. मग ब्रह्मानंदे सुखप्राप्ती होते. सद्गुरु आपल्या कृपाकटाक्षाने साधकावर सबाह्य अभ्यंतरी ज्ञानाचा प्रकाश टाकतो आणि त्याचे अज्ञान दुर करतो. सद्गुरु कोणावर कृपा करतात? – तर, सद्गुरु हे सच्छि–ष्याला जवळ करतात, त्याचेवर कृपा करतात, हा सच्छिष्य कसा हवा? – कवी म्हणतो.

ऐसी चित्तशुद्धी निर्मळ ।
बोलणे पाहणे जयाचे प्रांजळ ।
कदा कल्पांती नव्हे कुटिल ।
वर्तती सरल इंद्रिये ज्याची ॥ ६४१ ॥

इथें सच्छिष्याचे सद्वर्तन निरुपिले आहे. हा सच्छिष्य वैराग्यवंत हवा तोही कसा? तर–

जया नावडे इंद्रियवर्ग ।
जगा नावडे देहसंग ।
देहाचाची मानी उबग ।
सर्वार्थांचा संगु देहयोगे ॥६५८॥

अशा सच्छिष्याला नि वैराग्यवंताला 'उपदेश' होतो. कवी सांगतो.

सच्छिष्य आणि वैराग्यवंतु ।
सांगताचि ज्ञान चढे त्यांच्या हातु ।
म्हणोनि ते विज्ञान हा फलितार्थु ।
निश्चितार्थु बोलिला ॥७१७॥

पण अशा शिष्याला गुरुभेटीशिवाय, गुरुकृपेशिवाय ज्ञानप्राप्ती होत नाही, साधकाला गुरुभेट ही त्यादृष्टीने महत्वाची ठरते,

### वासनाक्षयात 'सुख'

जीव वासनेत गुंतलेला म्हणून तो दुःखी, विषय 'सुख' सेवनानें तो भ्रमात बुडून जातो. म्हणून विषय वासनांचा क्षय व्हायला हवा. तो झाला तरच ज्ञानमार्गाविषयी प्रेम जडून सुखप्राप्ती होते. तीर्थ, यज्ञ, तप, दान इ. करण्यातही सुख नाही. सुख कशात? तर वासनेची निवृत्ती होण्यात नि देवाविषयी भक्तीभाव दृढ होऊन त्याचे प्रेम वाढू लागण्यात सुख आहे. कवी म्हणतो.

जरी सर्वत्र निवृत्ती झालीं ।
तरी सुखाची संपत्ती हाता आली ।
अणूमात्रही दुःखबोली ।
कदाकाळी नाईके ॥९०६॥

राज्य, वैभव, संपत्ती सत्ता हे सर्व उद्भवतात आणि नाहीसेही होतात, त्यामुळे दुःख होते. म्हणून त्यांचे देणें घेहीही संपावे आणि चित्तस्थिर करून केवळ त्या परमेश्वराचीच आळवणी करावी. 'देह बुद्धीने जे जे करी । तें तें दुःखास्ति भरोवरी' असे कवी सांगतो.

इथे वसिष्ठांनी रामचंद्राच्या निमित्ताने प्रपंचात देहबुद्धी ठेवून दुःखभोगत असलेल्या असंख्य साधकांना देह बुद्धीतून निवृत्त होण्याचा उपदेश केला आहे. त्याचे महत्व एवढे आहे कीं देहबुद्धी मावळल्याशिवाय आत्मबुद्धी उदयत नाही देहबुद्धी मावळेल केव्हां ? – तर वासनाक्षय होईल. तेव्हां म्हणून वासनाक्षय व्हावा, तर आत्मबुद्धीने परमात्म्याचे प्रेम लाभेल, आनद होईल, असे तत्व ते सांगतात. अंतर्मना-तील ' देह–उपाधी ' संपल्या नाहीत तर देहाच्या बाह्य स्वरुपातील 'परमार्थशृंगार ' काय उपयोगाचा? कवी म्हणतो

अंतरि अतिदुःखे असे भरला ।
बाह्य थोर समारंभ केला ।
कडु दुधिया गुळे माखिला ।
अंतरी जाला गोड काये ॥९४८॥

तेव्हां वासनाक्षय होणें महत्वाचे. तरच ईश्वरसुख प्राप्त होईल.

देहनाश झाला तर आत्म्याचा नाश होतो, हेही अज्ञानाचेच लक्षण आहे. आत्मा अविनाशी आहे त्याचे स्वरुपही वसिष्ठ सांगतात. कवी म्हणतो :

पदार्थ जळे जाते न जळे ।
आतप तापल्या न पोळे ।
उदकी बुडाल्या न विरे जळे ।
नव्हे मैळे मळादिकी ॥९७९॥

पुढे आणखीं कवी सांगतो कीं,

उत्पत्ती स्थिती आणि नाश ।
हे आत्मयाच्या ठायी भ्रमांश ।
आत्मा सर्वदा अविनाश ।
नाही लेश जन्ममरणाचा ॥९९७॥

अनात्म ही देहबुद्धी. त्यायोगे प्रपचविचार आणि प्रपंचामुळे दुःखभोग. आत्मा हा त्यापासून खूपच वेगळा. तो कसा ? कवी सांगतो :

जया कालत्रयी व्यथा नाही ।
तोचि ते सर्वदा शिवरुपपाही ।
दुःख व्यावृत्ति केलियाही ।
कोणे समयी दुःखरुप नव्हे ॥१०२०॥

रंगनाथस्वामींनी वेदातील तत्वाचाही उल्लेख पुढे केला आहे. ' सर्वं खलु इदं ब्रह्म ' हे स्वरुप तो सांगतो. त्या ब्रह्मचाच्या प्राप्तीसाठी ज्ञान हवे. नि ज्ञानप्राप्तीसाठी गुरुभेट–गुरुकृपा व्हायला हवी, नि गुरुप्राप्तीसाठी साधकाचे अंगी वैराग्य निर्माण व्हायला हवे–असा हा सर्व अध्यात्म विचार आहे. कवी सांगतो :

वैराग्येविण विवेक नाही ।
वैराग्येविण निर्मूळ नाही ।
वैराग्येविण न घडे कांही ।
भक्तीज्ञान कही उपजेचिना ॥१०९९॥

–हा विचार यांत सर्वात महत्वाचा. हीच साधकदशेतील प्रारंभावस्था होय.

## २. ' जगन्मिथ्या ' तत्व हे ज्ञानाने कळले....

रंगनाथस्वामींनी दुसऱ्या प्रकरणात ' ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ' या तत्वावर निरुपण केले आहे. वसिष्ठांनी रामचंद्राला हा उपदेश करताना ' जगन्मिथ्या ' हे ज्ञानाने कळते अज्ञानामुळे जगाचे जगाचे जे मायारुप आहें तेंच सत्य असल्याचा भ्रम होतो. म्हणून ' तत्वनिवाडा ' करुन दाखविला आहे

सद्गुरु निजानंदांना प्रार्थून कवी सांगतो कीं, वैराग्याशिवाय ज्ञानप्राप्ती नाही हे मागील प्रकरणी विशद केल्यानंतर ज्ञानाविण जिवित व्यर्थ असल्याने यथार्थ–ज्ञान कोणते ?– याचा विचार इथे केला आहें. जग हे 'मिथ्या ' आहें ; सत्य नव्हें ही गोष्ट खात्रीपूर्वक पटल्याशिवाय जगाविषयीचा प्रापंचिक मोह संपत नाही. हा सर्व खेळ मनाचा आहे कवी सांगतो :

जगमिथ्यापणे दर्शन ।
अथवा सत्यत्वे होय भान ।
या दोन्हीसी मनचि कारण
मनेचि बंधन मोहही ॥४०॥

रामचंद्राने वसिष्ठांना प्रार्थना केली कीं, मला ही जगमिथ्यास्थिती सांगावी. त्यावर गुरुवर्य वसिष्ठ आनंदून म्हणाले : प्रपंच, संहार, उत्पत्ती हे सर्व मनानेच उत्पन्न केलेलें विषय आहेत.

### स्वस्वरुपाच्या विस्मरणाने भ्रमाविषयी माया–मोह...

मनास हे जग सत्य कां वाटते ? तर कवी म्हणतो :

विस्मरण स्वरुपाचे ।
तोचि संसार विभ्रम सांचे ।
विशेष भ्रम म्हणोनियाचे ।
विभ्रम ऐसे अभिधान ॥ मूळ संस्कृत श्लोकाचा अनुवाद ॥

गुरुवर्य वसिष्ठ सांगतात कीं, स्वप्नांत ज्याप्रमाणें भ्रम सत्य वाटतो, त्याप्रमाणें अज्ञानामुळे हे जग सत्य वाटते, पण मुळात ते 'मिथ्या ' आहे. सगळा संसारच मुळी ' संकल्प–भ्रम ' असा आहे. मनाचे तरी स्वस्वरुपाशी विस्मरण कां? तर मन प्रपंचोन्मुख असल्यानें ते ब्रह्मस्वरुपाला विसरते प्राण आणि वासनांच्या संयोगानें हे मन सैरावैरा धावते. मन निश्चळ राहिलें तरी वासना जागृत होतात, आणि मनाला त्या अनावर करतात.

रामचंद्राने विचारले, मननिवृत्ती कशी होईल ? तर वसिष्ठ सांगतात कीं, त्यासाठी साधन करावे लागेल.

या प्रकरणात साधनविषयक विचार आलेला नाही. मात्र 'जगन्मिथ्या ' स्वरुप हे आहे कसे ? मूळ ब्रह्मरुप आहे कसे ? अज्ञान, माया–मोह. भ्रम यांचे स्वरुप काय? याविषयीची चर्चा सविस्तरपणे केली गेली आहे ती करताना पुनरुक्ती पुष्कळच असल्याने अध्यात्मविचारांच्या

## माया आत्म्याचे आच्छादन

वसिष्ठांनी रामचंद्रास मायेचे स्वरुप कोणते ? हेही विशद केले आहे कवी सांगतो.

हे थोर आश्चर्य रघुराया ।
अतिविचित्र हे दृढावली माया ।
विश्वाते माहे करुनिया ।
करी आत्मया आच्छादन ।। १९५।।

हे आच्छादन कोणते? तर (१) माया (२) अस्मिता (३) राग (४) द्वेष (५) अभिनिवेश – हे पंचप्रकार मिळून जी अविद्या आहे तिचे हे आच्छादन आहे. या अविद्येनेच स्वस्वरुपाने विस्मरण घडविते. ही तिचा केवळी शक्ती आहे तिचे स्वरुप नि कार्य ही कवी सांगतो. माया ही स्वस्वरुपाचे विस्मरण घडविते, अस्मिता ही विपरितभावना निर्माण करते, राग म्हणजे देहाचे ममत्वच; द्वेष हा ममत्वाला प्रतिकूल आणि अभिनिवेश म्हणजे अहंकार. हे पंच-प्रकार म्हणजेच प्रपंच होय विश्वमोहिनी म्हणतात ती हीच
ही माया काय करते? – तर कवी सांगतो.

हेचि विचित्रपण मायेचे ।
आच्छादन करी स्वसिद्धाचे ।
प्रकाशन करी विपरिताचे ।
जेणें जनाचे ज्ञान भ्रंशे ।।२०८।।

विश्वाचे असत्यपण तरी कां वाटते? तर जे जे मन आणि इंद्रियांना आहे असे वाटते, ते खरे पाहता नाही. खरीतर हेच मिथ्यत्वाची - खूण आहे. कवी सांगतो.

तैसे भ्रममूळचि जे सर्व जग ।
भ्रमेचि भासतसे सांग ।
विचारुनि पाहता चांग ।
तंव ते व्यंग मिथ्यापणें कळते ।।२२४।।

तर जग हे असे. जागृतीत जसे स्वप्न दिसत नाहीं, तसे या जगाच्या भ्रमस्वरुपाचे आहे. पण ज्ञान झाले कीं, जगाचे मिथ्यात्व कळते. इंद्रियाला ग्राह्य ते ते नश्वर, मिथ्या. साहृय्याने प्रपंच भ्रम वाटत असेल तर ब्रह्म आणि प्रपंच यांत सादृश्य काय? खरे तर सादृश्य नाही. कारण ब्रह्मनिर्गुण, पूर्णानंद, व्यापक असे आहे. तर प्रपंच वस्तु-मात्राचा असुन तो अपूर्ण, दुःखकारक आणि विनाशी आहे. म्हणून सादृश्य.नेही ब्रह्म आणि प्रपंच एक नव्हते. हे अज्ञान निरसून जाण्यासाठी गुरुपदेशच हवा. गुरुकृपेच्या ज्ञानाने 'ब्रह्मसत्य जगन्मिथ्या' हे कळतें. आकाशात ढग येतात तशी ब्रह्मस्वरुपावर आच्छादलेली ही माया होय. कवी म्हणतो.

अभ्रेदुजेपण नाही आले ।
अभ्रे आकाशपण नाही गेले ।
अभ्रचि स्वयें नाशिले ।
व्योम उगले जैसे तैसे ।।३८०।।
तैसे शुद्ध आत्मयाच्या ठायीं ।
गडविश्व भासतसे पाही ।
आणि पावतसे लयोही ।
आत्मा अनपायी जैसा तैसा ।।३८१।।

ब्रह्मावर विश्वाचा लेप, म्हणून हे विश्व मिथ्याच होय, म्हणून ब्रह्मसुख हवें असेल तर निर्विकल्प - समाधीने मूळ स्वरुपाची ऐक्य पावूनच ते मिळते.

## प्रपंची मन मावळावे : ब्रह्मपदी मन जडावे .....

तिसरे प्रकरण 'मनोलय' हे असून यांत साधनमार्गांचा विचार केला आहे.

'मन हे आवरेना की वासना वावरे सदा' असा विचार समर्थांनी आपल्या करुणाष्टकात बोलून दाखविला असून तिथे 'बुद्धी दे रघुनायका' अशी प्रार्थनाही केली आहे. जीव परमार्थ प्रवृत्त होण्यातल्या या दोन अडचणीच आहेत. मन प्रपंचात अडकलेले आणि वासना वाढत चाल-लेली मग मन, चित्त, बुद्धी देवाकडे कशी वळणार? इथेही तोच विचार प्रकटला आहे.

वसिष्ठांनी रामचंद्रास मनोलय आणि वासनाक्षय करण्याचा 'साधनमार्ग' सांगितला आहे. या प्रकरणात

## मनोलय साधनमार्ग

ब्रह्माविषयी मनोलय व्हाव आणि प्रपंच असलेली वासना कमी व्हावी, तिचा संहार व्हावा, हा मुख्य विचार इथे सांगितला आहे. मनोलय झाल्याशिवाय 'सुख दुःख समेकृत्वा' जगण्याचा विवेक सुचणार नाही.वसिष्ठ सांगतात, आत्मा शुद्धच आहे. पण मन मात्र संकल्पभावनेने वस्तु-मात्राच्या मागे धावते. त्यामुळे ब्रह्माशेजारी राहूनही मनास मायेच्या आंधळेपणाने ब्रह्म दिसत नाही. ब्रह्मापासून हे मन स्वतःला 'अहं म्हणविते आणि त्यामुळे तिथून ही सृष्टी त्याला ब्रह्माविगळी वाटू लागते. ब्रह्म एकच पण मनाच्या प्रवृत्ती दोन. एक वृत्ती मलीन. ती द्वैत भासविते. देहसंकल्प त्यामुळेच स्फुरतो. दुःख प्राप्ती त्यामुळेच होते. दुसरी वृत्ती

शुद्ध स्वरुपाची. ती निर्माण होताच मनास शांती समाधान लाभून आनंद मिळतो. विश्वपसारा हा मनाचाच खेळ होय म्हणून मनाची एकाग्रता देवाविषयी करणे हाच महत्वाचा साधन–विचार आहे.

मने उत्पत्ती मने स्थिती ।
मने संहार मने व्यवहार गती ।
ज्ञानाज्ञानाची प्रतीती ।
सकळही भ्रांतिमने करुनि ॥१०८॥

अशीही मनाची अवस्था मन हाच प्रपंचाचा कर्ता आहे. कर्म, अकर्म, पाप - पुण्य हा सारा मनाचाच खेळ होय. मन देहालाच आत्मा मानते आणि कोटीकल्पनातून तेंच देहाला अधोगतीलाही नेते. शरीरानें काम केले. याला महत्व नाही. मनच मूळ त्याठायी असते. मनाचा वासना–क्षय व्हायला हवा. कवी म्हणतो.

अगा मुख्य वासनेचि करुन ।
बद्धता पावतसे मन ।
मुक्त जाणावे निर्वासन ।
हेंचि खूण यथाचि ॥१५६॥

## ' अंतर्मुखता ' हवी

मनाचा वासनाक्षय कशानें होईल? या रामचंद्राच्या प्रश्नावर वसिष्ठ सांगतात कीं, मन अंतर्मुख केल्यावर चित्रातील भ्रमदुर होऊन वासनाक्षय होईल. कारण देहधर्म म्हणजे मनाची बहिर्मुखता होय. कवी सांगतो.

तरी सर्वदा विषयांचे अभिलाषण ।
सर्वदा देहादिपदार्थ भान ।
सर्वदा सत्यत्वे दर्शन ।
हेंचि पूर्वबहिर्मुखता ॥१९७॥
मन हे वृत्तीतून प्रकटते. कवी सांगतो.
'म्हणौनि आधी मन जिंकावे ' कारण.
मनोजये ब्रह्मता सिद्ध ।
मनोजये प्रपंचाचा बाध ।
मनोजये ब्रह्मात्मबोध ।
जाये अबोध मनोजयी ॥२३८॥

मनोजय कसा व्हावा ? – तर त्यासाठी भगवत् भजन करावे आणि संताची संगती धरावी. शिवाय सद्गुरुंना शरण जावे. सत्संग हवा, आत्मविद्येचें ज्ञान हवें या दोन्ही गोष्टी सद्गुरुसान्निध्यात मिळतात. कवी सांगतो.

संकल्प त्यागे लयोमनाचा ।
मनोलयें उपरमुद्वैताचा ।
मग ब्रह्मचि उरे तेथ सर्वाचा ।
होमसाचा उपरमु ॥४३०॥

वित्तनाशासाठी 'अष्टांग योग' ही वसिष्ठ सांगतात पण 'ज्ञानप्राप्ती' ही सर्वात महत्वाची तिनेच 'मनोलय' होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

## अज्ञाननाश होईल तेव्हांच 'वासनोपशम' होईल ....

चौथ्या 'वासनोपशम' या प्रकरणात वासनेचा क्षय कसा होईल हाच साधनमार्गातील – मनोलयाशीसंबद्ध असलेला – असा पूरक विचार ते सांगतात.

वसिष्ठ सांगतात कीं, एकदा विश्व हे मिथ्या आहे हे कळले म्हणजे आणि ते सत्य नव्हें अशी खात्री पटून त्या विषयीचा हा भ्रम दुर झाला म्हणजे त्या जगाविषयी वासना राहतच नाहीत. म्हणून प्रथमतः विचार बुद्धीने ज्ञानतत्व ओळखावे. कवी म्हणतो.

यालागी गा रघुपती ।
आत्मविचारु करावा सर्वार्थी ।
विचारे न भासे विश्वभ्रांती ।
तद्भावे शांतिवासनेंची ॥८३॥

मग रामचंद्राने विचारले कीं, हा आत्मविचार कोणता? त्यावर वसिष्ठ म्हणाले, मी कोण? हे विश्व म्हणजे काय? – याचा विचार म्हणजे आत्मविचार होय. वासनाउद्भव णार नाहीत याचे साधन सांगतो, असे म्हणून ते सांगतात की,

अगा सर्वब्रह्मोतिभावना ।
तेणे निःशेष नाश होय अज्ञाना ।
कार्य ते विश्वभास जाणा ।
ते कार्य कोणाआश्रयें राहे ॥१५७॥
कारण ते अज्ञान जाण ।
कार्य ते विश्वभास पूर्ण ।
कारण नासे विश्वभासस्वप्न ।
न भासे संपूर्ण रघुवर्या ॥१५८॥
सदासर्वदा करिता ब्रह्मभावना ।
अज्ञान नाशे गा रघुनंदना ।
तेथे विश्वभास रचना ।
नाहींच क्षणामाजी होये ॥१६०॥

अज्ञान हेंच वासनाबिन होय. म्हणून मुळातच त्या अज्ञा–नाचे छेदन करावे. आणि संसाराविषयीची वासना ब्रह्म–विषयी लावावी. त्यासाठी वसिष्ठांनी सत्समागम आणि सत्छास्त्रश्रवण हा उपायही सांगितला असून त्यायोगें

सुखसंपन्नता प्राप्त होते, असे प्रतिपादन तें करतात, दुसरा उपाय म्हणजे कर्मविषयी असंग ठेवावा म्हणजे वासनांचा नाश होतो असेही ते सांगतात कवी म्हणतो.

अगा शरीर वाचा मानसे ।
जे जे कार्य निपजत असे ।
ते अधिष्ठान पंचक अपैसे ।
होतचि असे शुभाशुभ ॥२३१॥

पदार्था विषयीची सत्यता वाटू लागल की, तिथेच वासना उद्भवणारच. म्हणून पदार्थ मिथ्या वाटायला हवा म्हणजे वासनाक्षय होईल. मृगजळ आहे हे कळल्यावर तहानेची वासना निर्माणच कशी होईल? असादृष्टांतही कवी देतो. वासनेचा तिसरा उपाय म्हणून वसिष्ठ सांगतात कीं, शरीराला खरे मानल्याने वासना उद्भवतात म्हणून शरीर हे क्षणाक्षणाला नाश पावत आहे, हे तत्व विचारांती समजून घ्यावे, म्हणजे शरीराविषयी वासना निर्माण होणार नाहीत वासनेंच्या मुळाशी मनोभावना आहे. पण ब्रह्म हे ब्रह्मरुपाने पाहतात त्यांना ते जेसेतैसेच आहे पण ब्रह्माला संसार म्हणून पाहतात त्यांना ते भ्रमरुपच आहे. म्हणून ब्रह्माकडे आपण कोणत्या भावनेने पाहतो हे महत्वाचे.

मन आणि वासना हे दोन्ही देहबुद्धीचे विचार आहेत म्हणून ही देहबुद्धीच आत्मस्वरुपाकडे लावावी हा अध्यात्म विचार इथे स्पष्ट झाला आहें. त्यासाठी गुरुपदेश ऐकून आत्मस्वरुपाविषयी वृत्ती एकाग्र केल्यास वासना क्षय होतो. वासनाक्षयातच जीवन्मुक्ती आहे,असे वसिष्ठानी सांगून साधन मार्गातला हा विचार रामचंद्राच्या निमित्ताने सर्वच साधकांना उपदेशीला आहे. साधकाचा आचारधर्म हा यातूनच देहबुद्धीला प्रपंचातून मावळून परमार्थाकडे प्रवृत्त करण्यास उपकारक ठरतो.

## ५. 'मीच ब्रह्म' याची प्रचीती म्हणजे 'आत्ममनन'

पांचव्या प्रकरणात 'आत्ममनन' विचार प्रकटला आहे. भक्तीत बाह्योपचार विधीला गौणत्वच आहे. कवी म्हणतो :

म्हणौनि बाह्य सेवा ते गौण ।
मुख्य सेवा ते आत्मानुसंधान ।
ते होतसे वृत्युत्पत्तीन ।
हेचि खूण ज्ञातया ॥८५॥

मनोलय आणि वासनाक्षय व्हावा यासाठी मागील प्रकरणात सद्‌गुरुकडून सच्छास्त्र श्रवण करावे, असे प्रतिपादिले होते. तसा 'गुरूपदेश' झाला म्हणजे त्याची 'प्रचीती' यायला हवीं. आणि ती येणे म्हणजे आत्मानुसंधान होय. कवी सांगतो :

तेचि प्रमेयासंभावना ।
कैसे हा संदेह जाणा ।
उपजला त्यालागीं साधना ।
आत्ममनना प्रवर्तला ॥८०॥

– आपण ब्रह्म आहोत, याची प्रचीत यायला हवी ती येण्यासाठी आत्ममनन प्रवृत्ती व्हावी. आत्म्याचे चिंतन म्हणजे आत्ममनन होय. वसिष्ठ म्हणाले, मनोवासनेमुळे आत्म्यालाच जो 'मी देह' असे म्हणत होता, तो आत्ममनन करताना देहाला आत्म तत्व मानतो. शुद्धज्ञानानें त्याला देश–काल–वस्तु यातील नश्वरता ध्यानी येते. त्याला जागृती होते आणि त्यामुळे सत्यस्वरूप कळून येते. कवी सांगतो :

जागृति प्राप्त होताचि अपरोक्षज्ञान ।
जेणें बोधे ब्रह्म ते आपण ।
ऐसे बोधिताचि दृश्यमान ।
नाशे स्वप्न जागृति जैसे ॥१५६॥

जागृत्ती मात्र झाली नाही तर प्रपंचाविषयीची आसक्ती– म्हणजे प्रपंच स्वप्नावत, भ्रममूळ असूनही तो सत्य आहे. असे. वाटून त्याविषयीचा वाटणारा जिव्हाळा – यागोष्टी मात्र कधीच संपणार नाहीत. म्हणून कवी सांगतो.

या लागी देहेंद्रियाविरहित ।
मी आत्मा निर्गुण नित्यानंदभरित ।
ऐसा युक्तिकरुनि होय निश्चितार्थ ।
ते निश्चित आत्ममनन ॥१६६॥

ही भावना झाली कीं, मन आणि वासना देहाबाहेर राहतात आपत्ती आली तरी ती देहाला आली असे मानून त्यापासून अलिप्त राहता येते. म्हणजे विश्वातील वस्तुविषयोचे प्रेमच संपूनजाते 'भावाभावविहीन' अशीअवस्था होते, मीच सर्वत्र भरुन राहिलो असून सर्वाठायी आणि सर्वव्यापी आहे, याची प्रचीती येते त्यामुळे जिवित्वी उल्हास वाटतो. कवी सांगतो.

आपण ब्रह्महेस्वतः सिद्धअसे ।
परीवासननेनें व्यवधानी मन प्रवेशे ।
तेणे आपणाआपण न प्रकाशे ।
तेणेचि भ्रमंशे स्वरुपाहूनी ॥२३१॥

हे आत्ममनन होणे हा ज्ञानप्राप्तीचाच साधनविचार होय. हे आत्ममनन झालें की मुक्तता प्राप्त झाली, असेही वसिष्ठ सांगतात.

## ब्रह्मस्थिती हीच 'शुद्ध निरुपण' होय - - - - -

सहाव्या प्रकरणात 'शुद्धनिरुपण ' विचार येतो. प्रपंच उपाधीचाक्षय झाल्यानंतर ब्रह्म संग्रहार्थ म्हणजे लोक स्थितीलापोहोचलेल्या साधकानेंकसे वागावे? तर कवी सांगतो

तैसा स्वयें जो ब्रह्मनाला ।
नित्य ब्रह्म सुखीचिधाला ।
त्याचे मन विषयभोगाला ।
कोण्हेही वेळा इच्छी ना ॥१००॥

या साधकाने निरपेक्षभावनेने, निर्विषयवृत्तीनें केवळ लोक-कल्याणर्थकार्य करीत असावे, भगवत्‌चिंतन करीत रहावे. समर्थ रामदासांनी ज्याप्रमाणें 'विदेही पणे मुक्ती भोगीत जावी, असाध्यात्मविचार सांगितला आहे. तीच भावना, तोच विचार रंगनाथस्वामी स्पष्ट करतात म्हणताना.

ऐसा अंतरी असोन ।
देही असे बाह्य संरंथेकरुनी ।
बाधु न पवे सर्वथा जाण ।
विदेही आपण म्हणोनिया ॥१२५॥

हा साधक अंतरी ईश्वराचे ध्यान करतो आणि बाहेर लोककल्याणाच्या बुद्धीने वावरतो. ध्येय, ध्याता, ध्यान, याचे वेगळेपण त्याचेठायी उरलेंले नसते.

ब्रह्मस्थितीला पोहोचलेंल्या जीवन्मुक्त पुरुषाचेच लक्षण वसिष्ठांनी इथे रामचंद्रास सांगितले आहे. ती ब्रह्मस्थिती अतिशुद्ध निर्मळ असून प्रपंच - उपाधी तिथे उरत नाही. ज्ञानाने हे जाणता येते. या ज्ञानाचेही दोन प्रकार आहेत (१) शुद्ध ज्ञान ते चैतन्यस्वरुप होय. (२) वृत्तिज्ञान - ते दृश्यभासात्मक आणि मिथ्या स्वरुपाचे होय. त्यातील वृत्तिज्ञान हे क्षणिकसुख देत असल्याने शुद्धज्ञान निवडावे. वृत्तिज्ञानाला निर्विषय केले. कीं हे शुद्धज्ञान मिळते. आणि त्यायोगे आत्मसुखही प्राप्त होते. सत्ता - ज्ञान आनंद या तिन्ही स्थिती त्याचेठायी एकत्र होतात.

देह प्रारब्धकर्मानें बद्ध असल्यानें त्या विषयीची बुद्धी टाकून देऊन साधकाने स्वस्वरूपी म्हणजे ब्रह्मस्थितीशी एकरुप रहावे. तरच ब्रह्मसुख लाभेल. लोक देवाला आत्मा समजून ब्रह्मस्वरुपाला विसरतात. म्हणून कवी सांगतो.

देहादि इंद्रियासहित ।
जे जे दृश्य प्रप्रंचजात ।
ते सर्वही ब्रह्मसदोदित ।
जाण निश्चित अंतर्बाह्य ॥३८१॥

ब्रह्मावेगळी भावना करणें हीच भेदबुद्धी होय. त्यामुळे ब्रह्माविषयी विपरित भावना निर्माण होते. कवी सांगतो.

इयेते सांडुनि सर्वथापाही ।
ब्रह्मा व बोध सर्वत्र राही ।
नकोचिंतु आनकाही ।
मन देही विदेहीतुंचि ब्रह्म ॥३९३॥

ब्रह्म हेच शुद्धस्वरुप म्हणून त्याविषयीचा विचार स्पष्ट झाला आहे.

## आत्मसाक्षात्कार 'आत्मार्चन' निरुपण - - -

सातव्या प्रकरणात 'आत्मार्चन' म्हणजे ब्रह्मीच सदास्थित राहणे ही जी आत्मसाक्षात्काराची अवस्था आहे, तिचा विचार सांगितला आहे. कवी सांगतो.

अगा जे कां आत्मानुसंधान ।
तेंचि तें जाण आत्मार्चन ।
उपचारे बाह्यभजन ।
तें जाण गौण मंदाप्रति ॥२१॥

गुरूपदेश झाल्यानंतर साधक सतत एकांतात परमात्म्याचे चिंतन करीत राहतो, तींच अवस्था म्हणजे आत्मार्चन. साहजिकच देहादिदृश्ये त्याला तिरस्कारणीय वाटूं लागतात तो तरी कां वाटतो? तर कवी सांगतो.

अहो आपुले स्वरुप प्रत्यक्ष असे ।
परी ते भ्रमे व्यवधानिलेअसे ।
मन प्रत्यङ्‌मुख केलिया अपैसे ।
ब्रह्मसर्वांशे आपणचि पैं ॥४०॥

अशा स्थितीत साधक राहात असता त्याला ब्रह्मस्वरुप तर कळतेच. पण सृष्टीचा कर्ता, निर्माता, नियंता, पालविता, संहारकर्ता हा जो परमेश्वर आहे त्या परब्रह्माचेही स्वरूप कळते. त्यामुळे कवी पुढे म्हणतो

हेंचि जाण पां आत्मार्चन ।
जे करी निरंतर आत्मानुसंधान ।
स्वस्वरुपी अवस्थान ।
येर तो गौण बाह्यभक्ती ॥१०४॥

— तर अशा अवस्थेत साधकाला भक्तीच्या उपाधी-उपचारांची आवश्यकता उरत नाही. आत्मा हा आनंदस्वरुप असल्यानें त्याचेशी ऐक्य घडताना आनंदस्थिती प्राप्त होते. तिथे अज्ञान नाश पूर्णत्वानें झालेला असतो, ज्ञान-ज्ञाता-ज्ञेय हें त्रिविधपण हि उरत नाही. इतकेच काय ब्रह्मा-विष्णू-शंकर ही नामउपाधी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने भिन्न भिन्न वाटत असली तरी त्यांचे स्वरुप अंतरी एकच आहे, हे कळते. या ब्रह्मरुपाची पूर्णावस्था प्रकट करताना कवी म्हणतो.

तैसे सर्वात्मक ब्रम्हज्ञाण ।
विश्व हे नामरुपचि अभिधान ।
परी ते ब्रम्हाचि परिपूर्ण ।
तूंचि तूं निर्वाण परब्रह्म ॥२२६॥

देहेबुद्धी ही आत्मबुद्धीकडे प्रवृत्त झाल्यानंतर या आत्मबुद्धीचा विकास होत राहणं, हेंच ईश्वरी साक्षात्कारचे स्वरुप आहे. त्यादृष्टाने 'आत्म्यार्चन' अवस्था श्रेष्ठ स्वरुपाचीच मानायला हवी.

## 'आत्मनिरुपण' आत्म्याचे स्वरुप कसे?

आठव्या प्रकरणात आम्याच्या स्वरुपाविषयीचे विवेचन करण्यात आले आहे. जीव आणि आत्मा यांचेत अज्ञानामुळे भेदतत्व आल्याचे प्रतिपादन या प्रकरणात रंगनाथस्वामींनी तपशीलवार केले आहे अज्ञान, अविद्यायामुळे सृष्टी विषयीची ममत्वभावना आणि ज्ञानप्राप्तीमुळे मूळस्वरुपाविषयीची सत्यस्थिती हा विषय त्यांने या हीनि मागीलही एकदोनप्रकरणात पुन्हा पुन्हा प्रतिपादला आहे. विषय पटवून देताना मागील प्रमाणाची प्रचिती देत देत तो विषयाचे पुढचे विवेचन मांडतो, ही त्यांची निरुपण पद्धती होय.

'आत्मा कीं लक्षण -- ओळखिजें' ? या रामचंद्राच्या शंकेचे निरसन करताना वसिष्ठांनी आत्म्याचे-- स्वरूपसांगितले ते सांगताना कवी म्हणतो.

तरी तोचि आत्मयाचे स्वरुप जाण ।
जया उपाधिमेळे आले जीव-पण ।
उपाधि निरासे ब्रह्मपूर्ण ।
हेचि खूण परियसी ॥४५॥

जीवाला अहंकाराचा मळ चिकटला असल्याने त्याचे मूळ स्वरुप दिसत नाही. म्हणून हा अहंकार गेला की, जवाचं मूळ स्थिती -- जो आत्मा -- त्याचे स्वरूप कळते, मन, बुद्धी, अहंकार या योगचे तर आत्म्याचे भेदरूप दिसते. ते जीवाच्या स्वरुपात भासते. पण हे तिन्ही जाता मूळस्वरुप--परब्रह्म--ते दिसते. जीव भाव जात नाही तोवर

स्वयें ब्रह्म असोनी ।
भ्रमे आपण जीवत्व आणी ।
तेणे भ्रंशे स्वस्वरुपापासुनि ।
शोच्य सर्वगुणी जीवपणें ॥७३॥

अशी अवस्था होते.

देहादिकाचेनि अभ्यासे ।
ईश्वरासि जीवपणाचे पिसे ।
येऱ्हवी तो स्वयेंचि शुद्ध असे
आत्मा ऐसे जाण रामा ॥९८॥

असेही वसिष्ठ सांगतात.

जो सत्कार्मीचें अनुष्ठान करीत नाही, ईश्वर भजन करीत नाही, साधुपदेश स्वप्नीही पहात नाही, त्याला श्रीसद्‌गुरुराय कसे भेटतील. आणि गुरुभेट झाली नाहीतर जीवस्थिती तरी कशी नाहीशी होईल? आत्म्याची ही जीवस्थिती कां? आणि जीवस्थितीत दुःख कां? याचे विवरण रंगनाथस्वामींनी एका सुरेखदृष्टांताद्वारे दिले आहे. कवी म्हणतो.

जैसे दर्पणाचेनि मळिणपणें ।
मुखासि वक्रविकार होणें ।
अतिमालिन्यें न भासणें ।
दर्पणे चि कारणे प्रकार नाना ॥९३॥
मुखमुखी शुद्धचि असे ।
वक्रादि विरुपभावही नसे ।
परी दर्पणाति सारिखें भासे ।
शुद्ध दिसे जैसे तैसे ॥९४॥

म्हणून सत्कर्माची बुद्धीलावून पहाल तर आत्मोपलब्धी होईल. सत्कर्मे नाहीत म्हणून रुपे भिन्न नि त्यांत दुःखदर्शन असो मूढचेष्टितामुळेच हे दुःख होते, पण अज्ञान संपले की, जीव आणि ब्रह्म हा द्वैतविचार संपतो 'जेणे निरसे हे भवअज्ञान । द्वैनभात नाहीच होय' हा भेद सद्‌गुरुंच्याकृपेने संपतो. कवी सांगतो.

तोचि सद्‌गुरुचिया कृपा दृष्टी ।
विवेक प्रवेश भेदाच्यापोटी ।
तंव तो पावेलय उठाउठी ।
होय भेटी आप आपणया ॥१५६॥

आत्मा आणि जीव खरे तर दोन नव्हेतच - सुवर्ण सुवर्णाचे अलंकार यांत भेद कुठे असतो? देह एकच. अवयवाची नामे भिन्न. तसाच जीव हा आत्म्याचा अविष्कार होय. देहाचा भ्रम गेला तरच आत्मा हस्तगत होतो. मुळात आत्मा शुद्ध - निर्मळ असाच आहे. पण जडजीवासी त्यांची संगती लाभल्याने त्या आत्म्याचे रूपही जड दिसते. पण या आत्म्याचे स्वरूप साधनरुपी प्रयत्न करून पाहता येते. - गायीचे दोहन केल्यावर जसे दुध मिळते, तसें ज्ञानरूपी प्रयत्नानें देहातील आत्मस्वरुप हातो येते. तसे ज्ञानासाठी स्वच्छ बुद्धी हवी. रत्नकुंभ स्वच्छ केल्यानंतर जसा त्यांतील दीपप्रकाश अंतर्बाह्य दिसतो, तशी स्वच्छबुद्धी केल्यास परमात्म्याचे स्वरूप पूर्णत्वाने दिसते. आत्मामूळ स्वरुप असून जीव हे त्यांचेंच व्यक्तरुप आहे.

साखरेची चित्रे असतात. दिसायला ती वेगळी दिसतात असतात. अगदी हत्ती, घोडे, उंट, असतात. पण तोंडात टाकली तर ती सःखरच होय, तसे या आत्मा आणि जीव यांच्या स्वरूपाचे आहे. या आत्म्याचे निरवळ स्वरुप सांग– ताना कवी म्हणतो.

तैसे एकमात्र निरंजन ।
परब्रह्मचि ज्ञानधन ।
विश्वभास तो भ्रम जाण ।
सिद्धांत संपूर्ण इतुकाचि ।।५२२।।

पुढे आणखी सांगतो की,

आईक याचे उत्तर ।
सर्व भूतांचा आत्माअंतर ।
देहेंद्रिय बाह्यप्रकार ।
सर्वांचे अंतर जे आत्मरुप ।।५३१।।
एवंब्रह्मावेगळे कांही ।
अणुमात्र दुजे कांही ।
ऐसे जाणोनि सर्वदाःही -
न देखे कांहा आपणाविण ।।५६५।।

असे वसिष्ठांनी रामाला 'आत्मरुप' सांगताच रामानें ज्ञान-चक्षुनें सर्वत्र पाहिले, तेव्हा त्याला सर्वत्र आत्मस्वरुपच भरुन राहिल्याचे दिसून आले आणि तो ब्रह्मानंदाच्या डोह बुडाला, सुखीझाला. वसिष्ठांनी त्याला दृढालिंगन दिले.

## ब्रह्मानंदी परिपूर्ण झालेला : तो 'जीवन्मुक्त होय'

नवव्या प्रकरणात ब्रह्मानंदी सदास्थित राहून देहे– बुद्धीचा आत्मबुद्धीत पूर्णविलय पावलेला स्थिती म्हणजे 'जीवन्मुक्त - स्थिती' होय, असे प्रतिपादन करण्यात आले आहे. संसारपाश हा तिथें पूर्णपणे गळून पडलेला असतो. ही अवस्था प्राप्त होण्याला सद्गुरुभेट, गुरुपदेश, गुरुकृपा हीं कारणीभूत झाली म्हणून रंगनाथस्वामींनी सद्गुरुविषयीचा कृतज्ञतेनेभरुन राहिलेला प्रेमभाव विस्ताराने प्रकट केला आहे. तो म्हणतो.

अहो सद्गुरुचेनि दर्शन ।
घडती यथा श्रवण मनने ।
निदिध्यासने परिपाक होणे ।
गुरुखुणे साक्षात्कार ।।६७।।

कवी पुढे सांगतो कीं, सद्गुरुनाथ हेंच परब्रह्म होत त्यांचे चरण सेविताना भवार्णवातून आपण तरुन जातो आणि संसारदैन्य दृष्टीस पडत नाही. गुरुवचन हाच थोरधर्म असून त्याचे भजन करणें हीच मुख्य समाधी होय. ( कवीने या प्रकरणीच्या १५६ ओव्या 'गुरुमहिमा' सांगण्यात खर्ची घातल्या आहेत)

## जीवन्मुक्त हा स्वेच्छने वागतो

गुरुविषयीची कृतज्ञता व्यक्त केल्यानंतर कवीने मुख्य विषयाला आरंभ केला आहे. जीवन्मुक्त पुरुष कसा असतो? त्याची लक्षणे कोणती? असा प्रश्न रामचंद्रानी केला, त्यावर वसिष्ठ म्हणाले,

वास्तव आत्मस्वरुप जाणोन ।
तद्रुपे रहावे स्थिती करुन ।
सर्वत्र वाणें चिदानंदघन ।
परिपूर्ण पुर्णानंदे ।।१५९।।

असा तो असतो. शिवाय तो स्वच्छेने वागतो. ब्रह्मरुप कळल्याने त्याला सर्व अशा तृणवत् वाटतात. कवी सांगतो.

जगी असोनिया जनपणें ।
नाही जयासि जग होणें ।
जगचि जयासि ब्रह्मपणे ।
तिये खुणे परिस पां ।।१८।।

असा तो राहतो. विश्व हे ब्रह्मचि आहे ही खूणागांठ त्याला पटलेली असते. त्यामुळे त्याच्या मनाला समाधान शांती नि लाभलेली असते त्याला शत्रु नि मित्र हा भेद उरत नही. त्यांच्यां अंगी संतत्व आलेली असते. त्याची बुद्धी द्वैत नसते तो सदैव परब्रह्माशी विश्रांती पावलेला असतो. कर्ता आणि कर्तृत्व यांचा मळ त्याला स्पर्श शकत नाही. त्याचे विकारहो नष्ट झालेले असतात. तो राहतो कसा? तर, कवी सांगतो.

सर्वातीत पणे प्रकाशत ।
सर्व साक्षी होऊनिया रहात ।
सूर्य जैसा सान्निध्ये अलिप्त ।
तसा वर्तत असोनि देही ।।२४६।।

तो कर्म फळापासून देखील दुर असतो. आणि सर्वकाळ अंतर्मुख होऊन वावरतो. मायेच्या निद्रतेनू उठून तो ब्रह्म स्वरुपाच्या सुखनिद्रेत जाऊन पहूडलेला असतो कवी सांगतो.

ब्राह्य व्यापार दर्शनादिकरी ।
परी सुखे सुखावला अंतरी ।
तैसा ज्ञानी अंतःसुखसेजारी ।
पहूडुनिकरी बाह्यव्यापार ।।२७३।।

या शिवाय

कर्म करुनि तो अकर्ता ।

भोगभोगीनि तो अभोक्ता ।
इंद्रियमेळे करुनि वर्तता ।
न मेळे असंगता जयाचि ॥२७५॥

अशी त्याची स्थिती असून आत्मतोषे तो सुखी झालेला असतो. कर्ता कर्म, कारण, ही त्रिपुटी त्याची संपलेली असते अहंपण त्याला गेलेले असते. ब्रह्म आणि जीव हे द्वैतही संपलेले असते

## सदैव आनंदात मग्न

हा जीवन्मुक्त नेहेमी आनंदातच निमग्न असतो. कवी सांगतो.

तैसे ज्ञानें ही कर्मे करीती ।
परी कर्मीकर्मे फळाची नाही आसक्ती ।
करिताही न मोडी जयाची स्थिती ।
असंगगति अखंड ॥२९२।

असा तो असतो.

पुढे वसिष्ठांनी मुक्ती प्राप्तीसाठी 'सप्त ज्ञानभूमिका' विशद केल्या आहेत. (१) शुभेच्छा (२) विचारणा (३) तनुमानस (४ सत्वात्पत्ती (५) असंसक्ति (६) पदार्था-भाविनी (७) तूर्या ( कवीनें ३२७ ते ५९३ पर्यंतच्या ओव्यातून हो ज्ञान भूमिका स्पष्ट केली आहे. त्यात भव-विषयीची आसक्ती सरविण्यासाठी अखंड - नामस्मरण हा विचारही व्यक्त झाला आहे. ) कवी सांगतो.

हे तोडावयाचे साधन ।
करावे युक्ति करुनि अनुचिंतन ।
ययाचेंचि नाममनन ।
करावे आनुदिन अनाळसेपणे ॥४५०॥

ज्ञान प्राप्तीसाठीही 'नामस्मरण' आणि ज्ञानप्राप्ती नंतरही सच्चिदानंद सुखसेवनासाठी 'अखंड नामस्मरण' हा अध्या-त्मविचार यांत अत्यंत महत्वाचा आहे. या अवस्थेत हा साधक कसा असतो? तर कवी सांगतो.

ईश्वरादि याचे नि मतें ।
ईश्वर ध निवर्ते ।
सर्वे ही ईश्वरेचि करिजेते ।
मी कोण तेथें कर्ता भोक्ता ॥४९२॥

समर्थ रामदासांनी, तसेच तत्पूर्वीही ज्ञानेश्वर, एक-नाथ, तुकाराम यांनी 'अखंड - नामसातत्य' या आध्यात्म-विचारावरच भर दिला आहे. थोरतत्वज्ञ व साक्षात्कारीसंत श्रीगुरुदेव रानडे यांनी तर 'नामस्मरण हाच परमार्थ' हा सूत्रविचार म्हणून मांडला आहे. असो.

तुर्येत साधकाच्या ठिकाणी कोणताही भेद उरलेला नसतो, असे प्रतिपादन वसिष्ठ करतात. देहबुद्धीचा पूर्ण-पणानें विलय आत्मबुद्धीत झालेल्या असतो. त्यामुळे देह राहिला काय? देह पडला काय? त्याविषयीची न्यूनता त्याला वाटत नाही. कवी सांगतो.

जन्ही कोटिकल्पांती देह पडला ।
अथवा आताचि क्षणांर्धे गेला ।
तऱ्ही ज्ञानि लाभु नाही जाला ।
असे संचला ब्रह्मत्वेचि ॥६०८॥

## अंतर्बाह्य शून्याकार स्थिती

वसिष्ठ पुढे सांगतात की, एकदा जीवभाव संपला आणि शिवभाव निर्माण झाला की, शुभाशुभाचा विचारही त्याला भेदरुपानें उरत नाही. कवी सांगतो.

जेव्हा जाली ज्ञानप्राप्तो ।
तेव्हाचि मुक्त तो सर्वार्थी ।
जयाचे वासनेचि शांती ।
होऊनस्थिती अखंड ॥६२६॥

असा मुक्त पुरुष मन असून अमन, नेत्र असून अनयन, श्रवण होऊनही अश्रवण असा होतो. त्याला जग हे तृणतुल्य वाटते. त्याची स्थिती शून्यकार होते कवी म्हणतो

तऱ्ही अंतरी तो वासनाशून्य ।
बाह्य नाही प्रपंचभान ।
ऐसे अंतर्बाह्य प्रपंचहीन ।
तोचि शून्यपण परियेसी ॥६५७॥
अंतरी ब्रह्मानंदे पूर्णता ।
बाह्य पदार्थे कोण्ही नाही रिता ।
ब्रह्मांडकोटि पावे ब्रह्मता ।
ब्रह्मेंचि तत्वता सबाह्यपूर्ण ॥६६२॥

मन, बुद्धी, अहंकार या सर्वांनी त्याची देहबुद्धी संपते आणि तो अखंड आनंदास्थितीशीरत होतो.

कवीने या प्रकरणात मागील अनेक विषयांचा उप-संहार केला आहे. अखेरीस मुक्तपुरुषांचे आणखी एक विशेषत्व तो सांगतो की, मुक्त पुरुष हा सर्वसंग परित्याग करतो. त्यामुळे त्याच्याठिकाणी वासना उरत नाही. आणि जन्म-मरण यात्रा त्यांची संपते कवी म्हणतो.

नित्य मुक्त तो परमात्मा ।
जीवन्मुक्ताचा महिमा ।
तयासी संबंध मोक्षासी सीमा ।
नाहीश्रीरामा विदित त्यासी ॥९२६॥

पान ११० वर पहा

( पान १०७ वरुन )

असा हा मुक्त पुरुष 'याचिदेही देही याचि डोळा भोगी सुखाचा सोहळा' (ओवी ९५४) असा होतो हे सर्व सद्गुरू मळेच झाल्याने पुन्हा त्यांचे विषयीची कृतज्ञता तो सांगतो की,

> सद्गुरूवीन कृपाकलेशे ।
> अविद्या गली दाही दिशे ।
> सर्वत्र ब्रह्मानंदचि उल्हासे ।
> सामरस्य येकपण ॥१०४१॥

मुक्तपुरुषांची 'जीवन्मुक्त ' अवस्था ही अशी आनंद मय, सुखस्वरूप असते.

## ब्रह्मराज्याच्या 'सिंहासनी' आरुड करणारे 'निर्वाण'

या दहाव्या निर्वाणाच्या प्रकरणात जीवन्मुक्ताला 'सहजस्थिती' लाभून तो परमानंदात निमग्न होतो आणि ब्रह्मराज्याच्या सिंहासनी आरुड होतो. पूर्णानंदघन, नित्य-निर्गुण, चिद्रूप अशी त्याची अवस्था होते असा विचार वसिष्ठांनी प्रकट केला आहे.

जीवन्मुक्तस्थितीतच रामचंद्र आणि वसिष्ठ यांनी परस्परांना आलिंगन दिले. परमानंदात रामचंद्र तृप्त झाले. परमानंद झाल्यावर निरूपण तटस्थ राहते. रामाने तरीहि प्रश्न केला की, जीव हाच स्वस्वरुप असताना तो मायेत कां भ्रमतो? तर वसिष्ठांनी उत्तर देताना 'मनोनिग्रह कमी पडतो' असे सांगितले, मनोनिग्रह कायम राहण्या-साठी 'ज्ञान' व्हायला हवे, असे ते सांगतात. कवी सांगतो 'ज्ञानमात्रेची मोक्षप्राप्ती' (ओवी ९३)

> येक ज्ञानेमात्रेचि करुन ।
> आत्मस्वरूप अपरोक्ष जाणून ।
> स्वयेचि जाले ब्रह्मनिर्वाण ।
> बोधक कोण व्यवहारा ॥११८॥

असे सांगून वसिष्ठांनी मुक्तपुरूपाची अवस्था 'सहजस्थिती ही असते असे प्रतिपादन केले निर्वाण म्हणजेच ब्रह्मानंद आणि तो सहजस्थितीनेच प्राप्त होतो. कवी सांगतो.

> तऱ्ही सहजस्थितीने असता ।
> आत्मानुभवे चालता बोलता ।
> तेचि आईके श्रीरघुनाथा ।
> अपूर्वता इये स्थितीस ॥१६९॥

या अवस्थेलाच 'एकांतास्थिती' असेहीं त्यांने म्हणले आहे. या स्थितीत

> तेथे नेणणे ना जाणणे ।
> नाही भोगणे ना पाहणे ।
> नाही तेथे घेणे देणे ।
> अनुभवणे परमानंदु ॥३४०॥

एवढेच कार्य उरते असे ते सांगतात. समाधान, शांती, आनंद आणि सुख हीच अवस्था असते.

## सहजस्थितीत अक्षयानंद

ही सहजस्थिती 'अक्षयानंद' प्राप्त करुन देते हा आनंद 'चहूं वाचा न ये बोलता' (ओवी ६०९) असा असतो या स्थितीतील जीवन्मुक्तपुरुषाला विश्वातील उत्पत्ती आणि विनाश या स्थितीही कळतात. (ओवी ८२७ )

अक्षयानंद उपभोगणाऱ्या सहजस्थितींतील जीवन्मु-क्ताचे वर्णन ऐकून रामचंद्र म्हणाले, मलाहा सर्वत्र ब्रह्म दिसते. मी परमानंदी बुडालो आहे. (ओवी ९५१) मला अमृतपान लाभलें आणि ब्रह्म परिपूर्ण अवस्थेत मिळालें. (ओवी १०३२ ) ऐवढे तो सांगतो.

रामचंद्राने दशरथास उठून आलिंगन दिले. दशरथ राजाही सुखोन्नत झाला. आणि कवी सांगतो.

> सकळां जाला आनंदी आनंदु ।
> रघुनाथ चित्ती परमानंदु ।
> अवघा कोंदला ब्रह्मानंदु ।
> सुखस्वादु सर्व सभेसि ॥१०४१॥

त्यानंतर दशरथाने राम लक्ष्मण यांना विश्वामित्र मुनीच्या स्वाधीन केलें. पुढे यज्ञ झाला, स्वयंवर झाले. राम राज्यही झालें. असे सांगून रंगनाथस्वामींनी सद्गुरू निजा-नंदाच्या चरणी ग्रंथ अर्पण करुन अध्यात्मविवरणाची समाप्ती केली आहें.

## उप संहार

श्रीरंगनाथस्वामींनी योगवासिष्ठयात वैराग्यापासून ते निर्वाण स्थिती पर्यंतचा जो अध्यात्मविचार सांगितला त्यांत मुख्यसूत्र ते हेंच की, देहबुद्धी सरून आत्मबुद्धीने ब्रह्मस्वरुप जाणता येते आणि गुरूकृपेनें सहजस्थिती लाभून अक्षयानंद अनुभवता येतो. समर्थ रामदासांनी म्हटल्या-प्रमाणें ' हिशोब संपला मायेचा । निवाडा झाला तत्वाचा । साध्य होता साधनाचा । ठाव नाही ' असे होतच होतें तिथेच पापाची खंडना होते जन्मयातना चुकते. आणि आणि त्या ब्रह्मस्वरूपाची प्रचती येते. जीव, सृष्टी, ब्रह्म यांतील भेद संपून मुख्यकर्त्यास ओळखता येते. साधकाच्या उपासनेचे सार्थकत्व संतत्व मिळविण्यात आणि संतत्वातून गुरुपदवीस प्राप्त करून घेण्यात म्हणजेच 'ब्रह्मस्वरुप' होऊन जाण्यात आहे, असाच त्यांतील तत्वार्थ होय. गुरु-शिष्य संवाद हा जीव-ब्रह्म याविषयीचा भेद आहे तोवर चालू राहणारच आहे. जीवब्रह्माचे ऐक्य झाले की, निरुपण संपते. वसिष्ठ - रामचंद्र यांच्यातील संवादरूप तत्वज्ञान ग्रंथरुपानें

चालत आलें असून पुढें हेंच तत्वज्ञान श्रीकृष्ण अर्जुन यांच्या संवादरुपाने प्रकटलें आहे. समर्थानीही दासबोधात असाच गुरुशिष्य संवाद सांगून परमार्थ विशद केला आहे. गुरुपरंपरेनें आलेले हे अध्यात्मज्ञान 'विवरलेंचि विवरावें' हे खरे असले तरी अनुभवाशिवाय ते शद्बविध्यात्वच धारण करते. अनुभव, प्रचती, आत्मज्ञान याप्रयोग शद्बाला 'अर्थ' येतो. तो आत्मगर्भ भावार्थ ध्यानी यावा, अशी सद्गुरुचरणी प्रार्थना करून हे विवरण थांबवितो. 'न्यून ते पूर्ण करुन घ्यावें' ही साधिकाप्रति विज्ञापना रंगनाथस्वामींच्याच शद्बात सांगायचे तर 'श्रवण करावा स्वच्छं दे । ग्रंथ निर्द्वंद्व वसिष्ठ' (ओवी १०६८)

( नाझरे येथील स्वामींचे वंशज श्री. श्रीकांत देशपांडे व त्यांचे बंधु यांनी केलेल्या सहयोगाची कृतज्ञता येथे नोंदवीत आहे )

## जयरामस्वामी वडगांवकर जीवनपट

संकलक– म. प. पेठे

जन्म : श्रावण वद्य अष्टमी, शके १५२१

कुल : ऋग्वेदी ब्राह्मण गोत्र वशिष्ठ

आई वडील : कृष्णाबाई, भिकापंजीत. कात्राबाज मांडवगण येथील कुलकर्णी; उपनाम कसरे.

गुरु : शांतलिंगाप्पा उर्फ शांतेश्वर यांनी स्थापिलेल्या जंगम गादीचे अधिपती श्रीकृष्ण यादव अथवा कृष्णाप्पा–जयराम शैल परंपरा.

वास्तव्य : वडगांव (जि. सातारा)

व्यवसाय : कीर्तनकार. वेदांत सोपा करुन सांगण्याची व कथानके गोड शद्बात सांगण्याची हातोटी. गोरे शरिराने स्थुल, समर्थ सांप्रदायाप्रमाणें सतत कौपीन धारण करीत असत. त्यांच्याबद्दल सर्वांना आदर वाटत असे.

शिष्य परिवार : अनंत भट व गोपाळ

जीवनातील महत्वाच्या गोष्टी : वडिल लवकर ५ व्या वर्षी गेल्यामुळे गरिबीत दिवस काढले. आईने वाढविले, पंढरपूर येथे मधुकरी मागुन विद्याभ्यास १४ वर्षे वास्तव्य आंबेजोजोगाई येथें दत्ताचा साक्षात्कार. यांना नाथाचा अवतार मानीत समर्थ रामदासाच्या पंचायतनातील एक मानले जात असत. समर्थ रंगनाथ व आनंदमूर्ती तिघेजन वडगांव येथे उत्सवास जमत.

ग्रंथ निर्मिती : दशम स्कंध टीका (अभंगात्मक, ९९५९ ओव्या रुक्मिणी स्वयंवर ( श. १५७६, ४००० ओव्या) सीता स्वयंवर (श. १५७०), अपरोक्षानुभव (श. १५९५) ओव्या १७०० शांती प्रकरण, ज्ञानी भक्त संवाद ही पदे, अभंग, प्रबोध सुधाकर (तंजावर हस्त), जयबोध नांवाची दासबोध टीका.

समाधी : भाद्रपद वद्य एकादशी, शके १५९४ परिधावी संवत्सर (वडगांव येथे)

(संदर्भ, महाराष्ट्र सारस्वत आ. ६ १९८३.) )दासपंचायतन ३३६–३४३)

# श्रीविठ्ठल भक्त जयरामस्वामी वडगांवकर

डॉ. गोपाळ गोविंद बेणारे

साक्षात्कारी मराठी संताची परंपरा प्राचीन आहे. नाथसंप्रदायातून निर्माण झालेला हा संतप्रवाह निळोबारायाच्या ठायी थांबला असा वारकरी समज आहे. तथापि हा समज बरोबर नाही. कारण समर्थ संप्रदायामध्य सामील झालेले श्रीजयरामस्वामी वडगांवकर, आनंदमूर्ती ब्रम्हनाळकर, रंगनाथस्वामी निगडीकर, केशवस्वामी व स्वतः समर्थ या पंचायतनाने साक्षात्काराची परंपरा पुढे गुरुशिष्य प्रथेप्रमाणें वाढविली काहीं इतिहास संशोधक पंचायतन सत्पुरुषांचा काहींही संबंध नव्हता ते केवळ समर्थाच्या विचारप्रणाली खाली एकत्र आलेलें होते असे मानतात त्यांनीं लिहिलेल्या मराठी पदावर समर्थ काव्यरचनेचा परिणाम दिसून येतो समर्थपंचायतन पुरुषांचे काव्य वाचीत असताना समर्थाच्या विविध ग्रंथाची आठवण येते. संशोधकांची काहीही मते असोत या पुरुषांनी महाराष्ट्रात रामभक्ती आणि विठ्ठल भक्तीचा प्रसार केला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात 'जयजयरामकृष्णहरी' हा वारकरी पंथाचा द्वादशाक्षरी मंत्र केवळ वारकऱ्यांनी लोकप्रिय केला असे नव्हे तर रामदासी परंपरेशी निगडीत असलेल्या पंचायतनाने व त्यांच्या अनुयायांनी अधिक लोकप्रिय केला असे दिसते. समर्थ संप्रदायातील वरील सत्पुरुष हे रामभक्ती इतकेच विठ्ठल भक्तींला महत्व देत होते.

जयरामस्वामी वडगांवकर या प्रसिद्ध कवी आणि प्रसिद्ध तत्ववेत्त्यांचा जन्म भिकाजीपंत केसर या ब्राह्मणाच पोटी झाला ते देशस्थ अश्वलायन होत. त्यांच्या पत्नीचे नांव काशीबाई उर्फ भक्ती असे होते. काशीबाई ही अत्यंत धर्मनिष्ठ व व्रतवैकल्ये करण्यात उत्साही असे भिकाजीपंत व काशीबाई यांनी सद्गुरुसेवा भक्तीभावाने केली. तीं उभयता आत्मज्ञाना प्रित्यर्थ श्रीगुरुला अनन्य भावाने शरण गेली.

> हृदयाहृदय एक जाले । ये हृदयींचे ते हृदयी घातले ।
> द्वैप न मोडता केल । आपण ऐसे अर्जुना ।।१।।

याज्ञानेश्वरीतील सिद्धांता प्रमाणें सद्गुरु कृष्णस्वामींची भक्ती केली 'म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । ते अखंड यज्ञ याजन (ज्ञानेश्वरी) या द्वारा आत्मज्ञानाधिकारी बनले पूर्वसंस्कार आणि घरचे वातावरण यामुळे भिकाजीपंताचा सात्वीक, प्रेमळ, स्वभाव परमार्थाकडे अधिक झुकला. त्यांना दोन पुत्र झाले त्यापैकी एक जयरामस्वामी वडगावकर होत.

## पंढरपूर क्षेत्राचे काशीबाईला आकर्षण–

जयरामस्वामींच्या जन्मानंतर कांही काळातच भिकाजीपंताचें निधन झालें. मातोश्रींना दोन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी पार पाडावी लागली घरामध्यें मुलांवर संस्कार केलें जात होते. श्लोक, आरत्या, पदे, ज्ञानेश्वरी, भागवत चें पठण केले जात होते. त्यातील व्यक्तीजीवनावर आधारलेल्या नितीकथा, बोधकथा, काशीबाई आपल्या मुलांना सांगत असत. काशीबाईना पंढरपूर क्षेत्राचें आकर्षण होते. आपण मुलास घेउन पंढरपूरास जावें असे त्यांना नेहमीं वाटे. संताचे माहेरघर भूवैकुंठ पंढरपूर तेथील पवित्र चंद्रभागा व भक्ताग्रणी पुंडलिक इत्यादिचे दर्शन आणि सहवास घडला तर आपले दुःख हलके होईल. असा त्यांचा विश्वास होता. विठ्ठल नामाच्या जयघोषानें पंढरपूर दुमदुमत असल्याचें त्यांना माहित होते. ही विठ्ठलनाम कथा गंगा कोट्यावधी भाविकांना चैतन्य आणि आनंद देत आल्याचें सर्वांना ज्ञात होते. भक्तजनांना दुःखातून मुक्त करणारा विटेवरील माऊली काशीबाईचे अधिदैवत झाले आयुष्याच्या अखेर पर्यंत त्यानी पंढरीची वारी केली. काशीबाई आपल्या मुलांना कितन प्रवचनास घेऊन जात असत भक्तीप्रेमरसानें भरलेली ही गंगा काशिबाईच्या मुलांचा उद्धार करणारी ठरली. टाळ, मृदंग पताका, विणा या वाद्यातून विठ्ठल नामाचा होणारा गजर जयराम स्वामीच्या बालमनावर कायमचा परिणाम करुन गेला. आत्मरंगात रंगून गेलेली व मोक्षाला तुच्छ मानणारी ही वैष्णवमंडळी जयरामस्वामींचे आदरणीय स्थान झाले. विटेवरील विठ्ठलाची सगुणमूर्ती पाहून जयराम स्वामीच्या आनंदाला पारावार नसें. रंग शिळेवर नाचणारी भक्तमंडळी जयराम स्वामींना कृती करण्यास भाग पाडीत असे.

आपल्या मुलास घेऊन काशीबाई पंढरपूरास गेल्या. त्यावेळी आषाढी एकादशीचा सोहळा सुरु होता. भक्तिमार्गाच्या भजन केंद्री काशीबाई रमून गेल्या. असंख्य पताका टाळ मृदंग, विणा इ. झन्कार कीर्तनाच्या माध्यमातून नामघोष व सर्वत्र भरलेला आनंद पाहून काशीबाईना समाधान वाटले. पंढरपूर क्षत्री काशीबाईनी अ ल्प विन्हाड थाटले. संताचे अभंग, ज्ञानेश्वरी, उपनिषधे, वेद, गीता इ. शिक्षण मिळालेम्हजून तत्कलीन पंडितांच्या घरी.जयरामस्वामींना नेऊन सोडले चंद्रभागेचे स्नान, विठ्ठलाचे दर्शन आणि संत संगती यामध्ये रमलेल्या काशीबाईनी भिक्षा मागून जयरामाची मुंज केली. तथापि आईचे प्रेम आणि सहवास सुख फार काळ लाभले नाही. इ. सन १९०८ म्हणजे जयरामस्वामींच्या वयाच्या आठव्या वर्षी काशीबाईचे निधन झाले. आता विठ्ठल हाच पिता आणि माता अन्य कुणीहि आपले नाही अशी जयरामाची खात्री झाली. 'माझी आईच व मला सोडून परलोकी गेली, आता माझे संरक्षण करणे तुझे काम आहे, तू जगाचा पालनकर्ता आहेस, जयरामाने गोपाळपुरास अनुष्ठान केले. त्यावेळी त्यांना विठ्ठलाने दर्शन दिले. त्यावेळी विठ्ठलाने जयराम स्वामीस सांगितले की, नदीची दरड ढासळली म्हणजे मी तुझ्या हृदय मंदिरी प्रकट झालो आहे असे समज. त्याप्रमाणे जयरामस्वामींनी समाधी विसर्जन करुन चंद्रभागेवर नित्यकर्म विधी उरकुन टाकला. इतक्यात नदीची दरड कोसळली पुढे त्यांना विठ्ठलाने दर्शन देऊन असे सांगितले की, वडगांवीं श्रीकृष्णस्वामी म्हणून माझा अवतार आहे. त्यास तू अनन्य भावानें शरण जा म्हणजे तुझा उद्धार होईल वडगावास श्रीकृष्णस्वामीची भेट झाली.

आपल्या गुरुकडून त्यांनी तारक महामंत्र घेतला त्यावेळी जयरामस्वामीची समाधि २२ दिवस टिकली. २२ व्या दिवसानंतर श्रीकृष्णस्वामीनी जयरामस्वामीना जगदोद्धारक कार्य करण्यास आज्ञा केली. कांही काळ तिर्थयात्रा केल्यानंतर रेवणसिद्ध येथे अनुष्ठान केले व पंढरपूरास आले. त्यांनी यात्रेमध्ये विश्वनाथ, विश्वेश्वर, ब्रद्रीनाथ, रेतीदणु इ. तिर्थ स्थळाना भेटी दिल्या. काशीमध्ये आल्यानंतर त्यांना शितज्वराने पछाडले तशाही अवस्थेत त्यांनी किर्तन सेवेत खंड पडू दिला नाही अनंतदेवाच्या मठात श्रीगुरुच्या चरित्रावर केलेले निरुपण श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे ठरले. अनंत देवाना जयरामस्वामीचे ठिकाणी श्रीकृष्णाचे दर्शन झाले.

किर्तन प्रवचनाच्या माध्यामातून त्यांनी केलेले समाज प्रबोधन महाराष्ट्र विसरु शकत नाही. या साक्षात्कारी सत्पुरुषानी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात केलेली धर्मजागृती ऐतिहासिक पार्श्वभूमीवर पाहील्यानंतर त्यातील रहस्यातील धागे हळूहळू उकलु लागतात. धर्माचे पालन करण्यासाठी परमेश्वराने आपणास पाठविले आहे हा हेतु मनात धरुन जयराम स्वामी समर्थांच्या महाराष्ट्र धर्म जागृत करण्याच्या कार्यात सहभागी झाले. शके १५६६ च्या पावसाळ्यात समर्थ जरंडेश्वराच्या जवळ असताना स्वामीची व त्यांची भेट झाली. समर्थ जयरामस्वामीना राघोबा म्हणत असत. समर्थांच्या सहव्यासात घडलेल्या चमत्काराचे विश्लेशन चिकीत्सेच्या कसोटीला उतरणार नाही केवळ भाविकदृष्टीने त्याकडे पाहीले पाहिजे.

जयरामस्वामी उर्फ राघोबा यांनी तिर्थाटना प्रमाणे ग्रंथ लेखनाचे कार्य बरीच वर्षे केले. दशमस्कंदावरील टिका सीतास्वयंवर, रुक्मिणी स्वयंवर, अपरोजानुभूमी, पंचीकरण ज्ञानी भक्त संवाद, असें. त्यांचे लहान मोठे ग्रंथ प्रसिद्ध असून अभंगाची आणि पदाची संख्या विपुल आहे. दासबोध वाचीत असताना वाचवयास मिळणाऱ्या प्रतिभा, शद्व इत्यादीची पुनरावृत्ती जयरामस्वामीच्या पदात आली आहे कार्य असे वाटल्यावाचून रहात नाही. जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर, केशवस्वामी भागानगरकर, हे समर्थाचे सहप्रवासी वेगळे दिसत असलें तरी आत्मस्वरूपाने ते एकच होते. भाद्रपद वद्य ११ ही जयरामस्वामीची पुण्यतिथी भक्ती भावाने साजरी केली जाते. शके १५५४ भाद्रपद वद्य एकादशीला रामदासस्वामी रंगनाथस्वामी, केशवस्वामी, शेखमहंमद ही सर्व साधुसंत मंडळीं वडगांव या तिर्थक्षेत्री आली होती. ज्ञानेश्वर, समाधि होत असताना निवृत्तीनाथ, सोपान, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई यांना ज्याप्रमाणे दुःख झाले तसाच हा प्रकार होता गोपाळस्वामीच्या गळ्यात विणा घालून यापुढे त्यांनी घोड्यावर बसावे अशी आज्ञा केली. वडगांव येथे त्यादिवशी कीर्तनोत्सव साजरा करण्यात आला महाराष्ट्रातील अनेक संत त्यावेळी उपस्थित होते.

# संताच्या उपदेशाचे वैशिष्ट्य

– नारायणशास्त्री नाझरकर

जगांत तीन प्रकारचे उपदेश असतात. प्रभुसंमित, मित्रसंमित, कान्तासंमित असे प्रभुसंमित म्हणजे राजाची आज्ञा झाली कीं इच्छा असो नसो ती करणें भाग पडते उदा. श्रीक्षेत्रपंढरपूरातील विठ्ठल मंदिरा भोवतालची जागा रस्ते रूंद करणेसाठी घरमालकास नाईलाजानें सोडावी लागली. ते जर पर्यायी जागा देऊन राहण्याची व्यवस्था करुन केले. असते तर तें योग्य झाले असते, दुसरा मित्र–संमित उपदेश एखाद्या प्रसंगी मित्र आपणास सल्ला मसलत देतो. याप्रमाणें केलेस तर तुझें हित आहे नाही केले तर अनहित आहे. यावरुन कार्य प्रवृत्ति करणें आपल्या इच्छेवर अवलंबून असते. तो मित्र तूं असे केलेच पाहिजे असा आग्रह धरीत नाही. गीतेत भगवंतानें अर्जुनास मित्रा प्रमाणें उपदेश केला. 'यथेच्छसितथा कुरु' असेच सांगितले आहे. परंतु संताचा उपदेश कान्ता संमितप्रमाणें प्रत्यक्ष आज्ञा (हुकुम) न करता गोडी गुलाबाने प्रेमानें कार्य करणेंस भाग पाडतों जसे. एकादा व्यापारी माल खपविण्यासाठी नवीन नवीन प्रकारचा माल तयार करतात त्यापैकी एका भगिनीनें नवीन साडी घेतली की, आपल्या गृहिणीला तशी साडी घ्यावीशी वाटते. मग ती आपल्या पतिराजाला त्या साडीचे वर्णन करुन आमच्या भगनीने ती साडी घतली आमच्या काकूने ती घेतली आपल्या नशीबी कुठ आहें. हौसेने एखादि साडी घ्यावी. तेव्हा यजमानाला वाटते आपणहि आपल्या सौभाग्यवतीची हौस पुरी करण्यास तशी साडी घ्यावी. याप्रमाणें जी प्रवृत्ति होते त्याला कांता-संमित उपदेश म्हणताव. त्या योगाने जी प्रवृत्ति होते तां हूकुमानें नव्हें, व मित्रा प्रमाणें इच्छेप्रमाणें नव्हे तर प्रेमाने नाईलाजानें जी प्रवृत्ति केली जाते तिला कांतासंमित उप–देश म्हणतात संत कोणाला जबरदस्ती करीत नाहीत 'हरिमुखे म्हण। हरिमुखे म्हणा' नामाचे काय माहात्म्य आहे भक्तीचे काय महात्म्य आहे ते पटवून देतात 'नामसंकीर्तन साधन पैं सोपे जळतील पातके जन्मान्तरीचे'

## भगवंताच्या अवताराची तीन प्रयोजने आहेत

परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे । धर्म संस्थापना, दुष्टांचा नाश, व साधूचे रक्षण यातील पहिलें कार्य धर्म जागृती हे महत्वाचे कार्य संत करतात. 'लोपले ज्ञान जगी हित नेणती कोणी । अवतार पांडुरंग । नांव ठेविले ज्ञानी' असे रामानं–दाने ज्ञानेश्वरमहाराजांच्या आरतीत म्हटले आहे. यावरुन धर्म जागृती करता भगवानच संतरुपाने अवतीर्ण होऊन ते कार्य करीत असतात दारूबंदीचा कायदा केला. प्रचार केला. परंतु दारुबंदी न होता उलट ती वाढतच आहे. परंतु धर्म बंधन फार वेगळे आहे वारकऱ्यानें एकदा का माळ घातली कीं, तो दारु, मांस, इत्यादि व्यसनी पदार्थ वर्ज्य करुन नित्य नेमानें भगवंताचे नामस्मरण, हरिपाठ म्हणून भगवंताला नैवेद्य दाखवून त्याचा प्रसाद म्हणून भोजन करतो त्यांत त्याला शांतता, समाधान असते असे अनेक महान् भगवद्भक्त होऊन गेलें त्यापैकी निजानंद रंगनाथस्वामी महाराज नाझरेकर हे होत त्यांचा जन्म 'शुचीनां श्रीमतां गेहे भ्रष्टोऽभिजायते' शुद्ध बीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ॥ या उक्ती प्रमाणें बोपाजी पंत व बया-बाईच्या पोटी संताच्या कृपेने माणगंगेच्या तिरी देशपांडे कुळांत नाझरे गावी श १५३४ मार्ग शु. १० स झाला. माया मोहात न पडतां तपश्चर्या करण्याकरिता हिमालयात १२ वर्षे घालविली त्याना मस्तक शूल उठला असतां दत्त महाराजांनें सिंहरूपाने येवून झाडाची मुळी उगाळून डोक्यास लेप दिला तेव्हां मस्तकशूल कमी झाला. व त्या सिंहाचे पाय धरलें मला खऱ्या रूपाने दर्शन द्या तेव्हां दत्ताने प्रगट होऊन दर्शन दिले व त्यास आज्ञा केली की, कीर्तन प्रवचन द्वारा धर्म जागृती कर. गावी जावून माता पित्याची भेट घे ते तुझी वाट पहात आहेंत. ती आज्ञा प्रमाण मानून निघाले ते जवळचे टिहरी संस्थानच्या राजाने त्यांचा सत्कार करुन राजैश्वर्य प्रदान केले माथाभर जरीचा मंदिल, केसरीटिळा, मोत्याचा कंठा, कानांत भिकबाळी, जरीचा शेला, तलवार, ढाल, व बसण्यास उत्तम घोडा, असे राजैश्वर्य मिळाले तरी ते त्यात आसक्त अभिमानी नव्हते जनका प्रमाणें राज्यैश्वर्य भोगून वैराग्यशील होते. त्यांच्या नांवाप्रमाणें कीर्तनात अपूर्व रंग येवून त्यात ते नाचू लागलें की देहभान विसरुन जात होते. व श्रोते हि मंत्रमुग्ध होत असत. असेच एकदा शिवाजी महाराजांच्या राजधानी

सातारा येथे त्यांचे किर्तन ठरले त्यावेळी आकस्मिक पोट-शूळ उठला आता काय करावे? कोणास कीर्तनास पाठवावे म्ह. आपल्या पुतण्या खंडघास बोलवलें तूं कीर्तनास जा तो म्हणाला मला कांहीच येत नाही तेव्हां त्यांच्या जिभे-वर 'श्री' हें अक्षर काढले व कीर्तनाचा वेष देऊन कीर्तनास पाठविले तेव्हां त्याच्या कीर्तनास रंगनाथमहाराजापेक्षा अपूर्व रंग आला. हे गुरु कृपेचे द्योतक आहे पुढे त्यास कळले कीं सर्व ज्ञान भांडार संस्कृतात आहे त्याचा सामान्य जनाला बोध होण्या करिता ते वाङ्मयप्राकृत भाषेत रच त्याप्रमाणें श्रीधर स्वामींनी १८ पुराणे, महाभारत यातील उत्तम उत्तम कथा निवडून हरिविजय, रामविजय, पांडव प्रताप इत्यादी प्रासादिक ग्रंथ आपल्या प्रतिभा संपन्न बुद्धांने नव सानें भरलेले असे केलें त्याचे श्रद्धेने पारायण केले तर अद्यापहि मनुष्याची मनकामना पूर्ण होते हरि-विजयात - क्षीरसमुद्राचे वर्णन, महाबळभटाची कथा, या कोणत्या पुराणातील आहे ते सांगितले आहे यांनी रचलेले ग्रंथ एकदा आकलन करावे म्हटले तरी त्यांचे अवलोकन होत नाही तर ते कसे रचले व लिहिले असतील?

श्रीसद्गुरु रंगनाथ महाराजानी - गुरुगीता, योगवसिष्ठ, चित सदानंदा लहरी, कीर्तनोपयोगी निवडक पदे 'भजता निश्य हरि । मग ती माया काय करी' इ. पदे कीर्तनकाराच्या मुखी अद्यापहि आहेत. त्यांना दास पंचा-यतनात बसण्याचा मान मिळाला श्रीसमर्थ रामदासस्वामी व त्यांची माहुली येथे भेट झाली तसेच जयरामस्वामी वडगांवकर, आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर व केशवस्वामी भागा-नगरकर यांच्यां समवेत धर्म जागृती केली भीष्माचार्य प्रमाणें अखंड ब्रह्मचारी व्रतापुढे देवानो आपली प्रतिज्ञा मागे टाकून भक्ताची प्रतिज्ञा केली अशा त्या महात्म्याने अवतार कार्य करुन मार्गशीर्ष महिन्यात वद्य १० निगडी ( सातारा ) येथे शके १६०५ मध्ये समाधिस्थ झाले त्यांचे पुण्य स्मरण मुक्त व्हावे म्हणून त्रिशत सांवात्सरिक उत्सव साजरा करावा.


## ढाळेवाडी विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि.

ढाळेवाडी ता सांगोला

र. न. ३३२ | ऑडीट वर्ग 'ब' | स्थापना १४।५।१९६४

सभासद संख्या ११५ | येणें कर्ज- २,३१८७० | शेअर्स भांडवल ३६२५० | नफा- रु. १२०२५

मधुकर कृष्णाजी वाघमारे, सेक्रेटरी | तातोबा बजरंग चौगुले, सहा. सेक्रेटरी | बापूराव शंकर ढाळे, चेअरमन

## महूद बृहत विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि.

रजि. नं ८३१९ | महूद बु॥ ता. सांगोला | र. ता. २३ । ६ । १९४२

शाखा– १) कापड विभाग २) ग्राहक भांडार ३) बियाणे विभाग ४) धान्य विभाग नं. १ ५) धान्य विभाग नं. २ ६) जनरल विभाग

सभासद संख्या ७१५

कर्ज वितरण- १२,१७,४५७ | शेअर भांडवल- २,११,४८५ | नफा– १,८१,९६६

मधुकर कृष्णाजी वाघमारे, सेक्रेटरी | तातोबा बजरंग चौगुले, सहा. सेक्रेटरी | रंभाजी शंकरराव पाटील, चेअरमन

# समर्थ पंचायतन

धुंडामहाराज देगलूरकर

भारतवर्ष त्यांत ही महाराष्ट्र भूमि ही संतांचं खाण आहे महाराष्ट्रांत अशी पंचक्रोशी सापडणार नाही कीं ज्यात चार दोन शतकात एख दा लहान मोठा संत अवतरलेला नाही संतत्व हे जीवन आहे एक अत्युच्च ध्येय डोळ्यापुढे ठेवावयाचे व ते संपादन करण्याकरता कोणतेही दिव्य करण्याची तयारी ठेवावयाची. त्याग, तप, श्रद्धा, वैराग्य, ज्ञान, भक्तींनें जीवनावर संस्कार करावयाचें. जीवन त्यात झोकून द्यावयाचे, शारिरीक सुखाची पर्वा नाही, संसाराचा आसक्ति नाही मानापमानाची खंत न ही, विषय सुखाकडे ढुंकून पहावयाचे नाही कामक्रोध लोभादि दुष्ट विकारांना जवळ फिरकू द्यावयाचें नाहीं, दंभ नाही, दक्षिण्य नाही. ध्यान चिंतन नामस्मरणात निमग्न असावयाचे, स्फूर्ती झाल्यास सहजपणे त्या समाधि स्थितीत प्रगट झालेलें शद्ब माधुर्य ओज प्रसादादि लक्षणानें युक्त काव्य रुपाने बाहेर पडावयाचे, प्रसंगो पात्र व्यवहाराकडं लक्ष दिले तरी तो लोकसंग्रहात्मक 'बहुजन हिताय' स्वरुपाचाच असावयाचा, ' समः शत्रोत्रचमित्रेच' अशी समत्व स्थिती विश्वाशी तादात्म्याची भावना असल्याने 'चिंता करतो विश्वाची' ही वृत्ति एखाद्या वेळी परिस्थिती मुळे व्यवहारात राजकारणात लक्ष द्यावे लागले तरी ते एक तात्कालिक आहे समाजाचें कार्य म्हणून त्यात पडणे पण त्याला जीवनाचे एकमेव ध्येय आहे असे न समजणे. म्हणूनच समर्थ रामदास स्वामींनी

> सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
> परी तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥

असे म्हटले आहे. भगवद्भाव सर्वाभूती हे एकमेव संत जीवनाचे ध्येय आहे तो हृदयात ठेऊन समाजात भाव जाग्रत ठेवण्याचे कार्य संताना करावयाचे असते कारण खरा ईश्वरभाव असला तर तेथं अनेक दैवी गुण राहू शकतात. असा समाजच परस्पर प्रेम सौहार्दाने वागत असतो

श्री ज्ञानदेवानी आपल्या ज्ञानदेवीच्या पसायदानात 'खळाची व्यंकटी सांडो' त्यांची सत्कर्मांत रति वाढावी' भूत मात्रांत परस्पर मित्रभाव असावा, दुरिताचा अंधकार नाहीसा करणारा स्वधर्मरुपी सूर्याचा उदय व्हावा प्राणिमात्रांच्या योग्य व पुरुषार्थ प्रद इच्छा पूर्ण व्हाव्यात इत्यादि मागणी केल्यानंतर हे सर्व तेव्हांच होईल कीं जेव्हां संत सज्जन, ईश्वर निष्ठेची मांदियाळी जगास भटेल.

श्रीज्ञानेश्वरानी त्यांच्या अवतार कालात ' वैष्णवांची मांदी मेळेविली. त्या नंतर जवळ जवळ तीनशे वर्षानंतर श्रीसमर्थ रामदास स्वामी अवतार झाला महाराष्ट्रांत सर्वत्र आस्मानी सुल्तानी निर्माण झालीअसतां हिंदु राज्याचें संस्थापक श्री शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनें करता तुळजाभवानी तसेच श्री. सौ. जिजाबाई मातोश्रींचा शुभाशीर्वाद घेऊन प्रबळ धैर्य अढळ धर्म निष्ठा, शत्रू कडून होणारी देवदेवतांची विटंबना, स्त्रियावर अत्याचार. सर्व प्रकारे नाश, लुटालूट पाहुन ज्यांचा अहंकार व शौर्य वृत्ति जाग्रत झाली व सर्व प्रकारे प्रतिकारास प्राणपणास लाऊन लढण्यास ते तयार झाले त्यांच्या मागे भगवंताचे अधिष्ठान निर्माण करण्याचे महत्वाचे कार्य श्री समर्थ रामदास स्वामी यानी केलेलें त्यांच्या चरित्रातून स्पष्ट होते श्रीसमर्थांचा निःसीम श्रद्धा श्रीमारुतीराय व श्रीप्रभू रामचंद्र यांचेवर होती ते या दोघांची अनन्य भक्त होते. गावोगाव श्र हनुमान मंदिरे व भगवीं पताका हे महाराष्ट्राचे लेणें हें समर्थांचे देणे आहे.

इकडे देहूच्या तुकाराम महाराजांनी बहुजन समाजात आपल्या दिव्य अभंगवाणीने भगवद्भाव, त्यागी जीवन जगण्याची प्रेरणा दिली तर समर्थांनी–

> मराठा तितुका मेळवावा ।
> महाराष्ट्र धर्म वाढवावा ' ॥
> देशद्रोही तितुके कुत्ते ।
> मारोनि घालावे परते ।

म्हणून समाजात धार्मिक बळ व अस्मिता जाग्रतीचे कार्य केले व महाराष्ट्राचे आनंद वन बनविण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी महाराष्ट्रांत आणखी ही चार संतसूर्यांचा उदय झाला होता ते वडगावचे जयरामस्वामी, निगडीचे रंगनाथस्वामी, ब्रह्मनाळचे आनंदमूर्ती, व भागानगरचे केशवस्वामी, अशी ही संतांची मांदियाळी

त्या वेळी मिळाली होती. हे सर्वच पुरुष थोर अधिकाराचे साक्षात्कारी तसेच श्रेष्ठ कीर्तनकार ही होते, त्यांची चरित्रे या अंकात आली आहेतच. या सर्वच संतानी विपुल काव्य रचनाही केली आहे संत हे परमेश्वराशी एकरुप झालेले असतात म्हणून त्यांच्यातही कांही अलौकिक शक्ती प्राप्त झालेली असते त्या दिव्य शक्तीने कांही प्रासंगिक अलौकिक चमत्कार ही घडले जातात तसे अनेक चमत्कार या सर्वच संताच्या चरित्रातून घडलेले आहेत. यांना समर्थ पंचायतन म्हटले जाते. या सर्व समर्थ संताच्या प्रभावाने महाराष्ट्र भूमि भक्तिभाव समृद्ध झाली आहे.


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

**वसंतराव सदाशिव देशपांडे**

प्रासादिक मालाचे व्यापारी,

नामदेव पायरी जवळ महाद्वार

**श्रीक्षेत्र पंढरपूर.**

एक दर्शन—

# श्रीक्षेत्र निगडी [ निर्गुणपूर ]

श्री. श्रीकांत डोईफोडे

समर्थ पंचायतयापैकी श्री. रंगनाथस्वामीं निगडीकर यांच्या आगमनानंतर निगडी तीर्थक्षेत्र बनले संताचे वास्तव्य म्हणजे त्या भूमिला वरदानच. या स्थानासंबधी थोडी माहितीं या लेखात घ्यावयाची आहे

३५० वर्षापूर्वी ज्यावेळी स्वतः रंगनाथ स्वामी महाराज या ठिकाणी आलें त्यावेळेस सध्या रामगंगा ओढ्या काठचे गांव म्हणून दाखविन असलेंल्या ठिकाणी सर्वत्र घनदाट दाट जंगल होते येथ निरगुडीची झाडी ही मोठ्या प्रमाणांत होती या जंगलात मोर हरिण कोल्हें ससे व मधून मधून व्याघराज ही दर्शन देत असत अशा ठिकाणी सध्याचे निगडी अपशिंगे रस्त्यावर असलेल्या जोतिबाचे देवळाकडून स्वामींचे आगमन झाले व टेत महादेवाचे तळ या ठिकाणी असलेल्या जंगलाची वस्तीस ओलांडून स्वामी 'रामगंगा' ओढा ओलांडुन सध्या घाटाचे काम चालु असलेल्या घाटावरील पिंपळवृक्षाच्या पाराला 'मनोहर' घोडा बांधून अंमल विश्रांतीसाठी थांबले.

त्यांना दैनंदिन पूजाविधीसाठी दुधाची नितांत गरज होती. त्यासाठीं त्यांनी तेथे असलेल्या गुराखी मुलांना दुधाची मागणी केली त्या मुलांनी एक आडदांड व वाझोटी गाय दाखवून या गाईचे दुध काढुन घ्या म्हणुन सांगितले महाराजांनी सर्व प्रकार अंतर्यामी जाणला व एका भांड्यांत पूजेचे तिर्थ घेतलें व ते गाईवर सिंपडले व धार काढु लागले तो गाय शांत झाली व गाईचे आचळे दुधाने ओसंडून दुध गळत आहे या चमत्कारानें सर्व मुले घाबरली आपआपल्या आई वडिलांना घेवून आली. घडलेंला सर्व प्रकरा बद्दल सर्वानीच महाराजांचें पाय धरले क्षमायाचना करुन येथेच राहण्याचा आग्रह केला स्वामीनी तो मान्य केला. हि घटना १६३३ मध्ये घडली आहे.

महाराजांनी जरी त्या ठिकाणी वास्तव्य केले तरी महाराज सर्वत्र मनोहर घोड्यावरुन भ्रमण करीत असत असेच एकदा भ्रमणास निघाले असता आता कोठेतरी इतरत्र वास्तव्यास जावे असा हेतु मनांत धरुन चालले असता त्यांचें घोड्याच्या उजव्या पायाचा खूर एका दगडावर घट रोवून बसला त्या वेळेस गुरु दत्तात्रयानें दृष्टांत देवून सांगितलेले शद्ब आठवले 'ज्या ठिकाणी तुझ्या घोड्याचा खूर रूतेल त्या ठिकाणी कायम वास्तव्य करावे' ही आज्ञा शिरसावंद्य मानून स्वामींनी हेंच आपले कर्म क्षेत्र निवडून अर्ध्या शतकापेक्षा अधिक काल धर्म-प्रबोधन केले.

त्यांनी मठाची स्थापना केली व त्यांच्या आश्रयाने अनेक जणांनी आपआपली घरे उभी केली. अजूनही मठाच्या जागे भोवती डांगांची घरे आहेंत, निरगुडा लोक 'निर्गुणपूर' असे म्हणतात महाराजांचे धाकट बंधू विठ्ठल स्वामी यांचे वंशज गोसावी आडनावानें ओळखले जातात. त्यांना वंश परंपरेने देवस्थानचे हक्क व कर्तव्य करीत आहे

## देवस्थानची निर्मिती

इ. स. १६८४ मध्ये स्वामींनी मार्ग व १० दुपारी १२ वा. समाधी घेतली स्वामींच्या समाधीनंतर १८ व्या शत. समाधीवरील मंदिराची निर्मिती झाली त्यापूर्वी हेमाडपंथी बांधकामाचें मारुती मंदिर होते देवस्थानला छत्रपती संभाजीराजे व त्यांचे नंतर छत्रपतीं शाहुराजे (सातारा) यांनी इ. स. १७२३ व श्रीमंत माधवराव नारायणराव पेशवे यांनी १७७९ साली यांनी देवस्थान निर्मीतीसाठी व दैनंदिन पूजा आरती उत्सव यासाठी खाजगीतुन इनाम दिले शेवटचे इनाम संस्थेने खालसा होण्याचे अगोदर कांही काळ औंधचे बाळासो पंतप्रतिनिधी यांनी दिले.

समाधीमंदिर संपूर्ण दगडी बांधणीचे शिखराचे काम भाजक्या विटा चूना यांचे झालें मूळ समाधीवर कळसाची ऊंची जमीनी पासून ४५ फूट आहे. समाधीमंदिराचे माप याप्रमाणें अर्धगोला कृती पश्चिममुखी आहे समाधी मंदिरास लागून नंतरचे काळांत दुजोडी मंडपाचे काम झाले आहे मुख्य समाधी मंदिरास लागून उत्तरेस महादेव व दक्षिणेस श्री गजानन यांची स्वतंत्र स्थाने आहेत. समाधीच्या मागील बाजूस विठ्ठल रुक्मिणी यांच्या मूर्ती आहेत

मुख्य समाधी भोवताली हनुमान मंदिर राममंदिर दत्त मंदिर यांची स्वतंत्र देवळे आहेत या शिवाय विठ्ठलपंत

जनार्दन स्वामी व योगिराज स्वामी या सत्पुरुषांच्या दगडी बांधणीच्या समाध्या आहेत या शिवाय मनोहर घोड्याचा ज्या ठिकाणी उमटला त्या दगडी खूर चिन्हाचे छोटे मंदिर आहे या सर्व मंदिराच्या चारही बाजूनें बाहेरुन दगडी भक्कम तटबंदी आहे

**मठ**

मूळ जागा फार मोठी असून परंतु त्या जागेवर सध्या आर्ध्या खणाचे विटमातीचे कौलारु पूर्वाभिमुखी छोटे मंदिर आहे. या जागेत रंगनाथस्वामी दैनंदिन पूजाअर्चा ध्यान - धारणा करीत असत. सध्या या जागेवर दगडी पादुका आहेत मठाच्या मोकळ्या जागेत ग्राम-पंचायत इमारत आहे. उर्वरित मोकळ्या जागेत अतिथी गृहाचीं उभारणी होणार आहे

## २) ज्ञानपुरी

निगडीपासून पश्चिमेस कृष्णानंदीच्या काठी निगडी पासून ४॥ कि. मी. अंतरावर मठापासून नदीपर्यंत साखळी रस्ता आहे. निगडीतील वामनबुवानी श्रीमंत पेशवे माधव-राव नारायणराव यांचे कारकीर्दीत नाना फडनीस यांच्या सहकार्याने रस्ता केला आहे

या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे स्वामींचे समाधीनंतर तीन दिवस मनोहर घोड्याने अन्न पाणी वर्ज्य केले तिसरे दिवशी मठातुन मनोहर निघाला तो थेट या ठिकाणी आला व ज्या ठिकाणी कृष्णेच्या डोहात उतरला तो पुन्हा कोणालाच दृष्टीस पडला नाही याच ठिकाणी भव्य घाट बांधला आहे विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर बांधलें नदीच्या पात्रापर्यंत घाटाची बांधणी आहे. मंदिराभोवती भक्कम तटबंदी आहे मंदिर नदीच्या पात्रात आहे. या ठिकाणी अस्थी विसर्जन होते निगडी अस्थि विसर्जन येथेच होते

## ३) जोतिबा मंदिर

सर्व ग्रामस्थाचे कुलदैवत असलेले स्थान गावच्या दक्षिणेस २ किलो मी. अंतरावर वाडी रत्नागिरी जोतिबा हे मुख्य पिठ आहे. दगडी चुना माती पश्चिमाभिमुखी पत्रा असे बांधकाम आहे.

## ४) भैरवनाथ मंदिर

ग्रामदैवत भैरवनाथाचे मंदिर स्वामींच्या मंदिरापासून उत्तरेस जवळच आहे भव्य मंदिर दगडी बांधणीचे आहे. सध्या जिर्णोद्धार काम चालु आहे.

## ५) लक्ष्मी मंदिर

हरिजन वस्तीतील देवीच्या मंदिराचे स्वरुप पंचायत समिती कोरेगांव यांच्या सहकार्याने माजी सरपंच श्रीकांत डोईफोडे यांनी केले असून हे मंदिर पूर्ण झाले असून

## ६) मरीआई देवस्थान

दगड माती पत्रा असलेले अर्धा खणाचे उत्तराभि-मुखी मंदिर

या शिवाय रंगनाथ स्वामीच्या मनोहर घोड्याची निगा राखणारा मोतद्दार याच्या पिराची ॲप्रोच रोडवरच समाधी आहे.

## ८) घाट

देवस्थान जिर्णोद्धार कमीटीस सहकार्य करण्याचे उद्देशानें जवळ जवळ रु. ५०,००० ।- खर्चाचा घाट पंचायत समितीच्या मार्ग दर्शनाखाली काम चालू आहे.

## ९) अतिथी गृह

क्षेत्र निगडी येथे येणाऱ्या भावीकांसाठी त्यांचे मुक्कामाचे दृष्टीने सर्व सोईनी युक्त असे अतिथी गृहाची संकल्पना आहे या ठिकाणी विवाहादी मंगल कार्ये करता येतील व सार्वजनिक कार्यासाठी हॉल उपलब्ध करुन देणे व त्या ठिकाणी कार्यासाठी लागणारे सर्व साहित्य उपलब्ध करुन इ. चा त्यात समावेश होणार आहे

१) मार्ग व. १ ते ७ ज्ञानेश्वरी पारायण सोहळा
२) मार्ग. व. ७ ते १३ रंगनाथ स्वामी उत्सव
३) वैशाख शु. १५ जोतिबा कावड काठी
४) वैशाख मूळ नक्षत्रावर – भैरवनाथ यात्रा
५) भाद्रपद शु. ४ ते १४ – गणपती उत्सव यात रांगोळी स्पर्धा, सार्व हळदीकुंकू कार्यक्रम होतात.

# श्री केशवस्वामींची गुरुभक्ती

प्रभाकर लक्ष्मण बर्वे

यंदाचा साप्ताहिक पंढरी संदेशचा श्री समर्थ पंचायतन ह्यावर दिपावाली १९८४ चा विशेष अंक निघत आहे. त्या निमित्याने समर्थ पंचायतन म्हणजे काय हे थोडक्यात पहाणे योग्य होईल. समर्थ पंचायतन ह्या दोन शद्वापैकी समर्थ म्हणजे श्री समर्थ रामदास स्वामी हा अर्थ उघड आहे परंतु पंचायतन ह्याबद्दल थोडेसे स्पष्टीकरण आवश्यक आहे. पंचायतन म्हणजे एका संप्रदायाच्या एका उपासनेच्या, एकमेकांच्या प्रेमभावनी एकरुप झालेल्या लोकोद्धाराचे एकच कार्य करणाऱ्या पंचांच्या गटास वा संघास पंचायतन असे म्हणतात पंचायतानाची मूळ कल्पना आद्य शंकराचार्यांची असावी ह्या कल्पने प्रमाणें रामोपासकांनी राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न व मारुती हे पंचायतन ठरविले तर श्रीकृष्ण उपासकांनी श्रीकृष्ण, बलराम, गरुड, अर्जुन, व उद्धव हे पंचायतन मानलें महाराष्ट्रीय संत मंडळात तीन पंचायतनें प्रसिद्ध आहेत. एक ज्ञानेश्वर पंचायतन – ह्यात निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई व चांगदेव येतात तर दुसरे एकनाथ पंचायतन – ह्यात एका जनार्दन, रामा जनार्दन, जनी जनार्दन, विठा रेणुकानंदन व दासोपंत हे संत आहेत. तिसरे रामदास पंचायतन ह्यांत श्री रामदास स्वामी, जयरामस्वामी, रंगनाथस्वामी केशवस्वामी, व आनंदमूर्ति हे संत मोडतात. प्रस्तुत दिवाळी अंकात ह्या रामदास पंचायतनाचा विचार आलेला आहे. पंचायतनात जो अधिक लोकप्रिय व अधिक कार्यकुशल कार्यकर्ता असेल त्याच्या नावाने ते प्रसिद्धी पावते १७ व्या शतकात महाराष्ट्राची सामाजिक व राजकीय परिस्थिती कशी होती हे इतिहासावरुन सर्वश्रुतच आहे. ह्या पंचायतानाचें श्रींसमर्थ रामदासस्वामी हे प्रमुख संत होते हे उघडच आहें. श्रीसमर्थ हे अत्यंत कुशल संघटक व कार्यकर्ते हेही प्रसिद्धच आहे. तेव्हां कोणतीही क्रांती करावयाची ( मग ती सामाजिक असो वा राजकीय असो ) म्हणजे चळवळ करावीच लागते त्या शिवाय ती चळवळ यशस्वी होत नाही असा इतिहासाचा दाखला आहे. अशा तऱ्हेनें क्रांतीकारक चळवळ यशस्वी करावयाची असेल तर विरोधकांचा पाडाव करणे व मित्रांना एकमुखी करणे हे करावेच लागते. म्हणजे विरोध विरोधक मोडून काढावयाचे व मित्र जोडावयाचे अशी घडामोड करावीच लागते नेमके हीच दोन्ही कार्ये श्रीसमर्थांनी उत्तम तऱ्हेने केली. श्रीसमर्थाना जुन्यातून नवा इतिहास निर्माण करावयाचा असल्याने त्यांनी पंचायतानातील चौघेही संत हे विठ्ठल वा रामभक्त असूनही त्या संप्रदायाचे सहकार - समन्वयाचे धोरण ह्या संताना जवळ करण्यात दिसून येते. ह्या चारही संता पैकी जयरामस्वामी व रंगनाथस्वामी हे ब्रह्मचारी होते तर आनंदमूर्ती व केशवस्वामी हे गृहस्थाश्रमी होते.

ह्या संतापैकी जयरामस्वामी हे सर्वात वडील. श्रीरामदासस्वामी व केशवस्वामीं हे जवळ जवळ वयानें सारखे. तर रंगनाथस्वामी हे ह्या तिघांहून थोडे लहान व आनंदमूर्ती हे सर्वात लहान होते. श्री समर्थ व जयरामस्वामी रंगनाथस्वामी व आनंदमूर्ती ह्यांच्या वरचेवर भेटा होत असत हे असावे ह्याचे कारण कदाचित हे सर्वजण महाराष्ट्रातील सातारा जिह्यातील होते, श्रीसमर्थाना उरलेले चौघेही जण वडील बंधु समान मानीत असत, आणि समर्थांच्या धारकरीं पंथाला जीवेभावे संचार स्वातंत्र्य मिळेल असे दक्षतेनें पहात असत. समर्थांचे हे सहकारी संत म्हणजे उत्तम कार्यकर्ते व चौफेर दृष्टीचे असे होते म्हणुनच हे संत म्हणजे समर्थांची 'विवेक वर्धिनी' यंत्रणाच होती असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. श्रीसमर्थ रामदासस्वामी व इतर तिघे जयरामस्वामी, रंगनाथस्वामी व आनंदमूर्ती ह्यांचे संबंधानें ह्याच अंकात इतरत्र आलेलें असल्याने त्याचे बद्दल जास्त उहापोह न करतां. श्रीसमर्थ व जयरामस्वामी रंगनाथस्वामी, आनंदमूर्ती, ह्यांच्या पासून दूर महाराष्ट्रा बाहेर भागानगर ( हैद्राबाद ) येथे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कार्य करीत असलेले केशवस्वामी भागानगरकर ह्यांच्या चरित्रावर गुरुभक्तिवर कांहीसे लिहीता आले तर लिहावे हा प्रस्तुत लेखाचा प्रमुख हेतु आहे

श्रीकेशवस्वामींची समाधी शके १६०५ किंवा १६०८ मानण्यांत येतो. त्यांच्या जीवनातील विविध घटनांचा विचार करता समाधी समयी त्यांचे वय ७२ – ७३ वर्षाचे असले पाहिजे असा अंदाज करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांचा जन्मशक शकें १५३० च्या आसपास असावा असे मानले जाते.

श्रीकेशवस्वामी मूळचे सध्याच्या कर्नाटक राज्यातील बिदर जिह्यातल्या कल्याणी गांवचे त्यांचे वडील आत्माराम पंत कल्याणीचे कुलकर्णी होते. त्यांची आई गंगाबाई ही उभयता धार्मिक वृत्तीची व पंढरीची वारकरी होती. लग्न होऊन बरच वर्षे झाली तरी ह्या दांपत्याला मूळबाळ झाले नाही. ह्यांनी पुष्कळच उपासना केली म्हणून म्हणा किंवा कांहींही म्हणा यांच दांपत्याच्या पोटी श्रीकेशवस्वामीच जन्म झाला ह्यावेळीं आत्मराम पंताचे वय ८५ तर गंगाबाईचे वय ८० होते. बालपणा पासून केशवस्वामी वयाच्या पाचव्या वर्षा पर्यंत मनाच्या उन्मन अवस्थेत होते. त्यामुळे ५ व्या वर्षापर्यंत ते एक शद्बसुद्धा बोलले नाहीत पुढ श्रीशंकराचार्य ह्या गांवी आले असता त्यांनी केशवस्वामीना अनुग्रह दिला. व शक्तिपात करून त्यांना बोलते केले. ते बोलू लागले ते प्रथम ईश्वराचे न मस्मरणच.

पुढे योग्य वेळी कल्याणीचेच श्रीधरपंत सबनीस ह्यांच्या मुलीशी त्यांचा विवाह झाला. आणि केशवस्वामी गृहस्थाश्रमी झाले. जन्मतःच वैराग्य वृत्तीचे असलेले केशव स्वामी संसारात पडले तरीही परमार्थावरची त्यांची निष्ठा कायमच राहिली

गोवळ कोंडयाची राजसत्ता असलेले जमान्यांत, केशवस्वामीनं पूर्ववयांत तानशा कुतुबशहाच्या हाताखालिल अधिकाराची नोकरी सोडून काशीराज स्वामींचे शिष्यत्व पत्करलें. त्यामूळ भजन किर्तने असे त्यांचे कार्यक्रम अव्याहत चालू असत, असेच गांवोगाव हिंडत ते भागानगरात आले आणि तेथल्या जनतेला त्यांनी आपल्या वाणीनें व शिकवणुकीने असें भारुन टाकलें की कांही मुसलमानही त्यांचे शिष्य झाले. त्यांच्या शिकवणुकीने प्रभावित झालेल्या एका मुसलमान जमीनदाराने त्यांना कांही जमीन दिली. तिथेच केशवस्वामीनी आपला मठ स्थापून भागानगर हे आपले कार्यक्षेत्र निश्चित केलें हैदराबाद शहरापासून सुमारे चार मैलावर जियागुडा ह्या भागात अद्यापिही ही जागा आहे. तिथेच श्रीकेशवस्वामींची समाधी आहें.

गोवळ कोंडयाची राजधानी हैदराबाद हाच आपला कार्य परिसर म्हणून निवडताना केशवस्वामीना काय काय आपत्तीना तोंड द्यावे लागलें असेल ह्याची कोणालाही कल्पना करता येईल. कोठल्याही मुस्लीमेतर जेव्हा 'काफर' म्हणून तिरस्काराचा विषय होत होता त्या काळात केशव स्वामीनी तेथे एक संघटित हिंदु समाज निर्माण केला, एवढेच नव्हे तर मुस्लीम समाजातील कांहींची मने जिंकुन

जळी पाषाण कोरडा । तैसा राहू नको जडा ॥
करी स्वहित आपुले । धरुनि संताची पाऊले ॥
असे लोकांना सांगताना
प्रतीतीची नाहीं सोय । वरी शृंगारिलें देह ॥
त्यांची संगती नको रामा । ते काहीच न येती कामा ॥
असे सांगण्यास तें विसरले नाही.

केशवस्वामीनी रंजल्या – गांजल्यांना आपले म्हणण्याचा अशा भक्तिमार्गाचा पुरस्कार केला आहे. केशव स्वामीचें प्रकाशित वाङ्मय अक्षरशः अफाट आहे ते उत्तम प्रकारचें प्रतिभा संपन्न कवि होते. शिवाय त्यांना संगीताचेही चांगले ज्ञान होतें. केशवस्वामीनी जे काव्य लिहिलें त्यात अनेक विषय आलेले असून त्यात राम, कृष्ण, भवानी इत्यादी देवता तसेच परब्रह्म, वेदान्त भक्ती असेही विषय आलेले आहेत त्यांच्या उद्‌गारांत अद्वैत भाव आहें. त्याच प्रमाणें सगुण प्रेम आहे. शिवाय नाम व संत ह्याच्या विषयी प्रेमादरही दिसून येतो त्यांचे सुमारे ५५० श्लोक प्रसिद्ध आहेत धुळे येथील समर्थ भक्त कै शं. श्री. देव ह्यांना स्थापन केलेल्या श्रीसमर्थ वाग्देवता मंदिर, पंढरपूर येथील श्रीधर स्वामीचा मठ, पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळ इत्यादी ठिकाणी त्यांचें वाङ्मय विखुरले आहे बऱ्याच वर्षापूर्वी केंशवस्वामीच्या कवितेचा संग्रह ( सुमारे ३०० पृष्ठांचा ) श्री नरहर सदाशीव खरशीकर शास्त्री ह्यांनी संपादित केलेला, हैदराबाद येथील वें. श्रीधर वामन नाईक ह्यांनी प्रसिद्ध केंलेंला आहे. त्यांच्या काव्यामधून लोक शिक्षणाची व लोकाभिमुखतेंची वृत्ती दिसून येते.

आतां त्यांची गुरुभक्ती किती उत्कट होती हे त्यांच्या काव्यावरुन समजून येईल त्यांची कांही गुरुकिल्लीची पदे आहेत. त्यांत ते म्हणतात–

व्याघ्राचे वाडा एक मिस्कील गाय
ते दुपळघा बैलाचा माय रे ।
दांताविणे तिणें वाघास गिळीले
तिचा पाडा तिस खाय रे ।
सूर्याने गावी गडद पडले,
आंधळ्याने लाविल्या वाती रे ।
काजळा डोळा धुउनि सांडिता
नुरेचि दिवस राती रे ॥
मायेचा गोहो गाभण जाला
तो बायलेस आपण व्याला रे ।
गुरुकृपें केशवी नवलावो
पाहता चांदण्यानें डोहो गिळीलावो ॥

केशवस्वामींचा गुरुभक्तीवर मुख्य भर असल्याने ते लिहितात,

गुरुच्या एक्या बोले । मी पण माझे गेले ॥
गुरु संगतीत ' श्रवणें स्नानें अद्वय भजने हरिली माया रे ।।
आणखी एके ठिकाणी ते म्हणतात–

निश्चय झाले मन माझे । केली दया गुरुराजे ॥
विचारदिपक लावुनिया । राम हिरा करि घेऊनिया ॥

पुढे ते (केशवस्वामी) म्हणतात– श्रीगुरूने 'स्वराज्य देऊन सिद्ध आसनी बसविलें व जेथे जावे तेथे देव सांगते' असे केलें निरंतर लूट मिळतअसल्याने 'वादरुव वाद' यांचा आतां उबग आहे. सद्गुरुचें पायी आम्हा नित्य दिवाळी

त्यागी भोगी देव सापडला पूर्ण ।
सफल झाला ज्ञान योग ।।
बहिर अंतरी निरंतरी ।
देवचि दाटला पाहि गराई ॥

केशवस्वामीची दोन गुरुविषयक पदे तर फारच बहारीची आहेत.

(१) तो मज आठविती गुरूराजा ।
प्राण विसावा माझा ।।ध्रु।।
श्रवणी पाजुनिया अमृत । मस्तकी ठेऊनी हस्त ।।१।।
विवेक सिंधुची चित्ररत्नें । लेंववली मज यत्नें ।।२।।
अखंड देउनिया स्मरणासी । द्वैत भयाते नाशी ।।३।।
अक्षय प्राप्तीचा सुखदाता । केशव म्हणे आतां ।।४।।
(२) आनंद केला बा गुरुराया । हरली सकलहि माया ।ध्रु।
माया ममता मी मुळी नेणें । सर्वही सद्गुरु जाणें ।।२ ।
त्रिपुटी ग्रासुनिया सुख देशीं । प्राण विसावा होशी ।।२।
केशवस्वामीच्या दातारा । स्वरूपी दिधला थारा ।।३।

एके ठिकाणी केशवस्वामींनी गुरुचे वर्णन वीररसाच्या भाषेत केले आहे, ते मजेदार असल्यानें पुढे देत आहे. ते म्हणतात " सायुज्य तुरूंगावर चढून प्रेमाची झील दिलेला बोधाचा भाला घेऊन, भक्तीची कटयार, व नामाची फिरंग घेऊन स्वानंदाने ब्रह्मांड गर्जवित, काळाचा जबडा फोडीत व भवबंध बेडया तोडीत,

आला आला रे गुरुराज महाराज माझा आला ॥

गुरूकृपा जर असेल तर असणें नसणें, जाणणे नसणें हे राहत नाही.

जीव शिव दोन्ही भाव निजपदी जाले वाव ।
मी पणा वेगळा देव सहजची निःसंदेह ॥
जाणणें नसे, नेणणें नसे, असणे नसणे नसे ।
केशव म्हणें पूर्ण एक जाणणें मात्र असे ॥

संत समागम व गुरूचरणी जर मन व देह वाहिला असेल तर तीर्थक्षेत्र तिथेच आहे ह्याबद्दल ते सांगतात–

संत समागम काशी रे । क्षणभरि बस्तिशी जाशी रे ।
नासती पातक राशी रे । पावसि परम पदाशी रे ।ध्रु।
गुरू चरणीं मन ठेवुनिया । भजन रसायन सेवुनिया ॥
चिन्मय लेणें लेंवुनिया । राहे तन्मय होवुनिया ।।१।।
गुरूचरणीचा वासी रे । समाधी त्याची दासी रे ॥
पदोपदी त्या काशी रे । बोले केशव जोशी रे ।।२।।

केशवस्वामीना अहर्निशी आपल्या गुरुचा ध्यास लागला होता त्याबद्दल ते लिहितात–

गुरूभक्त नांदती जिये देशीं हो ।
तो मी देश ध्याईन अहर्निशी हो ॥
गुरूभक्तीचा कुळधर्म ज्याचे घरी हो ।
त्याच्या मूर्ती मी पुजीन अंतरी हो ॥
गुरू वेगळे दैवत ज्यासी नाही हो ।
म्हणें केशव लोळण त्याच्या पायी हो ॥

खरे संत भेटणे दुर्लभ, पण पूर्वपुण्याईने ते भेटलेच तर कृतार्थ जीवन होण्यास काय उशीर ? अनेकदा मंत्र यंत्र सांगणारे संत भेटतात परंतु देव भेटविणारे संत मिळणें फारच भाग्यचे होय. त्यासंबंधी केशव स्वामी

मंत्र यंत्र दीक्षा सांगती लयलक्ष ।
परी राम तो प्रत्यक्ष न करी कोण्ही ॥
सर्व कर्मी राम भेटवी माते ।
जीवे भावे त्याते ओवाळीन ॥

सद्भाग्याने व पूर्व पुण्याईने श्रीराम भेटविणारे सद्गु केशव स्वामींस भेटले त्याबद्दल ते म्हणतात–

(१) संत संग भला श्रीराम देखिला ।
आनंदु पिकला त्रिभुवनीं ।।१।।
सुखाचा सुकाळु डोळियासी लाला ।
श्रीराम देखिला आजि माय ।।ध्रु।।
देखिला श्रीराम संशयो तुटला ।
पांगही फिटला संसाराचा ।।२।।
संसाराचे बिरडे क्षणांत फेडिले ।
महावाक्य बोले श्रीगुरुच्या ।।३।।
केशव म्हणें आम्हा अनुभव प्रचीती ।
जागृती सुषुप्ती राम दिसे ।।४।।
२) सद्गुरुचे नाम ते माझी विश्रांती ।
म्हणें अहोरात्र राम राम ।।१।।
रामनाम वाचे अखंड उच्चारा ।
करा त्या हाकारा सद्गुरूसी ।।२।।
श्रीरामा सद्गुरु तुं माझा बापुला ।
तुझेनि आपुला विश्वजनु ।।३।।
केशव म्हणे माझे पुरवी मनोरथ ।
भेटीं दिली त्वरित याची देहीं ।।४।।

# केशवस्वामी भागानगरकर जीवनपट

संकलक– म. प. पेठे

जन्म : शक उपलब्ध नाही, आईच्या ८० व्या वर्षी जन्म झाल्याचे सांगतात.

कुल : ब्राम्हण ऋग्वेदी

आईवडील : गंगाबाई, आत्मारामपंत (कल्याणीचे)

गुरु : सहजानंद-नित्यानंद–काशीराज, संप्रदाय मुकुंदराज

वास्तव्य : लातूरच्या दक्षिणेस असलेलें कल्याणी हे मूळ गांव. भागानगर येथे मठ स्थापून राहिले.

व्यवसाय : कीर्तनकार

शिष्य परिवार : शिवराम, संतराज, गुंडा

जीवनातील महत्वाच्या गोष्टी : ५ व्या वर्षी शंकराचार्यांच्या कृपेनें वाचा आली

विवाह : भगन्नाम व विषयोपभोग या दोन परस्परविरोधी वृत्ती एकदाच होत्या त्यामुळे शृंगार व अध्यात्म दोन्ही प्रकारची पदे रचू लागलें. गीत गोविंदकार जयदेवाचे अवतार मानले गेलें; समर्थांवर भक्ती; पत्नीसह चाफळला जाण्यास निघाले, परंतु वाटेत थकले यावेळी ब्राह्मण रुपात मारुतीनें मदत केल्याची आख्यायिका

ग्रंथ निर्मिती : ४६८ पदे, रुप, नाम व देवपर कविता, एकादशी चरित्र

समाधी : गुरुवार पौंष शुद्ध १३ १६०४ दुदुंभी नाम संवत्सर, (संतराज यांनी हा शक दिला आहे.) भागानगर येथे . . . मुसा नगरीच्या तीरावर.

संदर्भ : महाराष्ट्र सारस्वत' आ. ६. १९८३ (१३६–३४३) दासपंचायतन


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा

ऐक्य सहकार्यांचा मार्ग आक्रमिता । समाज जीवना लाभे सुख समृद्धता ।

**टाकळीमिया विविध कार्यकारी सेवा सह. सोसा. लि.**

रजि. नं २१४५ ता. राहुरी जि अ.नगर र. ता. १७ । १२ । १९१८

वार्षिक उलाढाल रु. २ ते ३ कोटीपर्यंत

सभासद संख्या १०६९ सभासद भाग भांडवल १७ लाख सरकारी भाग भांडवल रु. १.१२ लाख

सभासद ठेवी रु. ३.२१ लाख निधी (सर्व) ७.८५ लाख बँक कर्ज रु. २६.७४ लाख

सभासद कर्ज रु. ३४.०८ लाख गुंतवणूक रु. ९.८९ खेळते भांडवल रु. ७१.६९ लाख

स्थावर मालमत्ता ४ २० लाख ☎ ३२ (टाकळीमिया)

गंगाधर सावळेराम मंचरे — मुख्य सचिव

भिकाजी महादू शिंदे — उप सभापती

जिजाबा रंभाजी करपे — सभापती

# ‘राम रंगी रंगली केशवाची वाणी’

— ए. का. थावरे

महाराष्ट्रातील संताच्या गेल्या ५००–६०० वर्षाच्या कार्याचा आढावा घेतला तर आपणास असे दिसून येईल की, समाज अभिवृद्धिसाठी पोषक अशी शिकवणूक देउन मानवाच्या सर्वांगीण विकासात फार मोठी मोलाची भर घातली आहे या संताच्या मांदीयाळीमध्ये श्रीज्ञानेश्वर, श्रीनामदेव, श्रीएकनाथ, श्रीतुकाराम, श्रीसमर्थ रामदासस्वामी इत्यादीच्या कार्याचा प्रभाव आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल त्यांच्या शिकवणूकीत काही समान सूत्रे होती भगवत् प्राप्ती हे अंतिम ध्येय मानून या मंडळीनी सगुणोपासना प्रतिपादीली. धार्मिक अध्ययनाला आचाराची जोड दिली विश्वी विश्वंभर या न्यायानें सर्वांभूति भगवद्भाव पहायला शिकविले भगवद्भक्ताचा अचार, विचार व कृती विशुद्ध असावी यासाठी अट्टाहास धरला

महाराष्ट्र संतमंडळीत तीन पंचायतने प्रसिद्ध आहेत १) ज्ञानेश्वर पंचायतन २) एकनाथ पंचायतन व ३) रामदास पंचायतन.

दास पंचकात पुढे दर्शविलेल्या महापुरुषांचा समावेश होतो.

| | |
|---|---|
| १) श्रीसमर्थ रामदास | सज्जनगड |
| २) श्रीजयराम स्वामी | वडगावकर |
| ३) श्रीरंगनाथ स्वामी | निगडीकर |
| ४) श्रीकेशव स्वामी | भागानगरकर |
| ५) आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर | |

सर्वजण समर्थांचे समकालीन होते. समर्थांनी आरंभिलेल्या कार्याची महती सर्वांना पटली होती. व प्रत्येकजण आपापल्या परिनें तेच कार्य करीत होते. त्यांचे व समर्थांचे स्नेहसंबंध चांगलें होते. याचा अर्थ ते सर्वच दास पंथीय होते व सर्वांनी दासांचे शिष्यत्व पत्करुन रामभक्तिचा प्रचार केलाअसे अजून पुराव्यानिशी निसंदीग्धपणें सिद्ध झालेलें नाही कार्य समानतेमुळे कालांतरानें कल्पिलेल्या दासपंचायतनात त्यांचा समावेश केंला गेला आहे.

सर्वांच्या कार्याचा, उपासनेचा व आरंभिलेल्या तडाखेबंद प्रचाराचा उहापोह विस्तृपणें एका लेखात होणें शक्य नाही. यास्तव या लेखात केवळ केशवस्वामी भागानगरकर यांच्या उपास्य देवतेचा व प्रबोधनाचा अल्पसा मागोवा घेण्याचे ठरविले आहे.

कर्नाटक राज्यातील कल्याणी गावाचे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आत्मारामपंत कुलकर्णी हे केशवस्वामींचे वडिल त्यांच्या पत्निचे नांव गंगाबाई. आत्माराम व गंगाबाई हे पतिपत्नि अत्यंत सात्विक होते. कुलधर्म व कुळाचार पाळण्यात ती दोघेही अति तत्पर असत. त्यांच्या घरी कुळपरंपरेनें चालत आलेली श्री पांडुरंगाची भक्ति व पंढरीची वारी होती. लग्नानंतर बरीच वर्षें पोटी संतान नसल्यामुळे गंगाबाई उदास असत तर आत्मारामपंत संसाराचा गाडा अनिच्छने व मोठ्या मेटाकुटीने हाकीत होते. पांडुरंगाची भक्ति मात्र निष्ठेने चालु होती. असाच काही काळ लोटल्यावर उभयतांची तपःश्चर्या फळास आली, आणि गंगाबाईची कुशी उजवली. दुर्दैवानें केशवस्वामींच्या जन्माची तिथी व शक उपलब्ध नाहीं, आपल्या समाजात त्याकाळी वसत असलेंल्या उदासीनतेचे तें एक नमुनेदार उदाहरण आहे.

जन्मल्याबरोबर केशवाची अवस्था काही वेगळीच होती. त्याची हालचाल, रडणे, खाणें, पिणें, सारे कसे इतर सामान्य बालकापेक्षा वेगळेच ते पाहून मातेला कधी धन्यता तर कधि न्यूनता वाटायची तरी पण पंढरीच्या पांडुरंगावर भरवसा ठेवून ती माता परिस्थितीत फरक पडेल या आशेवर होती बाळ मोठा होत होता; पण मातेच हृदय मात्र पोटच्या गोळ्यांच्या काळजीने झुरत होते. मुलाच्या तोंडून एक शद्ब ही फुटत नव्हता. आई दीन होती तर वडिलांचे मन विषण्ण होते त्यांना काय माहित की हे पोर पुढच्या आयुष्यात आपल्या प्रभावी बोधाने सारा महाराष्ट्र ढवळून काढील म्हणून. पुढे मोठी झेप घेण्याची ताकद यावी यासाठी कदाचीत तो वाणीला दिलेली विश्रांती पण असेल

असे कांहीं दिवस लोटलें भाग्याचा दिवस उजाडण्याची वाट पहावी लागते. हेंच खरे. मातापित्यांनी आपल्या बालकाचे बोचरे शल्य जणुं झाकुन ठेवले व पांडुरंगाची भक्ती शिगेला पोहोचविली पुढे काय झाले; एके दिवशी दिवशी श्रमीत् शंकराचार्य फिरत फिरत कल्याणीला आले

ह्या शिवाय केशवस्वामीचे गुरुभक्तिपर काव्य पुष्कळच आहे. परंतु सर्वच येथे देणें शक्य नाही तरी पण एकें ठिकाणी त्यांनी एक सुंदर रुपककेले आहे त्यांत सर्व शेत विषयक शब्द शेतकऱ्याच्या नित्य परिचयाचे वापरलेंले आहे. ते पद येथे देऊन हे गुरुभक्ति दर्शविणारें काव्य येथेच थांबवू. हे पद देण्यापूर्वी ज्ञानेश्वरी मधील पुढील ओवीचे स्मरण केल्यास हें रूपक केलेले पद समजण्यास सुलभ होईल.

ज्ञानदेव म्हणे मी चाडे । सद्गुरुने केंलें कोडे ।
माथा ठेविला ते फुडें । बीजांच वाईले ॥ ज्ञा. अ ६-४९२

**रुपक**

श्रवणाचे चाडे हेंधरिलें ।
गुरुमुखे निजबींज पेरिलें । ध्रु.।
निजधैर्य नांगर धरुनी ।
भेद खुंट काढिले खाणुनी ।
भक्ति ज्ञान वैराग्य तिफणी
अति शुद्ध केली मोदिनी ॥१॥
स्वानंदाचा वर्षला निजघ ।
परिपूर्ण पिकले चैतन्य ।
तेथे सत्व सोकारा राखण ।
कर्म पक्षी हांकिती आपण ॥२॥
निजबोधे पिकलें शेत वो ।
स्वानंदाच्या घुमऱ्या येंत वो ।
कैवल्याची राशी हें होत हो ।
गुरूकृपे केशव घेत हों ॥३॥

१) चाडे – बी पेरण्याचे लाकडी भांडे
२) तिफणी – तीन दात्याची जणू फणी. हिनेंच बी पेरले जाते.
३) सोकारा – रक्षण करणारा, राखण करणारा पांखरे उडविणारा
४) घुमरी – दाण्यांनी कणसे भरुन येणें उत्कर्ष होणे

येथे पर्यंत केशवस्वामीच्या गुरूभक्ति बद्दल त्यांच्या काव्यातून काय आलेले आहे ह्याचा उहापोह थोडक्यात केला. आतां केशवस्वामीच्या उपदेशाचे सार थोडक्यांत पाहुं ते म्हणतात मनुष्य कितीही विद्वान असला तसेच विविध कला मध्ये पारंगत असला तरी आत्मबोधा वाचून कृतार्थता नाही व हा आत्मबोध संत समागम व सद्गुरू कृपेनेच होतो भाग्याने मला उपरती झाली आणि मी संत सद्गुरुला शरण गेलो आता तरलो तरलो त्याच्या नांवे रे म्हणून तुम्ही सत्संग धरा व तरा व इतरासही तारा निजबोधाने 'अखंड समाधी' व तें सुख जनास देऊन लोकोद्धार करणें हे केंशवस्वामीच्या उपदेशाचे सार आहे. अद्वयानंदाचा किंवा ज्ञानोत्तर भक्तीचा जो कित्ता श्रीज्ञानेश्वर महाराजांनी जगास घालुन दिला तोच ज्ञानेंश्वरानंतरच्या पुढील सर्व संतानी गिरवला आहे. अर्थात, केशवस्वामी ह्याला मुळींच अपवाद नाहीत.

इ. स. १६८३ साली म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी ह्यांच्या निर्याणानंतर एकच वर्षानें त्यांनी भागानगर येथे समाधी घतली. हैदराबाद येथे मुचकुंदा उर्फ मुसा नदीच्या कांठी त्यांचा समाधी आहे. ही समाधी अनेक वर्षे जीर्ण अशा अवस्थेत होती. या समाधीचे अस्तित्व सुमारे ३०-४० वर्षापूर्वी माहित झाल्यानंतर हैदराबादचें कै. धर्मवीर वामनराव नाईक ह्यांनी ह्या समाधींवर छोंटेसे मंदिर बांधले. नंतर अलिकडेच समाधी व्यवस्था पहाण्यासाठी व जीर्णोद्धार करण्यासाठी एक समिती स्थापन झाली आहें. ह्या समितीच्या वतीनें दररोज पूजा अर्चा होत असते. दर वर्षी पौष वद्य १३ ला त्यांची पुण्यतिथी साजरी होते.

आतां उपलब्ध झालेल्या अनेक उल्लेंखा वरुन केंशव हे मुकुंदराजाच्या संप्रदायातील होते असे आढळून आले आहे. त्यांच्या एकूण जीवनांत मुकुंदराज संप्रदाय, वारकरी, संप्रदाय आणि धारकरी ( रामदासी ) संप्रदाय ह्यांचा त्रिवेणी संगम आढळतो. तसेच एकनाथाचा गृहस्थाश्रम, नामदेवांची विठ्ठल भक्ति आणि समर्थ रामदासस्वांमीची लोक संग्रहाक वृत्ती असा दुसराही एक सुरेख त्रिवेणी संगम आढळून येतो. असे नसते तर पर मुलाखांत परकीय सत्ताधाऱ्यांच्या राजधानांत राहून त्यांनी जे कार्य केले तें करणेंच दुरापास्त झाले असते अशा ह्या समर्थ रामदासस्वामींच्यां दास पंचायतनापैकी, प्रपंचात राहुन परमार्थ साधणाऱ्या, परमुलाखांत परकीय सत्ताधाऱ्यांच्या राजधानीत राहून, लोकसंपर्क संपन्न साथी – सहकारी श्रीकेशवस्वामी ह्यांना माझे सहस्त्रशः प्रणाम !

**संदर्भ**

१) श्रीसमर्थ चरित्र
लेखक – सदाशिव खंडो आळतेकर
२) मराठी वाङ्मयाचा इतिहास तिसरा खंड (रामदास खंड)
लेंखक – ह. भ. प. ल रा पांगारकर
३) श्रीसमर्थ
लेखक – पु. पां. गोखले
४) प्रसाद मासिक
श्रीसमर्थ रामदास विशेषांक ऑगस्ट १९८१

गंगाबाई मूल घेवून त्या महात्म्या कडे गेली आणि आपली व्यथा दीनवाणीनें त्यांना सांगितली. मुलाच्या ठिकाणी सुप्तपणें वसत असलेंले असामान्य गुण शंकराचार्यांनी ओळखले आणि म्हणाले आई, हे मूल सामान्य नाही धन्य तुझे दैव ! मातेच्या डोळ्यातुन आनंदाश्रु ओघळल तीने दीर्घ विश्वास टाकला पदराने डोळे पुसले आणि अवाक होऊन स्तब्ध उभी राहिली. तेवढ्यात शंकराचार्यांनी त्या मुलाच्या कानात मंत्र दिला आणि कृपाकटाक्षानें न्याहाळले डोक्यावरुन हात फिरविला मोठ्यांचे मोठेपण मोठेच जाणतात. तो व्यवहार सजातीयांचा. विजतीयांना तो कसा कळावा! शंकराचार्यांच्या हाताचा स्पर्श होताच, त्या बालाची वैखरी एकदम जागृत झाली तो अगदी रुळलेल्या माणसा सारखा स्वच्छ बोलू लागला त्याचे ते मधुर शद्ब कानानी एकताच आई डोलली तर, वडिलांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

बाल शुक्लेंदुवत् वाढू लागला. त्याच्या बोलण्यात, वागण्यात, आवडा निवडीत त्याचे असामान्यत्व प्रगट होत लागले. त्याने इतरेजन त प्रभावित झालेच, पण आई-वडिलांना मात्र श्रीपांडुरंगानी आपले पांग फेडलें म्हणून कृतकृत्य वाटू लागलें कल्याणीलाच श्रीधरपंत सवनीस नावाचें एक गृहस्थ रहात असत. ते कट्टर सूर्योपासक होते. असे म्हणतात कां, पंढरीच्या पांडुरंगाने त्यांना स्वप्नात येऊन असे सांगितले ; 'तुझी उपवर कन्या तू केशवास दे' केवढी कळजी भगवंत आपल्या भक्ताची वाहतो.

केशवाचा गहस्थाश्रम सुरु झाला ; पण त्याच्या मुखी सदानकदा श्रीरामचे नाम असे त्याची वाणी भगवन्नामात रंगली होती, आणि म्हणून त्याची संसारी वृत्ती भंगली दर पंधरा दिवसा एकादशी हरिदिनी जागर हे कार्यक्रम चालूच. तो जे करी ते इतरांना सांगे. " करा हरिभक्ति परलोकी यें कामा " हा त्यांच्या प्रबोधनाचा गाभा असे. फिरत फिरत ते एके दिवशी हैद्राबाद भागातील भागानगर या गावी आले. येथे येई पर्यन्त ते स्वामी या नावाने ओळखले जाऊ लागलें होते भागानगरीला येण्यापूर्वीच या भगवद्भक्ताच्या किर्तीचा सुगंध त्या गावी दरवळला होता धार्मिक माणसे त्यांच्या दर्शनाला आसुसली होती तर इतर जनांना आपले कुतुहल स्वस्थ बसु देत नव्हते. त्यांची वाणि गंगोघाप्रमाणें सुरु झाली की, क्षणार्धात श्रोत्यांची मने जिंकित असे. मंत्रमुग्ध होत. त्याचे कारण म्हणजें केशव स्वामीचें सांगणें हे आधि केले मग सांगितले या जातीचे होते त्यात लटकेपणा, दांभिकता लोकेषणा या कशांनाच थारा नव्हता. होता तो लोकोद्धाराचा शुद्ध हेतू येथूनच पुढे केशवस्वामींनी भागानगरीतच कायमचे वास्तव्य केले त्यांनी जातीपातीला अवास्तव महत्व दिले नाही. भिन्न-धर्मीय व पंथीय लोकांना एकत्र केले व भजन किर्तनानें नाममहिमा वाढविला लोकांना स्वतःच्या आचरणानें डोळस भक्ति सांगितली य त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला ते एकदा पंढरीच्या वारीला गेले होते, असा उल्लेख सापडतो. केशवस्वामींनी भजन कीर्तनातून सन्मार्गाची शिकवण दिली. भिन्नभिन्न देवांचीं उपासना करणारे व विविध सांप्रदायात विखुरलेल्या समाजपुरुषाला त्यांचे त्यांचे दोष दाखवुन दिलें व आडमार्गाने गेल्यानें होणारी फसगत त्यांना पटवून देऊन शुद्ध सात्वीक भक्तिमार्ग लोकांना सांगितला देव म्हणुनी मानिसी धोंडा । आड पडती पोरे पोरे रांडा ।। वय गमविले येणें । व्यर्थ मुखचि हे जिणें ।।

या धर्म संकीर्तनानें लोकात संघटन झालें व नाम स्मरणाने त्याची अस्मिता जागृत होऊन त्याचा आत्मविश्वास वाढला. ते म्हणत-

रामनामाचीं महिमा मोठी । नामे तरले कोटयानुकोटी ।
नामे गणिका वैकुंठवासी । नामे अढळपद ध्रुवासी ।।

भगवद्भक्तिचा खरा आस्वाद न घेतलेले ढोंगी साधु फार झाले होते: त्यांनी दांभिकपणाने लोकांना फसविण्याचे प्रकार खुप वाढले होते. स्वार्थापायीं लोकांना कुमार्गाला लावीत व देवाच्या नावावर आपल्या तुंबड्या भरीत त्यांच्या गाठी स्वधर्माचरणाचा कांहीही अनुभव नसे अशांच्या बाबतीत ते म्हणत-

प्रांजळ शद्वे ब्रह्म सांगे वरी वरी ।
अनुभवव पुसता चाऊ वाऊ करी ।।

ज्यांनी देव पाहिला नाही, भजनानंद लुटला नाही, त्यांचे बोलणें म्हणजे " प्रतीतीविण वाऊग्या गोठी असे ते म्हणत

थोर संत, भगवद्भक्त अनुभवाने संतुष्ट न होता ; " सेवितो हा रस वाटीतो आणिका " भावनेंने त्याचे अमृतपान ते यथेच्च लोकांना देतात त्याची अविट गोडी इतरांना लागावी म्हणून झिजतात.

भक्तीमार्गानें चालणाऱ्यांची वृत्ती अतिशय हळूवार असावी परदुःखाने मन विव्हळावे. इतरांच्या भावनांशी समरस व्हावे आणि मगच त्यांचे सह वर्तमान भक्ती करावी जीवांत जीव घालावा । चालावा भक्ती मार्ग हा ।

लोकसंग्रह करणाऱ्यानी घ्यावयाची दक्षतापण त्यांनी एकें ठिकाणी सांगितली आहे ते म्हणतात -

सकळी राखणें राजी । हें मुख्य भक्ति जाणिजे ।

श्री समर्थांनी प्रतिपादिलेलां सर्व पथ्ये त्यांनी आपल्या प्रबोधनात आग्रहाने मांडिली आणि त्या काळात महाराष्ट्रा बाहेर एवढ्या दूर अंतरावर राहून राष्ट्रहिताला पोषक ठरेल अशा भक्तिमार्गाची दुदुंगी पिटविली

केशवस्वामींनी खुप मराठी पद्य रचना केली आहे. तसेच त्यांची हिंदी पदेही उपलब्ध आहेत तरी सुद्धा जाणकारांचे असे मत आहे की, स्वामींच्या पुष्कळशा कविता अनेकांच्या दप्तरांत अद्यापि धूळखात पडल्या आहेत तिचे संशोधन व संपादन होण्याने त्यांच्या जीवित कार्यावर अधिक प्रकाश पडेल. स्वामीच्या सर्वच पदांची रचना अचूक शब्द-योजनेनें गुंफिली आहेत. त्यांच्या काव्याला रागाची व तालाची अवीट जोड आहे त्यांनी आपल्या पदातून श्रीरामाचे व श्रीकृष्ण रुपाचे अतिशय मनोहरी वर्णन केलें असून तें भाविक मनाला भारून टाकते कृष्णा संबंधी त्यांच्या पुढील काव्य पंक्ती पहा–

अनादी मूळ । ज्यासी नाही याती कूळ ।
तो यशोदेशी म्हणतसे आई रे ।

कधि कृष्णाचे तर कधि रघुरायाचे वर्णन वर्णन तें आपल्या पदातून रसभरीत करतात–

धन्य अयोध्येचे जन रे । जे अवलोकित रघुनंदन रे ।

पंढरीच्या सावळ्या पांडुरंगाने तर स्वामींना मोहिनी घातली होती, वेडं केलं होत. भिवरेच्या वाळवंटात भक्त पुंडलिकाच्या सान्निध्यात उभे राहून केशवस्वामी म्हणतात

काशीची न भवेचि सरी या।

विठ्ठल महती गाताना त्यांची वाणी बहरते. ते सहज उद्गारता –

बंदी पडल्या देवकोडी । त्यांचा बंद हा रे सोडी ॥

समर्थ सांप्रदायाचा मुख्य भर भिक्षेवर भिक्षेत निर्लोभता, संतुष्टता आणि ईश्वर भजनी लिनता या सर्वांचा एकत्र लाभ होतो म्हणुन समर्थ म्हणत

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ॥
ओम भवति पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥

या तत्वप्रणालीवर स्वामींचा सुद्धा अति कटाक्ष असे भिक्षेचे अन्न शुद्ध, सात्विक असावे, अन्यथा त्याचें वाईट परिणाम खाणाऱ्यावर होतात, म्हणून स्वामीनी अलक्ष भिक्षा मागितली त्या भिक्षेतील अपूर्वाई पहा –

ब्रह्मीची ब्राह्मणें आलो भिक्षेलागी ।
अलक्ष भिक्षा वेगी द्यावी आम्हा ॥ध्रु॥
शुद्ध स्वयंपाक केला नाही जीं हीं ।
त्यांची भिक्षा नाही घेणें आम्हा ॥१॥
कर्म कांडाचे ब्राह्मण ज्यांसीं न सोडी कर्मठपण ।
त्यांची भिक्षा जाण नेघो आम्ही ॥२॥
भेदबुद्धी पाक असे ज्याचे घरी ।
भिक्षा त्यांची करी घेणें नाही ॥३॥
शब्द ब्रह्मवादी शुष्क भिक्षा केवळ ।
तेणें एक चूळ न भरे आम्ही ॥४॥
संकल्प विकल्प गेले नाही ज्याचे ।
भिक्षान्न त्याचे नेघो आम्ही ॥५॥
ऐसिया भिक्षेलागी फिरतां आपण ।
गुरुकृपे केशवी पूर्णप्राप्ती झाली ॥६॥

भक्ति मार्गाच्या प्रतिपादनात त्यांनी उच्च - निच, श्रेष्ठ कनिष्ठ, अधिकारी अन् अधिकारी असा भेद कधी केलाच नाही तो फक्त धर्माचरणाचा. हेच त्यांचे जीवन तत्वज्ञान त्यांच्या वरील अलक्ष भिक्षेतुन प्रतित होत नाही काय?

समर्थ पंचायतनात असलेले, पण समर्थांच्या कार्य-क्षेत्रा पासुन खूप दुर असलेल्या केंशवस्वामींनी अजन्म लोक जागृतीचे कार्य केले. या महामानवानें अखेरीस भागा-नगरीत मुचकुंदा (मुसा) नदी कांठी लोकसेवेच्या व्रताचे आचरण करित असतानाच शके १६०४ मध्ये देह ठेवला. त्यांनी आत्मोद्धारापेक्षा लोकोद्धारच श्रेष्ठ मानला व अधो-गतीला जात असलेल्या समाज पुरुषाला जाग आणून योग्य मार्ग दाखविला. अशा या महात्म्याला, महापुरुषाला, निष्ठावान भगवद् भक्ताला श्रीज्ञानेशांच्या ओवीने वंदन करुन विसावतो.

तें ऋणक्षेप वाचा इया । न फडवे मरोनिया ।
तें पायां पडोनि मियां । सोडविले ॥

# श्रीकृष्ण दीक्षित सोमयाजी सेलूकर महाराज यांचे श्रेष्ठ जीवन

— लक्ष्मीकांत कृष्ण सेलूकर

श्रीरंगनाथ स्वामी महाराज निगडी, यांचे ओवीबद्ध चरित्र त्यांच्याच सांप्रदायांतील श्रेष्ठ संत सद्गुरु श्रीकृष्ण दीक्षीत सोमयाजी तथा सेलूकर महाराज यांनी अंतःस्फूर्तीने लिहीले आहे. श्रीरंगनाथ स्वामींच्या चरित्राचा हा मोठा धागा आहे. या श्रेष्ठ कवीचे श्री सेलूकर महाराजांचा जीवन वृतांत त्यांच्याच अधिकारी चिरंजीवाने शद्बांकीत केला आहे तो येथे आवर्जून देत आहोत

— संपादक

ॐ गणेशांबा सद्गुरुभ्योनमः श्री निजरंग कृष्ण गुरुवेनमः

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानम धर्मस्य तदात्मांन सृजाम्यहम ।।
परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे (श्रीमद्भगवद्गीता)

ज्या ज्या वेळेस अखील मानव गृहस्थ धर्माची हानी होऊन अधर्माचा उद्भव होतो. तेव्हां सन्मार्ग स्थानचे सर्व प्रकारे रक्षण करण्याकरित व दुष्टांचा विनाश करण्याकरिता मी युगा युगांचे ठायी धर्म स्थापनेसाठी अवतार धारण करतो.

जे धर्म जात आघवे । युगां युगी म्या रक्षावे ।
ऐसा ओघु हा स्वभावे । आद्यु असे ।। (ज्ञानेश्वरी)

वरील भगवंताच्या वचनाप्रमाणें सोळाव्या शतकात वैदिक धर्माच्या उत्थानांसाठी श्रीसमर्थ विष्णू पंचायतन श्रीरंगनाथस्वामी, जयरामस्वामी, आनंदमूर्ति केशवस्वामी श्रीरामदासस्वामी, या संत पंचायतनांनी अध्यात्मिक वैदिक परंपरेची जपणुक करुन संबंध हिंदुराष्ट्रात राजकीय व सामाजिक प्रगती घडवून आणण्यांसाठी धर्मरक्षक छत्रपती श्री. शिवाजी महाराज यांना धर्मोपदेश करून धर्म संस्थापनेची अमोल कामगिरी केली. त्याच कालावधीत कवीवर्य संत श्रीधरस्वामी [नाझरेकर] यांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर टाकली श्रीराम, विजय हरिविजय, पांडव प्रताप, शिवलिलामृत व स्फुटलिखाण आदिलेख श्रीधरांचेच अखील मानव जीवास आपला विवेक अखंड जागृत रहाण्या साठी संताचे वाङ्मयच तारक ठरते. ग्रंथ हेच समाजाचे तारक गुरु होत.' कारण संतानी संस्कृत मधिल दुर्मिळ ज्ञात जनसामान्यां पर्यंत प्राकृत भाषेत पोंहचविण्याचे व यातून समाज जागृतिचे महान कार्य केलें. आज त्यांचे ग्रंथच त्यांच्या रुपाने आपल्या समोर आदर्श आहे. तसेच प्रतिभा संपन्न योगीराज माऊली ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व कबीर यांचे ग्रंथ त्यांच्या रसाळवाणीच्या प्रभावाने व आचार संपन्नतेमुळे त्यांच्या सत्कर्माचा दिप आजही जनसामान्यांच्या मनांत तेवत आहे.

तसेच वेदांनी प्रतिपादलेल्या यज्ञ संस्थेची जपणुक अत्यंत कठीण अशा काळात विसाव्या शतकात आनंद सांप्रदायी श्रीनिजानंद रंगनाथ स्वामी महाराजांचे परमभक्त सद्गुरु श्रीकृष्ण दीक्षित सोमयाजी सेलूकर महाराज यांनी धैर्याने केली व आपल्या तेजस्वी परंपरेची सत्यसनातन वैदिक धर्माची यज्ञकर्मानुष्ठानाद्वारे शिकवण दिली. त्यांच्या आदर्श जीवन चरित्राचा आढावा थोडक्यात देण्याचा अल्पमती प्रयत्न केला आहे. स्नेह भावाने अवलोकन करावे. ही सदिच्छा !

साधु संतांची कर्मभूमी महाराष्ट्र, त्यातील लातूर नगरीचें दक्षिण दिशेस सेलू (औसा) गांव आहे. या गांवी श्री वेदमूर्ती एकनाथ पंढरीनाथ कुलकर्णी व त्यांची धर्मपत्नी साध्वीमाता भागेरथी देवी यांचे पवित्र उदरी श्रीराम नवमी शके १८०१ दुपारी परब्रह्म रामजन्मकाळी श्रीनिजानंद रंगनाथ माऊलीचे परमभक्त श्रीसद्गुरु कृष्ण दिक्षित सोमयाजी सेलूकर महाराज जन्मास आले. वडिलांचें ( वेदमूर्ती एकनाथ भाउचे ) दोन तपे काशीतच दोन वेदांच्या अध्यानांत गेली त्यामुळे सद्गुरु श्रीकृष्णचे माऊलीचे बालपण वेदमातेच्या कुशी तच गले. घराणें फारच गर्भ श्रीमंत, परंतु सात्विक वैराग्य वृत्तीमुळे आई वडिलांचा संपुर्ण काळ वेदमंत्र घोष यज्ञ यात्रादि कर्मातच गेला. त्यामुळे श्रीकृष्ण माऊलीवर वेद मातेचेच संस्कार दृढ घडले अशा परम पवित्र कुलांत योग भ्रष्टा शिवाय जन्मास कोण येणार!

प्राप्य पुण्य कृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।
शुचीनां श्रीमनां गेहे योग भ्रष्टोऽभिजायते ।।
अथवा योगीनां मेव कुले भवति धीमताम ।
एतद्धि दुर्लभ तरं लोके जन्म यदि दृषम (श्रीमद्भगवद्गीता)

वरील भगवंतांचे वचनाप्रमाणें साधु कुलांत यज्ञ कर्मानुष्ठानांच्या पूर्व संकल्पित तयारीनें कार्यासाठी प्रगट झाले. बाल अवस्थेतच श्रीरंगकुलोद्भव परमगुरु केशवबुवा गोसावी निगडीकर यांचा अनुग्रह झाला. सद्‌गुरु केशवबुवाचे न्याय आणि मिमांसा शास्त्रांवर प्रभुत्व होते. शिवाय प्रासादिक वाणी असल्याने किर्तनांचे वेळी देहभाव विसरुन आत्मरुपी तन्मय होत. अशा सात्विक विरक्त देही असूनी विदेही सद्‌गुरु माऊलींचें कृपांछत्र श्रीकृष्ण महाराजांना लाभलें.

सद्‌गुरुकृपे श्री दत्तोपासना भागवत ग्रंथाचे सतत वाचन श्री भगवद्‌गीता वाचन मनन आदि नित्यक्रम लहानपणापासूनच सद्‌गुरु श्रीकृष्ण महाराजांच्या दिनचर्येत असे. वडिलांच्या वार्धक्यामुळे घरातील सर्व जिम्मेदारी वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांच्या अंगावर पडली, पण फक्त पांच ते सहा वर्ष अंदाजे त्यांनी घरी राहुन वतनदारी अदि वैभव पाहिले पुढे थोडयांच अवधीत मौजे औसा येथील दत्तमंदिरात दर्शनांस गेल्यानंतर श्रीदत्त महाराजांचा प्रत्यक्ष साक्षात्कार होऊन हस्त लिखीत भागवत त्यांना प्रासादिक ग्रंथ दत्तात्रयांनी दिला. व भागवताची सात पारायणें कर म्हणजे तुझे पुर्व कर्म उदयास येईल असे सांगितले त्याप्रमाणें सद्‌गुरु श्रीकृष्ण महाराजांना तर संत गोरोबा काकांची कर्म भूमी येथे तेरणेंच्या कांही महादेवांच्या मंदिरात सतत तीन चार महिनें कोणालाही घरी न समजू देता तेथे राहुन भागवताची सात पारायणें केली तिथे गंगा तटाक (गोदावरी काठ) ही कर्मभूमी आहे असा शंकराचा दृष्टांत झाला पुढे गांवी आले. (वरील प्रासादिक ग्रंथ त्यांच्या त्यागी वृत्तीमुळे कोणास दिला हे मात्र आमचेकडे उपलब्ध नाही यांची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी त्याकालांतच सद्‌गुरू महाराजांचा विवाह त्यांच्या मातोश्रींचे इच्छेनुसार औसेकर पाठक उपाध्ये नारायण देव यांच्या कन्यारत्नाशीं झाला, त्याच माऊली रुक्मिणी माता होत. पुढे कांही दिवसानंतर प्रत्यक्ष श्रीरंग माऊलीच्या कृपा प्रसादानें त्यांना त्यांच्या पुर्वकर्मांची जागृती झाली त्याबद्दल खालील ओव्या माझे जेष्ठ बंधू श्री वाजपेयी रंगनाथ कृष्ण सेलूकर ('स्मृती कुसुमांजलींत') यांनी रचलेल्या आहेत.

बालत्वी कुलकर्णी साधन मिसे राज कृपासाधिली ।
संपत्ती गृहसौख्य फार मिळता उन्मतता पातली ॥
गर्वादत्व आले तदा उठविण्यां श्रीरंग येई घरा ।
निजरंगी रमला अखंड गुरु तो श्रीकृष्ण योगीस्मरा ॥१॥
साधू वेष धरी श्रीकृष्ण निकटी सांगे भविष्यांस तो ।
जासीं ग्राम धाम विभवा पैं वाट मी दावितो ।
गतजन्मी करिसी अनेक सुकृते घे साक्ष तू अंतरा ।
निजरंगी ॥२॥

वेदोक्त विधी यज्ञ याग करणें इच्छा तुझी पुर्वीची ।
पुर्तीसाठी तिच्या त्वरे उठनिघे आली घडी सिद्धिचा ॥
त्यागी तैं धनगे हृ सत्वर निघे तिर्थाटणा बावरा ।
निजरंगी रमला अखंड गुरु तो श्रीकृष्ण योगीस्मरा ॥३॥

श्रीनिजरंगी रंग माऊली भाकिता प्रमाणें सद्‌गुरु श्रीकृष्ण महाराज व माता रुक्मिणी देवी (मायबाई) लवकरच घरदार वैभवास सोडून पहिल्यांदा महारुद्र स्वाहाकार यज्ञ जन्म ग्रामी करुन आनंदानें गंगातटाकी जांभुळ बेटीं मोपेश्वरा संनिध राहिलें. तिथे सतत भागवत वाचन मनन व नित्य लिंगार्चन शिवपूजन क्रम चातुर्मासात असे त्यावेळी आसुरी प्रवृत्तीचे संस्थानिक राज्य असल्यामळे सर्वांना त्यांच्या जीवनाबद्दल अस्थिरता, असमाधान दिसून यते असे, कारण आपली तेजस्वी परंपरा, सत्य सनातन यज्ञ धर्माचा विसर पडला होता. दैत्य नाहिसे (असुरी प्रवृत्तीचे) नाहीसे होऊन परमोत्कर्ष साधण्यासाठी वेदमातेच्या धर्म मर्यादित राहूनच सर्व साधता येण्यासारखे होते.

आपली भारत माता भारतिय संस्कृती दिव्य तेजाने चमकावी दैवी संपत्तीचें साम्राज्य भारत भूमीवर प्रस्थापित व्हावे. दैवी सामर्थ्याने आपण सर्व सामर्थ्यवान व्हावे, हृदय दौर्बल्य नाहिसे होऊन आपणांत दिव्यत्वाची प्रेरणा मिळावी यासाठी व्यापक परमेश्वराचा यज्ञ कर्मानें पुजा करून पुर्ण कृपा संपादन करावी या सद्‌सद् विवेक बुद्धीनें सद्‌गुरू श्रीकृष्ण महाराजांनी तिथे वेदांनी प्रतिपादलेल्या सप्तसोमा पंकी, प्रकृती भुत प्रमुख श्रौतयाग (सोमयाग) करण्यांचे निश्चित केले.

अग्निहोत्र व्रताची आजन्म उपासना स्विकारलेल्या अग्निहोत्री उपासनें द्वारेच हा याग संपन्न होतो, म्हणून पुण्यपावन अशा गोदामाईचे तिरी वयाच्या २७ व्या वर्षी श्रौत दिक्षा सद्‌गुरु श्रीकृष्ण महाराजांनी घेवून दर्शपोर्णिमास, चातुर्मास्य याग, अग्निष्ठोनम ज्योतिष्ठोम स्वर्गसम अदि यागाची पुर्तता करुन 'सोमयाग' संपन्न केला. त्यावेळी काशींचे विद्वान कर्म कांडीया यागास आली होती, सतरा दिवस सतत २॥ लाख ते तीन लाख मंडळींना अन्नदान होत असे. आज प्रत्यक्ष त्या यागांस गेलेली मंडळी सांगतात त्या यज्ञात श्री निजरंग मूर्ती प्रगट रुपांत १७ दिवस होती. साधूचे वेषांत मौन धरुन खालिल ओव्यावरुन

त्या यज्ञी निजरंग मूर्ती प्रगटे की, पुर्णता कर्मिची ।
श्रीकृष्णाम्हूंता असेल आमुची ती ओळखी पुर्वीची ॥
रुद्राक्षे विभूती प्रसाद दिधला कल्याण ऽबोले गिरा ॥
निजरंगी रमलां अखंड गुरु तो श्रीकृष्ण योगी स्मरा ॥

(स्मृती कुसुमांजली)

सोम यागाचे अगोदरच श्री निजरंग कृपेने पहिले पुत्र रत्नजन्मास आले. माऊलीचे इच्छे नुसार रंगनाथ नांव ठेवण्यांत आले. तेच आजचे अग्निप्राण वाजपेयी प. पू. श्रीरंगनाथ कृष्ण सेलूकर होत. श्री गोदाकाठा सतत यज्ञ नारायणाचे अनुष्ठान व पायी काशीयात्रा यात त्यांचे एक तप लोटले पुढे परमगुरु श्री निजरंगनाथ स्वामीचें जन्म ग्रामी जाऊन जन जागृती करुन श्रीचा प्रतिवर्षी मार्गशिर्ष मासी दहा दिवस उत्सव चालू केला. सन १९३४ तो आज तगायत ५० वर्षापासून प्रतिवर्षी नाझरेकर मंडळी मोठ्या आत्मियतेनें करतात हे स्वाभिमानाने सांगावेसे वाटते.

सद्गुरु माऊलींच्या अंशतः ऋणांतुन उतराई व्हावी म्हणून श्रीकृष्ण सद्गुरु माऊलींनी श्रीनिजारंगनाथस्वामींचे ओवीबद्ध चरित्र त्या कालातच लिहिलें आहे. तोच श्रीरंग–लिलामृत ग्रंथ होय. श्रीरंगमूर्तीच्या असामान्य दिव्य जीवन चरित्रांवलोकनव नैतिक धार्मिक बंधनामुळे आपण सर्व त्या दयाघन प्रभुंचीच लेकुरे आहोत हीं भावनां रहाण्यांच चेतना मिळते.

संताच्या दिव्य ग्रंथा व लोकनानें माणूस देवत्व किंवा दिव्यावास पाहोंचतो,

यज्ञार्थात कर्मणो ऽन्यत्र लोको ऽयं कर्म बन्धन ।
तदर्थं कर्म कौंतेय मुक्त संङ्ग समाचार ॥
सहयज्ञाः प्रजा सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्य ध्वमेष वो ऽस्त्विष्ट काम धुक् ॥
देवांन भाव यतानेन ते देवा भाव यन्तु वः ।
परस्परं भावयन्तः श्रेयः परम् वाप्स्यथ ॥
(श्रीमद्भगवद्गीता)

वरील भगवंताच्या वचना प्रमाणें यज्ञ कर्माद्वारे हजारो शिष्य संप्रद याना सात्विक शिकवण देऊन वेद–मातेची अखंड अमोल कामगिरी बजावली. या कार्याचा विशेषत: वाटा म्हणजे वैराग्य मेरुमणी साध्वी मातोश्री मायराई (रुक्मिणी देवी) यांचा म्हणावा लागेल! त्यांचे कडकडीत वैराग्यशाली आचरण, पतीनिष्ठा, शुचित्व, क्षमा-रुपी शस्त्रच, संयमाची पराकाष्ठां आदि दैवी गुणांमुळे महाराजांचे जीवन शिवमय, ब्रह्ममय झाले. त्यांचे पावित्र्यच या दिव्य कार्यां कारणीभुत आहे त्या परमसाध्वो मातेच्या ठिकाणी चकून स्वप्नांत सुद्धा ऐहिक सुखोपभोग वासना स्पर्श करीत नसे पतीसेवेच्या रत्नमाला रत्नमाला शिवाय कंठी अन्य अलंकार नसे ! त्या 'वात्सल्य जिवा स्थाईभाव' सोम सम्राज्ञि मातेस (शिवशक्तीस) अत्यांदर पूर्वक अनंत प्रणाम । दंडवत ।

अशा प्रकारे प्रतीवर्षी कोटी लिंगार्चन चातुर्मास्य तद्-निमित्त महारुद्रस्वाहाकार सहस्त्र चंडी स्वाहाकार होत असे. जीवनांच्या अखेरच्या क्षणापर्यंत असंख्य याग संपन्न केले. संपूर्ण जीवनातील यज्ञ कर्मानुष्ठानाचे श्रेय सद्गुरु चरणी अर्पण करण्यासाठी शेवटचा याग व चातुर्मास्य श्रीसदानंद दत्त मठ कल्याण येथे सद्गुरु सान्निध्यात केला. त्यांच्या मनाचे ठिकाणी एक खंत होती. ती म्हणजे सप्त सोम यागाची. ते पत अपशु याग व्हावेत. पुढील कार्याची धूरा माझे जेष्ठ बंधूवर्य प.पु. पित्रतुल्य श्री रंगनाथ कृष्ण सेलूकर यांचेवर सोपवून वार्धक्यामुळे त्यांच्या इच्छेनुसार पुण्यपावन अशा गोदा मायाचे काठी श्रीक्षेत्र गंगागेड येथे माघ शु. ४ शके १८८८ रोजी सुर्योदयी जीवनाची पुर्णाहुती यज्ञेश्वरांस अर्पण करुन श्रीनिजरंगरुप झाले.

विराम प्रत्ययाभ्यास पूर्ण । संस्कारशेषोऽन्य ॥

भव प्रत्ययो विदेह प्रकृति लया नाम ॥ पातञ्जल योगसुत्र

वरील पातन्जल मुनीच्या श्रुतीप्रमाणें पुर्व कर्मयोगी विदेह देव व प्रकृतीत लय पावलेले योगी वैराग्यामुळे निर्विषय होऊन, वृत्तिमय कार्य करित नसलेने ' निर्विजसमाधी योगी' अखंड त्यागमय जीवन दर्शन यज्ञ कर्मानुष्ठाना द्वारे अनंत जीवाच्या कल्याणासाठी अवतार कार्यानुरुप करतात.

असेच यज्ञ दान तपः कर्म न त्याज्यं कार्यमेवतत् ।
यज्ञो दानं तपः चैव पावनानी मनीषिणाम् ॥
जिये यज्ञ दान तप दिके इये कर्मे आवश्यके ।
नियेन सांडावी पांथिके पाऊले जैसी ॥

वरील भगवंताच्या वचनाप्रमाणें माझे जेष्ठ बंधूवर्य पितृतुल्य प. पू. श्रीरंगनाथ कृष्ण सेलूकर यांनी परम पवित्र गोदातिरा श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रौत दिक्षा घेतली. श्रौत अग्निहोत्र घेतल्या पासून अवघ्या पांच ते सहा वर्षांत एका पाठोपाठ चातुर्मास्य याग, अग्निष्ठोत्र ज्योतीष्ठोत्र, स्वर्गसत्र प्रकृतीभुत प्रमुख श्रौत याग (सोमयाग) अग्निचयनयाग, वाजपेय याग बृहस्पतीसव अप्तोर्याम सोमयाग अशी सोम यागाची सप्तसंस्था पूर्ण करुन वेदमातेच्या यज्ञ कर्मानुष्ठांचा कळस काढला व घराण्यांच्या परंपरेचा अखंड तेजादिप निर्वाती तेवत ठवला, यामुळे निजरंग कृष्ण माऊलींची सदिच्छा पूर्ण झाल सद्गुरु श्रीकृष्ण माऊलीचे कार्यरुपानें प्रत्यक्ष दर्शन घडते, हा एक अलौकिक योगच म्हणावा लागेल.

परम पावन अशा भारत भुमित वेदातील श्रौत कर्मात पशु विरहीत यागामुळे अमुलाग्र बदल घडवून आणलेने आम्हां मुमुक्षुजनांना धोपट मार्ग मिळाला. या महान कार्या मुळे इतिहासात नविन नोंद झाली. या यज्ञेशाची सेवा अखंड घडो हीच याचना भगवान सद्गुरु माऊलीचे चरणी श्री निजरंग कृष्ण चरित्र स्मरणी करु या !

# आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर जीवनपट

संकलक– म. प. पेठे

जन्म : १५५० शके चा सुमार. आगलगांव येथे

कुल : ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र वसिष्ठ, शाखा आश्वलायन

आईवडील : सावित्री व ब्रह्मदेवभट् किंवा बाळंभट आडनाव जोशी

गुरु : रंगनाथ मोगरेकर काशीराज रघुनाथ नाशिकचे,

वास्तव्य : मूळगाव भालगांव

व्यवसाय : कीर्तनकार-प्रभावी गुरुभक्तीमुळे कीर्तन प्रसंगी वृंदावन डोलू लागे अशी आख्यायिका

शिष्य परिवार :

जीवनातील महत्वाच्या गोष्टी : विवाहानंतर पत्नीसह गुरुकडे रहावयास गेले.

मुलाचे नांव कृष्णमूर्ती

परंतु गुरु त्यांना सोडून सेकेश्वरला गेले, तेथे आनंदमूर्तींनी त्यांना गाठले. गुरुच्या समाधीनंतर ब्रह्मनाळ येथे वृंदावन स्थापून तेथे राहु लागले. संबधीत गुरुचे जोडे ठेवून त्याची पूजा करीत असत! ही गुरुभक्तीची परम सीमा,

ग्रंथ निर्मिती : रामचरित्र; करुणामृत, भूपाळ्या, पदे, आरत्या

समाधी : कार्तिक शुद्ध चतुर्दशी, शके १६१८, धाता संवत्सर सांगली जवळ ब्रह्मनाळ या गावी.

संदर्भ : महाराष्ट्र सारस्वत आ. ६ १९८३ (३३६–३४३) दासपंचायतन


श्रीनिजानंदरंगनाथस्वामी महाराज निगडीकर विशेषांकास आमच्या शुभेच्छा.

## दि किराणा भुसार कंझुमर्स को-ऑप. सोसायटी लि. पंढरपूर

सतत १७ वर्षे 'अ' वर्ग

पद्माकर वि. हरिदास — सेक्रेटरी

दामोदर विश्वनाथ नलबिलवार — चेअरमन

# श्री सद्गुरु
# आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर

– सौ. प्रफुल्लता श्रीकांत देशपांडे

परम कठिण शिळा डोंबी वृक्ष जैसा ।
जननी जठरी कुशी जन्मला कोण ऐसा ।
गुरु भजन प्रतापे ख्याती केली दिगंती ।
अनुदीन स्मर चित्ता स्वामी आनंद मूर्ती ।।

साक्षात परमानंदाची, ब्रह्मानंदाची मूर्ती म्हणजेच सांगली जिल्ह्यातील ब्रह्मनाळ ग्रामातील निजानंद समाधिस्त असलेली स्वामी आनंद मूर्ती ! ते लोकोध्दारक संत होते ज्या एकेकाळी मोगलाचे म्हणजे यवनांचे राज्य या भारत भूमिवर पसरले होते. बायी, ब्राह्मण व इतरे जनांचा सतत छळ होत होता. हा छळ परमेश्वर किती दिवस सहन करणार? या वसुंधरा मातेचा छळ कमी करण्यासाठी 'सर्वांची हरीला चिंता' या उक्ती प्रमाणें संत निर्मिती झाली यात प्रामुख्यानें, हिंदू धर्म समर्थ पंचायतनाचा फार मोठा वाटा आहे

मिरज प्रांता आगळ गांवी विद्वान कर्मठ ब्राह्मण बाळंभट जोशी हे रहात असत ते तेथील ग्राम जोशी होते. त्यांना दोन मुले. ही होती मोठा ,आनंद उर्फ अनत भट व दुसरा ब्रह्मदेव अनंत भट हेच पुढे आनंद मूर्ती या नावाने प्रसिद्ध आहेत.

आनंद मूर्तीचा जन्म शके १५५० मध्यें झाला. त्यांचा वेदाभ्यास वडीलांनीच करवून घेतला तसेच ते वैद्यक शास्त्रात हीं प्रविण होते. लहानपणी हुड पण अत्यंत प्रगल्भ बुद्धीचे असल्यामुळे अल्प वयातच संपूर्ण शिक्षण झाले. जुन्या रुढी व रिती रीवाजा प्रमाणें लग्न ही लहान वयातच झाले. ते वडिलांच्या बरोबरीने जवळ पासच्या खेड्यात जोशी पणा साठीही जात असत.

ढालगावच्या शेजारी निमज हे एक खेडेगांव आहे. या निमज गावी एक अभूत पूर्व घटना घडून आली साकेत वासी रामांश पुण्यश्लोक अशी महान विभूती श्रीरघुनाथ स्वामी अवतीर्ण झाले. या योगी मुनीने काशिची गंगा रामेश्वरास व रामेश्वरचा सेतू काशि विश्वनाथास बारा वेळा अर्पण करण्याचा संकल्प केला होता. अकरावेळा परी पूर्णता झाल्यावर ते बाराव्या वेळस तिर्थाटनास निघाले होते. वाटेत त्यांना निमज गावच्या शेजारील उजाड अरण्यात बेल गंगेच्या काठी त्यांना तिन्ही सांज झाली त्या वेळी त्यांनी तेथे सायं संध्या करण्याचा निर्णय घेतला त्यानी त्या निबिड अरण्यात कावड टेकविली त्यावर जवळील व्याघ्रांजीन पांघरवून आपण स्वत: ध्यानस्थ बसले जवळपासच्या लोकांचा व्याघ्राजीनस बघुन हिस्त्रश्वापद आल्याचा ग्रह झाला त्यांनी गावाकडे धूम ठोकली व सर्व ग्रामस्थ मंडळी व आप्पाजी पंत देशपांडे ढालगावचे हे मशाली टेंबे व बंदुका घेऊन अरण्याकडे धावले परंतु निरखून पाहता आप्पाजी पंत व इतरांच्या दृष्टीस ध्यान मग्न श्रींची मूर्ती पडली आणि तात्काळ त्यांच्या समीप जाऊन त्यांना साष्टांग नमस्कार घातला व आप्पाजी पंत हात जोडून घरी येण्या विषयी विनवू लागले तेव्हा रघुनाथ स्वामींनी त्याना शके १५६७ पार्थीव संवत्सरी माघ मासात पौर्णिमेच्या दिवशी प्रातःकाली तीन वर्षाच्या बाल रुपात तुझ्या घरी यऊन अनुग्रह दिक्षा देईन असे सांगितले कारण कीं, आम्ही बारा वर्षाचा तिर्थाटनाचा नियम असल्यामुळे गावात येऊ शकत नाही. तसेच आम्ही पूर्ण निराहार उपोषण व सैदव निरंजनी वास करण्याचे ठरविले आहे.

त्यांना दर्शनाचा ध्यास लागला व ते गुरुकृपेच्या क्षणाची प्रतिक्षा करु लागले त्या संकेत दिनी हे मालंकारानी भूषित त्रय वर्षाचे बाल अंगणी खेळू लागलें. आप्पाजी पंत देशपांड्यानीं अंतरीची खूण ओळखून त्याबालकांस लोटांगण घातले. व समर्थ रघुनाथ स्वामींनीं देखील आपले सत्य रुप प्रगट केलें. व भक्तास अलिंगन दिले. आप्पाजी पंत देशपांड्यानी गुरु पुजा करुन अनुग्रह घेतला.

आप्पाजी पंताना भगवत् स्वरुपाचे ज्ञान करुन देण्या साठी श्रीरघुनाथ स्वामींनी कांही काळ त्यांच्या घरीच वास्तव्य करण्याचे ठरविलें दररोज त्यांना परमार्थाच्या व वेदांच्या अनेक गोष्टी सांगू लागलें हें वर्तमान अनंत भटास कळाल्या बरोबर जातीचा कर्मठ जोशी ब्राह्मण क्रोधाग्नीने पेटून उठला कारण आम्ही जातीने वेदांत सांगणारे असताना असा कोण जोगडा या गावी येऊन पुराण कथन करींत असे! या संतापाने हाती काठी घेऊन भरां-भरा पंताच्या घरी गेलें. आणि माडीच्या पायऱ्या चढत असतानाच श्रीगुरु मुखातील अनुबोध कानावर पडला.

ब्राह्मण कुली झाला जन्म । सर्व वर्णात उत्तमोत्तम ।
ऐसे जन्मी जो विप्राधम । आत्मस्थिती नोळखे ।।

देहा भिमान मद्य पान । विद्या गर्वी पिशाच्चपण ।
मोह किरडे रोविले दशन । शुद्धी नुरली जयाला ।।
यती श्रेष्ठ जरी तो नर । परि तो रजका घरचा नर ।
निधी रिता हा विचार । आन येथे दिसेना ।।

स्वामीच्या वाणीतुन आलेल्या ह्या ओव्यांचा ओघात अनंत भटांच्या हृदयास भिडला आणि दाराच्या फटीतुन वाकुन पहात असतातांच सद्गुरु माऊलीचे दिव्य दर्शन घडले क्षणाची विद्युलता ब्रह्मांड उजळून टाकते त्याप्रमाणें यांचे अंत:करण समूळ बदलले गेले जे जोगड्याचा घडा शिकविण्यासाठी काठी घेऊन आले होते, ते त्यांच्या चरणावर लोळण घालू लागले. त्यांच्या सेवेत चार दोन दिवस घालवल्यावर पंतांच्या वाड्यात माघ महिन्यात अमृतसिद्धी गुरुपुष्यांमृत योगावर श्री रघुनाथ स्वामींनी अनंत भटास अनुग्रह केला. महामंत्र कानात सांगत असतानाच अनंत भटाची ब्रह्म नंदी तीन दिन समाधी लागली यानंतर श्रीगुरुंनी अनत भटास जड जीवितांचा उद्धार करण्यासाठीच तुमचा जन्म आहे म्हणजेज

अवता तुम्हा धराया कारण । उद्धराया जन जडजीवा ।

असे सांगून सिताकांत प्रभू रामचंद्राचे निर्गुण निराकार असे प्रत्यक्ष दर्शन घडविले. अशाप्रकारे गुरुकृपा झाल्या नतर ते स्व गृही गेले. तो पर्यंत त्यांचे वडील श्री बाळंभट यांना सर्व वर्तमान समजलेच होते. त्यांच्या कर्मट बुद्धिला हे न पटल्यामुळे त्यांना घरातून हाकलून दिले तान्हे दोन महिन्याचे बाळ घेऊन महान साध्वी पतीव्रता सखूबाई सही नवऱ्या पाठोपाठ घराबाहेर हाकलून दिले. तेव्हा अनंत भट आपल्या गृहणीसह वर्तमान श्रीगुरुचरणातली आश्रयास आले हे सर्वजन तिथून निघून डालगांवच्या पश्चिम दिशेस कृष्णावेदा संगमावर बसगड यागावी श्रीमहालक्ष्मी मंदिरात येऊन पोहोचले. हे गुरुशिष्य डालगावच्या बाहेर पडल्यावर इकडे आप्पाजीपंत देशपांड्याचावाडा सोडून संपूर्ण डालगांव जळून खाक झाले

त्यानंतर बसवडे गांवच्या लोकानी त्याना मुद्दाम पिशाच्च बाधीत घर दिले. तर तेथ या गुरुशिष्याचे चरण लागल्या बरोबर ते पिशाच्च हात जोडून समोर उभे राहिले दुसरे दिवशी त्या ब्रह्म सबंधास स्वामीनी कृष्णा वेदा संगमावर नेऊन कृपाकटाक्षाने व गंगा स्नानानें मुक्ती दिली. तेव्हां सर्व लोक शरण आलें.

बसगडे गावचे लोक याना शिधा सामग्री देत असत कोणी गाई, धन, जे कांही घडेल म्हणजे अल्पदान महापुण्य या प्रमाणें दान देत असत. रघुनाथस्वामी रोज गाय शिडविण्यासाठी गंगा तीरी जात व एका दगडावर स्नान संध्या करीत असत एक जण रोज त्या शिळेची पूजा करी तेव्हा त्याचा भक्ती भाव जाणून रघुनाथस्वमीच्या कृपेनें शिळेवर मारुती मूर्ती उलटली अद्यापही ती बसवडे ग्रामी विठ्ठल मंदिरात आहे

एकदा रघुनाथस्वामींनी तीन अंगूली निर्देश करुन निघून गेले ते एकांत अशा संकेश्वर ठिकाणी जाउन राहिले तीन दिवस पर्यंत आनंदमूर्तींनी वाट पाहिली परतु गुरुमूर्ती परत न आल्यामुळे बेचैन होऊन शोधार्थ निघाले.

माझी गुरुमूर्ती कुणी तरी दावा हो ।
माऊली कृपाळू मनी भावा हो ।।

असे म्हणत त्यांनी तिन वर्षात सर्व भारतातील तिर्थ क्षत्रांच्या ठिकाणी जाऊन शोध करुन परत फिरत फिरत संकेश्वराच्या जवळ एका गुरविणोला वर्णन सांगीतल्या वरुन तिने वर्णनाचा योगी संकेश्वरास असल्याचे सांगीतले परंतु तीने आनंदमूर्तींना तेथे न जाण्या विषयी विनविलें. कारण तेथे हिस्त्र पशूंची वस्ती होती. परंतु ते गुरु भक्तिने भारावलेले असल्यामुळे कशाचे ही भय न धारता जेथे रघुनाथ स्वामी ध्यानस्त बसले होते. तेथे ते येऊन पोहोचले तेव्हां त्याना असे झाले की,

वत्सासी जैसी गाय । बालकासी तैसी माया ।

असा ब्रह्मानंद झाला. स्वामीनी अनंतास हृदयासी धरले. गुरु माऊलीस पाहताच अनंतानें म्हटले-

तू तर चराचर जननी । आम्ही अपत्ये पशू समानी ।।
क्षोभ न धरावा मनी । सखी जननी तू आम्हा ।।

बालकास पाहून गुरु माऊलीचे अत:करण द्रवले व उभयतांच्या नेत्रातून आनंदाश्रू वाहू लागले.

रघुनाथस्वामीनी (तीन संकेत म्हणजे तिन वर्षे झाले होते) तिन वर्षात जेवढी अनुष्ठाने झाली त्याचे सर्व पुण्य अनंताच्या सत्वासाठी व योगक्षेमार्थ त्यास आपिले व आनंदमूर्ती अभिधान ठेवले.

या अनुष्ठाना प्रित्यर्थ संकेश्वर स्थळी पुरण पोळया पक्वान्न करुन ब्राह्मण भोजन घालून ते पूढे निघाले.

जात असता वाटेत एके ठिकाणी एक साठ वर्षांची साध्वी स्त्रि स्वामींच्या दर्शनास आली असता "पुत्रवती भव" असा आशिवाद दिला. " साधु वचन न जाये खोटे " त्या प्रमाणें त्या स्त्रिस रज ही गेले असताना पुत्र रत्न झाले. त्या नंतर त्या स्त्रिने पुत्र पती सहवंतमान बसवड ग्रामी येऊन श्रीगुरुपुजन थाटामाटानें करुन ब्राह्मण भोजन घातले.

या नंतर यती रघुनाथनी आपले उर्वरीत कार्य आनंदमूर्ती वर सोपवून स्वत: समाधी घेण्याचें निश्चित केले

शके पंधराशे एकूण नव्वदाशी
लवंग संवस्तर नभस्य मासी (भाद्रपद मासी)
शुक्लपक्ष द्वितीयेसी । अवतार समाप्त रविवारी ।।

श्रीरघुनाथस्वामींची इच्छा कृष्णा तीरी देहत्याग करण्याची असल्यामुळे आनंदमूर्तींनी त्यांच्या चडजीवाचा सर्व विधी ब्रह्मनाळक्षेत्री कृष्णा तीरी केला व तेथेच समाधी बांधून श्रीगुरु पादुकेची प्रतिष्ठापना केली.

पुढे पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यासाठी आनंद मूर्तींनी सर्व साहित्य जमा केले. परतु योगी यांचे पुण्यतिथीस साहीत्याच्या ऐवजी संताचीच गरज असने

त्या प्रमाणें वडगावाहून जयरामस्वामी, चाफळहून रामदासस्वामी रंगनाथस्वामी व निगडीहून केशवस्वामी भागानगरहून येत असत व उत्सव सोहळा अती आनंदाने किर्तन भजन गजरात परीपुर्ण झाला. दर वर्षीच हे सर्व पंचायतन तेथे जमे त्यावेळी या सर्वांचें काम सखुबाईसच करणें पडे पांडुरंग ज्या प्रमाणें धुणा दळण कांडण जनाबाईस करु लागे त्या प्रमाणें जयरामस्वामी सखुबाईस तिच्या सर्व कामात मदत करीत असत. हे आनंदमूर्तींना कळलें तेव्हा आनंदमूर्तींनी जयरामस्वामींना सांगितले की, आम्हा दुष्टास हि सेवा घेण्यास लावू नका तेंव्हा जयरामस्वामींनी सांगितले, सखुबाई माझी मुलगी आहे मी तिला सर्व कामात मदत करु लागणार त्यावेळे पासून त्याना वडगावी जावा याचा मान मिळात असे.

एकदा रंगनाथ स्वामी रघुनाथस्वामींच्या पुण्य तिथीचा दिवस विसरलें माध्यानीच्या स्नानाच्या संकल्पाच्या वेळी भाद्रपद शुक्ल द्वितीया उच्चारताच त्यांना रघुनाथ स्वामीच्या पुण्य तिथीची आठवण झाली तेव्हा ते तावडतोब आपल्या 'मनोहर' नामक अश्वावर आरुढ होऊन तिन प्रहारात सव्वीस कोस मजल मारुन संध्या समयी ब्रह्मानळास पोहचलें इकडे आनंदमूर्ती रंगनाथाची मार्ग प्रतिक्षा करीत अन्न प्राशन न करता बसले होते. जेव्हा घोड्याचा खिंकाळण्याचा आवाज ऐकला तेव्हां आनंदमूर्ती आत्यानंदानें सामोरे आले. एकमेकांचे क्षमालिंगन झाल्यावर प्रसादग्रहण केला. नंतर कितंनास उभारले कितंना नंतर पाहतात तो रंगमूर्तीचा घोडा अचेतन पडला होता हे पाहुन स्वामींना अतिशय वाईट वाटले तेव्हां रंगनाथस्वामी म्हणालें ज्या स्वामी रघुनाथ दयाळाच्या उत्सवास आलो असता त्यांच्या दरबारात घोड्याने मरावे हे विपरीत घडलेच कसे हें अपशय घालविणेंसाठी आनंदमूर्तींनी आश्वाच्या शवावर समाधिचें तिर्थ सिंचन करुन हात फिरवित म्हटले, जर तु खरच खगपाळ (गरुडाचा अंश ) असशील तर सर्व श्रम त्याग करुन उठशिल आणि काय आश्चर्य खरोखरच अश्व उठून उभा राहिला व सर्वांनाच आत्यानंद झाला.

ब्रह्मनळ क्षेत्री रामनवमीचा उत्सव ही मोठ्यां थाटाने होत होता. व अद्यापही चालू आहेच. यासाठी एकदा रंगनाथस्वामी व जयराम स्वामी वडगावकर यांचे शिष्य गोपाळ स्वामी निघालें वाटेत महारुद्र पंत कुलकर्णी नांवाचे भाविक सद्गृस्थ आपल्या शेतात काम करत होते त्याना ही या दोघानीं आग्रह करुन त्याना उत्सवासाठी ब्रह्मानळी नेले. चार दिवस उत्सव समारंभात मनास आनंद मिळाल्यावर महारुद्र पंतानी श्री रंगनाथस्वामींचा उपदेश घेण्याचे मनी चितले व आपला मनोदय श्री गुरूस ही बोलुन दाखविला. तेव्हा रंगनाथ स्वामीनी आनंदमूर्ती तुम्हास उपदेश करतील, असे सांगितलें तेव्हा महारुद्र पंताना मनी थोडासा संशय आला. परंतु त्यांनी तो मना मध्येच ठेवला हे अंतरीक रंगनाथस्वामी जाणलें. दुसरे दिवशी कृष्णातिरी आनंदमूर्ती व रंगनाथस्वामी स्नानास गेले. असताना तेथ योगायोगाने महारुद्र पंत ही आले जेव्हा महारुद्र पंताची दृष्टी या उभतावर पडली तेव्हां त्यांना ते एकरुपच दिसले अशा प्रकारे त्यांच्या मनातला संशय काढुन टाकून आनंदमूर्तींचे शिष्यत्व पत्करण्यास लावले.

करवीर आश्रमी श्रीशंकरभारतीं यांच्या पौष महिन्यात पुण्यतिथी मोहोत्सवास दरवर्षी नेंमाने आनंदमूर्ती जात असत त्यांना असे कळले कीं, कृष्णातिरी एक अनुष्ठानी ब्राह्मण रहात असून तो चार प्रहर ध्यानस्त बसतो व संध्याकाळी कृष्णेंच्या जळात नैवद्य अर्पण करतो त्यावेळी कृष्णा वेणी स्वत: दोन्ही हात वर काढुन तो नैवेद्य ग्रहण करते तेव्हां त्या द्विजास नमस्कार करुन पुढे करविरास जाण्याचा हेतु आनंदमूर्तीनी मनी कल्पीला व आपल्या घोडीवर स्वार होऊन ते निघाले कृष्णातिरी त्या तपस्व्याच्या मठा समीर येऊन थांबले व त्याच्या शिष्यास म्हणाले मला द्विज वर्याचे दर्शन घऊन लगच निघावयाचें आहे तरी मला दर्शन देण्याची विनंती द्विजवरास करावी, परंतु आपल्या चमत्काराचा अभिमान झालेल्या त्या ब्राह्मणानी या संत महात्म्याचा अधिकार न ओळखुन दर्शन देण्याचे नाकारले. तेव्हा त्यांनी त्या मठास पांच वेळा प्रदक्षिणा घालून सत्वर घोडीवर आरुढ होऊन पुढे निघाले. इकडे ते तपस्वी दररोज च्या प्रमाणें संध्या समयी कृष्णेंत नैवेद्य अर्पण्यास गेले परंतु कृष्णवेण्यांचे दोन हात वर आलें नाहीत ज्वला मध्येच नैवेद्य सोडून तें माघारे फिरलें. रात्री त्यांना कांही केल्या झोप लागेना. त्यांना दृष्टांतात कृष्णवेणानी वेताच्या काठीने ताडन केले. 'हत् भाग्या दुरात्म्या' म्हणून अपशद्बानी अवमानीत केलें. आनंदमूर्ती परम माहात्म असे साधु दारी आले होते परंतु तुझ्या दैवात नसल्यानें तुला त्यांचे दर्शन होऊ शकले नाही तुझी सर्व तपश्चर्या फुकट गेली. असे म्हणताच ब्राह्मण निसत्व झाला, त्यास अतिशय दुःख झाले पूर्वी ज्ञानोबानें चांगदेवाचा गर्व हरण केला होता त्याप्रमाणेंच येथे ही या अल्प बुद्धी द्विजवराचा गर्व हरण झाला. त्याच पाऊली तो करविरास जाऊन आनंदमूर्तीस शरण गेला व आपल्या बरोबर मठात परत घेऊन आले दुसरे दिवशी यथासांग पुजाअर्चा करुन तिन्ही सांजेच्यावेळी

कृष्णेंत नैवेद्य अर्पण करण्यासाठी आनंदमूर्तीसह गेले असता कृष्णेंतून रत्न जडीत कंकण युक्त दोन हात नैवेद्य ग्रहणा–साठी वर आले. आनंदमूर्ती व तस्वी ब्राह्मणास एकमेकाचा अधिकार समजून आला उभयतानी एकमेकास दृढ प्रेमा–लिंगन दिले व आंतरी समाधान पावले.

एकदा श्रीरघुनाथस्वामीची पुण्यतिथी असता भद्र–पद प्रतिपदेस किर्तन उभा राहिलें. मध्य रात्रीच्या समयास पखवाजाचा एवढा उच्चस्वर लागली की, मिरजेच्या राज वाड्यात असलेल्या बादशहा दिलेंलखानाच्या कानावर पोहोचला व त्याची झोप मोड झाली त्यामुळे चिडून त्यानी तावडतोब आनंदमूर्तीस कैद करण्यास स्वार पाठविले व त्यांना पकडून मिरजेच्या किल्यात बंदीस्त केले. दुसरे दिवशी द्वितीया पुण्यतिथीचा दिवस असल्यामुळें सर्वजण चिंतेत पडले 'ज्याचे अंतरी तळमळ। त्यासी कृपा असे प्रबळ' रघुनाथस्वामींनी एका विप्राचा वेश घेऊन श्रीकृष्णाला बंदी खांनातून सोडविले. त्या प्रमाणें बादशहाच्या जेलची कड्या कुलपे तशीच ठेवून आनंदमूर्तीस मुक्त केले व ब्रह्म-नळच्या रस्त्या पर्यंत आणून सोडविले आणि स्वतः अंतर्धान पावलें. ही वार्ता ऐकताच दिलेंलखानास आश्चर्यही वाटले व राग ही आला त्यांनी मनोमनी यायोगी पुरुषास भ्रष्ट करण्याचे ठरविले व आपल्या सैनिकास आनंदमूर्तीस बोला-वण्यास पाठविले आनंदमूर्ती सर्व सेवकासह मिरजेस आले. तेव्हां त्या यवनानें त्यांची पूजा करून सत्कार केल व मिर जेंतच कांही दिवस राहण्याची विनंती केली एका ब्राह्म–णाच्या घरी राहण्यासाठी जागा देऊन सर्व खर्चाचाभार स्वतः उचलला दररोज अन्न सामुग्री, पूजासामुग्री, पुष्पे वगैरे दिलेरखान आनंदमूर्तीस सेवकांच्या हस्ते पोहोचते करीत असे एके दिवशी दिलेरखानाने कपट बुद्धीने रुप्याच्या ताटात मांस घालून फुले आहे असे सांगून पाठवून दिलें त्या ताटावर आनंदमूर्तीनी अंतरीक जाणून मंत्रोदक शिंपडुन झाकण काढल्या बरोबर त्या मांसाचे रुपांतर अनेक पुष्पात झालें त्यांच्या या आगाध लिलेंने विस्मय चकित होऊन दिलेंरखान चकीत झाला व त्यांने अनेक गांवे आनंदमूर्तीस इनाम म्हणून दिले व मठ ही बांधून दिला.

एकदा रामदासस्वामीना असे वाटले की, मिरजेत मठ बांधून सांप्रदाय वाढवावा या हेतुनें ते सांगलीस आनं–दमूर्तीकडें आले तेथे जयरामस्वामी ही होते ते तिघे मिळून मिरजेत ब्राह्मणपूरीत येवून राहिले दररोज रामदासस्वामी गावात किर्तनें करुन व भक्ति महीमा पटवून देऊ लागले एके दिवसी ते किर्तन करीत असतानाच दिलेरखान तेथ आला होता त्याला किर्तनातील कथेत गोडी लागली किर्तनात रामदास स्वामीनी सांगीतलेंकी संत समागन, साधु संगत एक घटकाभर जरी घडली तरी तात्काळ रामदर्शन घडते. आहो! साखरें शेजारी मोठ ठेवल्यावर मिठाची रुची बदलेल काय? नाही जातीच्या दुष्टाला संतमहिमा कळणार कसा? मना मध्ये संशय बुद्धी ठेवून दुसरे दिवशी दिलेंरखानांने कारकुनास त्या तिघांना बोलावून आणण्यास सांगितले त्यावेळी सकाळीच रामदासस्वामी कृष्णास्नना साठी गेलें होते आनंद मूर्ती व जयरामस्वामीना घेऊन कारकुन परत आला नमस्कार वगैरे करून झाल्या नंतर गप्पा गोष्टीत चार तास गेले तेव्हां दिलेंरखान विचारु लागला काल किर्तनात काय सांगितले होते संतसंगतीने राम भेट। दोन घटींकेत निश्चित। तुमचे संगतीत माझे चार तास गेले तरी मला का राम भेटत नाही तेव्हा आनंद मूर्तीनी सांगितलेकी याचे उत्तर रामदासच देतील तेव्हा रामदासाना ही बोलविण्यात आलें त्यानांहि दिलेंरखानाने तेच विचारलें व म्हणाला जर मला रामदर्शन घडले नाही तर तुम्हाला योग भ्रष्ट करीन व तुमचा आचार धर्म बुडवून टाकीन तेव्हा रघुनाथाला स्मरुन याला कांहीतरी विपरीत लिला करून दाखविण्यासाठी ते तिघेजण किल्या-च्या तटा जवळ आलें गुरु स्मरण करुन बुरुच्या असलेल्या बंदुकीच्या गोळ्या मारण्याच्या छिद्रातुन ते तिघे पक्षाप्रमाणें बाहेर पडली व त्यातुनच दिलेलखानास येण्यासाठी हाक मारू लागली व म्हणाले ये इथेच रामदर्शन मिळेल परंतु हाच्यावर कोठे गुरुकृपा होती! तो विस्मय चकीत होऊन अपराध क्षमेसाठी धरणीवर गडबडा लोळू लागला संत सज्जन हे दयेचे सागर असतात अहो! गंगेत अनेक घाणीची गटारे येऊन मिळाले तरी गंगा त्यांना ढकलून देतें नाही तर त्यांना पोटात समावून घेते.

'गावरसे भरले। पाणीं पाठी पाय देत आले।
ते गंगा काय म्हणीतले। परतेसर ॥ ( ज्ञाने. )

तसे या यवनाचे अपराध यांनी पोटी घातले. नंतर दिलेरखानाने पश्चाताप पाऊन त्यांचा सत्कार केला व मिरजेत मठ बांधून दिला आनंदमूर्तींची गहिण वेणाबाई हि रामदासांची शिष्यीण होती तिला स्वामीनीं त्या मठाचा अधिकार दिला. अद्यापही तो वेंणाबाईचा मठ म्हणून प्रसिद्ध आहे.

दर वर्षी रघुनाथ स्वामीच्या पुण्यतिथी उत्सव रामनवमी उत्सव हे मोठ्या यथायोग्य प्रकारे करण्यासाठी कांही वेळी आनंदमूर्तींना भिक्षाटन करावे लागे काही वेळेस ऋण ही काढावे लागे भिक्षा ही भरपूर मिळत नसे हें पन्हाळ्याच्या मामलेदाराने धर्मानुकुल बुद्धीनें आनंदमूर्ती स्वतःजवळ असलेल्या भरपूर धनातून कांही देण्याचें ठरविले. त्यांनी आनंदमूर्तींना बोलावुन

घेऊन मान सन्मानानें सत्कार करुन भरपूर द्रव्य व उत्तम वस्त्रे देऊन भूषीत केले हे सर्व होना मोहरासह द्रव्य घेउन सांगलीस परत निघाले तेव्हा एका मांग रामोशानें द्रव्य हरण करण्यासाठी पाठलाग सुरू केला आनंदमूर्ती मार्ग क्रमीत पुढे चालले व पाठीमागे रामोशी दबा धरुन चालत होता आनंदमूर्तींना तो लुटणार एव्हढ्यात त्याच्या दृष्टीस दोन धनुर्धर पडले असे तीनवेळा झाले. चालताना दिसत नसत तर लुटण्याच्या वेळी धनुर्धर दिसत असत. आनंदमूर्तीस याची कांही कल्पना नव्हती शेवटी तो मांग रामोशी शरण आला. तेव्हा आनंद मूर्तीला म्हणाले की, आम्ही चोर आहोत. परंतु तुमचे द्रव्य घ्यावें. म्हणून प्रयत्न करतो तर दोन धनुर्धारी दिसतात तेव्हा आनंदमूर्तींना सुद्धा विस्मय चकीत झाले ते रामोशास म्हणाले तुम्ही पुण्यवान आहात तुम्हास राम दर्शन झालें, पुढे तेच यांचे निस्सीम भक्त होउन त्यांचे रक्षण करु लागले.

एकदा राम नवमी करिता रंगनाथस्वामी व जयराम स्वामींचे पट्ट शिष्य गोपाळस्वामी निघाले असता वाटेत पर्जन्य वृष्टी झाली व कृष्णेला पूर आला होता. तेव्हां पुढे कसे जावयाचे याची काळजी दोघाना लागली तेव्हा रघुनाथ स्वामीवर भार टाकून पात्रात उडी घेतली व उलटया प्रवाहात गुरुकृपेनें सहाकोस ब्रह्मनाळी येऊन पोहोचले तेंव्हा आनंदमूर्तीसह सर्वांना त्यांच्या या दुर्गम कृत्याबद्दल विस्मय वाटला.

पुण्यतिथी व रामनवमीच्या उत्सवाला रघुनाथ-स्वामीच्या समाधीचे वृंदावन डोलत असे श्री शिवाजी महाराजाचा पुत्र सुमती यांचा प्रतिनिधी परशुरामपंत यांनी यवनानी रायगड पन्हाळ्यास त्रास दिल्याचे समज-ल्यावरुन त्यांच्यावर स्वारी करण्याचे ठरविले. जात असता वाटेत त्यांच्या फौजेचा मुक्काम ब्रह्मनाळ येथे पडला तेथें हेंही वृंदावनाच्या डोलाची [कथा ऐकल्यांवर वृन्दावनाचा डोल कसा होतो हे खरे खोटे पाहण्यासाठी स्वतःच कितंनाला उभारले.

'कीतंन रंगी नाचे पांडुरंग ' म्हटल्याप्रमाणें वृंदावन डोलू लागले. तेंव्हां संशय येऊन पंतानी संकेतावरुन वृंदाव-नावर भाले भोपळे ठेवण्यास सुचविले अहो गुरु परीक्षा कोण घेऊ शकणार आहे ते भोपळे, भालें डोला सारखे नदीत पडले. त्यांच्या मनीचा संशय समूळ नष्ट झाला तेव्हा आनंदमूर्तींना कळले तेव्हा ते गुरुस छळल्यामुळे क्रोधाविष्ट होऊन शापोक्ती बोलू लागलें हे ऐकून पंताना अतिशय भिती वाटू लागली. शेवटी यवनान बरोबर तुंबळ युद्ध होऊन पराभव झाला. व त्यांच्या पाठीशी यवन लागले तेंव्हा घाबरुन पळ काढून आनंदमूर्ती पाशी आश्रयास आले व केलेल्या आपराधाची क्षमा मागू लागले. दया सागर गुरु मूर्तींनी ब्राह्मण म्हणून त्यांचा अपराध क्षमा केला:

जयराम स्वामी ब्रह्मानंदी लिन झाल्यावर त्यांच्या आस्थी घेहून श्रीगुरु रंगनाथस्वामी गया श्राद्ध करण्याच्या हेतूनें निघाले होते त्यानी जाताना आनंदमूर्तीस रघुनाथ स्वामीच्या आस्थि घऊन यात्रेस जाऊ या असे म्हटले तेंव्हा आनंदमूर्तींना काळजी वाटू लागली की स्वामीचा उत्सव निकट आला आहे तेंव्हा जाणे योग्य नाही ते म्हणाले–

आजो काशि विश्वनाथ । साक्षात तोची सद्गुरुनाथ
तयाचे चरणोदके कृतार्थ । होणें दुर्लभ या जन्मी ॥

तेव्हा रंगनाथस्वामीनी सांगितले. अरे ज्यांचा उत्सव आहे त्याचे त्याला काळजी आहे.तू का वृथा काळजी करतोस,

रात्री रघुनाथ स्वामीना स्वप्नात येऊन आनंदमूर्तींना यात्रेस जाण्या विषयी आज्ञा दिली. ते दोघे मग ''कृष्णाजी-नात आस्थि'' वेष्टून घेऊन रघुनाथांचा जय जयकार करुन निघाले.

जात असता वाटेत एका सावकाराच्या वाड्यात उतरले. तेथे त्यांनी स्नान संध्या करुन गुरु पादुकेची पूजा केली व ते चरणोदक दारात शिंपडून जागा शुद्ध केली त्या सावकाराची पत्नी ब्रह्मसबंधाने पछाडलेली होती तिच्या अंगावर त्यातील एक थेंब सहजगत्या पडला व ती निपचीत पडली. तिच्या अंगातील ब्रह्मसंबंध या उभयतास शरण व उद्धारासाठी याचना करु लागला तो म्हणाला मी या वंशाचा नायनाट करणारा होतो. माझे पाचशे रुपये देणें आहे. आता माझा उद्धार करुन ते पांचशे रुपये मी आपल्या चरणी अर्पण करतो. तेंव्हा त्या दोघानी ते पैसे रघुनाथ स्वामीच्या पुण्यतिथीस पाठवून दिले व त्या ब्रह्मसंबंधाला वाराणसीला नेऊन गंगा स्नान घातले व ' मुक्तोभव ' या उच्चारा सरशी त्याला मुक्ती दिली. नंतर ते दोघे गया श्राद्ध करुन परत आले

एकदा नागठाण्यास आनंदमूर्ती ब्राह्मणीकडे उतरले होते. दररोज भक्त लोक शिदा सामुग्री आणून देत असत त्या ब्राह्मणीकडे म्हैस असल्याने ती त्याना दूध, दही, ताक लोणी प्रिती पूर्वक प्रिती पूर्वक चाडत असे. ते माध्यान स्नानाचे वेळी दररोज म्हैस व रेडकू यानाही बरोबर नेत असत. एके दिवशी म्हशीस चरावयास सोडून ते स्नान संध्या करण्यास गेलें. तो वर लांडग्यानें रेडकास खाऊन टाकले परत येते समयी त्याना रेडकाचे स्मरण झालें. तेव्हा रेडकू कांही दिसेना शोधाशोध व्यर्थ गेली शेवटी म्हशीस घेऊन घरी परत आलें व म्हातारीस सर्व हकीगत सांगीतली सर्व प्रकार कळल्यावर म्हातारी रडू लागली व दुर्भीसणे करु

लागली रात्री म्हैस कांही धार देईना तेंव्हा आनंदमूर्ती म्हशीच्या जवळ आले व तिच्या पाठीवर हात फिरऊन म्हणालें, जन्म मरण हा नियतीचा खेळ आहे.

रेडकाचा वृथ शोक कां करतेस पुन्हा गर्भवती न राहता कायम लोकांच्या उपयोगासाठी दूध देत रहा व काय आश्चर्य म्हैस चरव्या भर भरुन दूध देऊ लागली.

एकदा केशवस्वामी हैद्राबाद शहरात कितनासाठी उभे राहीले असता त्यानी गुरु महात्म्यकथन करु लागलें गुरु भक्त परायण गुरु सेवेसी तत्पर असा एक महात्मा हणजे केवळ आनंदमूर्तीच असे सांगितले व त्याना येवढी तिव्रतेनें आनंदमूर्तींची अठवण झाली की तावडतोब त्याना भेटावे असे वाटलें त्यान श्रवणासाठी बसलेल्या भक्तांना सांगीतलं जो कोणी मला तावडतोब आनदमूर्तींची भेट करुन देईल त्याला मी ज्या दोन तिर्थ यात्रा केल्या आहेत त्या पैकी एकाचे पुण्य अर्पण करीन असे ते सहज बोलून गले त्याच दिवशी आनदमूर्ती हैद्राबाद शहरी आलेल होते. हे केशव स्वमीना माहित नव्हते. एका ब्राम्हणास ते माहित होते. व तो धावतच गेला व निद्रिस्त आनंदमूर्तीचे पाय चूरु लागला जागृती झल्या नंतर आनंदमूर्तींनी विचारले हे विप्र तुझा काय विचार आहे तेव्हा माझे चरण चुरतोस तो ब्राह्मण म्हणाला माझ्या दरीद्रयाच्या हातुन कांही महा-यात्रा घडणार नाहीत मला ते पुण्य तुमची व केशव-स्वामींची भेट घडवून दिल्यावर मिळणार आहे तेव्हा श्रम जरा झालें तरी माझ्या बरोब तावडतोब चला व मला पावन करा ते म्हणालें अरे यात्रेपेक्षा, आमच्या दोघाच्या भेटीत जो ब्रह्मानंद उचंबळेल तो जर तू त्यांच्या जवळ मागणार असशील तर मी येतो. ब्राह्मणानें विचार केला आयत्यावेळी काय मागायचे ते बघू म्हणाला चला ठिक आहे. कितन रगात तल्लीन झालेल्या केशव-स्वामीचे लक्ष तेथे येत असलेल्या आनंदमूर्तीकडे गेलें. व ते धावतच त्यांच्या जवळ गेलें व त्या दोघांनी एकमेकावर दृढ आलिंगन दिले व ब्रह्मानदात बुडालें. हे पाहून विप्राचे देहभानच हरपलें व त्यांचीच ब्रह्मानंदी टाळी लागली तो जेव्हा भानावर आला. तेव्हा त्याला आपल्या यात्रा सुकृताचें संकल्पानें दान करण्यासाठी केशवस्वामी तयारच होते. त्या ब्राह्मणानें दोघांच्या चरणावर लोळन घेऊन सांगितलें स्वामी तीर्थयात्रा व संत दर्शन एकच आहेत मला आनंद-मूर्तींची आपुली मिळणी । होता आनंद उभय मनी ।। तदंश देई मज लागुनी । यात्रा सुकृत नलगे मज ।।

केशवस्वामीनी ही आनंदमूर्तींची शिकवण आहे हे ताडलें. त्याविप्राचा भाग्योदय त्याच्या घरीं चालून आला होता.

गुरु घाली ज्ञानांजन । गुरु दाखवी निजधन ।
गुरु सबाह्य देऊन । स्वात्मबोध नांदतसे ।

या उक्ती प्रमाणें त्या ब्राम्हणाच्या मस्तकावर केशव स्वामीनीं हस्त ठेवला तेंव्हा

विप्र ब्रम्हैक्यता पावला । ऐशीया पदवी लागी आला ।
दुर्लभ लाभ तुटला । अचुंबीत हस्ताग्री ।।

गुरु कृपेविन सर्व काही व्यर्थच आहे-

आनंदमूर्तींच्याकडे दररोज सकाळी सद्गुरुंची काकडा आरती, अभिषेकपूजा, माध्यांन्ही भोजन पंक्ती, संध्याकाळी पंचपदी आरती वगैरे नित्यनैमित्तीक चालें असेच एकदा दुपारच्या भोजन पंक्तीच्या वेळी एक ब्राम्हण भिक्षेसाठी आला आनंदमूर्ती त्या अथित्यास म्हणाले येथे पंक्ती उठत असताना तुला घासभर मधुकरी नेंण्याचें काय कारण तू येथेच कृष्णेंत स्नान करुन येऊन प्रसादास बैस. तेंव्हा पंक्तीतला ब्राम्हण एकदम उसळून म्हणालें तो पापिष्ट व धर्मभ्रष्ट आहे. तो आमच्या पंक्तीस बसु शकणार नाही. तो वेळ पर्यंत तो ब्राम्हण स्नान करुन आला. आनदमूर्ती तो सद्गुरुशी शरण आलेला आहे गुरुद्वारात आल्याबरोबर त्याची मुखचर्या पालटली आहे तुम्ही त्याला पंक्तीत घ्या नाही म्हणू नका तेंव्हा सर्वद्विजवर म्हणालें अहो स्वामीजी तो चांडाळ मातृगमन करणारा पापिष्ट आहे त्याला आमचें मध्ये स्थान नाही आनंदमूर्ती म्हणालें आपण याला पाप मुक्त करण्यासाठी वृंदावना पर्यंत नेंऊ या. याचा जर उद्धार व्हावयाचा असेल तर समाधीचें तिर्थोदक याला दिल्यावर वृंदावनाचा डोल जाईल.

सर्व विप्रमेळा त्या ब्राह्मणास घेऊन वृंदावनापाशी आला. तेथे आनंदमूर्ती गुरुचरणोदक त्याला देऊन त्याच्या अंगावरही सिंचन केले ते म्हणाले आपण सर्वजण देखील रघुनाथस्वामींचे अवयवच आहेत तेंव्हा आपलेही अंगुष्ठ तीर्थ याला देतो. स्वामीनी सर्व तीर्थोदक त्यांच्या अंगावर सिंचन केले सर्वांनी मिळून रघुनाथस्वामी महाराज की जय असा जयघोष केल्याबरोर त्या ब्राह्मणाच्या अंगातुन पाप बाहेर पडलें व तो उजजळून निघाला व वृंदावनाचा डोल झाला अहो म्हटलें कशाला-

संत पदाची जोड । देरे हरी साधु पदाची जोड ।।

गुरुसी जो शरण रिघाला तो सदेह स्वर्गी ... म्हणतात मग पाप, निचरा या गोष्टींचे निवारण गुरुकृपेनें होणार नाही काय ?

एके समयी आनंदमूर्ती स्नान संध्या करुन गुरुचे ध्यान करीत असताना ते मानसपूजा करु लागलें. त्यात त्यानी गुरुला सर्व अर्पण केलें परन्तु बोटांत अंगठी घालण्याचे विसरलें. ध्यान संपउन पाहतात तो ताह्मनात दोन रत्नजडीत

म्हणजे मुनिमानसहंस असून त्यांच्याशी हा रंगनाथ पूर्णपणें रंगून व तरुण गेला आहे. हा विश्वास मनी ठेवा.

खरोखरीच हे पद वाचतांना संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील एक ओवी आठवते.

आता हृदय हे आपुले । चौफाळुनिया भलें ।
वरीं बैसऊं पाऊलें । श्रीगुरुची ॥

सुन्दर रचना असणारें व हृदयीचे बोल व्यक्त करणारे हे पहा ते पद

### श्रीरंगनाथ स्वामींचे पद

रामदास चतुराक्षारि मंत्र जप वारंवार
दुस्तरतर भवसागरतारक सच्चित्सुखसार ॥धृ॥
रामदास द्वय अभिन्न नामें गोडी शर्करा ।
राहटे परिमळ भुवनी हाती घेतां कर्पुरा ।
राजति वर्तूळशा त्या पदि ते जीवन की गारा ।
राजाधिराज अवतरला हा या जगदोद्धारा ॥१॥
मनुष्यरुपे विलसे परि हा पर्ि पूर्णकाम ।
मकराकृति कुंडले पहात। स्वतः सिद्धहेम ।
मण्डण संत सभेचे साधक जनासि विश्राम ।
मस्तकमणि हा शतकोटींचे निजगुज श्रीराम ॥२॥
दास तो उदास सेवुनी परमामृत कंदा :
दाता स्वात्मसुखाचा निरसुनि विषयांचा धंदा ।
दानकुल षड्वैरि मर्दूनी तारित मतिमंदा ।
दारा द्रव्य त्यजुनी सत्वर सद्भावे वंदा ॥३॥
सद्गुरुराज विराजत करुनी सज्जन गिरिवास ।
सर्वस्वेंसी शरण रिघावे धरुनिया कास ।
सत्य सनातन श्रीगुरु समर्थ मुनिमानसहंस ।
सहज - पूर्ण निजरंग रंगला तारक विश्वास ॥४॥

जय जय रंगनाथ माऊली दयाळे रंगनाथ महाराज
श्रीरंगनाथ जयरंगनाथ जय जय निजानंद रंगनाथ ॥
जय जय गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्मसद्गुरु ॥

---

अंकातुन प्रसिद्ध होणाऱ्या लेखांचें विचाराशी संपादक सहमत असतातच असे नाही.


श्रीनिजानंद रंगनाथस्वामी महाराज निगडीकर
विशेषांकास आमच्या शुभेच्छा

**नाही चोरांची भिती,**
कारण सिमेंट पाईप वजनदार असतात.

**नाही पोरांची भिती,**
कारण सिमेंट पाईप एक इंच जाड असल्याने फुटतुटीची भिती नाही.

**नाही आगीची भिती,**
सिमेंट, वाळू आणि सळई न जळणाऱ्या वस्तू पासुन सिमेंट पाईप तयार केलेला असतो, त्यामुळे

**सिमेंट पाईपला पर्याय नाही.**
आणि

**दर्जेदार सिमेंट पाईप साठी–**

**श्रीसंत नामदेव सिमेंट प्रॉडक्टस् इण्ड.प्रा. लि.**
द्वारा
सचलीत

**सिमेंट पाईप कारखाना**

**इसबावी** ता. पंढरपूर
पत्रपेटी क्र ४८, पंढरपूर ☎ ४२२

पान १६७ वरुन

आंगठ्यां दिसल्या त्याना वाटलें या कोणी दिल्या म्हणून उचलून पाहतात तो त्या हात तूनच गुप्त झाल्या व नंतर पुन्हा त्याच आंगठ्या ताह्मनात दिसू लागल्या तेंव्हां त्यांच्या लक्षात आलं कीं मानस पूजेमध्ये गुरुस आंगठीं समर्पणाचे विसरलो.

स्वस्तीश्री शालिवाहन शकें १६१८ धाता संवत्सरामध्ये कार्तिक शुद्ध चतुर्दशीच्या दिवशी आनंदमूर्ती गुरु पादुकाचे पुजन करीत होते प्रात:कालच्या पवित्र वातावरणात वेदांचे स्वर उमटत होते. स्त्रियांच्या सडा संमार्जन.मुळे कंकणाचा मजूळ स्वर निनादत होता. पक्षांची कुजनें चालू होती प्रत्येक जण आपल्या कामात मग्न होता एवढ्यात एक ब्राह्मण आनंद मूर्तीच्या समीप आला व जवळ येऊन म्हणाला, आज वैकुण्ठ चतुर्दशीचा महत पुण्य दिवस आहे. संतांचे कार्य लोकोद्धारार्थ असते आपले कार्य पूर्ण झालेलें आहें तेंव्हा आज आपण अवतार कार्य संपविण्यास कांही हरकत नाही आजचा सुदीन व्यर्थ दवडू नये आनंद मुर्तींनी त्या ब्राह्मणास नमस्कार करुन आज्ञा प्रमाण मानली तो ब्राह्मण तेथून बाहेर पडला. आनंदमूर्तिनी सर्व लोकास सांगितले की, प्रत्येक जण आपापले काम आवरुन रामनाम जप व पुराण श्रवणासाठीया ब्राह्मण वचना वरुन मी आपले कार्य आज संपवणार आहे. 'ब्राह्मवाक्य व ब्रह्म वाक्य' सारखेच असते. विष्णूनेंच ब्राह्मण रुपाने मला आज्ञा केली आहे. माझे शव ब्रह्मानळ येथे नेऊन गुरु सानीध्यात सर्व विधी करावा. असे सांगून त्यानी गुरु पादुके पूजा करुन स्वत: ध्यानस्थ बसले. सर्व ब्रह्मवृंद उच्चस्वरी मंत्रघोष करीत होता. रामनाम अबाल वृद्ध घेत होते. स्वामींनी एकदम उच्च स्वराने सिताकांत स्मरण केले व आपले शरीर गुरु पादुकेवर लोटून गुरु चरणी विलीन केले. त्यावेळी स्वर्गात सुद्धा दुदुंभी नाद झाला.



वर्गणीदार, जाहिरातदार, अजीव सभासद हितचिंतक यांना नूतन वर्ष सुख समृद्धिचे व आनंदाचे जावो.



# सा. पंढरी संदेश

२५२८ दर्शन मंडप नजीक,

**श्रीक्षेत्र पंढरपूर.**

जि. सोलापुर

☎ २९४

वार्षिक वर्गणी २५ रु.

... ११५ रु.